(अ) कोणत्याही पदावरील, संवर्गातील किंवा सेवेतील नेमणुकीसाठी एकाच तुकडीत निवड होऊन थेट भरती झालेल्या व्यक्तींनी नेमणूक आदेश निघाल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत किंवा सक्षम प्राधिकारी स्वविवेकानुसार वाढवून देईल अशा कालावधीत जर नेमणुकीचा स्वीकार केला असेल तर त्यांच्या आपसातील ज्येष्ठता आयोगाने वा निवड मंडळाने किंवा प्रकरणपरत्वे सक्षम प्राधिका-याकडून नामनिर्देशनाद्वारे झालेल्या थेट भरतीच्या बाबतीत सदर सक्षम प्राधिका-याने लावलेल्या पसंतीक्रमानुसार निर्धारित केली जाईल.

(ब) निवड सूचीतून पदोन्नती मिळालेल्या शासकीय कर्मचा-यांच्या बाबतीत अशा निवडसूचीत त्यांची नावे ज्या क्रमाने असतील त्याच क्रमानुसार त्यांची आपसातील ज्येष्ठता राहील, जर निवडसूची दोन भागात तयार केलेली असेल तर, पहिल्या भागात बिनशर्त निवड झालेल्यांची नावे अंतर्भूत असतील व दुस-या भागात निवड झालेल्यांची नावे असतील. पहिल्या भागात

समाविष्ट झालेल्या सर्व व्यक्तींचा क्रम दुस-या भागातील समाविष्ट केलेल्या व्यक्तींच्या वर लागेल.

परंतु निवड सूचीतील नावे ज्या क्रमाने लावलेली आहेत तो क्रम मागाहून आढावा घेतल्यामुळे बदलण्यात आला तर, संबंधित शासकीय कर्मचा-यांचा ज्येष्ठताक्रम त्यांच्या या सुधारित क्रमानुसार फेरमांडणी करण्यात येऊन निर्धारित केला जाईल.

(क) बदली झालेल्या शासकीय कर्मचारी ज्या पदावर, संवर्गात किंवा सेवेत तो बदली झालेला आहे त्या पदावरील, संवर्गातील किंवा सेवेतील अन्य शासकीय कर्मचा-यांच्या तुलनेने त्याची ज्येष्ठता, तो जेथे बदली झाला त्या पदाचा, संवर्गाचा किंवा सेवेचा वर्ग आणि वेतनमान, तेथील त्याचा सेवाकाल आणि त्याच्या बदलीस कारणीभूत झालेली परिस्थिती यथायोग्यपणे लक्षात घेऊन सक्षम प्राधिकारी निर्धारित करील.

(३) जेथे कोणत्याही दोन किंवा अधिक व्यक्तींच्या नावे एखादे पद, संवर्ग किंवा सेवा यातील नेमणुकीच्या तारखा, आवश्यक तर, मानीव तारीख नेमून दिल्यानंतर निर्धारित केलेल्या तारखा एकच असतील तर, वयाने ज्येष्ठ असलेली व्यक्ती ज्येष्ठताक्रम निर्धारित करण्याच्या प्रयोजनार्थ ज्येष्ठ म्हणून मानली जाईल.

५. <u>नेमणुकीच्या मानीव तारखा नेमून देणे :-</u>

(१) नियम ४ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, पुढील पोटनियमात अंतर्भूत केलेल्या तरतुदीनुसार सक्षम प्राधिकारी शासकीय कर्मचा-यास एखादे पद, संवर्ग किंवा सेवा यामधील त्याच्या प्रत्यक्ष नेमणुकीच्या तारखेपेक्षा जी वेगळी आहे अशी तारीख तेथील नेमणुकीची मानीव तारीख म्हणून नेमून देऊ शकेल आणि अशी मानीव तारीख नेमून देण्यात आल्यावर, उक्त पद, संवर्ग किंवा सेवा यातील त्याचा सेवाकाल त्या तारखेपासून सुरु झाला असे समजून त्याची गणना केली जाईल.

(२) जेव्हा एकाच तुकडीत निवड होऊन थेट भरती झालेल्या व्यक्ती वेगवेगळया तारखांना कामावर रुजू झाल्या असतील आणि प्रत्यक्षात ज्या तारखांना त्यांची नेमणूक झाली त्या तारखा कालानुक्रमे नियम ४ च्या पोटनियम (२) च्या खंड (अ) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे त्यांच्या आपसातील ज्येष्ठताक्रमाशी अनुरुप नसतील तेव्हा, जी व्यक्ती वरच्या क्रमावर असेल पण आपणापेक्षा कनिष्ठ असलेल्या व्यक्तींच्या नंतर कामावर रुजू झाली असेल तिला खालच्या क्रमावर असलेली व्यक्ती ज्या तारखेस कामावर रुजू झाली असेल ती तारीख तिच्या नेमणुकीची मानीव तारीख म्हणून नेमून दिली जाईल. मात्र वरच्या क्रमावर असलेली व्यक्ती आपल्या नेमणुकीच्या तारखेपासून तीस दिवसांच्या कालावधीत किंवा सक्षम प्राधिकारी वाढवून देईल अशा मुदतीत कामावर रुजू झाली असली पाहिजे.

(३) जेव्हा कोणत्याही निवड सूचीप्रमाणे जे दोन किंवा अधिक शासकीय कर्मचारी कोणतेही वरचे पद, संवर्ग किंवा सेवा यातील पदोन्नतीसाठी पात्र आहेत अशांना अशी वरची पदे, संवर्ग किंवा सेवा यामध्ये पदोन्नती मिळाली असेल आणि प्रत्यक्षात ज्या तारखांना असे शासकीय कर्मचारी अशा वरच्या पदांवर, संवर्गात किंवा सेवेत रुजू झाले त्या तारखा कालानुक्रमे नियम ४ च्या पोटनियम (२) च्या खंड (अ) मध्ये तरतुद केल्याप्रमाणे त्यांच्या आपसातील ज्येष्ठताक्रमाशी अनुरुप नसतील तेंव्हा, जर एखादी ज्येष्ठ व्यक्ती आपणापेक्षा कनिष्ठ असलेल्या व्यक्तींच्या नंतर कामावर रुजू झाली तर तिला, कनिष्ठ असलेली व्यक्ती ज्या तारखेस कामावर रुजू झाली असेल ती तारीख नेमणुकीची मानीव तारीख म्हणून नेमून दिली जाईल.

(४) पदोन्नत व्यक्तींचा ज्येष्ठताक्रम नियम ४ च्या पोटनियम (२) च्या खंड (ब) मधील परंतुकात तरतूद केल्याप्रमाणे फेरमांडणी करुन निर्धारित केला असेल त्याबाबतीत, त्यांना पदोन्नतीच्या मानीव तारखा नेमून दिल्या जातील किंवा जर त्या आधीच नेमून दिलेल्या असतील तर, याप्रमाणे फेरमांडणी करुन निर्धारित केलेल्या त्यांच्या ज्येष्ठताक्रमांशी कालानुक्रमे अनुरुप होईल अशा त-हेने त्या तारखा सुधारण्यात येतील.

(५) ज्या शासकीय कर्मचा-याचे नाव निवड सूचीत समाविष्ट केलेले आहे त्याच्याविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही चालू असल्यामुळे त्याची त्यास निवडसूचीतील त्याच्या क्रमाप्रमाणे प्रत्यक्षात पदोन्नती दिलेली नसेल, आणि अशी शिस्तभंग कार्यवाही संपल्यानंतर त्याची पदोन्नती झाली असेल, तेथे त्या प्रकरणाची परिस्थिती आणि शिस्तभंग कार्यवाहीचा निर्णय यथायोग्यपणे लक्षात घेऊन, सक्षम प्राधिकारी त्या कर्मचा-यास निवडसूचीतील त्याच्या क्रमानुरुप नव्हे तर अन्यथा निर्धारित केलेली नेमणुकीची मानीव तारीख नेमून देऊ शकेल.

(६) निवडसूची तयार करीत असताना जर एखाद्या शासकीय कर्मचा-यास डावलण्यात आले आणि त्याच्या प्रकरणाचा फेर आढावा घेताना एकतर सक्षम प्राधिका-याने स्वत: होऊन किंवा न्यायालयाने किंवा त्या संबंधात अधिकार प्रदान केलेल्या अन्य कोणत्याही प्राधिका-याने ही कारवाई मागाहून रद्द ठरवली तर, अशा शासकीय कर्मचा-याची प्रत्यक्ष पदोन्नती झाल्यावर त्याला याप्रमाणे डावलण्यात आले नसते तर ज्या तारखेस त्याची पदोन्नती झाली असती ती त्याच्या नेमणुकीची मानीव तारीख म्हणून नेमून देण्यात येईल.

(७) बदली झालेल्या शासकीय कर्मचा-याची ज्या पदावरुन, संवर्गातून किंवा सेवेतून बदली झाली आहे त्याचा वर्ग आणि वेतनमान, त्यातील त्याचा सेवावधी आणि त्याच्या बदलीस कारणीभूत झालेली परिस्थिती ही यथायोग्यपणे लक्षात घेऊन सक्षम प्राधिकारी ठरविल ती तारीख नेमणुकीची मानीव तारीख म्हणून नेमून दिली जाईल. जर बदली झालेल्या शासकीय कर्मचा-याची नेमणूक आयोगाशी विचारविनिमय करुन झाली असेल तर आयोगाशी विचारविनिमय करुन मानीव तारीख निर्धारित केली जाईल.

६. **<u>अभावित नेमणूक कोणती ते ठरविणे</u>** :- जेव्हा एखाद्या पदात, संवर्गात किंवा सेवेत नेमणूक केलेली असेल तेव्हा, सक्षम प्राधिकारी ती नेमणूक अभावित आहे किंवा कसे ते ठरविल आणि नेमणूक अभावित असल्यास त्यानुसार प्रमाणपत्रात नमूद करील.

परंतु, अशा प्रमाणपत्राची नोंद केली नसेल आणि जर, या प्रकरणी नेमणूक नैमित्तिक होती असे कोणत्याही नंतरच्या तारखेस आढळून आले तर, त्यामुळे आपली नेमणुक अभावित होत नाही असे समजण्यास भाग पाडण्याचा हक्क कोणत्याही व्यक्तीस प्राप्त होणार नाही.

७. **<u>विवक्षित बाबत नियम शिथील करण्याचा अधिकार</u>** :- पूर्वगामी नियमात काहीही अंतर्भूत असले तरी, जेव्हा आयोगाच्या कक्षेतील पदांच्या बाबतीत आयोगाशी विचारविनिमय केल्यानंतर जर शासनाची अशी खात्री झाली की, या नियमापैकी कोणत्याही नियमाची अंमलबजावणी केल्यामुळे कोणत्याही शासकीय कर्मचा-यास किंवा शासकीय कर्मचा-यांच्या एखाद्या वर्गास गैरवाजवी तोशीस सोसावी लागत आहे किंवा सोसावी लागण्याचा संभव आहे. अथवा लोकहिताच्या दृष्टीने नियम शिथील करणे आवश्यक आहे, तर ती कारणे लेखी नमूद करुन त्या कारणांस्तव अशा शासकीय कर्मचा-यांच्या बाबतीत किंवा अशा शासकीय कर्मचा-यांच्या वर्गाच्या बाबतीत आदेशाद्वारे असे निदेशित करु शकेल की, अशा तरतुदी अशा आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल त्याप्रमाणे, पण त्यांच्या आशयाला बाधा आणणार नाहीत अशा फेरबदलांसह अशा शासकीय कर्मचा-याला किंवा शासकीय कर्मचा-यांच्या वर्गाला लागू होतील.

परंतु अशा शासकीय कर्मचा-याचे किंवा शासकीय कर्मचा-यांच्या वर्गाचे प्रकरण न्यायोचित रीतीने हाताळता यावे आणि या नियमात तरतूद केलेल्या स्वरुपाचे लाभ प्रदान करता यावेत यासाठीच फक्त याप्रमाणे नियम शिथील करता येतील किंवा निदेश देता येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

एस.एच.ठाकर
शासनाचे सचिव.

एच ३२२(ए)(४०००-७-०९)-२३१

अधिक्रमित झालेल्यांना पूर्वलक्षी प्रभावाने पदोन्नती देण्यासंबंधीचे स्पष्टीकरण....

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रक ज्ञापन क्र.एसआरव्ही/१०८२/बारा.
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १४ सप्टेंबर, १९८२.

वाचा :- १) शासन परिपत्रक ज्ञापन,सा.प्र.वि.क्र.एसआरव्ही-१०६४-डी,दि.२५-२-१९६५
२) शासन परिपत्रक ज्ञापन,सा.प्र.वि.क्र.एसआरव्ही-१०६९-डी,दि.९-९-१९६९
३) शासन परिपत्रक ज्ञापन,सा.प्र.वि.क्र.एसआरव्ही-१०७९/बारा, दि.२४-१०-१९७९

## परिपत्रक ज्ञापन

शासनाच्या सामान्य प्रशासन विभाग,क्र.एसआरव्ही-१०७९/१२, दिनांक २४.१०.७९ च्या परिपत्रक ज्ञापनानुसार असे आदेश देण्यात आले आहेत की, एखाद्या प्रकरणी जर कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीस प्रशासकीय कारणास्तव विलंब झाला असेल, तर त्याला पदोन्नतीचा त्याच्या निकटच्या कनिष्ठ कर्मचाऱ्यांच्या प्रत्यक्ष पदोन्नतीच्या दिनांकाच्या आधारे मानीव दिनांक देण्यात यावा, आणि त्यास शासन परिपत्रक ज्ञापन, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-एसआरव्ही/१०६४-डी. दिनांक २५.२.१९६५ मधील परिच्छेद ३ मधील आदेशानुसार त्या पदाचे देय वेतन व भत्ते थकबाकीसह देण्यात यावे. या आदेशाच्या संदर्भात विस्ताराने स्पष्टीकरण करतांना शासन असे स्पष्ट करते की, जर प्रशासकीय विलंब तीन महिन्यापेक्षा अधिक कालावधीचा असेल तरच परिपत्रकांमध्ये आदेशीत केल्याप्रमाणे संबंधीत कर्मचाऱ्यास पदोन्नतीचा मानीव दिनांक आणि परिणामी देय वेतन व भत्ते यांचा फायदा थकबाकीसह देण्यात यावा.

२. शासन आणखी असा खुलासा करीत आहे की जर कनिष्ठ कर्मचाऱ्यांना प्रशासकीय कारणास्तव थोड्या कालावधीसाठी आकस्मिक (Fortuitous) पदोन्नती देण्यात आल्या असतील तर अशा प्रकरणी वरील संदर्भाधीन आदेश लागू होणार नाहीत.

हे आदेश वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१०५९५, दिनांक १६.८.१९८२ च्या संमतीने निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशाने व नावाने.

सही/-
( व. अ. कोटेश्वर )
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

राज्यपालांचे सचिव,
मुख्यमंत्र्यांचे सचिव,
महालेखापाल, महाराष्ट्र १, मुंबई
महालेखापाल, महाराष्ट्र २, नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी मुंबई
निवासी लेखा परीक्षा अधिकारी
वित्त विभाग,
सर्व मंत्रालयीन विभाग

D:\Desk 12\G R 14-9-1982

(१०३)

कनिष्ठ पद/संवर्ग/सेवामधून वरिष्ठ पद/संवर्ग/सेवामधील पदोन्नती करताना पाळावयाची तत्वे. — ७३ —

2 3 JUN 1983
शाखा- EST

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय, क्रमांक:-एसआरव्ही-१०७७/सीआर ३४३/७९/१२,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक १८ मे १९८३.

वाचा:- १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-एसआरव्ही १०७४/डी दिनांक २८/१/१९७५.

२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-एसआरव्ही १०७५/३४२/१०, दिनांक १/४/७६.

३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-एसआरव्ही १०७७/३६५८/१२, दिनांक १९/९/७७.

४) शासन परिपत्रक, ज्ञापन क्रमांक-एसआरव्ही-१०७८/३१२/१२, दिनांक ७/२/१९७९.

शासन निर्णय :- शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-एसआरव्ही १०७४/डी, दिनांक २८ जानेवारी १९७५ मधील आदेशाप्रमाणे, शासन सेवेतील वर्ग १ मधील प्रथम पदोन्नती वरील पदोन्नत्या निश्चित गुणवत्तेच्या निकषानी केल्या जातात आणि वर्ग १ मधील प्रथम पदोन्नती पर्यंतच्या सर्व पदोन्नत्या ''जेष्ठतेप्रमाणे योग्यता'' पाहून ( Seniority subject to fitness ) केल्या जातात. पदोन्नती करताना गुणवत्तेला अधिकाधिक वाव देण्याच्या दृष्टीने, शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही १०७५/३४२/१०, दिनांक १ एप्रिल १९७६ अन्वये आदेशित करण्यात आले की, वर्ग १ मधील प्रथम पदोन्नती पर्यंतच्या सर्व पदोन्नत्या करताना त्यातील २५ टक्के जागा केवळ गुणवत्तेच्या आधारावर जेष्ठतेचा विचार न करता भरण्यासाठी राखून ठेवाव्यात. या आदेशानुसार वर्ग १ मधील प्रथम पदोन्नतीसाठीच्या पदावर पदोन्नती देण्यासाठी निवडसूची तयार करताना ७५ टक्के जागा नेहमीच्या ''जेष्ठता व योग्यता'' या निकषाव्दारे आणि उरलेल्या २५ टक्के जागा ''निश्चित गुणवत्तेच्या'' निकषाव्दारे भरावयाच्या असतात.

शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, या आदेशाची अंमलबजावणी करताना काही व्यावहारिक अडचणी उत्पन्न होतात. म्हणून या आदेशांचे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या सल्ल्याने पुनर्विलोकन करण्यात आले. या विषयाचा सखोल आणि सांगोपांग विचार करून शासन खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

(अ) विशिष्ट गुणवत्ता धारकांसाठी २५ टक्के पदे राखीव ठेवण्यासंबंधीचे शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-एसआरव्ही १०७५/३४२/१०, दि. १/४/१९७६ व्दारा निर्गमित झालेले आदेश आता मागे घेण्यात येत आहेत.

कृ. मा. प.

(ब) सर्व पदोन्नतीमध्ये अत्युकृष्ट अहवाल असणा-यांचा अंतर्भाव निवड सूचीमध्ये करताना ४ जागा पर्यंतचे वरचे स्थान देण्याच्या विद्यमान प्रथे ऐवजी ६ जागा पर्यंतचे वरचे स्थान देण्यात यावे.

(क) निवड समितीने निवड सूची तयार करताना पुरेशा व्यक्तींचा विचार करावा या दृष्टीने जेव्हा निवड सूची २५ किंवा कमी नावांची करावयाची असेल तेव्हा निवड समितीच्या विचारार्थ असलेल्या अधिका-यांची संख्या तयार करावयाच्या निवड सूचीच्या तिप्पट संख्येइतकी असावी जेव्हा निवड सूची २५ पेक्षा अधिक नावाची असेल तेव्हा समितीच्या विचारार्थ अधिका-यांचा संख्या निवड सूचीच्या दुप्पट इतकी असावी.

(ड) २५ टक्के पदावर गुणवत्तेच्या निकषावर ज्या अधिका-यांना पदोन्नत्या आधीच देण्यात आल्या आहेत त्याचा फेर विचार करण्यात येऊ नये. केवळ ज्या निवड सूचीमध्ये ज्यांचा या निकषांच्या आधारावर अंतर्भाव झाला असेल, परंतु अद्याप ज्याना अशा पदोन्नत्या देण्यात आल्या नाहीत त्यांची नावे निवडसूचीमधून वगळण्यात यावीत व तेवढयापुरता निवडसूचीचा भाग रद्द समजण्यात यावा. तसेच विद्यमान नियमानुसार निवड सूचीत चार स्थानापर्यंत वरचे स्थान देण्याऐवजी सहा स्थानापर्यंत वरचे स्थान देण्याचा विचार वर दर्शविल्याप्रमाणे या पुढे व्हावा

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

व. अं. कोटेश्वर
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

राज्यपालांचे सचिव,
मुख्यमंत्र्यांचे सचिव,/उपमुख्यमंत्र्यांचे सचिव,
* प्रबंधक, मुंबई उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई,
* निबंधक, मुंबई उच्च न्यायालय व अपील बाजू, मुंबई,
* प्रबंधक, लोकायुक्त व उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग,
* वेगवेगळया मंत्रालयीन विभागाच्या अखत्यारीत सर्व विभागीय व कार्यालयीन प्रमुख,
सर्व मंत्रालयीन विभाग,

* पत्राने.

------

कनिष्ठ पद/संवर्ग सेवांमधून वरिष्ठ पद/ संवर्ग/सेवांमधील पदोन्नती करताना पाळण्याची तत्वे.

-75-

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांकःएसआरव्ही-१०७७/सीआर-३४३/७९/१२,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक ३ डिसेंबर १९८३.

वाचा :- १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांकःएसआरव्ही-१०७४/डी, दिनांक २८-१-१९७५.

२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांकः एसआरव्ही-१०७५/३४२/१०, दिनांक १-४-१९७६.

३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांकः एसआरव्ही-१०७७/३६५८/१२, दिनांक १९-९-१९७७.

४) शासन परिपत्रक, ज्ञापन क्रमांकःएसआरव्ही-१०७८/३१२/१२, दिनांक ७-२-१९७९.

५) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांकःएसआरव्ही-१०७७/सीआर-३४३/७९/१२, दिनांक १८ मे १९८३.

शासन निर्णय :- शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांकःएसआरव्ही-१०७७/सीआर-३४३/७९/१२, दिनांक १८ मे १९८३ मधील आदेशांनुसार शासन सेवेतील वर्ग १ मधील प्रथम पदोन्नती पर्यंतच्या पदोन्नती करताना त्यातील २५ टक्के जागा केवळ गुणवत्तेच्या निकषांवर जेष्ठतेचा विचार न करता पदोन्नतीने कराव्यात हे आदेश रद्द करण्यात आले आहेत. तसेच दिनांक १८-५-८३ रोजी वापरात असलेल्या निवड सूचीच्या न संपलेल्या भागात जी नावे केवळ गुणवत्तेच्या निकषांवर अंतर्भूत केलेली असतील ती निवडसूचीतून वगळण्यात यावीत असेही आदेश देण्यात आलेले आहेत.

उपरोक्त आदेश दिनांक १८ मे १९८३ चे असल्यामुळे साहजिकच दिनांक १८ मे १९८३ पर्यंत गुणवत्ता निकषानुसार ज्या पदोन्नत्या करण्यात आल्या त्यांचाच केवळ फेरविचार करण्यात येऊ नये अशी अनेक विभागांची समजूत झालेली आहे, असे शासनाच्या निदर्शनास आणण्यात आले आहे. त्यामुळे सर्व संबंधितांच्या माहितीसाठी असे स्पष्ट करण्यात येत आहे की, १८ मे १९८३ रोजी अस्तित्वात असलेल्या निवड सूचीतील गुणवत्तेवर आधारित सर्वच उमेदवारांच्या पदोन्नत्या रद्द कराव्यात असा शासनाचा उद्देश नाही. दि. १८ मे १९८३ चे आदेश संबंधितांना प्राप्त होण्यास लागणारा कमी अधिक कालावधी लक्षात घेऊन शासन असे आदेश देत आहे की, दिनांक १८ मे १९८३ चे आदेश विभाग/विभागाध्यक्षांना/मिळालेल्या दिनांकापर्यंत किंवा १७ जून १९८३ पर्यंत, जे आधी घडेल तोपर्यंत, गुणवत्तेच्या निकषांवर ज्या पदोन्नती करण्यात आल्या त्यांचा फेरविचार करण्यात येऊ नये.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

व. अं. कोटेश्वर,
सह सचिव, महाराष्ट्र शासन.

(कृ. मा. प.)

जिल्हाधिकारी रत्नागिरी
-कार्यालय-
21 DEC 1983

**निवडसूची**
**बनविण्यासंबंधीचे नियम विहीत करण्याबाबत.**

महाराष्ट्र शासन.
सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रक क्र.एसआरव्ही-१०८१/१२५१/सीआर-६/८५/१२,
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २३ जुलै, १९८५.

वाचा :- (१) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक-एसआरव्ही-१०७४/दहा, दिनांक ११ सप्टेंबर १९७५.
(२) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक-एसआरव्ही-१०७९/७४०/१२, दिनांक ७ एप्रिल १९७९

**शासन परिपत्रक**

शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-एसआरव्ही-१०७४/दहा, दिनांक ११ सप्टेंबर, १९७५ अन्वये शासन सेवेतील पदोन्नती देण्यासाठी निवडसूची तयार करण्यासंबंधीच्या नियमांचे प्रारुप विहीत करण्यात आले आहे. या प्रारुप नियमांत वेळोवेळी अनेक दुरुस्त्या करण्यात आल्या आहेत. या सर्व दुरुस्त्यांचे संकलन करुन प्रारुप नियमांत आणखी काही सुधारणा करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परामर्षाने सुधारीत प्रारुप नियमांचा मसुदा तयार करण्यात आला आहे. प्रमाणित मसुदा सोबतच्या जोडपत्रात दिला आहे.

२. प्रत्येक मंत्रालयीन विभागांनी, त्यांच्या नियंत्रणाखालील सेवांमधील/पदांवरील/श्रेणीमधील/ पदोन्नतीसाठी तयार करावयाच्या निवडसूची बद्दलचे नियम तयार करावेत अशा सूचना सामान्य प्रशासन विभागाच्या क्रमांक- एसआरव्ही/१०७९/७४०/१२, दिनांक ७ एप्रिल, १९७९ च्या परिपत्रकान्वये दिल्या आहेत. मंत्रालयातील सर्व विभागांनी, त्यांच्या नियंत्रणाखालील सेवा / पदां/ श्रेणीवरील पदोन्नतीसाठी, प्रमाणित मसुद्यांतील सुधारित नियमांनुसार निवडसूची तयार करण्यासंबंधीचे नियम सुधारित अथवा नव्याने विहीत करण्याची कार्यवाही करावी.

३. निवडसूची तयार करण्यासंबंधीचे नियम भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३०९ खालील परंतुकान्वये विहीत करावयाचे आहेत. अतएव, त्या नियमांच्या मसुद्यात सामान्य प्रशासन विभागाची, लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील पदांच्या संदर्भात लोकसेवा आयोगाची आणि विधी व न्याय विभागाची सहमती मिळविणे आवश्यक आहे. तद्नंतर प्रारुप नियमांत राज्यपालांची अनुमती घ्यावी.

महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही /-
( व. अं. कोटेश्वर )
सह सचिव, महाराष्ट्र शासन

## NOTIFICATION

Department,

Mantralaya, Bombay - 400 032

Dated the

**Constitution of India**

No.

In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of Constitution of India 1(and in supersession of all existing rules, orders or instruments made in this behalf) the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules for preparation, maintenance and revision of Select List of the persons holding the post of 2------------------------------------------ in the 3 ----------------------------------------Department/ office for the purpose of promotion to the post of 4------------------------------------------------------------ ------------------------------------ namely :-

1. Short title - These rules may be called the Select List for promotion to the post of 5--------------------------- in the 6 ----------- ------------------------------------ Department (Preparation, Maintenance and Revision Rules, 198

2. Definitions - In these rules, unless the context otherwise requires -

(a) "Commission" means the Maharashtra Public Service Commission.

(b) "Committee" means the Selection Committee constituted under rule 3;

1. To be retained only when any rules or instruments are in force and are required to be superseded.
2. Here mention the name of the post from which the promotion is to be given.
3. Here mention the name of the Department/or office.
4. Here mention the name of the post to which the promotion is to be given.
5. Here mention the post to which the promotion is to be given.
6. Here mention the name of the Department.

7. Here mention the post from which the promotion is to be given.

8. Here mention the name of the Department or office.

9. Here mention the name of the post with class to which the promotion is to be given.

10. Here mention the name of the Department or office

11. Define the post from which the promotion is to be given.

12. Define the post to which the promotion is to be given. But the definitions should be arranged in alphabetical order.

* The members to be nominated on the Committee shall be not below the rank of the promotional post for which the Select List is to be prepared.

13. Here mention the name of the post with class from which promotion is to be given.

(c) "Government" means the Government of Maharashtra;

(d) "Select List" means a list consisting names of persons holding the posts of 7------------------------------------------- ------------------------------------------- in the 8 -------------- Department/office, who are eligible for promotion to the post of 9------------------------------------------- in the 10 ------------------------------------------- Department/office and considered fit for promotion in accordance with these Rules;

(e) "11 -------------------------------------------".

(f) "12 -------------------------------------------".

(g) "Schedule" means the Schedule appended to these rules.

3. <u>Constitution of Selection Committee.</u> For the purpose of preparing a Select List there shall be constituted a Selection Committee consisting of not less than three and not more than six members as may be nominated by Government. The members to be so appointed shall not be below the rank of -------------------------------------------

4. <u>Meeting of the Committee</u> - The committee shall ordinarily meet every year in the month of September or in such other month as the Government may be order specify in this behalf to draw up a Select List.

5. <u>Select List to be prepared annually,etc:-</u>

(i) The Committee shall consider annually

the claims of all person holding the posts of 13.

---

eligible for promotion and prepare a Select List of those considered by it to be fit for promotion to the vacancies available for filling by promotion.

(ii) The Select List shall ordinarily be limited to the number of vacancies already existing and those likely to be occur during the following one year.

(iii) The number of persons to be considered for inclusion in the Select List shall be equal to three times the number of vacancies available for promotion if such vacancies do not exceed 25 and in other cases tow times the number of vacancies available for promotion.

(iv) The Select List shall be drawn up having regard to the orders contained in Government Resolutions and Government Circulars mentioned in the Schedule.

6. **Manner of preparation of Select List.**

(i) The names of the persons included in the Select List shall ordinarily be arranged in order of seniority in the feeder cadre/posts at the time of such inclusion.

Provided that, the Committee may give any person higher rank in the Select List upto a maximum of six places than that warranted by his seniority if, in the opinion of the committee, such person is considered to be of an outstanding merit.

(ii) The name of an officer, if any, who, on the basis of his confidential record is not considered fully fit for promotion but deserves to be given a trial as a measure of encouragement may be included in the Select List at the place warranted by his seniority in the feeder cadre and an indication of the name having been included on trial may be given. The cases of all such Officers may be reviewed at the preparation of the next Select List with reference to their performance in the higher post during the trial period. If it is found that such Officer has completed the trial period satisfactorily, the original Select List may be finalised without any connotation. If, it is considered that the officer should be continued on trial for another year, his name shall be deleted from the first Select List and entrered at the top of the next Select List with an indication of the element of trial. If it is considered that the Officer is not fit to be continued in the post of promotion, his name shall be deleted and he shall be reverted.

In the event of there being no such cases for review, the earlier Select List shall not be reviewed.

(iii) The cases of all persons who are passed over at any previous revision of the Select List or whose names were deleted from that list shall be considered by the Committee at the subsequent revision thereof, but if such persons are brought on the Select List, they

shall take rank among those who are included in the Select List for the first time.

7. **Fixation of seniority in Select List** - Subject to the provisions of rule 6, the seniority of persons in the Select List shall be determined by the date of entry of their names in the list.

8. **Maintenance of Select List -**

(i) Persons whose names are brought on the Select List shall ordinarily remain in the list in the same capacity until they are confirmed in the post of 14------------------ ---------------------------- or retire from Government service.

14. Here maintion the post to which promotion is to be given.

(ii) The Government may in consultation with the Commission remove names of persons from the Select List if they have subsequently proved themselves to be unfit for continuance on the Select List. The removal of the name from the list shall entail the reversion of the person concerned if he is already officiating in a higher post.

9. **Final Select List -** The Select List drawn up annually be the Committee shall be forwarded by the Government to the Commission for its advise together with all relevant material including the Confidential records of all the persons whose cases have been reviewed by the Committee and those who are proposed to be included in or omitted from the Select List. The Government shall after taking into consideration the views of the commission, determine the final Select List.

| | |
|---|---|
| 15. Here mention the names of the post to which promotion is to be given. | 10. **Promotion and Confirmation -** (i) When a vacancy in the post of 15-------------------------------- is expected to last for three months or more it shall ordinarily be filed in, in an officiating capacity by a person whose name his highest in the Select List and who has not already been officiating. (ii) Officers whose names are on the Select List shall normally be confirmed in accordance with their rank in the Select List. |

## SCHEDULE

(See rule 5 (iv))

1] Government Resolution, General Administration Department, No.:BCC-1072-J, dated 23rd May 1974;

2] Government Resolution, General Administration Department, No.:SRV-1074/D, dated the 28th January, 1975;

3] Government Circular, General Administration Department, No.:SRV-1975/X, dated the 2nd April 1976;

4] Government Resolution, General Administration Department, No.:BCC-1078/831/XVI-B, dated the 14th April 1981;

5] Government Resolution, General Administration Department, No.:SRV-1077/CR-343/79/XII, dated the 18th May 1983;

6] Other orders if any issued by Government from time to time in this behalf.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

Under Secretary to Government.

शासन सेवेतील कर्मचा-यांची/
राजपत्रित अधिका-यांची
ज्येष्ठता यादी तयार करणे व
प्रसिध्द करणेबाबत.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रक क्रमांक: एसआरव्ही १०८७/६२४/१२,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २१ एप्रिल १९८७.

## शासन परिपत्रक

शासन सेवकांच्या पदोन्नती, स्थायीकरण इत्यादी प्रयोजनासाठी अन्य बाबी समवेत त्यांची सेवेतील/संवर्गातील ज्येष्ठता विचारात घ्यावयाची असते. त्यासाठी भिन्न सेवेत/संवर्गात असणा-या सर्व सेवकांची अद्यावत ज्येष्ठता यादी बनविणे आणि संबंधितांच्या माहितीसाठी ती प्रसिध्द करणे आवश्यक असते. तथापि, शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, शासन सेवेतील राजपत्रित अधिका-यांच्या/कर्मचा-यांच्या ज्येष्ठता याद्या नियमितपणे तयार करून प्रसिध्द केल्या जात नाहीत किंवा त्या प्रतिवर्षी अद्यावत केल्या जात नाहीत. परिणामी त्या त्या सेवेत/संवर्गात काम करीत असणा-या राजपत्रित अधिका-यांना/कर्मचा-यांना त्या सेवेत/संवर्गात आपले स्थान निश्चित कोठे आहे याबद्दलची जाणीव होत नाही. अतएव, शासनाचे असे आदेश आहेत की, शासन सेवेतील राजपत्रित अधिकारी/कर्मचारी ज्या सेवेत/संवर्गात काम करीत आहेत त्यांची सेवा/संवर्ग निहाय ज्येष्ठता यादी प्रतिवर्षी १ जानेवारी हा आधारभूत दिनांक मानून एप्रिल महिन्यामध्ये तयार करण्यात यावी आणि ती संबंधित राजपत्रित अधिकारी/कर्मचारी यांच्या माहितीसाठी तात्काळ प्रसिध्द करण्यात यावी. या यादीमध्ये विभागाचे नांव, संवर्गाचे नांव, शासन सेवकांची ज्येष्ठतेनुसार नावे, राखीव जाती/जमातीचा असल्यास तसा उल्लेख आणि प्रत्येकाच्या त्या संवर्गातील नियुक्तीचा दिनांक या माहितीचा समावेश असावा.

२. सर्व मंत्रालयीन विभागांना विनंती करण्यात येते की, शासनाचे सदर आदेश आपल्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांच्या निदर्शनास कृपया आणावेत आणि त्यांची काटेकोरपणे अंमलबजावणी केली जाईल याबाबत दक्षता घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

प्र. बा. देसाई,
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति

राज्यपालांचे सचिव,

[कृ.मा.प.]

शामसु-रोटा-साप्रवि-एच-१६१[५,०००-५-८७]

मुख्य मंत्र्यांचे सचिव,
× प्रबंधक, उच्च न्यायालय [मूळ बाजू], मुंबई,
× निबंधक, उच्च न्यायालय [अपील शाखा], मुंबई,
× निबंधक, लोकआयुक्त व उप लोकआयुक्त यांचे कार्यालय,
× सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख,
सर्व मंत्रालयीन विभाग [१० प्रती].

---

× पत्राने.

एच-१६१[५,०००-५-८७]-अ

**कनिष्ठ पद/संवर्ग/सेवा यामधून वरिष्ठ पद/संवर्ग/सेवा**
**<u>यामध्ये पदोन्नती करताना पाळावयाची तत्वे.</u>**

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय, क्रमांकःएसआरव्ही-१०८८/प्र.क्र.११/८८/१२
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
**दिनांक :-१८.१०.१९८८**

**वाचा :-** १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-१०७७/सीआर३४३/७९/१२, दि.१८.५.१९८३.

<u>शासन निर्णय</u>

शासन निर्णय, क्र.एसआरव्ही-१०७७/सीआर-३४९/७९/१२, दि.१८.५.१९८३ नुसार निरनिराळया पदोन्नतीमध्ये अत्युत्कृष्ट अहवाल असणाऱ्यांचा अंतर्भाव निवडसूचीमध्ये करताना ६ जागांपर्यंतचे वरचे स्थान देता येते. अशा प्रकारे निवडसूचीमध्ये वरचे स्थान देण्याच्या प्रश्नाचा शासनाने फेरविचार केला असून पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे :-

१) सर्व पदोन्नतीमध्ये अत्युत्कृष्ट अहवाल असणाऱ्यांचा अंतर्भाव निवडसूचीमध्ये करताना ६ जागांपर्यंतचे वरचे स्थान देण्यात यावे.

२) सर्व पदोन्नतीमध्ये उत्कृष्ट अहवाल असणाऱ्यांचा अंतर्भाव निवडसूचीमध्ये करताना २ जागांपर्यंतचे वरचे स्थान देण्यात यावे.

तरी यापुढे निवडसूची तयार करताना वर नमूद केल्याप्रमाणे वरचे स्थान देण्याचा विचार करण्यात यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

भा.म.भणगे
**शासनाचे उप सचिव.**

**प्रति,**

राज्यपालांचे सचिव
मुख्यमंत्री यांचे सचिव,
* प्रबंधक,मूळ शाखा,उच्च न्यायालय,मुंबई ,
* प्रबंधक,अपील शाखा,उच्च न्यायालय,मुंबई,
* प्रबंधक,लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय,मुंबई,
* सचिव,महाराष्ट्र लोकसेवा आयोग,मुंबई ,
निरनिराळया मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
सर्व मंत्रालयीन विभाग,

*पत्राने.

सेवाप्रवेश नियम

पदोन्नतीसाठीची पूर्वअट म्हणून निम्न संवर्गात/सेवेत/श्रेणीत किमान सेवेसंबंधीची अट विहित करणे.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रक क्रमांक-एसआरव्ही-१०८८/१०९/बारा,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक- ३१ मे, १९८९.

वाचा:- १] शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसआरव्ही-१२७७/१२, दिनांक१४ ऑक्टोबर, १९७७.

२] शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसआरव्ही-१२७७/१२, दिनांक ३ सप्टेंबर, १९७९.

३] शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसआरव्ही-१०८०/१२, दि. २० जुलै, १९८१.

४] शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र. एसआरव्ही-१०८८/१०९/बारा, दिनांक २५ ऑगस्ट, १९८८.

परिपत्रक -

शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसआरव्ही-१०८०/१२, दिनांक २० जुलै, १९८१ आणि क्रमांक एसआरव्ही-१०८८/१०९/बारा, दिनांक २५ ऑगस्ट, १९८८ अन्वये काही विशिष्ठ पदोन्नतीकरीता निम्न पदावर किमान सेवेची अट पदोन्नतीसाठीची पूर्व अट म्हणून विहित करण्यात आलेली आहे. सदरहू तत्व संबंधित सेवाप्रवेश नियमांत अंतर्भूत करण्याची कार्यवाही करणे आणि अशी कार्यवाही पूर्ण होईपर्यन्त पदोन्नती करतांना उपरोक्त परिपत्रकातील तत्वाचा अवलंब करणे आवश्यक आहे.

उपरोक्त आदेशांनुसार पदोन्नतीसाठी आवश्यक असलेल्या विहित-अनुभवाचा कालावधी हा संबंधित सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार नियमित पध्दतीने केलेल्या नियुक्तीनंतरचा असला पाहिजे असेही आता स्पष्ट करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

[ भा. म. भणगे ]
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई[ पत्राने],

मंत्रालयाचे सर्व विभाग,

मंत्रालयाच्या विविध विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभागप्रमुख.

GR-200404101142560001-0100

कनिष्ठ पद /संवर्ग/सेवामधून वरिष्ठ पद/संवर्ग/
सेवामधील पदोन्नती करताना पाळावयाची तत्वे.

निवड समितीने निवडसूची तयार करताना विचारात
घ्यावयाच्या व्यक्तींची संख्या.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक :एसआरव्ही-१०८९/४०६/प्र.क्र.५/८९/बारा,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १ ऑगस्ट, १९८९

वाचा : १. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-एसआरव्ही-१०७५/३४२/
दहा, दिनांक १ एप्रिल, १९७६

२. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक -एसआरव्ही-१०७७/
सीआर-३४३/७९/बारा, दिनांक १८ मे, १९८३

शासन निर्णय

निवड समितीत सध्या रिक्त असलेल्या आणि पुढील वर्षभराच्या कालावधीत रिक्त होणा-या संभाव्य रिक्त पदांपैकी पदोन्नतीने भरावयाच्या पदांकरीता निवडसूची तयार करावयाची असते. पदोन्नतीच्या प्रयोजनासाठी असलेल्या निवड समितीकडून निवडसूची तयार करताना पुरेशा व्यक्तींचा विचार व्हावा असे अपेक्षित आहे.

२. निवड समितीच्या विचारार्थ क्षेत्रात ( zone of Consideration) असलेल्या व्यक्तींच्या गोपनीय अभिलेखांचे अवलोकन करावे लागते. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक -एसआरव्ही-१०७७/सीआर-३४३/७९/बारा, दिनांक १८ मे, १९८३ अन्वये निवड समितीच्या विचारार्थ क्षेत्र निश्चित करण्याबाबतचे शासनाचे विद्यमान आदेश पुढीलप्रमाणे आहेत :-

"निवड समितीने निवडसूची तयार करताना पुरेशा व्यक्तींचा विचार करावा यादृष्टीने जेव्हा निवडसूची २५ किंवा कमी नावांची करावयाची असेल तेव्हा निवड समितीच्या विचारार्थ असलेल्या अधिका-यांची संख्या तयार करावयाच्या निवड सूचीच्या तिप्पट संख्येइतकी असावी. जेव्हा निवडसूची २५ पेक्षा अधीक नावांची असेल तेव्हा समितीच्या विचारार्थ अधिका-यांची संख्या निवडसूचीच्या दुप्पट इतकी असावी."

३. निवडसूची तयार करताना विद्यमान आदेशानुसार विचारार्थ क्षेत्रातील सर्वच उमेदवारांचा विचार करणे आवश्यक नसते. परंतु सर्वांचे गोपनीय अहवाल अद्ययावत करुन /गोळा करुन निवड समितीच्या सदस्यांना अवलोकनासाठी पाठवावे लागतात, त्यामुळे निवडसूची तयार करायला विलंब होतो. ज्यावेळी २५ टक्के पदावर गुणवत्तेच्या निकषांवर पदोन्नती द्यावयाचे आदेश होते, त्यावेळी मोठ्या संख्येचे विचारार्थ क्षेत्र आवश्यक होते. शासनाने २५ टक्के गुणवत्तेच्या निकषांवर पदोन्नती देण्याचे आदेश मागे

असणा-यांना निवडसूचीमध्ये जास्तीत जास्त ६/२ जागापर्यन्तचे वरचे स्थान देता येते. त्यामुळे या विषयाचा सखोल आणि सांगोपांग विचार करुन शासन निवड समितीच्या विचारार्थ क्षेत्राच्या व्याप्ती संबंधीच्या विद्यमान आदेशात बदल करुन बिनराखीव पदांकरीता व राखीव पदातील प्रत्येक प्रवर्गांकरीता विचारार्थ क्षेत्र पुढीलप्रमाणे असावे असे आदेश देत आहे.

१. बिनराखीव [सर्वसाधारण प्रवर्ग] पदांकरीता विचारार्थ क्षेत्र.

अ] एक ते तीन नावांची निवडसूची करावयाची असल्यास कमीत कमी सहा कर्मचा-यांचा /अधिका-यांचा विचार करण्यात यावा.

ब] चार ते दहा नावांची निवडसूची करावयाची असल्यास निवडसूचीच्या आकाराच्या दुप्पट संख्येइतक्या कर्मचा-यांचा/अधिका-यांचा विचार करण्यात यावा.

क] दहापेक्षा जास्त नावांची निवडसूची करावयाची असेल तर निवडसूचीच्या आकाराच्या दीडपट संख्येइतक्या किंवा वीस यापैकी जास्त असेल त्या संख्ये-इतक्या कर्मचा-यांचा/अधिका-यांचा विचार करण्यात यावा.

२. राखीव [अनुसूचित जाती/जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्ग] पदांकरीता विचारार्थ क्षेत्र.

वर्ग-३ ते वर्ग-१ मधील पहिल्या पदापर्यन्तच्या पदांवर पदोन्नती देताना ५० बिंदू रोस्टरनुसार प्रत्येक मागासवर्गीय प्रवर्गातील कर्मचा-यांसाठी/अधिका-यांसाठी जितकी राखीव पदे असतील त्या राखीव पदाच्या संख्येस अनुसरुन वरील भाग [१] मधील [अ],[ब] आणि [क] मध्ये नमूद केलेल्या संख्येइतक्या मागासवर्गीय कर्मचा-यांचा/अधिका-यांचा देखील विचार करण्यात यावा.

टिप :- मागासवर्गीयांकरीता राखीव असलेले पद अथवा पदे आरक्षणमुक्त करण्याचे शासनाचे आदेश झाल्यास त्या प्रमाणात वरील भाग[१] मधील विचारार्थ क्षेत्र वाढून भाग [२] मधील विचारार्थ क्षेत्र कमी होईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

[भा. म. भणगे ]
उप सचिव, महाराष्ट्र शासन

मागासवर्गीयांना शासकीय व निम-शासकीय सेवेत पदोन्नतीमध्ये आरक्षण.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
निर्णय क्रमांक: बीसीसी-१०८९/२५५१ [३]/१६-ब,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक २३ जानेवारी, १९९१.

पहा :- [१] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक:बीसीसी-१०७२-जे, दिनांक २३ मे, १९७४.

[२] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक: एसआरव्ही-१०७४-डी, दिनांक २८ जानेवारी, १९७५.

[३] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:बीसीसी-१०७५/१३००/१२५४/[३]/१६, दिनांक ३१ जुलै, १९७५.

शासन निर्णय :- शासन निर्णय, दिनांक ३१ जुलै, १९७५ अन्वये असे आदेश देण्यात आले आहेत की, ज्या संवर्गात/सेवांत सरळसेवा भरतीचे प्रमाण ६६ 2/3 % पेक्षा अधिक होत नाही अशा संवर्गात/सेवेत पदोन्नतीच्या कोट्यामध्ये मागासवर्गीयांना आरक्षण लागु करण्यात यावे. वर नमूद केलेल्या दिनांक २३ मे, १९७४ च्या शासन निर्णयातील आदेशाप्रमाणे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि विमुक्त जाती व भटक्या जमाती या तीन गटांतील मागासवर्गीय कर्मचारी/अधिकारी यांना पदोन्नतीसाठी ५० बिंदू नामावली प्रमाणे आरक्षण विहित करण्यात आले आहे.

२. मागासवर्गीयांचे सरळसेवेमध्ये प्रतिनिधित्व वाढविण्याच्या दृष्टीने केंद्र शासनाने अलिकडेच असे आदेश दिले आहेत की, ज्या सेवा/संवर्गामध्ये सरळसेवा भरतीचे प्रमाण ७५% पेक्षा अधिक होत नसेल अशा सेवा/संवर्गामध्ये पदोन्नतीसाठी आरक्षण विहित करण्यात यावे. सदरील आदेशांचा विचार करुन त्या अनुषंगाने शासन आता असे आदेश देत आहे की, राज्य शासकीय/निम शासकीय सेवेतील ज्या सेवा/संवर्गामध्ये सरळसेवा भरतीचे प्रमाण ७५ % पेक्षा अधिक नाही अशा सेवा/संवर्गामध्ये पदोन्नतीसाठी वर नमूद केलेल्या तीन गटांसाठी ५० बिंदू नामावली नुसार आरक्षण विहित करण्यात यावे.

३. उपरोक्त आदेश हे सध्या चालु असलेल्या सरळसेवा भरतीमधील[शासन निर्णय, दिनांक १२ जुलै, १९८९] तसेच पदोन्नतीमधील [शासन निर्णय, दिनांक २० सप्टेंबर, १९८९] अनुशेष भरुन काढण्याच्या विशेष भरती मोहिमे संदर्भात लागु असणार नाहीत. म्हणजेच, ज्या संदर्भात अनुशेषाची मोजणी होऊन पदे भरण्याची कार्यवाही करण्यात आली आहे/येत आहे, त्या अनुशेष भरतीसाठी हे आदेश लागु असणार नाहीत.

४. वरील आदेश शासकीय/निमशासकीय सेवा तसेच महामंडळे, मंडळे, महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदा, अनुदानित संस्था, सहकारी संस्था, शासकीय उपक्रम, विद्यापीठे, अनुदानित शैक्षणिक संस्था, इत्यादी मधील आस्थापने-मधील पदांना लागु होतील. मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणा-खालील निमशासकीय संस्था/कार्यालयातील पदांबाबत विहित नियम/अधिनियमाखाली

कृ. मा. प.

सूचना निर्गमित कराव्यात अशी त्यांना विनंती आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

प्र. द. भावसे,
उप सचिव,
महाराष्ट्र शासन.

प्रति,

राज्यपाल यांचे सचिव,
मुख्य मंत्री यांचे सचिव,
सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
शासनाचे सर्व सचिव,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
* आयुक्त, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती, नवी दिल्ली,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्यायशाखा, मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर,
निवासी लेखाधिकारी, मुंबई,
अधिदान व लेखाधिकारी, मुंबई,
संचालक, समाजकल्याण, पुणे,
सेवायोजन संचालक, मुंबई,
इतर सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग,
आदिवासी विकास विभाग,
मंत्रालयाचे इतर सर्व विभाग.

---

* पत्राने.

जिल्हाधिकारी कार्यालय,
रत्नागिरी
6 MAR 1991
शाखा -
अ. लि. नि. अ. लि. जिल्हाधिकारी

गुणवत्तेवर निवड झालेल्या मागासवर्गीयांच्या गटातील उमेदवारांना आरक्षित असलेल्या जागांच्या संदर्भात मोजण्यात येवू नये याबाबतचा खुलासा...

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय, क्रमांक: बीसीसी-१०८९/२५५१[ब]/१६-ब,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक २५ जानेवारी, १९९१.

वाचा :- [१] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-बीसीसी-१०६४/३/जे, दिनांक ९ एप्रिल, १९६५.

[२] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: बीसीसी-१०६४/३/जे, दिनांक २७ जून, १९७४.

## नि र्ण य

उपरोक्त शासन निर्णयांमध्ये असे सुचित केले आहे की, मागासवर्गीयांच्या गटातील ज्या उमेदवारांची गुणवत्तेनुसार निवड होईल त्यांना आरक्षित जागांच्या संदर्भात मोजण्यात येवू नये. शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, सदरील आदेशांची अंमलबजावणी काटेकोरपणे केली जात नाही व मागासवर्गीयांच्या गटातील उमेदवार गुणवत्तेनुसार [मेरीट] निवडले गेले असले तरी त्यांना राखीव असलेल्या जागांच्या संदर्भातच नेमणूका देण्यात येतात.

२. उपरोक्त आदेशांचा याव्दारे पुनरुच्चार करण्यात येत असून सर्व नियुक्ती प्राधिका-यांचे संबंधित आदेशांकडे काटेकोर अंमलबजावणीसाठी लक्ष वेधण्यात येत आहे. या संदर्भात खालील उदाहरणात स्पष्टीकरण दर्शविले आहे.

उदा. १०० बिंदु नामावलीनुसार १७ जागा भरताना बिंदु क्रमांक-२२ ते ३८ हे वापरावयाचे आहेत. ह्यानुसार खुला प्रवर्ग व मागासवर्गीयांच्या आरक्षित जागांचे वाटप पुढीलप्रमाणे येईल :-

| | | |
|---|---|---|
| खुला प्रवर्ग | ११ | |
| अनुसूचित जाती | २ | [बिंदु क्रमांक २५ व ३३] |
| अनुसूचित जमाती | १ | [बिंदु क्रमांक ३०] |
| विमुक्त जाती, भटक्या जमाती | १ | [बिंदु क्रमांक २८] |
| इतर मागासवर्गीय | २ | [बिंदु क्रमांक २४ व ३४] |
| एकुण: | १७ | |

या एकूण भरावयाच्या १७ जागांपैकी ६ जागा मागासवर्गीयांसाठी आरक्षित आहेत. या ६ आरक्षित जागांसाठी गुणवत्ता शिथिल करुन जे उमेदवार

GR-20040408162645001-0100

कृ. मा. प.

निवडलेले आहेत त्यांचा विचार करावा लागेल. ६ आरक्षित जागांव्यतिरिक्त जे काही मागासवर्गीय उमेदवार गुणवत्तेनुसार निवड झाले असतील त्यांना खुल्या प्रवर्गाच्या ज्या ११ जागा आहेत त्या संदर्भात त्यांचा गुणामुळे विचार करावा लागेल.

३. वरील आदेशांचे शासकीय व निम-शासकीय सेवांमधील सर्व नियुक्ती अधिका-यांनी काटेकोरपणे पालन करावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

प्र. ध. माळवे,
उप सचिव,
महाराष्ट्र शासन.

प्रति,

राज्यपाल यांचे सचिव,
मुख्य मंत्री यांचे सचिव,
सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
* आयुक्त, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती, नवी दिल्ली,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा, मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
संचालक, समाजकल्याण, पुणे,
सेवायोजन संचालक, नवी मुंबई,
मंत्रालयीन विभागांच्या प्रशासकीय विभागांखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग,
आदिवासी विकास विभाग,
मंत्रालयाचे इतर सर्व विभाग,
सामान्य प्रशासन विभाग, कार्यासन १२, १३-अ, १४-अ,
निवड नस्ती.

---

* पत्राने.

---

पदोन्नती नाकारल्यामुळे उद्भवणारे परिणाम
व त्याबाबत अवलंबिण्याची कार्यवाही-

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय, क्रमांक-एसआरव्ही-१०८७/११३१/प्र.क्र. ११-८९/बारा,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक- 30 एप्रिल, १९९१.

शासन निर्णय :-

शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, काही वेळा शासकीय सेवकांना पदोन्नती देण्याचे आदेश निर्गमित झाल्यावर पदोन्नती दिलेले सेवक, पदोन्नतीने दिलेली नेमणूक त्याच ठिकाणी असो अथवा अन्य ठिकाणी असो, त्यांच्या पसंतीच्या ठिकाणी पदस्थापना/नेमणूक मिळेपर्यन्त पदोन्नती नाकारतात. काही वेळा पदोन्नती साफ नाकारून खालच्याच पदावर राहण्याची संबंधित अधिकाऱ्यांकडून इच्छा दर्शविली जाते. शासनास जेथे अधिक चांगल्या व कार्यक्षम सेवकांची नेमणूक करावयाची असते, अशा खडतर, दुर्गम किंवा आदिवासी प्रदेशासारख्या ठिकाणी अशा अधिकाऱ्यांची पदोन्नतीने नेमणूक केल्यानंतर ती पदोन्नती नाकारण्याची प्रवृत्ती दिसून येत आहे. सेवकाने पदोन्नती नाकारल्यामुळे प्रशासकीय अडचणी/विलंब होतात; शिवाय आपल्या पसंतीचे पदोन्नतीचे ठिकाण/जागा/पद मिळविण्यासाठी प्रयत्न/प्रतीक्षा करण्याची वृत्ती वाढीस लागते. या सर्व बाबींचा विचार करून शासकीय सेवकांनी पदोन्नती नाकारल्यास त्या प्रकरणी पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी असे आदेश शासन देत आहे:-

"वरच्या संवर्गात पदोन्नतीसाठी निवड झाल्यानंतर एखाद्या सेवकाने पदोन्नतीचे पद स्वीकारण्यास नकार दर्शविल्यास त्याचे नांव पदोन्नतीसाठी पात्र असणाऱ्या सेवकांच्या निवडयादीतून काढून टाकण्यात यावे. पदोन्नतीसाठी पात्र असणाऱ्या कर्मचाऱ्यांची निवड यादी त्यानंतर जेव्हा बनविण्यात येईल, त्या वेळी त्या कर्मचाऱ्याच्या प्रकरणाचा गुणवत्तेप्रमाणे पुन्हा विचार करावा."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[भा. म. भणगे]
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

राज्यपालांचे सचिव,
मुख्यमंत्र्यांचे सचिव,
* प्रबंधक, मुंबई उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई,
* प्रबंधक, मुंबई उच्च न्यायालय, अपील बाजू, मुंबई,
* प्रबंधक, लोकायुक्त व उप लोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग

200404131629 01001-0100

..२..

वेगवेगळ्या मंत्रालयीन विभागाच्या अखत्यारीतील सर्व विभागीय व
कार्यालयीन प्रमुख,
सर्व मंत्रालयीन विभाग,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,

*पत्राने

महाराष्ट्र शासन दुय्यम मंत्रालय सेवा [लिपिक व सहाय्यक] सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा.
नियम ५ [अ] अनुसार वेतनवाढ रोखण्यात आलेली नसल्यास सदर वेतनवाढ पूर्वलक्षीप्रभावाने रोखण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रक क्रमांक-परीक्षा-१०९१/[प्र.क्र.४/९१]/१७,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक : 15 OCT 1991

## परिपत्रक

महाराष्ट्र शासन दुय्यम मंत्रालय सेवा [ निम्नस्तर लिपीक ] सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा नियम, १९७७ व महाराष्ट्र शासन दुय्यम मंत्रालय सेवा [सहाय्यक] सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा नियम १९७७ या दोन्ही नियमावलीतील नियम ५[अ] मध्ये परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास होणा-या परिणामासंबंधिच्या अन्य तरतूदींबरोबर खालीलप्रमाणे तरतूद करण्यात आली आहे.

"तो परीक्षा उत्तीर्ण होई पर्यन्त किंवा परीक्षा उत्तीर्ण होण्यामधून नियम ६ च्या पोटनियम २ अन्वये त्यास सूट मिळे पर्यन्त निम्नस्तरीय लिपिकाच्या/सहाय्यकाच्या वेतनश्रेणीतील पुढील वेतनवाढ त्याला देण्यात येणार नाही."

२. नियम ५ [अ] मधील उक्त तरतूदींनुसार जे कर्मचारी वेतनवाढ रोखण्यास पात्र होते, परंतु काही कार्यालयीन अडचणींमुळे किंवा प्रशासकीय कारणामुळे त्यांची वेतनवाढ रोखण्याचे आदेश काढण्यास विलंब झाला असेल अथवा तसे आदेश काढण्याचे राहून गेले असेल आणि त्या कर्मचा-यास त्याची पुढील वेतनवाढ नियमीतपणे देण्यात आली असेल, अशा कर्मचा-यांची वेतनवाढ पूर्वलक्षी प्रभावाने रोखता येणे शक्य आहे काय, असा प्रश्न उपस्थित झाला होता. यासंबंधात काळजीपूर्वक विचार करून शासनाने असा निर्णय घेतला आहे की, उक्त नियमामध्ये वेतनवाढ रोखण्याची विनिर्दिष्ट तरतूद असल्यामुळे वेतनवाढ रोखण्यास पात्र असलेल्या कर्मचा-यांची वार्षिक वेतनवाढ ज्या दिनांकापासून रोखणे आवश्यक होते त्या दिनांकापासून रोखण्यात यावी आणि त्या दिनांकापुढील त्याची वार्षिक वेतनवाढ त्याला देण्यात आली असेल तर ती वेतनवाढ त्याला अनुज्ञेय नसल्यामुळे, त्याला अतिप्रदान झालेली रक्कम त्याच्याकडून वसूल करण्यात यावी.

३. सर्व मंत्रालयीन विभाग, सचिव महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांना विनंती करण्यात येते की, वरील प्रकारच्या प्रकरणामध्ये वेतनवाढ रोखण्याचे आदेश काढण्याचे

[क.प.उ.]

राहून गेले असल्यास वरील परिच्छेद २ मध्ये म्हटल्याप्रमाणे त्यांनी कार्यवाही करावी तसेच त्यांना अशीही विनंती करण्यात येते की, त्यांनी हे परिपत्रक परीक्षेला बसणा-या सर्व उमेदवारांच्या निदर्शनास आणावे.

४. हे आदेश विधी व न्याय विभागाच्या क्रमांक २८२७ बी, दिनांक ३० ऑगस्ट, १९९० व वित्त विभागाच्या क्रमांक ९५२/९१/सेवा ३ दिनांक २४ सप्टेंबर १९९१ या अनौपचारिक संदर्भान्वये त्या विभागाच्या सहमतीने काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१] सर्व मंत्रालयीन विभाग

२] अधिदान व लेखाअधिकारी, मुंबई

३] निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई

४] सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई [पत्राने]

५] विधी व न्याय विभाग [बी]

६] वित्त विभाग सेवा-३,

७] निवड नस्ती.

**शासकीय सेवकांना पदोन्नती संदर्भात**
**मानीव दिनांक देण्याबाबत**
**प्रकरण तपासणी अधिकाराबाबत**

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्रमांक : एसआरव्ही-१०९३/प्र.क्र. २/९३/१२
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक - ११ जून, १९९३.

**वाचा :-** (१) शासन परिपत्रक, राजकीय आणि सेवा विभाग, क्रमांक एलआर - आयएनटी - १०५९- ६, दिनांक १० मार्च, १९६०.

(२) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक - एसआरव्ही - १०६४-ड, दिनांक- २५ फेब्रुवारी, १९६५.

**शासन परिपत्रक**

शासन सेवेतील कर्मचारी / अधिकारी यांना पदोन्नतीच्या संदर्भात डावलले गेले असल्याचे निश्चित झाले तर त्यांना पदोन्नतीचा मानीव दिनांक देण्याबाबत विचार करण्यात येतो. मानीव दिनांक देण्याबाबतची प्रकरणे वर नमूद केलेल्या परिपत्रकानुसार तपासावयाची असतात. वर नमूद केलेल्या दिनांक १० मार्च, १९६० च्या परिपत्रकातील तरतुदींप्रमाणे जर तात्पुरत्या ज्येष्ठता यादीच्या आधारे पदोन्नती दिली असेल आणि ती ज्येष्ठता यादी अंतिम केल्यानंतर त्या ज्येष्ठतेनुसार जर कनिष्ठ व्यक्तीला अगोदर नियमित स्वरुपाची पदोन्नती दिली असेल तर ज्येष्ठ व्यक्तीला पदोन्नतीचा मानीव दिनांक दिला जातो.

मात्र वेतन निश्चितीच्या फरकांचे लाभ दिले जात नाहीत. दिनांक २५ फेब्रुवारी, १९६५ च्या परिपत्रकातील तरतुदींच्या आधारे ज्येष्ठता यादीमधील ज्येष्ठ व्यक्तीला चुकीने अधिक्रमण करुन कनिष्ठ व्यक्तीला नियमित स्वरुपाची पदोन्नती दिली असेल तर मानीव दिनांक दिला जातो. या प्रकरणी ज्या व्यक्तीला मानीव दिनांक दिला असेल त्याला वेतननिश्चितीचे फायदे फरकासहित दिले जातात.

२. मानीव दिनांक देण्याबाबतची प्रकरणे मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी, सामान्य प्रशासन विभाग आणि वित्त विभाग यांच्या परामर्शाने निकाली काढणे आवश्यक आहे. कारण अशा प्रकरणी एकाच पदाचे वेतन दोन व्यक्तींना देण्याची शक्यता निर्माण होत असते. तसेच

(कृ.मा.प.)

पदोन्नती नियमित स्वरुपाची नसेल तर मानीव दिनांक देण्याबाबतचा निर्णय घेणे अयोग्य असते. यामुळे मानीव दिनांक देण्याबाबतची प्रकरणे सखोल परिक्षणानंतर निकाली काढणे आवश्यक आहे. परंतु या विभागाच्या असे निदर्शनास आले आहे की, मानीव दिनांक देण्याबाबतची प्रकरणे विभाग प्रमुख स्तरावर तपासली जावून निर्णय घेतले जातात. हे निर्णय वर नमूद केलेल्या परिपत्रकातील तरतुदींप्रमाणे नसल्याचेही आढळून आले आहे. म्हणून मानीव दिनांक देण्याबाबतच्या प्रकरणी शासन आता असे आदेश देत आहे की, मानीव दिनांक देण्याबाबतचा प्रकरणे मंत्रालयीन विभागांनी परस्पर निकाली काढू नयेत, मंत्रालयीन विभागांनी अशा प्रकरणांची प्राथमिक छाननी करावी व याबाबतच्या प्रस्तावांना सामान्य प्रशासन विभाग आणि वित्त विभाग यांनी आवश्यक मंजूरी दिल्यानंतरच यासंबधीचे आदेश निर्गमित करावेत.

३. सर्व मंत्रालयीन विभागांनी शासनाचे सदर आदेश त्याच्या अखत्यारीतील विभाग प्रमुख आणि कार्यालय प्रमुख यांच्या निदर्शनास आणावेत. तसेच विभाग प्रमुख स्तरावर मानीव दिनांक देण्याबाबत जर यापूर्वी काही आदेश असतील तर ते आदेश या निर्णयानुसार अधिक्रमित ठरतील.

४. शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही १०७६/१२ दिनांक २१ जून, १९८२ अन्वये ज्येष्ठता विनियम विहित करण्यात आले आहेत. त्यामधील नियम ५(१) मधील सक्षम प्राधिकारी याऐवजी आवश्यक ती दुरुस्ती करण्याची कार्यवाही वेगळी करण्यात येत आहे. तोपर्यन्त मानीव दिनांक प्रस्ताव या आदेशानुसार तपासण्यात यावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

य. मा. जोशी
उप सचिव,महाराष्ट्र शासन

C:\Desk 12\G.R\GR-11-06-93

शासकीय सेवकांना पदोन्नती संदर्भात
मानिव दिनांक देण्याबाबत.
प्रकरण तपासणी अधिकाराबाबत.

महाराष्ट्र शासन.
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक-एसआरव्ही-१०९३/प्र.क्र.२/९३/१२
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १३ डिसेंबर,१९९३.

वाचा :-शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-एसआरव्ही-१०९३/प्र.क्र.२/९३/१२,
दिनांक :- ११ जून, १९९३.

शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक-एसआरव्ही-१०९३/प्र.क्र.२/९३/१२, दि. ११ जून, १९९३ अन्वये शासन सेवेतील कर्मचारी/अधिकारी यांना पदोन्नतीचा मानिव दिनांक देण्याबाबतची प्रकरणे तपासताना कोणती कार्यवाही करावी याबद्दलचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. या परिपत्रकातील सुरुवातीचे वाक्य खालीलप्रमाणे सुधारीत केल्यानुसार वाचण्यात यावे.-

"शासन सेवेतील कर्मचारी/अधिकारी यांना पदोन्नतीच्या संदर्भात चुकीने अधिक्रमित केले असल्याचे किंवा डावलले गेले असल्याचे निश्चित झाले तर त्यांना पदोन्नतीचा मानिव दिनांक देण्याबाबत विचार करण्यात येतो."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/-
( य. मा. जोशी )
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

राज्यपाल यांचे सचिव,
मुख्यमंत्री यांचे सचिव,
प्रबंधक,उच्च न्यायालय,मूळ शाखा,मुंबई (पत्राने),
प्रबंधक उच्च न्यायालय,अपील शाखा,मुंबई (पत्राने),
प्रबंधक लोकआयुक्त व उपलोकआयुक्त यांचे कार्यालय,मुंबई (पत्राने),
सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई (पत्राने),
महालेखापाल,महाराष्ट्र-१,मुंबई,
महालेखापाल,महाराष्ट्र-२, नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
विविध मंत्रालयीन विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व सर्व कार्यालय प्रमुख,
मंत्रालयीन सर्व विभाग,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासन.

# महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक : एसआरव्ही १०८८/प्र.क्र.११/८८/१२,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २१ फेब्रुवारी, १९९४.

वाचा : १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : इएसव्ही-सीएचआर-१०८५/८६८/१३, दिनांक ९.९.१९८८,
२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : एसआरव्ही-१०७४/ड, दिनांक २८ जानेवारी, १९७५,
३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : एसआरव्ही-१०७७/सीआर ३४३/७९/१२, दिनांक १८ मे, १९८३,
४) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : एसआरव्ही-१०८८/ प्र.क्र.११/८८/१२, दिनांक १८ ऑक्टोबर, १९८८.

**शासन निर्णय** :

सामान्य प्रशासन विभागाच्या क्रमांक : इएसव्ही-सीएचआर-१०८५/८६८/तेरा, दिनांक ९ सप्टेंबर, १९८८ च्या शासन निर्णयान्वये शासकीय सेवकांच्या प्रतिवर्षी लिहिल्या जाणा-या गोपनीय अभिलेख्यांची प्रतवारी कोणती ठरवावी, याबद्दलच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांकः एसआरव्ही १०७४/ड, दिनांक २८ जानेवारी, १९७५ अन्वये वर्ग-१ मधील (आता गट अ) प्रथम पदोन्नतीच्या सर्व पदांवरील पदोन्नतीच्या ज्येष्ठता अधीन पात्रता आणि त्यानंतरच्या वरच्या पदावरील पदोन्नत्या निव्वळ गुणवत्ता तत्वांनी करण्यात याव्यात, असे शासनाचे धोरण आहे. पदोन्नतीसाठी पात्रता ठरविताना शासकीय सेवकांचे लगतचे ५ वर्षांचे गोपनीय अभिलेख तपासले जातात. परंतु गोपनीय अभिलेख्यांच्या प्रतवारीचा निकष कोणता असावा यासंबंधीचे निश्चित असे आदेश निर्गमित केलेले नाहीत. त्यामुळे निवडसूची बनविताना पात्रतेच्या निकषाबाबत संदिग्धता रहात असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. अतएव, शासनाने या बाबीसंदर्भात सर्वकष तपासणी करुन वरच्या पदावर पदोन्नती देण्यासाठी गोपनीय अभिलेख्यांच्या प्रतवारीचे निकषांबाबत खालीलप्रमाणे निर्णय घेतले आहेत :-

१. शासन सेवेतील गट मधील प्रथम पदांवरील पदापर्यंतच्या सर्व गटातील पदोन्नत्या ज्येष्ठता अधीन पात्रता या निकषानुसार देण्यात याव्यात. पात्रता निश्चित करण्यासाठी विचारक्षेत्रातील सर्व अधिका-यांचे ५ वर्षांचे गोपनीय अभिलेख तपासून शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक -एसआरव्ही १०८९/३६५४/प्र.क्र.१२/८९/१२, दिनांक २८.३.९० मध्ये नमूद केल्याप्रमाणे

ज्यांच्या गोपनीय अभिलेख्यांची किमान सरासरी प्रतवारी "ब" (बी) येत असेल तर संबंधितांना ज्येष्ठतेनुसार निवडसूचीत अंतर्भूत करण्यात यावे.

२. गट अ मधील दुस-या टप्प्यानंतरच्या,परंतु ज्या पदांची वेतनश्रेणीतील किमान वेतनश्रेणीचा टप्पा रु.५,१००/- आहे अशा सर्व पदांवरील पदोन्नत्या निव्वळ गुणवत्ता (Strict Selection) नुसार देण्यात यावी. त्यासाठी ५ वर्षांच्या गोपनीय अभिलेख्यांची किमान सरासरी प्रतवारी "ब +" अशी निश्चित करण्यात यावी.

३. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : एसआरव्ही १०७७/सीआर-३४३/७९/ १२, दिनांक १८ मे, १९८३ आणि शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : एसआरव्ही - १०८८/प्र.क्र.११/८८/१२, दिनांक १८.१०.१९८८ अन्वये निवडसूचीमध्ये समावेश झालेल्या अधिका-यांच्या बाबतीत ज्यांचे गोपनीय अभिलेख अत्युत्कृष्ट "अ+" किंवा उत्कृष्ट "अ" प्रतीचे असतील त्यांना निवडसूचीमध्ये अनुक्रमे ६ आणि २ स्थानापर्यंत वरचढपणा यावा असे आदेश आहेत. २ स्थानांपर्यंत वरचढपणा देण्याबाबतचे आदेश आता मागे घेण्यात येत आहेत. अत्युत्कृष्ट "अ+" प्रतवारी असणा-या अधिका-यांस / कर्मचा-यांस निवडसूचीमध्ये ६ स्थानांपर्यंत वरचढपणा देण्याचे विद्यमान आदेश पुढील आदेश होईतोपर्यंत कार्यान्वित राहतील. मात्र अशा अधिका-यास ज्येष्ठ असलेल्या अधिका-याचे अभिलेख "अ" प्रतवारीचे असतील तर त्याचे वर "अत्युत्कृष्ट" गोपनीय अभिलेख असणा-या अधिका-यास वरचढपणा देण्यात येऊ नये.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(य.मा.जोशी)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. राज्यपाल यांचे सचिव,
२. मुख्यमंत्री यांचे सचिव,
३. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, बँक ऑफ इंडिया बिल्डींग, फोर्ट, मुंबई (पत्राने),
४. प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई (पत्राने),
५. प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई (पत्राने),
६. प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई (पत्राने),
७. सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई (पत्राने).

एच ३२२ (बी) (२०००-७-०९)

C:\Desk 12\G.R\21 Feb. 94

लक्ष्यपेध श्री: केळस्कर
आस्थापना अ-का

पदोन्नती

गोपनीय अभिलेख्यांच्या प्रतवारीचे निकष

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय, क्रमांक एसआरव्ही-1088/प्र.क्र.11/88/12,
मंत्रालय, मुंबई 400-032. दिनांक 22 सप्टेंबर 1994.

वाचा:- (1) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक ईएसबी-1389/90-89/13, दिनांक 31 जानेवारी 1990.

(2) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही - 1088/प्र.क्र. 11/(88)/12, दिनांक 21 फेब्रुवारी 1994.

प्रा. दु. नि. ... दि.:- 27 APR 1995 ... शाखा नि.उ.जि.

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही - 1088/प्र.क्र. 11/88/12, दिनांक 21 फेब्रुवारी 1994 अन्वये शासकीय सेवकांना वरच्या पदावर पदोन्नती देण्यासाठी निकटतम पदावरील त्यांच्या 5 वर्षांच्या गोपनीय अभिलेख्यांची सरासरी प्रतवारी निश्चित करण्यात आली आहे. त्या निर्णयामधील अनुक्रमांक 2 मधील निकषांसंबंधीची तरतूद सध्या अमलात असलेल्या कार्यपध्दतीशी सुसंगत नसल्याचे निदर्शनास आले आहे. हे लक्षात घेता वरील आदेशात खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे. गट "अ" मधील पहिल्या टप्प्यानंतरच्या सर्व पदोन्नत्या या निव्वळ गुणवत्ता (strict selection) नुसार देण्यात याव्यात. मात्र त्यासाठी गोपनीय अहवालाचे निकष खालीलप्रमाणे असतील:-

(अ) ज्या पदांच्या वेतनश्रेणीचा किमान टप्पा रुपये 5,099 पर्यन्त आहे, त्यासाठी किमान निकष म्हणून 5 वर्षांच्या गोपनीय अभिलेख्याची सरासरी प्रतवारी "ब +" अशी राहील.

(ब) ज्या पदांच्या वेतनश्रेणीचा किमान टप्पा रुपये 5,100 किंवा त्यापेक्षा अधिक आहे, त्यासाठी किमान निकष म्हणून 5 वर्षांच्या गोपनीय अभिलेख्याची सरासरी "अ" अशी राहील.

2. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक 21 फेब्रुवारी 1994 अन्वये निर्गमित करण्यात आलेल्या निकषांसंबंधीचे आदेश लक्षात घेऊन त्यानुसार मध्यंतरीच्या काळात काही निवडसूचीचे प्रस्ताव अंतिम केले असल्यास त्याचे पुनर्विलोकन करण्यात यावे.

3. एखाद्या संवर्गासंबंधात वर नमूद केलेल्या परिच्छेद 1 मधील (अ) व (ब) मधील निकषापेक्षा त्या त्या संवर्गातील कामाचा व्याप व जबाबदा-या लक्षात घेऊन वेगळा निकष निश्चित केला गेला असल्यास त्यास हे आदेश लागू न होता त्या संवर्गासाठी निश्चित करण्यात आलेले प्रतवारीसंबंधीचे आदेश लागू होतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

व.गा. जोशी,
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति

(1) राज्यपाल यांचे सचिव,

(कृ.मा.प.)

मु-रोटा-साप्रवि-एच-1512(4,000-3-95)

मागासवर्गीयांसाठी आरक्षीत पदे -
उमेदवार उपलब्ध न झाल्यास अदलाबदलीने पदे भरणे,
पदे आरक्षणातून मुक्त करणे.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांकः बीसीसी-1094/सीआर-67/94/16-ब,
मंत्रालय, मुंबई-400 032. दिनांक :- 5 डिसेंबर, 1994.

**पहा** :- शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी-1091/2551/(क)/16-ब, दिनांक 27 मार्च, 1991.

**प्रस्तावना** :- शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी-1064/111/जे, दिनांक 9.4.1965 अन्वये मागासवर्गीयांच्या विविध प्रवर्गांकरिता सरळ सेवा प्रवेशाकरिता आरक्षण विहित करण्यात आले होते. त्यामध्ये इतर मागासवर्गीयांकरिता 10 टक्के आरक्षण विहित करण्यात आलेले होते, व ते 22 मार्च, 1994 पर्यन्त अंमलात होते. दिनांक 9.4.1965 अन्वये निर्गमित केलेल्या आदेशानुसार इतर मागासवर्गीयांकरिता असलेले आरक्षण भरले न गेल्यास अनुशेष पुढे पुन्हा दाखविण्याची तसेच ते पुढे ओढण्याची तरतूद नव्हती. त्यामुळे शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.बीसीसी-1091/2551/(क)/16-ब, दिनांक 27 मार्च, 1991 च्या आदेशानुसार अदलाबदलीने पदे भरताना ती फक्त अनुसूचित जमाती आणि विमुक्त जाती व भटक्या जमाती या प्रवर्गामधून भरण्याची तरतूद आदेशात करण्यात आलेली होती. मंडळ आयोगाच्या शिफारशीनुसार शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.बीसीसी-1093/2167/सीआर-141/93/16-ब, दिनांक 23 मार्च, 1994 अन्वये मागासवर्गीयांच्या विविध प्रवर्गांकरिता आरक्षण विहित करण्यात आलेले आहे त्यामध्ये इतर मागासवर्गीयांकरिता एकूण 19 टक्के आरक्षण विहित करण्यात आलेले आहे. या आरक्षित पदांपैकी काही पदे भरली न गेल्यास ती पुढील 5 भरती वर्षांपर्यन्त अनुशेष म्हणून पुढे ओढण्याची तरतूद करण्यात आलेली असून ती अदलाबदलीने भरण्याबाबत देखील दिनांक 23 मार्च, 1994 च्या शासन निर्णयात तरतूद करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे गुणवत्तेनुसार जे मागासवर्गीय उमेदवार सेवा प्रवेशाकरिता पात्र ठरतील त्यांची गणना आरक्षित पदावर केली जाणार नाही अशीही तरतूद दिनांक 23 मार्च, 1994 च्या आदेशात करण्यात आलेली आहे.

मागासवर्गीयांसाठी असलेल्या सरळ सेवा भरती तसेच पदोन्नतीमध्ये आरक्षित पदे उमेदवाराअभावी भरली न गेल्यास ती कशा प्रकारे भरण्यात यावीत याबाबतचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. या गोष्टींचा सर्वकष विचार करून शासनाने आता खालीलप्रमाणे निर्णय घेतले आहेत :-

**शासन निर्णय** :- शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी-1091/2551/(क)/16-ब, दिनांक 27 मार्च, 1991 मधील आदेश अधिक्रमित करून खालीलप्रमाणे सुधारित आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

<u>सरळ सेवा भरती</u>

अ) अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती, विमुक्त जाती (अ) भटक्या जमाती (ब) भटक्या जमाती (क) भटक्या जमाती (ड) व इतर मागासवर्गीय (इ) या प्रवर्गांकरिता निर्धारित केलेल्या प्रमाणानुसार भरती करण्यासाठी त्या त्या प्रवर्गाचा उमेदवार उपलब्ध झाला नाही तर अशी पदे 5 भरती वर्षापर्यन्त रिक्त ठेवावी व या 5 भरती वर्षात त्या प्रवर्गाचा उमेदवार उपलब्ध करून घेण्याचे प्रयत्न करण्यात यावेत, असे प्रयत्न करूनही उमेदवार प्राप्त झाला नाही तर 6 व्या वर्षी खाली उल्लेख केल्याप्रमाणे अदलाबदलीने ही पदे भरण्यात यावीत. 6 व्या वर्षीही त्या प्रवर्गाचा किंवा अदलाबदलीसाठी दुसऱ्या प्रवर्गाचा उमेदवार उपलब्ध झाला नाही तर 7 व्या वर्षी खुल्या प्रवर्गाने उमेदवार भरण्याची कार्यवाही सामान्य प्रशासन विभागाच्या मान्यतेनंतर करण्यात यावी. त्यासाठी आवश्यक त्या समर्थनासह प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागाकडे पाठवावा. 6 व्या वर्षी पदे खालील प्रवर्गाने अदलाबदलीने भरण्यात यावीत :-

अनुसूचित जाती } या दोन प्रवर्गातच अदलाबदली करण्यात यावी.

शा.2 (१) प्रेस/ग्रं.-1288(5000-1-95).

९०१

| | | |
|---|---|---|
| विमुक्त जाती (अ) | } | (मूळच्या 14 व तत्सम जाती) |
| भटक्या जमाती (ब) | } | (मूळच्या 28 व तत्सम जमाती) या दोन प्रवर्गांत अदलाबदली करण्यात यावी. |
| भटक्या जमाती (क) धनगर व तत्सम | } | या तीन प्रवर्गात अदलाबदली करण्यात यावी. |
| भटक्या जमाती (ड) वंजारी व तत्सम | } | |
| इतर मागासवर्गीय (इ) | } | |

ब) प्रशासकीय व जनहितास्तव पद 5 भरती वर्षापर्यन्त रिक्त ठेवणे शक्य नसेल तर पद तात्पुरते बिगर राखीव करण्याचा प्रस्ताव संबंधित विभागाच्या सचिवांच्या प्रमाणपत्रासह सामान्य प्रशासन विभागाकडे अभिप्रायासाठी पाठवावे. अशा प्रस्तावावर सामान्य प्रशासन विभागाने अभिप्राय दिल्यानंतर वर्ग-1, व वर्ग-2 च्या पदांसंदर्भात प्रस्ताव त्या त्या विभागाच्या सचिवांनी मा.मंत्री, समाजकल्याण व आदिवासी विभागाचे मंत्री यांच्यामार्फत मा.मुख्यमंत्र्यांकडे सामान्य प्रशासन विभागामार्फत मान्यतेसाठी पाठवावेत.

क) मंत्रालयीन विभागातील व विभागाच्या नियंत्रणाखालील कार्यालयातील वर्ग-3 व वर्ग-4 ची पदे तात्पुरत्या स्वरुपात अनारक्षित करण्याबाबतचे प्रस्ताव संबंधित विभागाने सामान्य प्रशासन विभागाच्या मान्यतेसाठी सादर करावीत व सामान्य प्रशासन विभागाच्या मान्यतेनंतर विभागांनी मा.मंत्री (स.क.) आणि मा.मंत्री (आदिवासी विकास) यांची मान्यता घ्यावी.

ड) वर नमूद केल्याप्रमाणे अशा सर्व प्रकरणी सामान्य प्रशासन विभागाचे अभिप्राय घेण्यात यावेत.

## पदोन्नती

(1) अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/विमुक्त जाती(अ)/भटक्या जमाती (ब) यांना पदोन्नतीमध्ये आरक्षण ठेवण्यात आले आहे. शासन निर्णय, क्र.बीसीसी-1772/जे, दिनांक 23 मे, 1974 अन्वये त्यासाठी 50 बिंदू नामावली निर्धारित केली आहे. त्याचा अवलंब करावा. या नामावलीत विमुक्त जाती/भटक्या जमातींचा एकत्रित समावेश करण्यात आला आहे. त्याप्रमाणेच कार्यवाही करावी. या प्रवर्गासाठी निर्धारित केलेल्या प्रमाणानुसार त्या त्या प्रवर्गाचे उमेदवार उपलब्ध झाले नाहीत तर पद भरण्यासाठी 3 भरती वर्षे प्रयत्न करण्यात यावा व त्या प्रवर्गाचे उमेदवार मिळेपर्यन्त ते पद 3 भरती वर्षे रिक्त ठेवण्यात यावे. तदनंतर 4 थ्या वर्षी अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती या दोन प्रवर्गातून व विमुक्त जाती(अ)/भटक्या जमाती (ब) या दोन प्रवर्गातूनच आपआपसातून अदलाबदलीने भरण्यात यावे.

(2) प्रशासकीय कारणास्तव किंवा जनहितास्तव अशी पदे संबंधित प्रवर्गाचा उमेदवार उपलब्ध नसल्यास तात्पुरत्या स्वरुपात अनारक्षित करावयाचे असल्यास यासंबंधीचा प्रस्ताव संबंधित प्रशासकीय विभागामार्फत सामान्य प्रशासन विभागाकडे मंजूरीसाठी पाठवावा. सामान्य प्रशासन विभागाने या पदाचे राखीव स्वरुप तात्पुरते काढून टाकण्यास मान्यता दिली तर एकत्रित नियमसूचित समाविष्ट असलेल्या इतर कर्मचा-यांची नेमणूक करुन रिकाम्या जागा तात्पुरत्या स्वरुपात भरता येतील व त्या त्या गटाची राखीव पदे त्या गटाचा उमेदवार उपलब्ध होईपर्यन्त 4 थ्या वर्षी वर नमूद केल्याप्रमाणे पद अदलाबदलीने भरावे. 4 थ्या वर्षीही अदलाबदलीसाठी मागासवर्गीयांचा उमेदवार उपलब्ध झाला नाही तर पद कायमचे अनारक्षित झाले असे समजून इतर प्रवर्गातून / खुल्या प्रवर्गाने (ज्या मागासवर्गीयही असतील) भरण्यात यावे यासाठी ही सामान्य प्रशासन विभागाची मान्यता घ्यावी.

(3) गट-1 व गट-2 ची आरक्षित पदे तात्पुरत्या स्वरुपात बिगर आरक्षित करण्यासंबंधीचे प्रस्ताव योग्य त्या समर्थनासह संबंधित विभागाच्या सचिवांच्या प्रमाणपत्रासह सामान्य प्रशासन विभागाच्या अभिप्रायासाठी पाठवावेत व नंतर मा.मंत्री, समाजकल्याण, मा.मंत्री आदिवासी विकास व संबंधित विभागाचे मंत्री यांच्यामार्फत मा.मुख्यमंत्र्यांकडे मंजूरीसाठी पाठवावेत.

(4) मंत्रालयीन विभागातील व विभागाच्या नियंत्रणाखालील कार्यालयातील वर्ग-3 व 4 ची आरक्षित पदे तात्पुरत्या स्वरुपात बिगर आरक्षित करण्यासंबंधीचा प्रस्ताव योग्य त्या समर्थनासह संबंधित विभागाच्या सचिवांच्या प्रमाणपत्रासह सामान्य प्रशासन विभागाच्या मान्यतेसाठी पाठवावेत.

(5) वर नमूद केल्याप्रमाणे अशा प्रकरणी सामान्य प्रशासन विभागाचे अभिप्राय घेण्यात यावेत.

(6) गट-1 व गट-2 च्या निवड सूचीतील मागासवर्गीयांच्या अधिक्रमाला मान्यता देण्यासाठी सामान्य प्रशासन विभाग, मंत्री (समाजकल्याण), मंत्री (आदिवासी विकास) व विभागाचे मंत्री यांच्यामार्फत मा.मुख्यमंत्र्यांकडे अशी प्रकरणे सादर करण्यात यावीत.

(7) ज्येष्ठतेनुसार मागासवर्गीय उमेदवार पदोन्नतीला पात्र असेल परंतु त्याच्या प्रवर्गाचा आरक्षित बिंदू नसेल तर अशा कर्मचा-यास आरक्षित बिंदू नाही म्हणून पदोन्नती नाकारु नये.

## सर्वसाधारण सूचना

1. राखीव जागेवर खुल्या प्रवर्गातील उमेदवारांची तात्पुरती नियुक्ती/पदोन्नती देताना "आपली नियुक्ती/पदोन्नती मागासवर्गीयांच्या राखीव जागेवर तात्पुरत्या स्वरुपात करण्यात आली असून संबंधित उमेदवार प्राप्त झाल्यानंतर किंवा अदलाबदलीने पद भरल्यानंतर आपली नियुक्ती/पदोन्नती संपुष्टात येईल". असा उल्लेख नियुक्ती/पदोन्नतीच्या आदेशात न चुकता करण्यात यावा.

2. राखीव जागेवर इतर उमेदवारांची तात्पुरती नियुक्ती/पदोन्नती दिल्यास अशा उमेदवारांची नोंद कायम स्वरुपी बिंदू नामावलीत घेण्यात येऊ नये. त्यांची नोंद तात्पुरत्या स्वरुपातील स्वतंत्र नोंदवहीत घेण्यात यावी. व जसजसे मागासवर्गीय उमेदवार उपलब्ध होतील तसतसे त्या नोंदवहीतील नोंदी कायम स्वरुपी बिंदू नामावलीत घेण्यात याव्यात.

3. सामान्य प्रशासन विभागाच्या मान्यतेसाठी जेजे प्रस्ताव सादर करण्यात येतील ते ते प्रस्ताव संबंधित विभागांनी मागासवर्गीयांच्या आरक्षणाची अंमलबजावणी करण्याकरिता नेमण्यात आलेल्या उप सचिवांनी प्रथम तपासून आपापल्या विभागाच्या सचिवांमार्फत सामान्य प्रशासन विभागाकडे पाठवावेत.

4. मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखाली असलेल्या क्षेत्रिय कार्यालयातील गट-3 व गट-4 च्या सरळ सेवा भरतीतील व पदोन्नतीतील मागासवर्गीयांचे अनारक्षण/अधिक्रमण विभाग प्रमुखांनी सहाय्यक आयुक्त (मागासवर्ग कक्ष) यांचे प्रमाणपत्र न चुकता घ्यावे.

5. महामंडळे, मंडळे, महानगरपालिका, नगरपालिका, शासकीय उपक्रम, जिल्हा परिषद, अनुदानित संस्था, विद्यापीठ, सहकारी संस्था/बँका, शैक्षणिक अनुदानित संस्था इत्यादींमधील मागासवर्गीयांची आरक्षित पदे तात्पुरत्या स्वरुपात बिगर आरक्षित करण्यासंबंधी संबंधित विभागांनी सामान्य प्रशासन विभागाच्या सहमतीने व मान्यतेने पुढील कार्यवाही करावी.

हे आदेश 1 जानेवारी, 1995 पासून अमलात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

शांता शास्त्री,
शासनाचे प्रधान सचिव.

प्रति,

राज्यपाल यांचे सचिव,
मुख्य मंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव/अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,

विशेष मागास प्रवर्गाकरिता पदोन्नतीमध्ये आरक्षण

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक – बीसीसी–1094/प्र.क्र.68/94/16ब,
मंत्रालय, मुंबई 400 032. दिनांक :– 26 जुलै, 1995.

पहा:– 1) शासन निर्णय, सा.प्र.वि.क्र.बीसीसी–1094/प्र.क्र.68/94/16ब, दिनांक 8 डिसेंबर 1994.

2) शासन निर्णय, सा.प्र.वि.क्र.बीसीसी–1094/प्रक्र.68/94/16ब, दिनांक 2 जानेवारी, 1995.

3) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, क्र.सीबीसी–1494/प्रक्र.236/मावक–5, दिनांक 7 डिसेंबर, 1994.

4) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, क्र.सीबीसी–1494/प्र.क्र.236/मावक–5 दिनांक 13 जून, 1995.

5) शासन निर्णय, सा.प्र.वि.क्र.बीसीसी–1094/प्रक्र.68/94/16ब, दिनांक 15 जून, 1995.

शासन निर्णय:– शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक–बीसीसी–1094/प्रक्र.68/94/16ब, दिनांक 15 जून, 1995 अन्वये समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभागाने घोषित केलेल्या "विशेष मागास प्रवर्गासाठी शासकीय, निमशासकीय सेवेत सरळ सेवा तसेच पदोन्नतीमध्ये आरक्षण विहित करण्यात आले आहे. त्यास अनुसरून सरळ सेवा भरतीची 200 बिंदू नामावली, त्याचप्रमाणे पदोन्नतीसाठी असलेल्या 50 बिंदू नामावलीमध्ये सुधारणा करणे अनिवार्य आहे. त्यादृष्टीने 200 बिंदू नामावली सुधारित स्वरुपात निर्गमित करण्याचा प्रस्ताव शासनाच्या स्तरावर विचाराधीन आहे.

पदोन्नतीसाठी पूर्वीची 50 बिंदू नामावली शासन निर्णय क्र.बीसीसी–1092/1692/प्र.क्र.154/16ब, दिनांक 4 ऑगस्ट, 1992 अन्वये विहित करण्यात आली आहे. या बिंदू नामावलीत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती यांच्यासाठी आरक्षण ठरविण्यात आले आहे. आता नव्याने निर्णय केलेल्या विशेष मागास प्रवर्गास 2% इतके आरक्षण सरळ सेवा व पदोन्नतीमध्ये दिले असल्याने पदोन्नतीसाठी असलेल्या 50 बिंदू नामावलीतील एक बिंदू सदर विशेष मागास प्रवर्गासाठी राखून ठेवणे आवश्यक आहे. पूर्वीच्या 50 बिंदू नामावलीत सुधारणा करुन त्यात विशेष प्रवर्गासाठी 2% इतके आरक्षण म्हणजे 50 बिंदू मध्ये एक बिंदू, बिंदू क्र.10 वर दर्शवून सुधारित बिंदू नामावली सोबतच्या परिशिष्टात नमूद करण्यात आली आहे. ही बिंदू नामावली दिनांक 13 जून, 1995 पासून अंमलात येईल.

सर्व शासकीय कार्यालयांनी सदर आदेशाची नोंद घ्यावी आणि तदनुसार कार्यवाही करावी. मंत्रालयीन विभागांनी सदर आदेश त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयांना कळवावेत तसेच निमशासकीय सेवा, मंडळे, महामंडळे इत्यादि आस्थापनांमध्ये हे आदेश लागू करण्याबाबत स्वतंत्र आदेश संबंधित मंत्रालयीन विभागांनी निर्गमित करावेत. या संदर्भात निर्गमित केलेल्या आदेशांच्या प्रती या विभागासही पाठविण्यात याव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सि. म. हिरेमठनेर,
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

६३०

प्रत,

राज्यपाल यांचे सचिव,
मुख्य मंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,
~~सर्व विभागीय आयुक्त,~~
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,

जिल्हाधिकारी कार्यालय [illegible]
27 SEP 1995

नमुनेवजा नामावली (50 बिंदू रोस्टर)

| अ.क्र. | पदे राखीव किंवा खुली आहेत | अ.क्र. | पदे राखीव किंवा खुली आहेत. |
|---|---|---|---|
| 1. | अनुसूचित जाती | 26. | खुली |
| 2. | खुली | 27. | विजाभज (अ/ब) |
| 3. | खुली | 28. | खुली |
| 4. | अनुसूचित जमाती | 29. | खुली |
| 5. | खुली | 30. | खुली |
| 6. | खुली | 31. | अनु. जमाती |
| 7. | विजाभज (अ/ब) | 32. | खुली |
| 8. | खुली | 33. | खुली |
| 9. | खुली | 34. | खुली |
| 10. | विशेष मागासप्रवर्ग | 35. | अनु. जाती |
| 11. | खुली | 36. | खुली |
| 12. | खुली | 37. | खुली |
| 13. | अनु. जाती | 38. | खुली |
| 14. | खुली | 39. | अनु. जाती |
| 15. | खुली | 40. | खुली |
| 16. | अनु. जमाती | 41. | खुली |
| 17. | खुली | 42. | खुली |
| 18. | खुली | 43. | अनु. जमाती |
| 19. | अनु. जाती | 44. | खुली |
| 20. | खुली | 45. | खुली |
| 21. | खुली | 46. | खुली |
| 22. | खुली | 47. | अनु. जाती |
| 23. | अनु. जाती | 48. | खुली |
| 24. | खुली | 49. | खुली |
| 25. | खुली | 50. | विमुक्त जाती व भटक्या जमाती (अ/ब) |

| | |
|---|---|
| अनु. जाती | 7 |
| अनु. जमाती | 4 |
| विजाभज. (अ/ब) | 3 |
| विशेष मागास प्रवर्ग | 1 |
| राखीव पदांची संख्या | 15 |
| खुल्या पदांची संख्या | 35 |

एच-710(ए)(5000-8-95)2.

सरळ सेवेतील जातीय आरक्षण तसेच महिला आणि विशेष मागास प्रवर्गाचे आरक्षण दर्शविणारी सुधारित 200 बिंदू नामावली.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्र.बीसीसी–1094/3609/प्र.क्र.56/94/16 ब,
मंत्रालय, मुंबई 400 032, दिनांक 15 सप्टेंबर, 1995

संदर्भ:– 1) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.बीसीसी–1093/2167/सीआर–141/93/16 ब, दिनांक 18 जून, 1994.
2) शासन निर्णय, महिला व बाल कल्याण विभाग, क्र.संकीर्ण–1092/प्र.क्र.366/का–2, दिनांक 22 जून, 1994.
3) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.बीसीसी–1094/प्र.क्र.68/94/16 ब, दिनांक 15 जून, 1995
4) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.बीसीसी–1094/प्र.क्र.68/94/16 ब, दिनांक 3 जुलै, 1995.

........

शासन निर्णय

1. मंडल आयोगाच्या शिफारशी लक्षात घेऊन राज्य शासनाने सरळ सेवेमध्ये जातीय आरक्षण अंतर्भूत असलेली 200 बिंदू नामावली उपरोक्त संदर्भ क्र.(1) येथे नमूद केलेल्या दिनांक 18 जून, 1994 च्या शासन निर्णयाद्वारे निर्गमित केली आहे.

2. उपरोक्त संदर्भ क्र.2 अन्वये महिलांसाठी शासन सेवेत 30% आरक्षण ठेवण्याबाबतचे आदेश महिला व बाल कल्याण विभागाने निर्गमित केले आहेत. सदर आदेश दिनांक 1.4.1994 पासून लागू करण्यात आले आहेत.

3. उपरोक्त संदर्भ क्र.3 मध्ये नमूद केलेल्या दिनांक 15 जून, 1995 च्या शासन निर्णयाद्वारे विशेष मागासप्रवर्गासाठी 2% आरक्षणाची तरतूद करण्यात आली आहे. सदर आरक्षणाची तरतूद दिनांक 13 जून, 1995 पासून लागू होईल असे उपरोक्त संदर्भ क्र.4 येथे नमूद केलेल्या दिनांक 3 जुलै, 1995 च्या आदेशांमध्ये नमूद करण्यात आले आहे.

4. महिलांसाठी असलेले 30% आरक्षण आणि विशेष मागास प्रवर्गासाठी असलेले आरक्षण लक्षात घेऊन ते आरक्षण अंतर्भूत करून भरतीसाठी असलेली 200 बिंदू नामावली सुधारित करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. आता याबाबत साकल्याने विचार करून महिला व विशेष मागास प्रवर्गासाठी असलेले आरक्षण अंतर्भूत करून सुधारित 200 बिंदू नामावली तयार करण्यात आली असून, ती सोबतच्या परिशिष्टामध्ये जोडली आहे.

5. वर नमूद केल्यानुसार महिलांचे आरक्षण दिनांक 1 एप्रिल, 1994 आणि विशेष मागास प्रवर्गाचे आरक्षण दिनांक 13 जून, 1995 पासून लागू करण्याचे आदेश असले तरी, सोबतच्या परिशिष्टात जोडण्यात आलेली बिंदू नामावली दिनांक 1 जुलै, 1995 पासून अंमलात /लागू करावी.

6. शासकीय कार्यालयांनी महिला आरक्षण आणि विशेष मागास प्रवर्गासाठी असलेले आरक्षण लक्षात घेऊन दिनांक 1 जुलै, 1995 पूर्वी काही कार्यवाही केली असल्यास त्यास या निर्णयामुळे बाधा येणार नाही. सदरहू सुधारित बिंदू नामावलीची सुरुवात बिंदू क्र.1 पासून करावी. दिनांक 30 जून, 1995 रोजी पूर्वीच्या बिंदू नामावलीप्रमाणे असलेला मागासवर्गीयांचा अनुशेष विचारात घ्यावा.

7. हे आदेश महिला व बालकल्याण विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

के.सी. श्रीवास्तव,
प्रधान सचिव (सेवा).

प्रति,

राज्यपाल यांचे सचिव,
मुख्य मंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव/अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
* प्रबंधक, लोकायुक्त आणि उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
सचिव, सर्व प्रादेशिक निवड मंडळे,
सचिव, राज्य निवड मंडळ,
संचालक, समाजकल्याण, पुणे,
आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक,
संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,
संचालक, सेवायोजन, मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
सर्व मंत्रालयीन विभाग,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती.

* पत्राने.

......

# सरळ भरतीची नमुनेवजा 200 बिंदु नामावली

| अनु.क्र. | पदे राखीव किंवा खुली आहेत | अनु.क्र. | पदे राखीव किंवा खुली आहेत |
|---|---|---|---|
| 1. | खुली | 36. | अनुसूचित जाती |
| 2. | अनुसूचित जाती | 37. | खुली |
| 3. | खुली | 38. | इतर मागासवर्ग (म) |
| 4. | अनुसूचित जमाती | 39. | खुली |
| 5. | खुली (म) | 40. | इतर मागासवर्ग |
| 6. | विमुक्त जाती (अ) | 41. | खुली (म) |
| 7. | खुली | 42. | अनुसूचित जाती (म) |
| 8. | भटक्या जमाती (ब) | 43. | खुली |
| 9. | खुली | 44. | अनुसूचित जमाती |
| 10. | भटक्या जमाती (क) | 45. | खुली |
| 11. | खुली (ग) | 46. | इतर मागासवर्ग |
| 12. | भटक्या जमाती (ड) | 47. | खुली (म) |
| 13. | विशेष मागास प्रवर्ग | 48. | अनुसूचित जाती |
| 14. | इतर मागासवर्ग | 49. | खुली |
| 15. | खुली | 50. | इतर मागासवर्ग |
| 16. | अनुसूचित जाती | 51. | खुली |
| 17. | खुली (म) | 52. | भटक्या जमाती (क) |
| 18. | अनुसूचित जाती (म) | 53. | खुली (खु) |
| 19. | खुली | 54. | अनुसूचित जाती |
| 20. | इतर मागासवर्ग (ग) | 55. | खुली |
| 21. | खुली | 56. | अनुसूचित जमाती |
| 22. | अनुसूचित जमाती | 57. | खुली |
| 23. | खुली (म) | 58. | इतर मागासवर्ग |
| 24. | इतर मागासवर्ग | 59. | खुली (म) |
| 25. | खुली | 60. | इतर मागासवर्ग (म) |
| 26. | इतर मागासवर्ग | 61. | खुली |
| 27. | खुली | 62. | अनुसूचित जाती (म) |
| 28. | अनुसूचित जाती | 63. | विशेष मागासवर्ग |
| 29. | खुली (म) | 64. | विमुक्त जाती (अ) |
| 30. | इतर मागासवर्ग | 65. | अपंग (मुक-बधीर) |
| 31. | खुली | 66. | इतर मागासवर्ग |
| 32. | अनुसूचित जमाती (म) | 67. | खुली (म) |
| 33. | अपंग (अंध) | 68. | अनुसूचित जमाती (ग) |
| 34. | इतर मागासवर्ग (म) | 69. | खुली |
| 35. | खुली (म) | 70. | अनुसूचित जाती |

| अनु.क्र. | पदे राखीव किंवा खुली आहेत | अनु.क्र. | पदे राखीव किंवा खुली आहेत |
|---|---|---|---|
| 71. | खुली | 108. | भटक्या जमाती (क) (म) |
| 72. | इतर मागासवर्ग | 109. | खुली (म) |
| 73. | खुली (म) | 110. | भटक्या जमाती (ड) |
| 74. | इतर मागासवर्ग (म) | 111. | खुली |
| 75. | खुली | 112. | इतर मागासवर्ग |
| 76. | अनुसूचित जाती | 113. | विशेष मागास प्रवर्ग |
| 77. | खुली | 114. | अनुसूचित जाती (म) |
| 78. | भटक्या जमाती (ब) | 115. | खुली (म) |
| 79. | खुली | 116. | इतर मागासवर्ग (म) |
| 80. | इतर मागासवर्ग | 117. | खुली |
| 81. | खुली | 118. | इतर मागासवर्ग |
| 82. | अनुसूचित जमाती | 119. | खुली |
| 83. | खुली | 120. | अनुसूचित जमाती (म) |
| 84 | भटक्या जमाती (क) | 121. | खुली (म) |
| 85 | खुली (म) | 122. | अनुसूचित जाती |
| 86 | अनुसूचित जाती (म) | 123. | खुली |
| 87 | खुली | 124. | इतर मागासवर्ग |
| 88. | विमुक्त जाती (अ) (म) | 125. | खुली |
| 89. | खुली | 126. | अनुसूचित जाती |
| 90. | इतर मागासवर्ग (म) | 127. | खुली (म) |
| 91. | खुली (म) | 128. | इतर मागासवर्ग (म) |
| 92. | अनुसूचित जाती | 129. | खुली |
| 93. | खुली | 130. | अनुसूचित जमाती |
| 94. | इतर मागासवर्ग | 131. | खुली |
| 95. | खुली | 132. | इतर मागासवर्ग |
| 96. | भटक्या जमाती (ड) (म) | 133. | अपंग (अंध) |
| 97. | खुली (म) | 134. | अनुसूचित जाती (म) |
| 98. | इतर मागासवर्ग | 135. | खुली (म) |
| 99. | अपंग (अस्थीव्यंग) | 136. | भटक्या जमाती (ब) (म) |
| 100. | अनुसूचित जाती | 137. | खुली |
| 101. | खुली | 138. | अनुसूचित जाती |
| 102. | अनुसूचित जमाती | 139. | खुली |
| 103. | खुली (म) | 140. | इतर मागासवर्ग (म) |
| 104. | विमुक्त जाती (अ) | 141. | खुली (म) |
| 105. | खुली | 142. | भटक्या जमाती (क) |
| 106. | भटक्या जमाती (ब) (म) | 143. | खुली |
| 107. | खुली | 144. | अनुसूचित जमाती |

मुद्र-1211(1,200-12-95)-2अ.

| अनु.क्र. | पदे राखीव किंवा खुली आहेत |
|---|---|
| 145 | खुली |
| 146 | इतर मागासवर्ग |
| 147 | खुली (म) |
| 148 | अनुसूचित जाती |
| 149 | खुली |
| 150 | इतर मागासवर्ग |
| 151 | खुली |
| 152 | इतर मागासवर्ग (म) |
| 153 | खुली (म) |
| 154 | अनुसूचित जाती (म) |
| 155 | खुली |
| 156 | अनुसूचित जमाती (म) |
| 157 | खुली |
| 158 | भटक्या जमाती (ब) |
| 159 | खुली (म) |
| 160 | इतर मागासवर्ग |
| 161 | खुली |
| 162 | अनुसूचित जाती |
| 163 | विशेष मागास प्रवर्ग (म) |
| 164 | विमुक्त जाती (अ) |
| 165 | अपंग (मूक-बधीर) |
| 166 | इतर मागासवर्ग |
| 167 | खुली |
| 168 | अनुसूचित जमाती |
| 169 | खुली |
| 170 | अनुसूचित जाती |
| 171 | खुली |
| 172 | भटक्या जमाती (क) |
| 173 | खुली (म) |
| 174 | इतर मागासवर्ग (म) |
| 175 | खुली |
| 176 | इतर मागासवर्ग |
| 177 | खुली |
| 178 | अनुसूचित जाती (म) |
| 179 | खुली (म) |
| 180 | इतर मागासवर्ग |
| 181 | खुली |
| 182 | अनुसूचित जमाती |
| 183 | खुली |
| 184 | अनुसूचित जाती |
| 185 | खुली (म) |
| 186 | भटक्या जमाती (क) (म) |
| 187 | खुली |
| 188 | विमुक्त जाती (अ) (म) |
| 189 | खुली |
| 190 | इतर मागासवर्ग |
| 191 | खुली |
| 192 | अनुसूचित जाती |
| 193 | खुली |
| 194 | इतर मागासवर्ग |
| 195 | खुली |
| 196 | इतर मागासवर्ग |
| 197 | खुली |
| 198 | भटक्या जमाती (ड) (म) |
| 199 | अपंग (अस्थी व्यंग) |
| 200 | इतर मागासवर्ग |

टिप:- (म) म्हणजे महिलांसाठी राखीव.

महिलांसाठी 30% आरक्षण ठेवण्यात आलेले असून त्या त्या प्रवर्गात त्यांच्या टक्केवारीनुसार अंतर्भाव करण्यात आला आहे:-

| आरक्षणाची टक्केवारी | | 200 बिंदूतील एकूण बिंदू |
|---|---|---|
| अनुसूचित जाती | 13% | 26 |
| अनुसूचित जमाती | 7% | 14 |
| विमुक्त जाती (अ) | 3% | 6 |
| भटक्या जमाती (ब) | 2.5% | 5 |
| भटक्या जमाती (क) | 3.5% | 7 |
| भटक्या जमाती (ड) | 2% | 4 |
| इतर मागासवर्ग | 19% | 38 |
| विशेष मागास प्रवर्ग | 2% | 4 |
| खुला प्रवर्ग | 48% | 96 |
| | 100 | 200 |

सुधारित बिंदु नामावली सरळ सेवा आणि पदोन्नती.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय, क्रमांक: बीसीसी-1094/3609/प्र.क्र.56/94/16-ब,
मंत्रालय, मुंबई-400 032, दिनांक 15 फेब्रुवारी, 1996.

**प्रस्तावना :-** शासन निर्णय, समक्रमांक दिनांक 15 सप्टेंबर, 1995 द्वारे विहित करण्यात आलेली सरळ सेवेची 200 बिंदु नामावली आणि शासन निर्णय, क्रमांक: बीसीसी-1094/प्र.क्र.68/94/16-ब, दिनांक 26 जुलै, 1995 अन्वये विहित केलेली पदोन्नतीची 50 बिंदु नामावली त्या दोनही बिंदु नामावल्या मागे घेतल्याची घोषणा शासनातर्फे दिनांक 19 डिसेंबर, 1995 रोजी विधान परिषदेतील चर्चे प्रसंगी करण्यात आली होती. सदर बिंदु नामावल्या मागे घेतल्यास त्याऐवजी कोणत्या बिंदु नामावल्या विहित करण्यात याव्यात याबाबतचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. त्यासंदर्भात आता खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :-** शासन निर्णय क्रमांक: बीसीसी-1094/प्र.क्र.68/94/16-ब, दिनांक 26 जुलै,1995 आणि शासन निर्णय, क्रमांक: बीसीसी-1094/3609/प्र.क्र.56/94/16-ब, दिनांक 15 सप्टेंबर, 1995 या आदेशांद्वारे विहित करण्यात आलेल्या अनुक्रमे 50 बिंदु नामावली आणि 200 बिंदु नामावली या दोन्ही बिंदु नामावल्या या शासन निर्णयाद्वारे विधान परिषदेतील चर्चेच्या दिनांकापासून म्हणजेच दिनांक 19 डिसेंबर, 1995 पासून मागे घेण्यात येत आहेत. सुधारित बिंदु नामावल्या लवकरच निर्गमित करण्यात येतील. दरम्यानच्या कालावधीत दिनांक 19 डिसेंबर, 1995 पासून सोबत जोडलेली 50 बिंदु नामावली पदोन्नतीसाठी आणि 200 बिंदु नामावली सरळ सेवा भरतीसाठी विहित करण्यात येत आहे.

ही नामावली दिनांक 19 डिसेंबर, 1995 पासून प्रथम बिंदु पासून वापरण्यात यावी. मात्र, दिनांक 18 डिसेंबर, 1995 रोजी पूर्वीच्या बिंदु नामावलीप्रमाणे असलेला मागासवर्गीयांचा अनुशेष विचारात घेण्यात यावा. दिनांक 19 डिसेंबर, 1995 पासून हे आदेश निर्गमित करण्यापर्यन्तच्या कालावधीत या पूर्वीच्या म्हणजे दिनांक 26 जुलै, 1995 व दिनांक 15 सप्टेंबर, 1995 च्या आदेशांनुसार भरती/पदोन्नतीबाबत काही कार्यवाही करण्यात आली असेल तर त्याची नोंद नवीन बिंदु नामावलीत घेण्यात यावी व त्या अनुषंगाने काही अनुशेष निर्माण होत असेल तर तो पुढील विचारात घेण्यात यावा.

पूर्वी म्हणजे दिनांक 18 डिसेंबर, 1995 पर्यन्त कार्यवाही पूर्ण झालेल्या म्हणजे सरळ सेवेतील मागणीपत्र पाठवून उमेदवार उपलब्ध झाले असल्यास, पदोन्नतीसंदर्भात निवडसूची सक्षम प्राधिकाऱ्याच्या स्तरावर मान्य झाली असल्यास, अशा प्रकरणी सुधारणा करण्याची आवश्यकता नाही. मात्र, दिनांक 18 डिसेंबर, 1995 नंतर करण्यात येणारी कार्यवाही व वरीलप्रमाणे कार्यवाही पूर्ण न झालेली प्रकरणे सोबत जोडलेल्या बिंदु नामावल्यांप्रमाणे करण्यात यावीत.

18 MAR 1996

सरळ सेवेमध्ये महिलांसाठी असलेले 30% आरक्षण त्या त्या प्रवर्गात टक्केवारीनुसार विचारात घेण्याची कार्यवाही संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी करावी.

सर्व शासकीय कार्यालयांनी सदर आदेशाची नोंद घ्यावी आणि त्यानुसार कार्यवाही करावी. मंत्रालयीन विभागांनी सदर आदेश त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयांना कळवावेत तसेच निमशासकीय सेवा, मंडळे, महामंडळे इत्यादी आस्थापनांमध्ये हे आदेश लागू करण्यासंबंधात स्वतंत्र आदेश संबंधित मंत्रालयीन विभागांनी तत्काळ निर्गमित करावेत.

शा.म.मु.रोटा/सा.प्र.वि./एच-1440(6000-2-96)-1

या संदर्भात निर्गमित केलेल्या आदेशांच्या प्रती या विभागकडेही पाठविण्यात याव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

क. [illegible],
प्रधान सचिव.

प्रति,

राज्यपालांचे सचिव,
मुख्यमंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव/अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
* प्रबंधक, लोकायुक्त आणि उप लोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
सचिव, सर्व प्रादेशिक निवड मंडळे,
सचिव, राज्य निवड मंडळ,
संचालक, समाजकल्याण, पुणे,
आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक,
संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,
संचालक, सेवायोजन, मुंबई,
सहायक आयुक्त (मागासवर्ग कक्ष), सर्व विभागीय आयुक्तांची कार्यालये,
महालेखापाल, महाराष्ट्र 1/2 (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर,
महालेखापाल, महाराष्ट्र 1/2 (लेखा परीक्षा), मुंबई/नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा अधिकारी, मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती.

---

* पत्राने.

# सरळ भरतीची नमुनेदाखल 200 बिंदु नामावली.

| अनु-क्रमांक 1. | पदे राखीव किंवा खुली आहेत. 2. | अनु-क्रमांक 1. | पदे राखीव किंवा खुली आहेत. 2. |
|---|---|---|---|
| 1. | अनुसूचित जाती | 41. | अनुसूचित जाती |
| 2. | अनुसूचित जमाती | 42. | खुली |
| 3. | विमुक्त जाती (अ) | 43. | खुली |
| 4. | भटक्या जमाती (ब) | 44. | अनुसूचित जमाती |
| 5. | इतर मागास वर्ग | 45. | खुली |
| 6. | खुली | 46. | खुली |
| 7. | खुली | 47. | इतर मागास वर्ग |
| 8. | खुली | 48. | खुली |
| 9. | अनुसूचित जाती | 49. | अनुसूचित जाती |
| 10. | इतर मागास वर्ग | 50. | भटक्या जमाती (ड) |
| 11. | विशेष मागास प्रवर्ग | 51. | खुली |
| 12. | खुली | 52. | इतर मागास वर्ग |
| 13. | खुली | 53. | खुली |
| 14. | खुली | 54. | खुली |
| 15. | इतर मागास वर्ग | 55. | खुली |
| 16. | अनुसूचित जमाती | 56. | भटक्या जमाती (क) |
| 17. | अनुसूचित जाती | 57. | अनुसूचित जाती |
| 18. | खुली | 58. | अनुसूचित जमाती |
| 19. | खुली | 59. | इतर मागास वर्ग |
| 20. | खुली | 60. | खुली |
| 21. | इतर मागास वर्ग | 61. | खुली |
| 22. | खुली | 62. | विशेष मागास प्रवर्ग |
| 23. | खुली | 63. | इतर मागास वर्ग |
| 24. | खुली | 64. | खुली |
| 25. | अनुसूचित जाती | 65. | अनुसूचित जाती |
| 26. | इतर मागास वर्ग | 66. | अपंग (मूकबधीर) |
| 27. | खुली | 67. | विमुक्त जाती (अ) |
| 28. | खुली | 68. | इतर मागास वर्ग |
| 29. | भटक्या जमाती (क) | 69. | खुली |
| 30. | अनुसूचित जमाती | 70. | खुली |
| 31. | इतर मागास वर्ग | 71. | खुली |
| 32. | खुली | 72. | अनुसूचित जमाती |
| 33. | अपंग (अंध) | 73. | अनुसूचित जाती |
| 34. | अनुसूचित जाती | 74. | इतर मागास वर्ग |
| 35. | खुली | 75. | खुली |
| 36. | इतर मागास वर्ग | 76. | खुली |
| 37. | खुली | 77. | खुली |
| 38. | खुली | 78. | इतर मागास वर्ग |
| 39. | खुली | 79. | खुली |
| 40. | इतर मागास वर्ग | 80. | खुली |

एम-1440(6000-2-96)-2

| अनु-क्रमांक | पदे राखीव किंवा खुली आहेत. | अनु-क्रमांक | पदे राखीव किंवा खुली आहेत. |
|---|---|---|---|
| 1. | 2. | 1. | 2. |
| 81. | अनुसूचित जाती | 121. | खुली |
| 82. | भटक्या जमाती (ब) | 122. | खुली |
| 83. | खुली | 123. | खुली |
| 84. | इतर मागास वर्ग | 124. | खुली |
| 85. | खुली | 125. | अनुसूचित जाती |
| 86. | अनुसूचित जमाती | 126. | इतर मागास वर्ग |
| 87. | भटक्या जमाती (क) | 127. | खुली |
| 88. | खुली | 128. | खुली |
| 89. | अनुसूचित जाती | 129. | खुली |
| 90. | इतर मागास वर्ग | 130. | अनुसूचित जमाती |
| 91. | खुली | 131. | इतर मागास वर्ग |
| 92. | खुली | 132. | खुली |
| 93. | खुली | 133. | अपंग (अंध) |
| 94. | इतर मागास वर्ग | 134. | अनुसूचित जाती |
| 95. | अनुसूचित जाती | 135. | खुली |
| 96. | खुली | 136. | इतर मागास वर्ग |
| 97. | विमुक्त जाती (अ) | 137. | खुली |
| 98. | इतर मागास वर्ग | 138. | खुली |
| 99. | अपंग (अस्थिव्यंग) | 139. | खुली |
| 100. | भटक्या जमाती (ड) | 140. | खुली |
| 101. | अनुसूचित जाती | 141. | अनुसूचित जाती |
| 102. | अनुसूचित जमाती | 142. | इतर मागास वर्ग |
| 103. | विमुक्त जाती (अ) | 143. | भटक्या जमाती (क) |
| 104. | भटक्या जमाती (ब) | 144. | अनुसूचित जमाती |
| 105. | इतर मागास वर्ग | 145. | खुली |
| 106. | खुली | 146. | खुली |
| 107. | विशेष मागास प्रवर्ग | 147. | इतर मागास वर्ग |
| 108. | खुली | 148. | खुली |
| 109. | अनुसूचित जाती | 149. | अनुसूचित जाती |
| 110. | इतर मागास वर्ग | 150. | भटक्या जमाती (ड) |
| 111. | खुली | 151. | खुली |
| 112. | खुली | 152. | इतर मागास वर्ग |
| 113. | खुली | 153. | खुली |
| 114. | भटक्या जमाती (क) | 154. | खुली |
| 115. | इतर मागास वर्ग | 155. | खुली |
| 116. | अनुसूचित जमाती | 156. | इतर मागास वर्ग |
| 117. | अनुसूचित जाती | 157. | अनुसूचित जाती |
| 118. | खुली | 158. | अनुसूचित जमाती |
| 119. | इतर मागास वर्ग | 159. | खुली |
| 120. | खुली | 160. | खुली |

मुम-1440(6000-2-96)-24.

| अनु-क्रमांक १. | पदे राखीव किंवा खुली आहेत 2. | अनु-क्रमांक 1. | पदे राखीव किंवा खुली आहेत. 2. |
|---|---|---|---|
| 161. | भटक्या जमाती (ब) | 181. | अनुसूचित जाती |
| 162. | इतर मागास वर्ग | 182. | खुली |
| 163. | विशेष मागास प्रवर्ग | 183. | इतर मागास वर्ग |
| 164. | खुली | 184. | खुली |
| 165. | अनुसूचित जाती | 185. | खुली |
| 166. | अपंग (मुक बधीर) | 186. | अनुसूचित जमाती |
| 167. | विमुक्त जाती (अ) | 187. | खुली |
| 168. | इतर मागास वर्ग | 188. | खुली |
| 169. | खुली | 189. | अनुसूचित जाती |
| 170. | खुली | 190. | इतर मागास वर्ग |
| 171. | खुली | 191. | खुली |
| 172. | अनुसूचित जमाती | 192. | खुली |
| 173. | अनुसूचित जाती | 193. | विमुक्त जाती (अ) |
| 174. | भटक्या जमाती (क) | 194. | इतर मागास वर्ग |
| 175. | इतर मागास वर्ग | 195. | अनुसूचित जाती |
| 176. | खुली | 196. | भटक्या जमाती (ब) |
| 177. | खुली | 197. | भटक्या जमाती (क) |
| 178. | इतर मागास वर्ग | 198. | इतर मागास वर्ग |
| 179. | खुली | 199. | अपंग (अस्थिव्यंग) |
| 180. | खुली | 200. | भटक्या जमाती (ड) |

| | | | |
|---|---|---|---|
| (1) | अनुसूचित जाती | 13% | 26 |
| (2) | अनुसूचित जमाती | 7% | 14 |
| (3) | विमुक्त जाती (अ) (14 व तत्सम जाती) | 3% | 6 |
| (4) | भटक्या जमाती (ब) (जानेवारी, 1990 पूर्वीच्या 28 व तत्सम जमाती) | 2.5% | 5 |
| (5) | भटक्या जमाती (क) (धनगर व तत्सम जमाती) | 3.5% | 7 |
| (6) | भटक्या जमाती (ड) (वंजारी व तत्सम जमाती) | 2% | 4 |
| (7) | इतर मागास वर्ग | 19% | 38 |
| (8) | विशेष मागास वर्ग | 2% | 4 |
| | एकूण राखीव पदांची संख्या | | 104 |
| | खुल्या पदांची संख्या | | 96 |
| | | एकूण - | 200 |

## पदोन्नतीची 50 बिंदू नमुनेदार नामावली

| अनु-क्र. | पदे राखीव किंवा खुली आहेत. | अनु. क्र. | पदे राखीव किंवा खुली आहेत. |
|---|---|---|---|
| 1. | 2 | 1. | 2 |
| 1. | अनुसूचित जाती | 26. | खुली |
| 2. | अनुसूचित जमाती | 27. | खुली |
| 3. | विमुक्त जाती व भटक्या जमाती | 28. | विमुक्त जाती व भटक्या जमाती |
| 4. | खुली | 29. | खुली |
| 5. | खुली | 30. | अनुसूचित जमाती |
| 6. | खुली | 31. | खुली |
| 7. | खुली | 32. | खुली |
| 8. | खुली | 33. | अनुसूचित जाती |
| 9. | अनुसूचित जाती | 34. | खुली |
| 10. | खुली | 35. | खुली |
| 11. | विशेष मागास प्रवर्ग | 36. | खुली |
| 12. | खुली | 37. | खुली |
| 13. | खुली | 38. | खुली |
| 14. | खुली | 39. | खुली |
| 15. | खुली | 40. | खुली |
| 16. | अनुसूचित जमाती | 41. | अनुसूचित जाती |
| 17. | अनुसूचित जाती | 42. | खुली |
| 18. | खुली | 43. | खुली |
| 19. | खुली | 44. | अनुसूचित जमाती |
| 20. | खुली | 45. | खुली |
| 21. | खुली | 46. | खुली |
| 22. | खुली | 47. | खुली |
| 23. | खुली | 48. | खुली |
| 24. | खुली | 49. | अनुसूचित जाती |
| 25. | अनुसूचित जाती | 50. | विमुक्त जाती व भटक्या जमाती. |

| | |
|---|---|
| अनुसूचित जाती | 7 |
| अनुसूचित जमाती | 4 |
| विमुक्त जाती व भटक्या जमाती | 3 |
| विशेष मागास प्रवर्ग | 1 |
| खुल्या पदांची संख्या | 35 |

पदोन्नती

विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु असताना शासकीय सेवकास दिलेल्या पदोन्नतीचे नियमन करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय, क्र.एसआरव्ही-१०९५/प्र.क्र.२९/९५/बारा,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक - २२ एप्रिल, १९९६.

वाचा :- शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-एसआरव्ही-१०७५/१०, दिनांक २ एप्रिल, १९७६.

**शासन निर्णय**

विभागीय चौकशी प्रलंबित असलेल्या अधिकारी/कर्मचारी हयांच्या पदोन्नतीसाठी विचार करताना काय कार्यपध्दती अवलंबिली जावी, हया संबंधात सविस्तर सूचना उपरोलिखित परिपत्रकान्वये विहित करण्यात आल्या आहेत. त्यानुसार विभागीय चौकशी प्रलंबित असतानाही, ज्येष्ठताक्रमानुसार विचारक्षेत्रात येणारे अधिकारी / कर्मचारी पदोन्नतीस पात्र असल्याचे, निवडसमितीस आढळल्यास अशा अधिकारी / कर्मचारी हयांचा निवडसूचीत तात्पुरत्या स्वरुपात समावेश केला जातो व नंतर, पदोन्नती आदेशित करण्यास सक्षम असणाऱ्या अधिकाऱ्याने अशा दोषारोपांचे स्वरुप लक्षात घेवून, त्यास चौकशीच्या निर्णयाची वाट न पहाता तात्पुरती पदोन्नती द्यावयाची काय हयाबाबत जाणीपूर्वक निर्णय घ्यावयाचा असतो,

(ब) विभागीय चौकशी नंतर, अधिकारी / कर्मचारी हयास दोषमुक्त ठरविल्यास, ओघानेच त्याची तात्पुरती पदोन्नती नियमित केली जाते. परंतु, अधिकारी / कर्मचारी हयांचे विरुध्दचे आरोप सिध्द होऊन, त्यास काही शिक्षा झाली तर शिक्षेची अंमलबजावणी करण्याकरिता त्याची तात्पुरती पदोन्नती संपुष्टात येते.

हयासंबंधात, शासनाच्या असे निदर्शनास आले की, दीर्घकाळ चाललेल्या चौकशीच्या प्रक्रियेनंतर, अपचारी अधिकारी / कर्मचारी हयांस वेतनवाढ/वाढी, रोखण्याची सौम्य शिक्षा झाल्यावर, ही शिक्षा भोगण्यासाठी अधिकारी / कर्मचारी हयास, निम्न पदावर पदावनत करणे जाचक ठरते, म्हणून हया सर्व बाबींचा काळजीपूर्वक विचार करुन शासन असे आदेश देत आहे की,

(१) विभागीय चौकशी प्रलंबित असतानाही , जाणीवपूर्वक निर्णय घेऊन तात्पुरते पदोन्नत करण्यात आलेल्या अधिकारी / कर्मचारी हयास चौकशीनंतरच्या निर्णयानुसार वेतनवाढ /वाढी रोखण्याची सौम्य शिक्षा झाल्यास, शिक्षा भोगण्यासाठी, त्यास निम्न पदावर, पदावनत करण्याची आवश्यकता नाही. वेतनवाढ /वाढी रोखण्याच्या शिक्षेची अंमलबजावणी पदोन्नतीच्या उच्च पदावरच करण्यात यावी. मात्र त्यासाठी त्याची , त्याची उच्च पदावर शिक्षा भोगण्यास तयारी असल्याची लेखी पूर्वसंमती घेण्यात यावी . जर त्याने लेखी संमती देण्याचे नाकारल्यास, त्यास निम्न पदावर पदावनत करुन त्या पदावर शिक्षेची अंमलबजावणी केली जावी व शिक्षेचा कालावधी पूर्ण होईपर्यन्त त्यास पदोन्नती दिली जाऊ नये .

(२) ज्या प्रकरणी पदोन्नती रोखण्याची शिक्षा देण्यात आली असेल, अशा अपचारी अधिकारी / कर्मचारी हयास ताबडतोब मूळ पदावर पदावनत करण्यात यावे .

हे आदेश दिनांक १ जानेवारी , १९९५ पासून अंमलात येतील .

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

के.सी.श्रीवास्तव
प्रधान सचिव (सेवा)

प्रति,
राज्यपालांचे सचिव,
मुख्यमंत्र्यांचे सचिव,
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग (पत्राने),
सचिव , महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय ,
प्रबंधक उच्च न्यायालय, मूळ बाजू ,
प्रबंधक उच्च न्यायालय, अपील बाजू ,
सर्व मंत्रालयीन विभाग,
मंत्रालयीन विभागाच्या अखत्यारीतील सर्व विभग प्रमुखा /कार्यालय प्रमुख

शासकीय सेवकांना पदोन्नतीसंदर्भात मानीव दिनांक देण्याबाबत.

प्रकरण तपासणी अधिकाराबाबत.

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक: एसआरव्ही 1093/प्र.क्र 2/93/बारा,
मंत्रालय, मुंबई-400 032, दिनांक 7 जून, 1996.

वाचा :- (1) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: एसआरव्ही-1093/प्र.क्र.2/93/12, दिनांक 11 जून, 1993.

(2) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: एसआरव्ही-1093:प्र.क्र.2/93/12, दिनांक 13 डिसेंबर, 1993.

## शासन परिपत्रक

शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: एसआरव्ही-1093/प्र.क्र.2/93/12, दिनांक 11 जून, 1993 अनुसार शासकीय कर्मचा-यांना मानीव दिनांक देण्याच्या प्रकरणी सामान्य प्रशासन व वित्त विभागाची सहमती घेणे आवश्यक आहे.

2. सदर आदेशापूर्वी निकाली काढण्यात आलेली प्रकरणे मंत्रालयीन प्रशासकीय विभागांकडून सामान्य प्रशासन व वित्त विभागाकडे सहमतीसाठी पाठविण्यात येत आहेत. त्यामुळे शासन याद्वारे असे निदेश देत आहे की, दिनांक 11 जून, 1993 च्या पूर्वी निकाली काढण्यात आलेल्या सर्व प्रकरणी पुनर्विलोकन करणे अपेक्षित नाही. परिणामी अशी सर्व प्रकरणे सामान्य प्रशासन व वित्त विभागाकडे सहमतीसाठी पाठविणे आवश्यक नाही. तथापि, ज्या प्रकरणांमध्ये मानीव दिनांक देताना अनियमितता घडल्याचे वेतन पडताळणी वा अन्य एखाद्या सक्षम प्राधिका-याच्या निदर्शनास आले आहे, अशी प्रकरणे मात्र सामान्य प्रशासन व वित्त विभागास मान्यतेसाठी पाठविणे आवश्यक आहे.

प्रस्तुत आदेश वित्त विभागाची संमती अनौपचारिक संदर्भ क्रमांक 353/सेवा-3, दिनांक 2 एप्रिल, 1996 अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सु. र. सुर्वे,
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

1. राज्यपाल यांचे सचिव,
2. मुख्य मंत्री यांचे सचिव,
* 3. प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा/अपिल शाखा, मुंबई,
* 4. प्रबंधक, लोकआयुक्त व उपलोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
* 5. सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
6. महालेखापाल, महाराष्ट्र-1, मुंबई,
7. महालेखापाल, महाराष्ट्र-2, नागपूर,
8. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
9. विविध मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व सर्व कार्यालय प्रमुख,
10. सर्व मंत्रालयीन विभाग,
11. सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने.

---

* पत्राने.

शासन सेवेतील पदांची वेतनश्रेणी वाढवितांना किंवा त्यामध्ये बदल करतांना तसेच राजपत्रित दर्जा देताना सामान्य प्रशासन विभागाशी विचार विनिमय करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक : एसआरव्ही-१०९६/प्र. क्र. ३/९६/१२,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २६ ऑगस्ट, १९९६.

वाचा :- सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. एसआरव्ही-१०९३/ प्र. क्र. ४/९३/१२, दिनांक ८ जून, १९९३.

## शासन परिपत्रक

शासन सेवेतील गट "क" मधील पदांची वेतनश्रेणी गट "ब" मधील पदा इतकी वाढविण्याच्या प्रस्तावास प्रथम, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची सहमती घेण्यात यावी असे वरील संदर्भाधीन दि. ८ जून, १९९३ च्या शासन परिपत्रकानुसार स्पष्ट करण्यात आले आहे.

२. वरील प्रस्ताव तसेच शासन सेवतील पदांची वेतनश्रेणी वाढवितांना किंवा त्यामध्ये इतर काही बदल करतांना असे प्रस्ताव सेवा विषयक बाबींच्या संदर्भात आणि संवर्ग व्यवस्थापनेच्या दृष्टीने या विभागास दाखविणे आवश्यक आहे. तथापि, अशा प्रस्तावास सामान्य प्रशासन विभागाची सहमती घेतली जात नाही असे या विभागाच्या निदर्शनास आले आहे.

३. अतएव, शासनाचे असे आदेश आहेत की, मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या नियंत्रणाखील सेवामधील किंवा संवर्गातील पदांची वेतनश्रेणी वाढवितांना किंवा त्यामध्ये इतर काही बदल करतांना तसेच राजपत्रित , दर्जा द्यावयाचे प्रस्ताव वित्त विभागास सादर करण्यापूर्वी प्रथम न चुकता या विभागाकडे पाठवावेत. तसे करतांना प्रारूप सेवाप्रवेश नियमांचा मसुदा देखील सादर करावा.

४. सर्व मंत्रालयीन विभागांनी या सूचनांचे काटेकोरपणे अनुपालन करावे.
महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने.

[य. मा. जोशी]
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
१. राज्यपालांचे सचिव,
२. मुख्यमंत्र्यांचे सचिव,
३. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,, सर्व मंत्रालयीन विभाग.
४. सर्व मंत्रालयीन विभाग,
५. वित्त विभाग.
६. महाराष्ट्र लोकसेवा आयोग [पत्राने]
७. सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने

**सेवा प्रवेश नियम**

पदोन्नतीसाठी पूर्वअट म्हणून निम्न संवर्गात किमान सेवेसंबंधीची अट.

---

परिविक्षाधीन कालावधीतील सेवा अनुभवासाठी ग्राह्य न धरण्याबाबतचे आदेश मागे घेण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग,

शासन निर्णय क्रमांक:एसआरव्ही-1091/प्र.क्र.1/91/12,

मंत्रालय, मुंबई 400 032, दिनांक : 17 फेब्रुवारी, 1997.

पहा :- 1) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही-1088/109/बारा, दिनांक 25 ऑगस्ट, 1988

2) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-1088/109/बारा, दिनांक 31 मे, 1989,

3) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-1088/109/प्रक्र.1/88/बारा, दिनांक 4 सप्टेंबर, 1990.

4) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे क्र.73(अ)(7)/989/दोन, दिनांक 25 जानेवारी, 1994 व 25 जून 1996

5) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-1091/प्रक्र.1/91/बारा, दिनांक 23 मे, 1994.

शासन निर्णय :- परिविक्षाधीन कालावधीतील सेवा, पदोन्नतीसाठी निम्न संवर्गात पूर्वअट म्हणून अनुभवासाठी ग्राह्य न धरण्याबाबतचे वरील अनुक्रमांक (5) येथील आदेश मागे घेण्यात येत आहेत. त्यामुळे परिविक्षाधीन कालावधीतील सेवा पदोन्नतीसाठी आवश्यक असलेल्या अनुभवासाठी ग्राह्य धरण्यात यावी. मात्र परिविक्षा कालावधी समाप्त केल्याचे आदेश निर्गमित केल्याखेरीज संबंधित सेवकाचा वरच्या पदावरील पदोन्नतीसाठी विचार करु नये.

सदर आदेश मागे घेण्यात आल्यामुळे दिनांक 23 मे, 1994 ते आजतागायत ज्या कर्मचा-यांचा/अधिका-यांचा या आदेशामुळे पदोन्नतीसाठी विचार करण्यात येऊ शकला नाही अशी काही प्रकरणे असल्यास या कर्मचा-यांचा/अधिका-यांचा पदोन्नतीसाठी तातडीने विचार व्हावा व त्यांची पदोन्नत संवर्गात मूळ ज्येष्ठता कायम राखण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

य. मा. जोशी,
सह सचिव, महाराष्ट्र शासन.

- 8 MAR 1997
शाखा 813
प्र. लि. नि. उ. शि. जिल्हाधिकारी

प्रति,

शासन सेवेतील मागासवर्गीय/अमागासवर्गीय
कर्मचारी/अधिकारी यांची पदोन्नत संवर्गात
आपापसातील ज्येष्ठता विनियमित करण्याबाबत

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-१०९६/प्र.क्र ३२/९६/बारा,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक:- २७ मार्च, १९९७

वाचा-शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-१०७६/१२
दिनांक:- २१ जून, १९८२.

शासन निर्णय

शासन सेवेतील विविध संवर्गात/पदावर नियमितरित्या नियुक्ती झालेल्या शासकीय सेवकांची ज्येष्ठता त्यांच्या त्या पदावरील/संवर्गातील किंवा सेवेतील अखंडित सेवाकालावधीवरून निश्चित केली जाते. मात्र, या प्रयोजनार्थ अभावित नेमणूकीचा कालावधी वगळला जातो. म्हणजेच, ज्या दिनांकापासून संबंधितांची नियमित नेमणूक झाली असेल त्या दिनांकापासून ज्येष्ठता निर्धारित केली जाते. केंद्र शासन विरुद्ध विरपालसिंग चौहान इत्यादी [केस नं. जेटी-१९९५(७)एससी-२३१, दिनांक १०.१०.१९९५ प्रकरणी निर्णय देताना सर्वोच्च न्यायालयाने आपल्या निकालपत्रातील परिच्छेद २३ मध्ये मागासवर्गीय आणि अमागासवर्गीय अधिकारी/कर्मचारी यांची पदोन्नत संवर्गात, आपापसातील ज्येष्ठता कशी निर्धारित करावी यासंबंधी नमूद केलेले तत्व खालीलप्रमाणे आहे :-

Even if a scheduled caste/scheduled Tribe candidate, is promoted earlier by virtue of a rule of reservation/roster, than his senior general candidate and the senior general candidate is promoted later to the said higher grade, the general candidate regains his seniority over such earlier promoted Scheduled caste/Scheduled tribe candidate. The earlier promotion of the S.C./S.T. candidate in such a situation does not confer upon him seniority over the general candidate even though the general candidate is promoted later to that category.

S.O file

..p.t.o.

जिल्हाधिकारी कार्यालय
रत्नागिरी.
- 4 APR 1997
शाखा

थोडक्यात, मागासवर्गीय सेवकाला आरक्षणानुसार अमागासवर्गीय सेवकाच्या अगोदर वरच्या पदावर जरी पदोन्नती मिळाली असली, तरी अशा परिस्थितीत त्यांच्यानंतर पदोन्नत झालेल्या सर्वसाधारण वर्गातील कर्मचा-याच्या-वर वरच्या संवर्गात ज्येष्ठता प्राप्त होत नाही.

२. सर्वोच्च न्यायालयाचा वर नमूद केलेला निर्णय व केंद्र शासनाचा कार्मिक व प्रशिक्षण मंत्रालयाचे दिनांक ३० जानेवारी, ९७ चे आदेश लक्षात घेता राज्यशासकीय सेवेतील कर्मचा-यांच्याबाबतीत [illegible] ज्येष्ठता विनियमात योग्य त्या दुरुस्त्या करणे क्रमप्राप्त ठरते. त्या अनुषंगाने खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी असा निर्णय घेण्यात येत आहे.

अ] एखादया कर्मचारी/अधिका-याची आरक्षण बिंदूनुसार त्या पदावर पदोन्नतीने नियुक्ती झाल्यानंतर [illegible] ज्येष्ठ असलेल्या खुल्या प्रवर्गातील कर्मचारी/अधिकारी पदोन्नत झाल्यास, तो मुळची ज्येष्ठता पुन्हा प्राप्त करील. थोडक्यात खुल्या प्रवर्गातील कर्मचारी/अधिकारी आरक्षणाच्या धोरणामुळे उशिरा पदोन्नत झाल्यास त्याच्या मूळ सेवा प्रविष्ठ संवर्गानुसार त्याची ज्येष्ठता कायम राहील.

ब] राज्यशासकीय सेवेतील वरच्या पदावर पदोन्नतीसाठी निम्न पदावर किमान सेवेची अट सेवा प्रवेश नियमात विहित करण्यात येते. वर "अ" येथे नमूद केल्यानुसार ज्येष्ठता निश्चित केल्यावर संबंधित कर्मचारी किमान सेवेची ही अट पूर्ण करीत नसतील तर त्यांचा अनुभव कालावधी तो त्यास कनिष्ठ असलेल्या मागासवर्गीयांच्या नियुक्ती दिनांकापासून धरण्यात यावा.

क] शासन सेवेतील विविध संवर्गातील निवडसूच्या वरील तरतुदीनुसार ज्येष्ठता विचारात घेऊन बनविण्यात याव्यात. सध्याच्या ज्येष्ठता यादया सुधारण्यात याव्यात.

३. ज्येष्ठता निर्धारित करण्यासंबंधीचे वरील तत्व शासन सेवेतील सर्व गटांतील सर्व स्तरांवरील पदोन्नत्याच्या संदर्भात लागू राहील.

४. हे आदेश दिनांक ३० जानेवारी, १९९७ पासून अंमलात येतील.

५. सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-१०७७/१२, दिनांक २१ जून, ८२ च्या अधिसूचनेन्वये विहित केलेल्या महाराष्ट्र नागरी सेवा [ज्येष्ठता विनियम] नियम १९८२ मध्ये वरीलप्रमाणे आवश्यक त्या सुधारणा करण्यात येत आहेत. त्या सुधारणा होईपर्यन्त या आदेशानुसार कार्यवाही करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

[ रवि भू. बुध्दिराजा ]
सचिव [सेवा]

प्रति,

राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
मुख्यमंत्री यांचे सचिव,
उप मुख्यमंत्री यांचे सचिव,
सर्व मंत्री यांचे खाजगी सचिव,
सर्व राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
* प्रबंधक, लोकायुक्त व उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, [विधानसभा], मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय [विधानपरिषद], मुंबई,
महालेखापाल-१ [लेखा परीक्षा], महाराष्ट्र, मुंबई,
महालेखापाल-२ [लेखा परीक्षा], महाराष्ट्र नागपूर,
महालेखापाल-१, [लेखा व अनुज्ञेयता], महाराष्ट्र, मुंबई,
महालेखापाल-२, [लेखा व अनुज्ञेयता], महाराष्ट्र नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
मुख्य लेखा परीक्षक [निवासी लेखे], कोकण भवन, नवी मुंबई,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हापरिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
सर्व मंत्रालयीन विभाग,
निरनिराळ्या मंत्रालयीन विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती.

* पत्राने

**सरळसेवा प्रवेश व पदोन्नतीसाठी सुधारित बिंदू नामावली विहित करण्याबाबत....**

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक: बीसीसी-1097/प्र.क्र.2/97/16-ब,
मंत्रालय, मुंबई-400 032. दिनांक:- 29 मार्च, 1997.

वाचा:- 1) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक-बीसीसी-1094/प्र.क्र.68/94/16-ब,
दिनांक: 26 जुलै, 1995.
2) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक-बीसीसी-1094/3609/प्र.क्र.56/94/16-ब,
दिनांक: 15 सप्टेंबर, 1995.
3) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक-बीसीसी-1094/3609/प्र.क्र.56/94/16-ब,
दिनांक: 15 फेब्रुवारी, 1996.

**प्रस्तावना :-** उपरोक्त दिनांक: 26 जुलै, 1995 व दिनांक: 15 सप्टेंबर, 1995 च्या शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेल्या 200 बिंदू व 50 बिंदू नामावल्या मागे घेण्यात येत असल्याची घोषणा, दिनांक: 19 डिसेंबर,1995 रोजी विधान परिषदेत झालेल्या चर्चेच्या वेळी शासनातर्फे करण्यात आली. त्या अनुषंगाने, उपरोक्त क्रमांक-3 येथील दिनांक 15 फेब्रुवारी, 1996 च्या शासन निर्णयान्वये, घोषणेच्या दिनांकापासून म्हणजेच दिनांक: 19 डिसेंबर, 1995 पासून, 200 बिंदू व 50 बिंदू नामावल्या मागे घेण्यात आल्या. मात्र दरम्यानच्या काळात कामकाजाची अडचण होऊ नये म्हणून तात्पुरती 200 बिंदू/50 बिंदू नामावली विहित करण्यात आली. बिंदू नामावली सुधारित करण्याचा प्रश्न शासनाच्या काही काळ विचाराधीन होता.

**शासन निर्णय :** सरळसेवा प्रवेशासाठी व पदोन्नतीसाठी बिंदू नामावल्या सुधारित करण्याच्या प्रश्नासंदर्भात शासनाने मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठित केली होती. या समितीने केलेल्या शिफारशीनुसार सरळसेवा प्रवेशासाठी सुधा 100 बिंदू नामावली व पदोन्नतीसाठी सुधारित 50 बिंदू नामावली याद्वारे विहित करण्यात येत आहेत. सुधारित बिंदू नामावलीचा न सोबत जोडला आहे.

2. या निर्णयाच्या दिनांकापूर्वी ज्या प्रकरणी कार्यवाही पूर्ण झालेली आहे, त्याचे पुनर्विलोकन करण्याची आवश्यकता नाही. मात्र, यापुढे सरळसेवा भरती व पदोन्नतीसंदर्भात, सोबतची सुधारित बिंदू नामावली अनुसरण्यात यावी. विद्यमान नामावलीनुसार यापूर्वी ज्या क्रमांकापर्यंतचे बिंदू वापरले आहेत, त्यापुढील बिंदू पासून सुधारित बिंदू नामावलीचा अवलंब करण्यात य मात्र त्यापूर्वीचा अनुशेष असल्यास सरळसेवा भरती/पदोन्नती प्रसंगी विचारात घेण्यात यावा. विमुक्त जाती/ भटक्या जमाती क सरळ सेवेसाठी "अ", "ब", "क" व "ड" या प्रवर्गातील आरक्षण अंतर्गत परिवर्तनीय (Internally transferable) राहील.

3.मंत्रालयीन विभागांनी,सरळसेवा भरती व पदोन्नतीच्या वेळी, या सुधारित बिंदू नामावलीचा अवलंब करावा. तसेच त्यांच्या नियंत्रणाखाली सर्व शासकीय कार्यालयांना, यासंदर्भात उचित सूचना देण्यात याव्यात. निमशासकीय सेवा, मंडळे, न... इत्यादीमध्ये, हे आदेश लागू करण्यासंबंधी संबंधीत मंत्रालयीन विभागांनी योग्य ते आदेश निर्गमित करावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

रवि भू. बूध्दीराजा,
सचिव (सेवा).

प्रति,
राज्यपालांचे सचिव,

कृ.मा.पं.

मुख्य मंत्र्यांचे प्रधान सचिव,
उप मुख्यमंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव/ अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
- प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई,
- प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
- प्रबंधक, लोकायुक्त आणि उप लोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,

सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
सचिव, सर्व प्रादेशिक निवड मंडळे,
सचिव, राज्य निवड मंडळ,
संचालक, समाजकल्याण, पुणे,
आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक,
संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,
संचालक, सेवायोजन, मुंबई,
सहाय्यक आयुक्त (मागासवर्ग कक्ष), सर्व विभागीय आयुक्तांची कार्यालये,
महालेखापाल, महाराष्ट्र 1/2, (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर,
महालेखापाल, महाराष्ट्र 1/2, (लेखा परीक्षा), मुंबई/नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा अधिकारी, मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासन,
निवड नस्ती.

- <u>पत्राने</u>

## सरळसेवा भरतीसाठी 100 बिंदु नामावली.

| अनुक्रमांक | वर्ग | अनुक्रमांक | वर्ग. |
|---|---|---|---|
| 1. | अनुसूचित जाती | 36. | खुला |
| 2. | अनुसूचित जमाती | 37. | अनुसूचित जाती |
| 3 | विमुक्त जाती (अ) | 38. | खुला |
| 4. | भटक्या जमाती (ब) | 39. | इतर मागास वर्ग |
| 5. | इतर मागास वर्ग | 40. | खुला |
| 6. | खुला | 41. | विमुक्त जाती (अ) |
| 7. | भटक्या जमाती (क) | 42. | खुला |
| 8. | खुला | 43. | अनुसूचित जाती. |
| 9. | इतर मागास वर्ग | 44. | खुला |
| 10. | खुला | 45. | इतर मागास वर्ग |
| 11. | भटक्या जमाती (ड) | 46. | खुला |
| 12. | अनुसूचित जाती | 47. | भटक्या जमाती (ब) |
| 13. | खुला | 48. | खुला |
| 14. | खुला | 49. | इतर मागास वर्ग |
| 15. | विशेष मागास वर्ग | 50. | खुला |
| 16. | खुला | 51. | अनुसूचित जाती. |
| 17. | इतर मागास वर्ग | 52. | खुला |
| 18. | खुला | 53. | अनुसूचित जमाती |
| 19. | इतर मागास वर्ग | 54. | खुला |
| 20. | खुला | 55. | इतर मागास वर्ग. |
| 21. | अनुसूचित जाती | 56. | खुला |
| 22. | खुला | 57. | भटक्या जमाती (क) |
| 23. | अनुसूचित जमाती | 58. | खुला |
| 24. | खुला | 59. | इतर मागास वर्ग |
| 25. | इतर मागास वर्ग | 60. | खुला |
| 26. | खुला | 61. | अनुसूचित जाती |
| 27. | अनुसूचित जाती | 62. | खुला |
| 28. | खुला | 63. | अनुसूचित जमाती |
| 29. | इतर मागास वर्ग | 64. | खुला |
| 30. | खुला | 65. | इतर मागास वर्ग |
| 31. | भटक्या जमाती (क) | 66. | खुला |
| 32. | खुला | 67. | अनुसूचित जाती |
| 33. | अनुसूचित जमाती | 68. | खुला |
| 34. | खुला | 69. | इतर मागास वर्ग |
| 35. | इतर मागास वर्ग | 70. | खुला |

| अनुक्रमांक | वर्ग | अनुक्रमांक | वर्ग. |
|---|---|---|---|
| 71. | अनुसूचित जमाती | 86. | खुला |
| 72. | खुला | 87. | विशेष मागास वर्ग. |
| 73. | अनुसूचित जाती | 88. | खुला |
| 74. | खुला | 89. | इतर मागास वर्ग |
| 75. | इतर मागास वर्ग | 90. | खुला |
| 76. | खुला | 91. | अनुसूचित जाती |
| 77. | भटक्या जमाती (ड) | 92. | खुला |
| 78. | खुला | 93. | अनुसूचित जमाती |
| 79. | इतर मागास वर्ग | 94. | खुला |
| 80. | खुला | 95. | इतर मागास वर्ग |
| 81. | अनुसूचित जाती | 96. | खुला |
| 82. | खुला | 97. | अनुसूचित जाती |
| 83. | विमुक्त जाती (अ) | 98. | खुला |
| 84. | खुला | 99. | भटक्या जमाती (ब/क) |
| 85. | इतर मागास वर्ग | 100. | खुला. |

## वर्गानुसार आरक्षित पदे.

| | वर्गानुसार आरक्षित पदे | | बिंदु. | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | अनुसूचित जाती (13) | :- | 1 | 12 | 21 | 27 | 37 | 43 | 51 |
| | | | 61 | 67 | 73 | 81 | 91 | 97 | |
| 2. | अनुसूचित जमाती (7) | :- | 2 | 23 | 33 | 53 | 63 | 71 | 93 |
| 3. | विमुक्त जाती (अ) (3) | :- | 3 | 41 | 83 | | | | |
| 4. | भटक्या जमाती (ब) (2.5) | :- | 4 | | 47 | ) | | | |
| | | | | | | ) | 99 (ब/क) | | |
| 5. | भटक्या जमाती (क) (3.5) | :- | 7 | 31 | 57 | ) | | | |
| 6. | भटक्या जमाती (ड) (2) | :- | 11 | 77 | | | | | |
| 7. | विशेष मागास प्रवर्ग (2) | :- | 15 | 87 | | | | | |
| 8. | इतर मागास वर्ग (19) | :- | 5 | 9 | 17 | 19 | 25 | 29 | 35 |
| | | | 39 | 45 | 49 | 55 | 59 | 65 | 69 |
| | | | 75 | 79 | 85 | 89 | 95 | | |
| 9. | सर्वसाधारण (48) | :- | 6 | 8 | 10 | 13 | 14 | 16 | 18 |
| | | | 20 | 22 | 24 | 26 | 28 | 30 | 32 |
| | | | 34 | 36 | 38 | 40 | 42 | 44 | 46 |
| | | | 48 | 50 | 52 | 54 | 56 | 58 | 60 |
| | | | 62 | 64 | 66 | 68 | 70 | 72 | 74 |
| | | | 76 | 78 | 80 | 82 | 84 | 86 | 88 |
| | | | 90 | 92 | 94 | 96 | 98 | 100 | |

GR - 200404081554 44001 - 0100

**आर.के.सभरवाल आणि इतर विरुध्द पंजाब राज्य प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाच्या अनुषंगाने आरक्षणाबाबतचे आदेश**

**महाराष्ट्र शासन,**
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय,क्रमांक : बीसीसी-१०९७/प्र.क्र.६३/९७/१६-ब,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
**दिनांक : १८ ऑक्टोबर,१९९७.**

## शासन निर्णय

सर्वोच्च न्यायालयाने आर.के.सभरवाल आणि इतर विरुध्द पंजाब राज्य, यांच्या प्रकरणी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने शासनाने असा निर्णय घेतला होता की, केंद्र शासनाने किंवा इतर राज्य शासनांनी आदेश निर्गमित केल्यानंतर, शासन त्याप्रमाणे आदेश निर्गमित करील.

२. केंद्र शासनाने त्यांच्या ज्ञापन क्रमांक ३६०१२/२/९६-इएसटीटी(आरईएस), दिनांक २ जुले,१९९७ अन्वये वरील याचिकेसंदर्भातील मार्गदर्शक तत्वासंबंधीचे आदेश निर्गमित केलेले आहेत. ते विचारात घेऊन, सेवाभरती व बिंदुनामावलीसंदर्भात, शासन खालील प्रमाणे आदेश देत आहे :-

(१) आरक्षण हे संवर्गाच्या पदसंख्येस (संवर्गातील एकूण पदांची संख्या विचारात घेऊन टक्केवारीनुसार) लावावे. रिक्त होणाऱ्या जागांच्या संदर्भात लावू नये. बिंदुनामावली ही आरक्षणाची विहित टक्केवारी पूर्ण होईपर्यन्त वापरात ठेवावी. विहित टक्केवारी पूर्ण होताच बिंदुनामावली वापरण्याची आवश्यकता नाही. त्यानंतर ज्या प्रवर्गाची जागा रिक्त होईल त्या प्रवर्गातील कर्मचाऱ्यांव्दारे ती जागा भरण्यात यावी व त्या बिंदुपुढे तो बिंदु त्या प्रवर्गासाठी उपयोगात आणला अशी नोंद घ्यावी.

(२) गुणवत्तेवर नियुक्त झालेल्या मागासवर्गीय कर्मचाऱ्याची आरक्षण पदावर गणना करण्यात येऊ नये व त्याची नियुक्ती आरक्षण बिंदुवर दर्शवू नये. त्याची गणना खुल्या प्रवर्गात करावी.

(३) वर (१) येथे नमूद केल्यानुसार बिंदुनामावली ही रिक्त होणाऱ्या पदावर आधारित नसावी. ती संवर्गाच्या संख्येवर आधारित असावी.

(४) बिंदुनामावली ही मागासवर्ग प्रवर्गाचे आरक्षण निश्चित करण्यासाठी आहे. ज्येष्ठता निश्चित करण्यासाठी नाही.

(५) बिंदुनामावली वापरताना खालील मुलभूत तत्वे विचारात घ्यावीत --

(१) मागास प्रवर्गांना विहित केलेले आरक्षण हे टक्केवारीनुसार असावे व एकूण आरक्षण हे प्रचलित आरक्षणानुसार संवर्गाच्या ५२% पेक्षा जास्त असता कामा नये.

(२) सरळ सेवा भरतीसाठी आणि पदोन्नतीसाठी वेगळी बिंदु नामावली ठेवावी. या व्यतिरिक्त अन्य भरती माध्यम असल्यास, त्यासाठी देखील वेगळी बिंदुनामावली ठेवावी.

(६) बदली, प्रतिनियुक्तीच्या पदांना बिंदुनामावली वापरु नये.

(७) "मागासवर्गीयांना सेवेत आरक्षण व इतर सवलती" या पुस्तिकेतील प्रकरण १(अ) २ पृ.१८/१९ यातील आदेश विचारात घेऊन छोटया संवर्गाचे गट करण्यात यावेत.

(८) एकाकी पदास बिंदुनामावलीनुसार आळीपाळीने आरक्षण ठेवावे. सुरुवातीस अनुसूचित जाती व त्यानंतर खुला असे आळीपाळीने (एका आड एक) या तत्वावर याचे पालन व्हावे.

(९) यापुढे पदोन्नतीमध्ये भटक्या जमाती (क) , धनगर व तत्सम यांना ३.५% व भटक्या जमाती (ड), वंजारी व तत्सम यांना २% आरक्षण विहित करण्यात येत आहे. नवीन १०० बिंदुनामावली सोबत जोडलेली आहे. ती १९९६-९७ च्या निवड सूची पासून अंमलात आणावी आणि तसे करताना बिंदु क्रमांक १ पासून ती

वापरावी. हे आरक्षण त्या त्या निवडसूची वर्षापुरते राहील. तसेच ते "अ", "ब", "क" व "ड" या प्रवर्गात अंतर्गत परिवर्तनीय (Internally Transferrable) राहील.

३. वरील आदेशानुसार बिंदुनामावलीचा वापर करण्यासंबंधीच्या सविस्तर सूचना सोबतच्या परिशिष्टात नमूद करण्यात आल्या आहेत. हे आदेश दिनांक २ जुलै,१९९७ पासून अंमलात येतील. त्यापूर्वी, तयार करण्यात आलेल्या निवडसूच्या अंतिम करण्यात आल्या असल्यास, त्यांत बदल करण्याची आवश्यकता नाही. यापुढे सरळ सेवा भरती किंवा पदोन्नतीचे प्रस्ताव विचारात घेताना, त्या त्या संवर्गातील आरक्षित पदधारकांची संख्या विचारात घेऊन कार्यवाही करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

रवि भू.बुध्दिराजा,
प्रधान सचिव (सेवा)

प्रति,

राज्यपाल यांचे सचिव,
मुख्य मंत्र्यांचे सचिव/उप मुख्य मंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
मुख्य सचिव/अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
* प्रबंधक,लोकायुक्त आणि उप लोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग,मुंबई,
सचिव, सर्व प्रादेशिक निवड मंडळे,
सचिव,राज्य निवड मंडळ,
संचालक, समाजकल्याण, पुणे,
संचालक, आदिवासी विकास, नाशिक,
संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,
संचालक, सेवायोजन, मुंबई,
सहाय्यक आयुक्त (मागासवर्ग कक्ष), सर्व विभागीय आयुक्तांची कार्यालये,
महालेखापाल, महाराष्ट्र १/२, (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर,
महालेखापाल, महाराष्ट्र १/२, (लेखा परीक्षा), मुंबई/नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील विभागप्रमुख/कार्यालय प्रमुख,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती.

* पत्राने.

एच-996(1000-1-03)1अ

# परिशिष्ट

## बिंदुनामावलीचा वापर करण्यासंबंधीच्या सूचना

(१) सरळसेवा भरती करिता शासन निर्णय क्रमांक : बीसीसी-१०९७/प्र.क्र.२/१६-ब, दिनांक २९ मार्च,१९९७ नुसार विहित केलेली १०० बिंदुनामावली वापरण्यात यावी.

(२) सेवा प्रवेश नियमांनुसार प्रत्येक भरती माध्यमाकरिता (सरळसेवा व पदोन्नती इत्यादी) वेगवेगळी बिंदुनामावली दर्शविण्यात यावी. बिंदुनामावलीचा वापर करताना सेवा भरती नियमांतील तरतुदी विचारात घ्याव्यात.

(३) बिंदुनामावली ही मागास प्रवर्गाचे आरक्षण निश्चित करण्यासाठी आहे. ज्येष्ठता निश्चित करण्यासाठी नाही.

(४) सध्या असलेली संवर्गातील पदसंख्या लक्षात घेऊन आरक्षण बिंदु निश्चित करण्यात यावेत.भविष्यात संवर्ग संख्येत वाढ झाल्यास, अथवा घट झाल्यास, आरक्षण बिंदुची संख्या त्यानुसार त्या प्रमाणात जास्त अथवा कमी करण्यात यावी.

(५) जेथे सध्या विहित आरक्षणापेक्षा जास्त नियुक्त्या करण्यात आल्या आहेत त्यामुळे सध्याच्या तेथील नियुक्त्यांना बाधा येणार नाही.

(६) सर्व मंत्रालयीन विभाग प्रमुखांनी यानुसार तातडीने कार्यवाही करुन प्रत्येक संवर्गाबाबत वरील मार्गदर्शक सूचनेनुसार आढावा घ्यावा व त्यानुसार कार्यवाही करावी.

(७) सध्या अस्तित्वात असलेले विविध शासन आदेश वरीलप्रमाणे सुधारण्यात आले असल्याचे गृहित धरण्यात यावे.

(८) पदोन्नतीच्या वाटयातील पदे भरण्यासाठी निवडसूची बनविताना आणि पदोन्नतीच्या वाटयाबाहेरील अन्य पदांवर तात्पुरत्या पदोन्नत्या देण्यासाठी पदोन्नती सूची बनविताना दोन वेगवेगळया बिंदुनामावल्या वापराव्यात.

**पदोन्नतीची १०० बिंदु नमुनेवजा नामावली**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अनु.जाती | २६ | खुला | ५१ | अनु.जाती | ७६ | खुला |
| २ | अनु.जमाती | २७ | अनु.जाती | ५२ | खुला | ७७ | भ.ज.(ड) |
| ३ | वि.जा.(अ) | २८ | खुला | ५३ | अनु.जमाती | ७८ | खुला |
| ४ | भ.ज.(क) | २९ | खुला | ५४ | खुला | ७९ | खुला |
| ५ | खुला | ३० | खुला | ५५ | खुला | ८० | खुला |
| ६ | खुला | ३१ | भ.ज.(क) | ५६ | खुला | ८१ | अनु.जाती |
| ७ | भ.ज.(ब) | ३२ | खुला | ५७ | भ.ज.(क) | ८२ | खुला |
| ८ | खुला | ३३ | अनु.जमाती | ५८ | खुला | ८३ | वि.जा.(अ) |
| ९ | खुला | ३४ | खुला | ५९ | खुला | ८४ | खुला |
| १० | खुला | ३५ | खुला | ६० | खुला | ८५ | खुला |
| ११ | भ.ज.(ड) | ३६ | खुला | ६१ | अनु.जाती | ८६ | खुला |
| १२ | अनु.जाती | ३७ | अनु.जाती | ६२ | खुला | ८७ | वि.मा.प्र. |
| १३ | खुला | ३८ | खुला | ६३ | अनु.जमाती | ८८ | खुला |
| १४ | खुला | ३९ | खुला | ६४ | खुला | ८९ | खुला |
| १५ | वि.मा.प्र. | ४० | खुला | ६५ | खुला | ९० | खुला |
| १६ | खुला | ४१ | वि.जा.(अ) | ६६ | खुला | ९१ | अनु.जाती |
| १७ | खुला | ४२ | खुला | ६७ | अनु.जाती | ९२ | खुला |
| १८ | खुला | ४३ | अनु.जाती | ६८ | खुला | ९३ | अनु.जमाती |
| १९ | खुला | ४४ | खुला | ६९ | खुला | ९४ | खुला |
| २० | खुला | ४५ | खुला | ७० | खुला | ९५ | खुला |
| २१ | अनु.जाती | ४६ | खुला | ७१ | अनु.जमाती | ९६ | खुला |
| २२ | खुला | ४७ | भ.ज.(ब) | ७२ | खुला | ९७ | अनु.जाती |
| २३ | अनु.जमाती | ४८ | खुला | ७३ | अनु.जाती | ९८ | खुला |
| २४ | खुला | ४९ | खुला | ७४ | खुला | ९९ | भ.ज.(ब/क) (आळीपाळीने) |
| २५ | खुला | ५० | खुला | ७५ | खुला | १०० | खुला |

| | | | |
|---|---|---|---|
| अनुसूचित जाती | (१३) | : | १, १२, २१, २७, ३७, ४३, ५१, ६१, ६७, ७३, ८१, ९१, ९७ |
| अनुसूचित जमाती | (७) | : | २, २३, ३३, ५३, ६३, ७१, ९३ |
| विशेष मागास प्रवर्ग | (२) | : | १५, ८७ |
| विमुक्त जाती (अ) | (३) | : | ३,४१, ८३ |
| भटक्या जमाती (ब) | (२) | : | ७,४७ |
| भटक्या जमाती (क) | (३) | : | ४, ३१, ५७ |
| भटक्या जमाती (ब/क) | (१) | : | ९९ |
| भटक्या जमाती (ड) | (२) | : | ११, ७७ |
| सर्वसाधारण | (६७) | : | ५, ६, ८, ९, १०, १३, १४, १६, १७, १८, १९, २०, २२, २४, २५, २६, २८, २९, ३०, ३२, ३४, ३५, ३६, ३८, ३९, ४०, ४२, ४४, ४५,४६, ४८, ४९, ५०, ५२, ५४, ५५, ५६, ५८, ५९, ६०, ६२, ६४, ६५, ६६, ६८, ६९, ७०, ७२, ७४, ७५, ७६, ७८, ७९, ८०, ८२, ८४, ८५,८६, ८८, ८९, ९०, ९२, ९४, ९५, ९६, ९८, १००. |

शासन सेवेतील मागासवर्गीय/अमागासवर्गीय कर्मचारी/ अधिकारी यांची पदोन्नत संवर्गात आपापसातील ज्येष्ठता विनियमित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय,क्रमांक:एसआरव्ही-१०९६/प्र.क्र.३२/९६/बारा,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ दिनांक २० ऑक्टोबर,१९९७.

**वाचा** :-१) शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:एसआरव्ही-१०७६/१२, दिनांक २१ जून,१९८२.

२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:एसआरव्ही-१०९६/प्र.क्र.३२/९६/१२, दिनांक १९ एप्रिल,१९९७.

**शासन निर्णय :-** केंद्र शासन विरुध्द विरपालसिंग चौहान इ. (केस नं.जेटी-१०९५ (७) एस.सी.९३१, दिनांक १० ऑक्टोबर १९९५) प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयास अनुसरुन व केंद्र शासनाच्या कार्मिक व प्रशिक्षण मंत्रालयाचे दिनांक ३० जानेवारी,१९९७ चे आदेश विचारात घेऊन राज्य शासकीय सेवेतील कर्मचाऱ्यांच्या बाबतीत ज्येष्ठता विनियमित करण्याबाबत दिनांक १९ एप्रिल,१९९७ रोजी आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. आता जगदिशलाल विरुध्द हरयाणा राज्य शासन आणि इतर (केस नं.जेटी-१९९७ (५) एस.सी.३८७, दिनांक ७ मे,१९९७) प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने शासन निर्णय, दिनांक १९ एप्रिल,१९९७ रोजी आदेश अधिक्रमित करण्यात येत आहेत व सुधारित आदेश खालीलप्रमाणे आहेत :-

२. (अ) एखादा मागासवर्गीय कर्मचारी/अधिकारी पदोन्नत संवर्गात अगोदरच पदोन्नत झाला असेल तर त्याची ज्येष्ठता त्या संवर्गात पुनर्विलोकीत करण्याची आवश्यकता नाही. तसेच दिनांक ३०जानेवारी,१९९७ रोजी अस्तित्वात असलेल्या ज्येष्ठता याद्या सुधारित करण्याची देखील आवश्यकता नाही.

(ब)संबंधित कर्मचारी/अधिकारी त्यांच्या त्या त्या संवर्गातील नियमित नियुक्तीच्या दिनांकापासून, ज्येष्ठता विनियम,१९८२ मधील तरतुदीनुसार आपली ज्येष्ठता कायम राखील.

(क) ज्येष्ठता निर्धारित करण्यासंबंधीचे वरील तत्व शासन सेवेतील सर्व गटातील सर्व स्तरांवरील पदोन्नत्यांच्या संदर्भात लागू राहील.

३. वरील खुलासा लक्षात घेता, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:एसआरव्ही-१०७६/१२, दिनांक २१ जून,१९८२ च्या अधिसूचने अन्वये विहित केलेल्या महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठता विनियम) नियम,१९८२ मध्ये आता सुधारणा करण्याची आवश्यकता नाही.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

रवि भू.बुध्दिराजा,
प्रधान सचिव (सेवा).

C:\Desk 12\G.R.20 OCT 1997

शासन सेवेत सरळ सेवा भरतीसाठी समांतर आरक्षण (Horizontal Reservation) कार्यान्वित करण्यासाठी अनुसरावयाची कार्यपध्दती विहित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रक क्रमांक:एसआरव्ही-1097/प्र.क्र.31/98/16-अ,
मंत्रालय, मुंबई-400 032. दिनांक 16 मार्च, 1999.

वाचा: 1. शासन निर्णय, सा.प्र.वि. क्र.एसआरव्ही-1077/3576/1433/16-अ, दि.23.5.1978.
2. शासन निर्णय, सा.प्र.वि. क्र.एसईएम-1080/35/16-अ, दि.21.1.1980.
3. शासन परिपत्रक, सा.प्र.वि. क्र.आरपीई/आरटीए-1080/0/181/16-अ, दि.10.10.1980.
4. शासन निर्णय, सा.प्र.वि. क्र.एसआरव्ही-1094/1004/प्र.क्र.30/16-अ, दि.17.11.1994.
5. शासन निर्णय, सा.प्र.वि. क्र.बीसीसी-1094/प्र.क्र.68/94/16-ब, दि.12.8.1994.
6. शासन निर्णय, न.व.वि. क्र.ईक्यूआर-1094/प्र.क्र.768/भूपुक-1, दि.9.8.1995.
7. शासन निर्णय, म.व.बा.क.वि. क्र.संकीर्ण-1096/प्र.क्र.30/का.-2, दि.1.8.1997.
8. शासन निर्णय, सा.प्र.वि. क्र.बीसीसी-1097/प्र.क्र.2/97/16-ब, दि.6.8.1997.
9. शासन परिपत्रक, सा.प्र.वि. क्र.एसआरव्ही-1097/प्र.क्र.12/97/16-अ, दि.2.5.1998.
10. अनिल कुमार गुप्ता वि. उत्तर प्रदेश राज्य आणि इतर (जेटी-1995(5)एससी-505) या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या न्याय निर्णयातील मार्गदर्शक तत्वे.

परिपत्रक :- शासनाने सेवेतील भरतीसाठी मागासवर्गीयांसाठी आरक्षण लागू केले आहे. हे आरक्षण सामाजिक आरक्षण (Social Reservation) असल्याने ते उभे आरक्षण (Vertical Reservation) आहे. त्याचप्रमाणे विशेष आरक्षण (Special Reservation) मागासवर्गीयांव्यतिरिक्त अन्य घटकांसाठी लागू केलेले आहे व ते समांतर किंवा आडवे आरक्षण (Horizontal Reservation) आहे. या संदर्भात मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने (अॅपलेट साईड) रिट याचिका क्रमांक:4067/1998 वरील निर्णयान्वये अनिलकुमार गुप्ता वि. उत्तर प्रदेश राज्य आणि इतर (जेटी-1995(5)एससी-505) या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या न्याय निर्णयास अनुसरुन समांतर आरक्षणाबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार सेवेतील उभे आरक्षण व समांतर आरक्षणाच्या संदर्भात अनुसरावयाची कार्यपध्दती व त्या बाबतच्या मार्गदर्शक सूचना शासकीय/निमशासकीय सेवा, मंडळे/महामंडळे/नगरपालिका/महानगरपालिका/जिल्हापरिषदा/शासकीय अनुदान प्राप्त संस्था/विद्यापिठे/सहकारी संस्था व शासकीय उपक्रम इत्यादींना लागू करण्यात यावे.

2. सेवेतील नियुक्तीसाठी सामाजिक आरक्षण (उभे आरक्षण) खालीलप्रमाणे आहे :-

| | | |
|---|---|---|
| 1. | अनुसूचित जाती | : 13% |
| 2. | अनुसूचित जमाती | : 7% |
| 3. | विमुक्त जाती (अ) | : 3% |
| 4. | भटक्या जमाती (ब) | : 2.5% |
| 5. | भटक्या जमाती (क) | : 3.5% |
| 6. | भटक्या जमाती (ड) | : 2% |
| 7. | विशेष मागास प्रवर्ग | : 2% |
| 8. | इतर मागास वर्ग | : 19% |

वर नमूद केलेल्या आरक्षणाव्यतिरिक्त सेवेतील नियुक्त्यांसाठी लागू असलेले विशेष आरक्षण (समांतर आरक्षण) पुढीलप्रमाणे आहे :-

| | | |
|---|---|---|
| 1. | माजी सैनिक | 15% फक्त गट क आणि गट ड साठी |
| 2. | प्रकल्पग्रस्त/भूकंपग्रस्त | 5% फक्त गट क आणि गट ड साठी |
| 3. | अपंग | 3% गट अ आणि ब मधील कांही पदांसाठी तसेच गट क आणि गट ड साठी |
| 4. | महिला | 30% |

समांतर आरक्षण हे फक्त सरळ सेवा भरतीस लागू राहील. समांतर आरक्षण हे सामाजिक आरक्षणांतर्गत आरक्षण असल्याने त्यास सामाजिक आरक्षणावर वाढीव म्हणून गणण्यात येऊ नये.

4. सर्वोच्च न्यायालयाच्या न्याय निर्णयात उल्लेखिलेल्या प्रमाणे समांतर आरक्षण हे कप्पीकृत आरक्षण ( Compartmentalised Reservation ) आहे, म्हणून पदे भरण्यापूर्वी, पदे निश्चित करताना तसेच भरतीची जाहिरात देताना त्या जाहिरातीत केवळ सामाजिक आरक्षणाची पदसंख्याच नमूद न करता सामाजिक आरक्षणाच्या प्रत्येक प्रवर्गामध्ये (उभे आरक्षण जसे अ.जा., अ.ज., वि.ज.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड) वि.मा.प्र., इ.मा.व. आणि खुला प्रवर्ग) विशेष आरक्षणानुसार येणा-या राखीव पदांची संख्या सुध्दा निर्देशित करावी.

5. सर्वोच्च न्यायालयाच्या न्याय निर्णयात/उल्लेखिलेल्या नुसार समांतर आरक्षणांतर्गत त्या त्या प्रवर्गासाठी विहित करण्यात आलेल्या टक्केवारीनुसार वाटा निश्चितपणे मिळावा यासाठी सरळसेवा भरती करताना खालील टप्पे विचारात घेण्यात यावेत :-

(अ) प्रथम टप्पा :- गुणवत्तेच्या निकषानुसार खुल्या प्रवर्गातील उमेदवारांची निवड यादी करावी, या यादीत, समांतर आरक्षणात असणा-यांची संख्या पर्याप्त असेल तर कोणताही प्रश्न उद्भवणार नाही आणि त्यानुसार पदे भरावीत. जर समांतर आरक्षणाच्या प्रवर्गातील उमेदवारांची संख्या पर्याप्त नसेल तर समांतर आरक्षणाकरीता त्या त्या प्रवर्गातील उमेदवारांना उपलब्धतेनुसार पर्याप्त संख्येत यादीतील शेवटचे उमेदवार वगळून समाविष्ट करावेत.

(ब) दुसरा टप्पा :- त्यानंतर प्रत्येक सामाजिक आरक्षणाच्या प्रवर्गातील उमेदवारांच्या निवड याद्या तयार कराव्यात (जे उमेदवार यापूर्वीच टप्पा 'अ' मध्ये सामिल झाले असतील त्यांना या यादीतून वगळावे.)

(क) तिसरा टप्पा :- वरील 'ब' नुसार तयार करण्यात आलेल्या याद्यांमध्ये सामाजिक आरक्षणातील ( Social Reservation ) प्रत्येक प्रवर्गाच्या विहित टक्केवारीनुसार 'अ' येथे विशद केलेल्या कार्यपध्दतीनुसार समांतर आरक्षणाचे पुरेसे उमेदवार समाविष्ट करावेत. मात्र असे करताना सामाजिक प्रवर्गांतर्गत रहावे.

6. सर्वोच्च न्यायालयाच्या न्याय निर्णयात उल्लेखिलेल्यानुसार विशेष आरक्षण हे प्रत्येक उभ्या आरक्षणाच्या कक्षांतर्गत राहील. म्हणजेच विशेष आरक्षण हे एका सामाजिक आरक्षण प्रवर्गातून दुस-या सामाजिक आरक्षण प्रवर्गात स्थानांतरीत करता येणार नाही.

7. सर्व नियुक्ती प्राधिका-यांनी वरील कार्यपध्दती तसेच सूचनांनुसार यापुढे न चुकता कार्यवाही करावी. हे आदेश शासकीय/निमशासकीय सेवा, मंडळे/महामंडळे/नगरपालिका/महानगरपालिका/जिल्हापरिषदा/शासकीय अनुदान प्राप्त संस्था/विद्यापिठे/सहकारी संस्था व शासकीय उपक्रम इत्यादींना लागू करण्यात यावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

भि.रा.वाढवे,
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
राज्यपालांचे सचिव,
मुख्य मंत्री यांचे सचिव,
उप मुख्य मंत्री यांचे सचिव,
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव/अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
* प्रबंधक, मुंबई उच्च न्यायालय, मूळ शाखा, खंडपीठ, औरंगाबाद,
* प्रबंधक, मुंबई उच्च न्यायालय, अपील शाखा, खंडपीठ, औरंगाबाद,
* प्रबंधक, लोकआयुक्त आणि उप लोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
सचिव, महाराष्ट्र दुय्यम सेवा निवड मंडळ, मुंबई,
सचिव, सर्व प्रादेशिक दुय्यम सेवा निवड मंडळे,
संचालक, समाजकल्याण, पुणे,
सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील विभागप्रमुख व कार्यालय प्रमुख,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती.

* पत्राने.

एच-1445(5000-3-99)-अ.

अधिक्रमित झालेल्यांना पूर्वलक्षी प्रभावाने
पदोन्नती देण्यासंबंधीचे स्पष्टीकरण.........

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय,क्र.एसआरव्ही-२००१/३६२/प्र.क्र.२१/२००१/बारा,
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२
दिनांक: २९ऑक्टोबर, २००१.

वाचा:- १) शासन परिपत्रक ज्ञापन,सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-१०६४-डी, दिनांक २५.२.१९६५
२) शासन परिपत्रक ज्ञापन,सामान्य प्रशासन विभाग,क्र.एसआरव्ही-१०६९-डी, दिनांक ९.९.१९६९
३) शासन परिपत्रक ज्ञापन, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-१०७९/बारा, दिनांक २४.१०.१९७९
४) शासन परिपत्रक ज्ञापन, सामान्य प्रशासन विभाग,क्र.एसआरव्ही-१०८२/बारा, दिनांक १४.९.१९८२

**शासन निर्णय:**

संदर्भाधीन क्रमांक १ येथील दिनांक २५.२.१९६५ च्या शासन परिपत्रक ज्ञापनातील परिच्छेद ३ मध्ये निर्देशित केल्याप्रमाणे चुकीने अधिक्रमित झालेल्या कर्मचाऱ्यास मानीव दिनांक मंजूर केल्यास त्या मानीव दिनांकापासून पदोन्नतीच्या पदाचे वेतन व भत्ते थकबाकीसह देय ठरते. संदर्भाधीन क्रमांक ३ येथील दिनांक २४.१०.१९७९ च्या शासन परिपत्रक ज्ञापनानुसार प्रत्यक्षात पदोन्नती मिळाल्यानंतरही पदोन्नतीच्या पदावर कर्मचाऱ्यास रुजू होण्याकरीता प्रशासकीय कारणास्तव विलंब झाल्यास त्याला त्याच्या निकटच्या कनिष्ठ कर्मचाऱ्याच्या पदोन्नतीच्या दिनांकाच्या आधारे मानीव दिनांक देवून वर नमूद केलेल्या दिनांक २५.२.१९६५ च्या शासन परिपत्रक ज्ञापनातील निदेशानुसार वेतन व भत्त्याची थकबाकी अनुज्ञेय करण्यात आली आहे.

२. तथापि, संदर्भ क्रमांक ४ येथील दिनांक १४ सप्टेंबर,१९८२ च्या शासन परिपत्रक ज्ञापनानुसार पदोन्नतीच्या पदावर रुजू होण्याकरीता प्रशासकीय विलंब ३ महिन्यापेक्षा अधिक कालावधीचा असेल तरच मानीव दिनांक वेतन व भत्त्याच्या थकबाकीसह अनुज्ञेय ठरविण्यात आला आहे. परिणामी प्रशासकीय विलंब ३ महिन्यापेक्षा कमी कालावधीचा असल्यास ज्येष्ठ कर्मचाऱ्यास मानीव दिनांक अनुज्ञेय ठरत नाही. तसेच त्या अनुषंगाने वेतन निश्चिती/थकबाकी मिळत नसल्याने कनिष्ठ कर्मचाऱ्यास पुढील वेतनवाढ आधीच्या दिनांकाला मिळून ज्येष्ठ कर्मचाऱ्यास वेतन कमी मिळते व वेतनवाढी देखील उशीरा मिळून त्याचे कायम स्वरुपाचे आर्थिक नुकसान होते. ही परिस्थिती लक्षात घेता, सदर आदेशातील त्रुटी दूर करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते. याबाबत सर्वंकष विचार करुन शासन आता खालीलप्रमाणे सुधारीत आदेश देत आहे.

(कृ.मा.प.)

१) दिनांक १४ सप्टेंबर,१९८२ च्या शासन परिपत्रक ज्ञापनातील *"प्रशासकीय विलंब ३ महिन्यापेक्षा अधिक कालावधीचा असेल तरच संबंधित कर्मचाऱ्यास पदोन्नतीसाठी मानीव दिनांक देय असल्याबाबत"* ची तरतुद आता वगळण्यात यावी.

२) पदोन्नतीच्या पदावर कर्मचारी विलंबाने रुजू होण्यास स्वत: जबाबदार असल्यास किंवा तो रजेवर असल्यामुळे असा विलंब झाल्यास कनिष्ठ कर्मचाऱ्याच्या पदोन्नतीच्या अनुषंगाने मानीव दिनांक व त्या अनुषंगाने वेतन निश्चिती तसेच वेतन व भत्त्याची थकबाकी अनुज्ञेय होणार नाही.

३) अभावित स्वरुपाची पदोन्नती पुढे चालू राहिल्याने कनिष्ठ कर्मचाऱ्यास त्या अनुषंगाने अधिक वेतन मिळत असल्यास तसेच अभावित स्वरुपाची किंवा नियमित पदोन्नती ज्येष्ठ कर्मचाऱ्याने नाकारली असल्यास अशा प्रकरणात ज्येष्ठ कर्मचाऱ्यास कनिष्ठ कर्मचाऱ्याच्या पदोन्नतीचा मानीव दिनांक अनुज्ञेय असणार नाही. परिणामी मानीव दिनांकाच्या अनुषंगाने वेतन निश्चिती व वेतन व भत्त्याची थकबाकी अनुज्ञेय करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

अशा प्रकरणात ज्येष्ठ कर्मचाऱ्यास कनिष्ठाच्या वेतना इतके वेतन उंचावून देण्याचा प्रश्न देखील उद्भवणार नाही.

३. सदर आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

४. सदर आदेश वित्त विभागाने अनौपचारीक संदर्भ क्रमांक-८५१/सेवा-३, दिनांक १३-९-२००१ अन्वये दिलेल्या संमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(प्रकाश लोखंडे)
उप सचिव,महाराष्ट्र शासन

प्रति,

मा. राज्यपालांचे सचिव,
मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
महालेखापाल,(लेखा व अनुज्ञेयता)महाराष्ट्र-१,मुंबई,
महालेखापाल,(लेखा परीक्षा)महाराष्ट्र-१,मुंबई,
महालेखापाल,(लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-२,नागपूर,
महालेखापाल,(लेखा परीक्षा) महाराष्ट्र-२,नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी
वित्त विभाग/सेवा-३,
सर्व मंत्रालयीन विभाग,
निवड नस्ती.(का.१२)

2.17.10.

शासन सेवेतील कर्मचाऱ्यांची/ [illegible]
अधिकाऱ्यांची ज्येष्ठता यादी तयार करणे व
प्रसिध्द करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रक क्रमांक:एसआरव्ही-२००२/प्र.क्र.३/२००२/१२,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- २७ मार्च,२००२.

**वाचा** :- (१) शासन परिपत्रक,सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक:एसआरव्ही-१०८७/६२४/१२,दिनांक २१ एप्रिल,१९८७.
(२) शासन परिपत्रक,सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक:एसआरव्ही-१०९३/प्र.क्र.८/९३/१२,दिनांक १७ जुलै,१९९३.

## शासन परिपत्रक :-

शासकीय सेवेतील कर्मचारी/अधिकारी यांना त्यांचे ज्येष्ठतेतील स्थान कळावे यासाठी प्रत्येक वर्षाचा १ जानेवारी हा आधारभूत दिनांक मानून दरवर्षी एप्रिल महिन्यात सेवाज्येष्ठता यादी प्रसिध्द करावी असे शासनाचे आदेश आहेत. पदोन्नती व स्थायीकरण करताना अद्ययावत सेवाज्येष्ठता यादी उपलब्ध होणे आवश्यक असते. ज्येष्ठतायादी जर अद्ययावत स्वरुपात प्रसिध्द करण्यात आली नसेल तर संबंधित कर्मचारी/अधिकारी यांना आपले संवर्गातील निश्चित स्थान कोठे आहे, याबाबतची माहिती मिळत नाही. यामुळे पदोन्नती /मानीव दिनांक याबाबतची अनेक प्रकरणे उद्‌भवतात आणि न्यायालयीन प्रकरणांच्या संख्येतही वाढ होत आहे असे दिसून आले आहे.

२. बऱ्याच मंत्रालयीन विभागांकडून आणि विभाग प्रमुखांकडून १ जानेवारी या आधारभूत दिनांकास प्रत्येक वर्षी सेवाज्येष्ठता प्रसिध्द करण्यात येत नाही असे शासनाच्या निदर्शनास आले आहे. त्यामुळे वर नमूद केलेल्या संदर्भांकित आदेशाचा पुनरुच्चार करण्यात येत आहे. प्रत्येक मंत्रालयीन विभागाने आणि विभाग प्रमुखांनी कृपया त्यांच्या नियंत्रणाखालील अधिकारी/कर्मचारी संवर्गाची सेवाज्येष्ठता यादी प्रत्येक वर्षी १ जानेवारी या आधारभूत दिनांकास एप्रिल महिन्यापर्यन्त कोणत्याही परिस्थितीत प्रसिध्द करण्याची काळजी घ्यावी.

३. विविध संवर्गांच्या ज्येष्ठता याद्यांबाबतची सद्य:स्थिती मुख्य सचिवांना सादर करावयाची आहे यास्तव सर्व विभागांना अशी विनंती करण्यात येते की, त्यांच्या नियंत्रणाखालील विविध राजपत्रित/अराजपत्रित संवर्गातील अधिकारी/कर्मचारी यांच्या दिनांक १ जानेवारी,२००१ या

(कृ.मा.प.)

आधारभूत दिनांकास प्रसिध्द करण्यात आलेल्या सेवाज्येष्ठता यादींची माहिती सोबतच्या विवरणपत्रात दिनांक १५ एप्रिल,२००२ पर्यन्त या विभागास उपलब्ध करुन द्यावी. तसेच दिनांक १ जानेवारी,२००२ रोजीची सेवाज्येष्ठता यादी प्रसिध्द करण्याच्या दृष्टिने आवश्यक ती कार्यवाही तातडीने करावी व या संदर्भातील अहवालसुध्दा सोबतच्या विवरणपत्रानुसार तात्काळ या विभागाकडे सादर करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(बा.क.अग्रवाल)
अपर मुख्य सचिव (सेवा)

प्रति,

राज्यपालांचे सचिव,
मुख्यमंत्र्यांचे सचिव,
सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
सर्व मंत्रालयीन विभाग,
सामान्य प्रशासन विभागाच्या कक्षेतील आस्थापना विषयक बाबी हाताळणारी
सर्व कार्यासने.

# परिशिष्ट "अ"

(शासन परिपत्रक,सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक:एसआरव्ही-२००२/प्र.क्र.३ /१२,दिनांक २७.०३.०२ सोबतचे विवरणपत्र)

मंत्रालयीन विभागाचे नांव :-

| अ.क्र. | पद/संवर्ग यांचे नांव | दि.१ जानेवारी,२००१ रोजीची सेवाज्येष्ठता यादी प्रसिध्द करण्यात आली आहे काय, | प्रसिध्द करण्यात आली असल्यास अंतिम स्वरुपात प्रसिध्द केल्याचा क्रमांक व दिनांक | प्रसिध्द करण्यात आली नसल्यास त्यामागील विलंबाची कारणे. | दि.१ जानेवारी,२००२ ची सेवाज्येष्ठता यादी प्रसिध्द करण्यासंदर्भात करण्यात येत असलेल्या कार्यवाहीची सद्यस्थिती |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | राजपत्रित | | | | |
| | अराजपत्रित | | | | |

शासकीय कर्मचाऱ्यांना पदोन्नती संदर्भात
मानीव दिनांक देण्याबाबत....
प्रकरण तपासणी अधिकाराबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक, क्रमांक-एसआरव्ही-२००२/प्र.क्र.२/२००२/१२,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :- ६ जून, २००२.

वाचा :-
१) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक-एसआरव्ही-१०६४/डी, दिनांक : २५ फेब्रुवारी, १९६५.
२) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक-एसआरव्ही-१०६९/डी, दिनांक : ९ सप्टेंबर, १९६९.
३) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक-एसआरव्ही-१०७५/१० दिनांक : २ एप्रिल, १९७६.
४) शासन ज्ञापन , सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक-एसआरव्ही-१०७९/१२, दिनांक : २४ ऑक्टोबर, १९७९
५)शासनअधिसूचना,सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक-एसआरव्ही-१०७६/१२ दिनांक : २१ जून, १९८२
६) शासन ज्ञापन, सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक-एसआरव्ही-१०८२/१२ दिनांक : १४ सप्टेंबर, १९८२.
७) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक-एसआरव्ही-१०९३/ प्र.क्र.२/९३/१२ दिनांक : ११ जून, १९९३.
८) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक-एसआरव्ही-१०९३/ प्र.क्र.२/९३/१२, दिनांक : १३ डिसेंबर, १९९३.
९) शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-एसआरव्ही- १०९४/१/९४/१२, दिनांक : १ जुलै, १९९४.
१०) शासन परिपत्रक,सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक-एसआरव्ही-१०९५/ प्र.क्र.२९/९५/१२, दिनांक : २२ एप्रिल, १९९६
११) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक-एसआरव्ही-२०००/३६२ प्र.क्र.२१/२००१/१२, दिनांक : २९ ऑक्टोबर, २००१.

## शासन परिपत्रक

शासन सेवेतील कर्मचारी/अधिकारी यांना ते ज्येष्ठ व पात्र असूनही पदोन्नतीच्या संदर्भात डावलले गेले असल्याचे निश्चित झाले तर त्यांना पदोन्नतीचा मानीव दिनांक देण्याबाबत उपरोक्त आदेशातील तरतुदीनुसार विचार करण्यात येतो. मानीव दिनांक देण्याबाबतची प्रकरणे वर नमूद केलेल्या आदेशांतील तरतुदीनुसार तपासावयाची असतात. तथापि, मानीव दिनांक देण्याच्या प्रकरणामध्ये काही अनियमितता होत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आल्याने शासनाने संदर्भाधीन

क्र.७ येथील दिनांक ११ जून, १९९३ च्या आदेशान्वये मानीव दिनांक मंजूर करण्याचे सर्व प्राधिकार शासनाकडे घेतले होते. त्यानुसार मानीव दिनांक देण्याबाबतची प्रकरणे मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी सामान्य प्रशासन विभाग आणि वित्त विभाग यांच्या परामर्शाने / मान्यतेने निकाली काढणे आवश्यक आहे. प्रशासकीय अधिकाराचे विकेंद्रीकरण करण्याच्या धोरणानुसार अराजपत्रित पदावरील कर्मचाऱ्यांना मानीव दिनांक देण्याबाबतच्या प्रकरणांना मान्यता देण्याचे प्राधिकार विभाग प्रमुखांना / खाते प्रमुखांना प्रदान करण्याची बाब या विभागाच्या विचाराधीन होती. त्यानुसार उपरोक्त शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक ११ जून, १९९३ च्या आदेशामध्ये अंशतः सुधारणा करुन पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

"यापुढे गट-ब (अराजपत्रित), गट-क आणि गट-ड संवर्गातील पदांवर पदोन्नतीचे मानीव दिनांक देण्याचे प्राधिकार विभाग प्रमुखांना / खाते प्रमुखांना राहतील. मात्र सदर विभाग प्रमुख / खाते प्रमुख मंत्रालयाच्या सचिव दर्जाचे अधिकारी असणे बंधनकारक राहील. जे विभाग प्रमुख / खाते प्रमुख सचिव दर्जाचे नसतील त्यांच्या नियंत्रणाखालील वरील संवर्गातील कर्मचाऱ्यांना मानीव दिनांक प्रदान करण्याचे प्राधिकार संबंधित मंत्रालयीन विभागाच्या सचिवांना राहतील. मात्र गट "अ" व "ब" या राजपत्रित संवर्गातील अधिकाऱ्यांना मानीव दिनांक प्रदान करताना पूर्वीप्रमाणेच सामान्य प्रशासन विभाग आणि वित्त विभाग यांची मान्यता घेणे आवश्यक राहील."

२. कर्मचाऱ्याला ज्या पदाचा मानीव दिनांक द्यावयाचा आहे त्या पदावर त्याला प्रत्यक्ष पदोन्नती मिळणे आवश्यक आहे. परंतु सेवेमध्ये असताना त्याला जर प्रत्यक्ष पदोन्नती मिळाली नाही तर पदोन्नतीचा मानीव दिनांक देतांना महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१ मधील नियम ३२ मधील तरतूदी शिथिल करणे आवश्यक ठरते. अशा प्रकरणी मात्र पुर्वीप्रमाणेच सामान्य प्रशासन विभाग आणि वित्त विभाग यांची मान्यता घेणे आवश्यक राहील. या अनुषंगाने आणखी नमूद करण्यात येते की, मानीव दिनांकाची प्रकरणे सर्वसाधारणपणे ज्या कारणांमुळे उद्भवतात ती कारणे सोबतच्या परिशिष्ट - अ मध्ये दिलेली आहेत. ती विचारात घेऊन मानीव दिनांकाची प्रकरणे उद्भवणार नाही याची दक्षता शासनाच्या सर्व विभागांनी व विभाग प्रमुखांनी घ्यावी. अशी दक्षता घेऊनही मानीव दिनांक देण्याची प्रकरणे उद्भवल्यास त्या प्रकरणाची तपासणी/उपरोक्त आदेशातील तरतुदी आणि सोबतच्या परिशिष्ट - ब मधील मुद्दे विचारात घेऊन करावी व त्यांची पूर्तता होत असल्यास मानीव दिनांक प्रदान करण्यास परिच्छेद १ मधील प्राधिकारांतर्गत मंजूरी देण्यात यावी.

३. शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-एसआरव्ही-१०७६/१२, दिनांक २१ जून, १९८२ अन्वये ज्येष्ठता विनियम विहित करण्यात आले आहेत. त्यामधील नियम ५ (१) (५) व (७) मध्ये आवश्यक ती सुधारणा करण्याची कार्यवाही स्वतंत्रपणे करण्यात येईल.

४. उपरोक्त परिपत्रक वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक :-३८२/सेवा-३, दिनांक ३० एप्रिल, २००२ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

प्रकाश लोखंडे
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मंत्रालयीन विभागांचे सर्व अप्पर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव,
सर्व मंत्रालयीन विभाग,
वित्त विभाग/सेवा-३,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
* प्रबंधक, लोकआयुक्त व उपलोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानसभा),मुंबई.
* सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधान परिषद), मुंबई,
* सचिव, राज्य निवडणूक आयोग,नवीन प्रशासकीय भवन,मंत्रालय,मुंबई,
* महालेखापाल-१ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र मुंबई,
* महालेखापाल-२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र नागपूर,
* महालेखापाल-१ (लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र मुंबई,
* महालेखापाल-२ (लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
मुख्य लेखा परीक्षक (निवासी लेखे) कोकण भवन, नवी मुंबई,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
मंत्रालयीन विभागाच्या अखत्यारीतील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती

* पत्राने.

D:\Desk 12\G.RC.R.2-2002

H-374(5000-6-02)2

( शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही-२००२/प्र.क्र.२/२००२/१२ दिनांक ६ जून,२००२ सोबतचे परिशिष्ट)

## परिशिष्ट - अ

## मानीव दिनांक देण्याची प्रकरणे उद्भवण्याची कारणे

(१) गोपनीय अहवालातील प्रतिकूल शेरे वेळेवर न कळविणे; त्यांची वस्तुनिष्ठ प्रतवारी न होणे; विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीच्या वेळी अद्ययावत गोपनीय अहवाल उपलब्ध नसणे व त्यामुळे त्यांची प्रकरणे खुली ठेवणे.

(२) सेवाज्येष्ठता यादी अद्ययावत नसणे; शिवाय सर्व अधिकाऱ्यांना/कर्मचाऱ्यांना सेवाज्येष्ठता यादी वेळीच उपलब्ध न झाल्यामुळे अधिकारी/कर्मचारी यांना सेवा ज्येष्ठता यादीतील त्यांचे स्थान माहित नसणे.

(३) विभागीय परीक्षा उत्तीर्ण / अनुत्तीर्ण झाल्याच्या कारणास्तव तसेच उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाल्यानंतर परीक्षा नियमांनुसार सेवाज्येष्ठता यादीत वेळीच सुधारणा न करणे.

(४) मागासवर्गीयांच्या पदोन्नती संदर्भातील आरक्षण धोरणाची काटेकोरपणे अंमलबजावणी न करणे.

(५) पदोन्नतीसाठी विचार करताना विभागीय चौकशी प्रलंबित असणे; काही कालावधीनंतर विभागीय चौकशीचा निर्णय घेऊन त्यामध्ये निर्दोष सूटणे वा किरकोळ शिक्षा होणे.

(६) पदोन्नतीसाठी विचार झालेला असताना अधिकारी / कर्मचारी निलंबित असणे व त्यानंतर तो अंशतः किंवा पूर्णतः दोषमुक्त होणे.

(७) भ्रष्टाचार/ लाचलुचपत प्रकरणी न्यायालयात गुन्हा दाखल असल्याने पदोन्नती न देणे व निर्दोष सुटल्यानंतर मानीव दिनांक देणे.

(८) निवडसूच्यांना आयोगाची मान्यता न घेणे; परिणामी दीर्घकाळ पदोन्नती तात्पुरत्या स्वरुपात चालू राहणे - पदोन्नत्या नियमित झाल्याशिवाय मानीव दिनांकाचा विचार करणे शक्य नसते.

(९) पदोन्नतीच्या नियमित कोटयाखेरीज नामनिर्देशनाकरिता असलेल्या कोटयातील पदांवर पदोन्नत्या दिल्या जातात व भविष्यात पदोन्नतीसाठी उपलब्ध होणा-या पदांवर त्या समायोजित केल्या जात नाहीत.

-------------------

( शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही-२००२/प्र.क्र. २/२००२/१२, दिनांक ६ जून,२००२ सोबतचे परिशिष्ट)

## परिशिष्ट - ब

**मानीव दिनांक देण्याबाबतच्या प्रस्तावाची तपासणी करताना लक्षात घ्यावयाचे मुद्दे.**

१) सेवाकनिष्ठ कर्मचा-यास पदोन्नती देण्यात आली, त्यावेळी संबंधित कर्मचा-यांचा कोणत्या कारणास्तव विचार झालेला नाही. यास जबाबदार कोण व त्याविरुध्द करावयाची कार्यवाही.

२) अर्जदाराचे निवडसूचीच्यावेळी अस्तित्वात असलेल्या सेवाज्येष्ठता यादीतील स्थान. त्यास सेवाकनिष्ठ (पदोन्नतीसाठी आरक्षण असल्यास त्याच्या आधारे) असलेल्या त्याच्या प्रवर्गातील कोणत्या कर्मचा-यास नियमित पदोन्नती दिली आहे.

३) सेवाकनिष्ठ कर्मचा-यास पदोन्नती देण्यात आली त्या दिनांकास (निवडसूचीत) अर्जदार गोपनीय अहवाल व इतर आवश्यक त्या अटींनुसार पदोन्नतीस पात्र आहे किंवा कसे ? याबाबतची पात्रता विभागीय पदोन्नती समितीमार्फत तपासून घेण्यात यावी व ते जर पदोन्नतीस पात्र ठरले तरच मानीव दिनांक देण्यात यावा.

४) मानीव दिनांक हा एकास - एक तत्वावर देण्यात यावा.

५) ज्या निवडसूचीच्या आधारे ज्या प्रवर्गाच्या कर्मचा-यास / अधिका-यास मानीव दिनांक देण्यात आला आहे, त्या प्रवर्गाच्या सर्वात सेवाकनिष्ठ कर्मचा-याचे नाव संबंधित निवडसूचीतून कमी करुन, पुढील निवडसूचीत रिक्त पदे व त्या प्रवर्गाच्या वाट्याला येणा-या पदांमध्ये प्रमाणात समावेश करणे आवश्यक असते.

-------------

GR-200404171246227001-0100

पदोन्नती
गोपनीय अभिलेखांच्या प्रतवारीचे निकष

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय- क्रमांक : एसआरव्ही-२००२/प्र.क्र.२०/०२/१२,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २३ डिसेंबर, २००२.

वाचा :- (१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक ईएसवी-११८९/९०-८९/१३,
दिनांक ३१ जानेवारी, १९९०.
(२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-१०८८/प्र.क्र.११/(८८)/१२,
दिनांक २१ फेब्रुवारी, १९९४
(३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-१०८८/प्र.क्र.११/(८८)/१२,
दिनांक २२ सप्टेंबर, १९९४

शासन निर्णय :-

संदर्भाधिन क्रमांक २ येथील दि. २१ फेब्रुवारी,१९९४ च्या शासन निर्णयान्वये गट-अ मधील पहिल्या टप्प्यापर्यंतच्या पदांवर तसेच गट-अ मधील पुढील टप्प्यांवरील पदांवर पदोन्नतीसाठी गोपनीय अहवालांच्या सरासरी प्रतवारीचे निकष विहित केलेले आहेत. त्याचप्रमाणे संदर्भाधीन क्रमांक ३ येथील दि.२२ सप्टेंबर,१९९४ च्या शासन निर्णयान्वये या प्रत्येक टप्प्यावरील पदांच्या ४थ्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार अंमलात आलेल्या वेतनश्रेणीच्या अनुषंगाने वेतनश्रेणीचे किमान टप्पे विहित केलेले आहेत.

२. ५व्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार वेतनश्रेणीच्या झालेल्या पुनर्रचनेच्या अनुषंगाने संदर्भाधीन क्रमांक३ येथील दि.२२ सप्टेंबर,१९९४ च्या शासन निर्णयानुसार विहित केलेले वेतनश्रेणीचे किमान टप्पे सुधारीत करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते. त्या अनुषंगाने ५ व्या वेतन आयोगाच्या शिफारशींचा दि.१ जानेवारी,१९९६ पासून झालेल्या वेतनश्रेणीच्या पुनर्रचनेनंतर पदोन्नतीसाठी गोपनीय अहवालांच्या सरासरीचे सर्वसाधारण निकष आणि वेतनाचे टप्पे खालील प्रमाणे विहित करण्यात येत आहेत. :-

१) शासन सेवेतील गट-अ मधील पहिल्या टप्प्यापर्यंतच्या पदावरील पदोन्नती ही "ज्येष्ठता अधीन पात्रता" या तत्वावर होत असल्याने या पदोन्नतीसाठी गोपनीय अहवालांच्या सरासरी प्रतवारीचा निकष "ब" असा निश्चित करण्यात यावा.

२) गट-"अ" मधील पहिल्या टप्प्यानंतरच्या सर्व पदोन्नत्या " ज्येष्ठता अधिन निव्वळ गुणवत्ता (Strict selection/गुणवत्ता व ज्येष्ठता (Strict Selection with due regard seniority )"या तत्वावर करण्यात येत असल्याने त्यासाठी गोपनीय अहवालाच्या सरासरी प्रतवारीचे निकष खालीलप्रमाणे राहतील. -

(अ) गट-अ मधील ज्या पदांच्या वेतनश्रेणीचा किमान (Minimum) टप्पा रुपये १६,३९९ पर्यन्त आहे, त्या पदावरील पदोन्नतीसाठी ५ वर्षाच्या गोपनीय अहवालांची सरासरी प्रतवारी किमान "ब+" अशी असावी.

(ब) गट-अ मधील ज्या पदांच्या वेतनश्रेणीचा किमान (Minimum) टप्पा रुपये १६,४०० किंवा त्यापेक्षा अधिक आहे त्या पदावरील पदोन्नतीसाठी ५ वर्षाच्या गोपनीय अहवालांची सरासरी प्रतवारी किमान "अ" अशी असावी.

(क) मात्र ज्या पदांसाठी शासनाने स्वतंत्र आदेशान्वये गोपनीय अहवालांच्या सरासरीचे विविक्षीत निकष विहित केले असतील असे स्वतंत्र निकष ते वरील सर्वसाधारण निकषानुरुप नसले तरी अंमलात राहतील.

३. संदर्भाधीन क्रमांक २ येथील दि.२१ फेब्रुवारी,१९९४ च्या शासन निर्णयातील परिच्छेद १ (३) मधील **"अत्युत्कृष्ठ"** गोपनीय अहवाल असलेल्या कर्मचा-यास निवडसूचीत वरचढपणा देण्याबाबतचे आदेश यापुढेही अंमलात राहतील.

४. सदर आदेश ५ व्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार सुधारीत केलेल्या वेतनश्रेणी अंमलात आलेल्या दिनांकापासून म्हणजेच दि.१ जानेवारी,१९९६ पासून अंमलात आल्याचे समजण्यात यावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

बा. बा. नारायणकर
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

राज्यपालांचे सचिव,राजभवन,मलबार हिल,मुंबई.
मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
सर्व मंत्री /राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव,
सर्व मंत्रालयीन विभागांचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
सर्व मंत्रालयीन विभाग,
* प्रबंधक,मूळ शाखा,उच्च न्यायालय,मुंबई .
* प्रबंधक,अपील शाखा,उच्च न्यायालय,मुंबई.
* प्रबंधक,लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय,मुंबई.
* सचिव,महाराष्ट्र लोकसेवा आयोग,मुंबई .
* सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानसभा) मुंबई.
* सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानपरिषद) मुंबई.
* राज्य निवडणूक आयुक्त,राज्य निवडणूक आयोग,नवीन प्रशासकीय भवन, मुंबई.
* सचिव, अनुसूचित जमाती कल्याण समिती,विधान भवन, मुंबई.
* महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र, मुंबई.
* महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई.
* महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र, नागपूर.
* महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व परीक्षा),महाराष्ट्र, नागपूर.
अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई.
निवासी लेखा परीक्षा अधिकारी,मुंबई.
मुख्य लेखा परीक्षक (निवासी लेखे) कोकण भवन,नवी मुंबई.
सर्व विभागीय आयुक्त.
सर्व जिल्हाधिकारी.
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
निरनिराळया मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख.
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवडनस्ती.
*पत्राने.

---

शासन सेवेतील मागासवर्गीय/अमागासवर्गीय कर्मचारी/
अधिकारी यांची पदोन्नतीच्या संवर्गातील आपापसातील
ज्येष्ठता विनियमित करण्याबाबत .

विरपालसिंग चौहान, जगदिशलाल व अजितसिंग (२)
प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार.

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय , क्रमांक:एसआरव्ही-२००१/प्र.क्र.२८/२००१/१२,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २० मार्च,२००३.

संदर्भ :- (१) शासन अधिसूचना,सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक:एसआरव्ही-१०७६/१२,दिनांक २१ जून,१९८२.
(२) शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक:एसआरव्ही-१०९६/प्र.क्र.३२/९६/१२,दिनांक १९ एप्रिल,१९९७
(३) शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक:एसआरव्ही-१०९६/प्र.क्र.३२/९६/१२,दिनांक २० ऑक्टोबर,१९९७.

**शासन निर्णय :-**

शासन सेवेतील कर्मचाऱ्यांची/अधिकाऱ्यांची पदोन्नतीनंतरची सेवाज्येष्ठता ठरविण्यासंबंधी सर्वसाधारण तत्वे शासन अधिसूचना,सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक:एसआरव्ही-१०७६/१२, दिनांक २१ जून,१९८२ अन्वये विनियमित केलेली आहेत. तसेच शासन सेवेतील मागासवर्गीय/अमागासवर्गीय अधिकारी/कर्मचारी यांची पदोन्नत संवर्गात आपापसातील जेष्ठता विनियमित करण्याबाबतचे आदेश शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:एसआरव्ही-१०९६/प्र.क्र.३२/९६/१२, दिनांक २०/१०/१९९७ अन्वये निर्गमित केले आहेत.

२. केंद्र शासन विरुध्द विरपालसिंग चौहान, जगदिशलाल विरुध्द हरियाना राज्य शासन आणि अजितसिंग (२) विरुध्द हरियाना राज्य शासन प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने मागासवर्गीय/अमागासवर्गीय कर्मचारी/अधिकारी यांच्या पदोन्नती संवर्गात ज्येष्ठते संदर्भात वेगवेगळे निर्णय दिले होते. मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेले निर्णय लक्षात घेऊन भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १६ (४-अे) मध्ये "In matters of Promotion to any class" ऐवजी "In matters of Promotion, with consequential seniority, to any class" अशी दिनांक १५ जून,१९९५ पासून पूर्वलक्षी प्रभावाने सुधारणा केंद्र शासनाने केली आहे. त्यानुसार शासन सेवेतील मागासवर्गीय/अमागासवर्गीय कर्मचारी/अधिकारी यांची पदोन्नत संवर्गात आपापसातील जेष्ठता पदोन्नतीच्या दिनांकाच्या आधारे विनियमित करण्याबाबत केंद्र शासनाने ज्ञापन क्रमांक:२००११/१/२००१/इएसटीटी (डी), दिनांक २१/१/२००२ अन्वये सुधारीत आदेश निर्गमित केले आहेत.

(कृ.मा.प...

३.  केंद्र शासनाने भारतीय संविधानामध्ये केलेली दुरुस्ती व त्यानुसार निर्गमित केलेले दिनांक २१/१/२००२ चे आदेश विचारात घेता राज्य शासनाने आता असा निर्णय घेतला आहे की, शासन सेवेतील मागासवर्गीय/अमागासवर्गीय कर्मचारी/अधिकारी यांची पदोन्नत संवर्गात आपापसातील जेष्ठता विनियमित करण्याबाबत वर नमूद केलेल्या दिनांक २१ जून,१९८२ च्या अधिसूचनेतील आणि दिनांक २०/१०/१९९७ च्या आदेशातील सूचना कायम राहतील. त्यामुळे मागासवर्गीय व अमागासवर्गीय उमेदवारांच्या निवडसूचीतील क्रमानुसार दिलेल्या नियमीत पदोन्नतीच्या दिनांकाचे आधारे पदोन्नतीच्या संवर्गातील त्यांची परस्पर ज्येष्ठता निश्चित होईल.

४.  सर्व विभागांनी/नियुक्ती अधिकाऱ्यांनी यास्तव त्यांच्या नियंत्रणाखालील सर्व संवर्गाच्या ज्येष्ठतायाद्या प्रकाशित करताना वरील सूचना लक्षात घेवून कार्यवाही करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

बा.बा.नारायणकर
अवर सचिव,महाराष्ट्र शासन.

प्रति,

राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव,
मंत्रालयीन विभागांचे सर्व अप्पर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव,
सर्व मंत्रालयीन विभाग,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
* प्रबंधक, लोकआयुक्त व उपलोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानसभा), मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधान परिषद), मुंबई,
* सचिव, राज्य निवडणूक आयोग,नवीन प्रशासकीय भवन,मंत्रालय,मुंबई,
* महालेखापाल-१ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र मुंबई,
* महालेखापाल-२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र नागपूर,
* महालेखापाल-१ (लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र मुंबई,
* महालेखापाल-२ (लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
मुख्य लेखा परीक्षक (निवासी लेखे) कोकण भवन, नवी मुंबई,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
मंत्रालयीन विभागाच्या अखत्यारीतील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती

* पत्राने.

--------

**सेवा प्रवेश नियम--**
**पदोन्नतीसाठीची पूर्व अट म्हणून निम्न संवर्गात/सेवेत/ श्रेणीत किमान सेवेसंबंधीची अट मागासवर्गीयांचा अनुशेष भरुन काढण्यासाठी शिथिल करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक,क्रमांक:एसआरव्ही-२००३/सीआर-१८/२००३/१२,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
**दिनांक :-२२ सप्टेंबर,२००३.**

**वाचा :-** १) शासन परिपत्रक,सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक:एसआरव्ही-१०८८/१०९/१२, दिनांक २५ ऑगस्ट,१९८८.
२) शासन परिपत्रक,सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:एसआरव्ही-१०८८/१०९/ प्र.क्र.१/८८/१२,दिनांक ४ सप्टेंबर, १९९०.

## परिपत्रक

वर नमूद केलेल्या शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:एसआरव्ही-१०८८/ १०९/१२, दिनांक २५/८/१९८८ आणि शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:एसआरव्ही-१०८८/१०९/प्र.क्र.१/८८/१२, दिनांक ४/९/१९९० अन्वये गट-क (वर्ग-३) पासून गट-अ (वर्ग-१) मधील दुसऱ्या टप्प्यावरील पदोन्नतीपर्यन्तच्या पदावर आंतरश्रेणी पदोन्नतीसह प्रत्येक टप्प्यावर पदोन्नत्या देताना पदोन्नतीसाठी पूर्व अट म्हणून निकटतम निम्न पदावर किमान ३ वर्षाच्या सेवेची अट विहित करण्यात आलेली आहे. सध्या राज्यातील सर्व शासकीय/निम शासकीय सेवेतील मागासवर्गीयांचा सरळसेवा व पदोन्नतीमधील अनुशेष भरुन काढण्याची मोहिम हाती घेण्यात आलेली आहे. पदोन्नतीमधील अनुशेष भरुन काढण्याकरिता काही संवर्गात पदोन्नत्या देण्याकरिता निम्न संवर्गात ३ वर्षाची सेवा झालेले मागासवर्गीय कर्मचारी उपलब्ध होत नाहीत, असे शासनास आढळून आलेले आहे. त्यामुळे अनुशेष भरण्याच्या मोहिमेत बाधा उत्पन्न होत आहे. सदर बाधा दूर करण्याकरिता पदोन्नतीच्या कोटयातील मागासवर्गीयांची अनुशेषाची पदे भरण्याकरिता केवळ मागासवर्गीय कर्मचा-यांकरिता निम्न पदावरील ३ वर्षाच्या अनुभवाचा कालावधी शिथिल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

२. याबाबत सर्वकष विचार करुन शासनाने आता असा निर्णय घेतला आहे की, मागासवर्गीयांचा पदोन्नतीच्या कोटयातील अनुशेष भरुन काढण्याकरिता गट-क (वर्ग-३) पासून गट-अ (वर्ग-१) च्या पदावर आंतरश्रेणी पदोन्नतीसह प्रत्येक टप्प्यावर पदोन्नती करताना निकटतम निम्न पदावर विहित केलेला सेवेचा ३ वर्षाचा कालावधी खालील अटीच्या अधीन राहून शिथिल करुन तो २ वर्षाचा करण्यात येत आहे :-

(१) त्यांची पदोन्नती निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात राहिल व वरिष्ठ संवर्गात जेष्ठतेसाठी ग्राहय धरता येणार नाही. त्या संवर्गात वेतनाव्यतिरिक्त अन्य कोणतेही लाभ मिळणार नाहीत.

(कृ.मा.प...

(२) अशी पदोन्नती केवळ ११ महिन्यांसाठी देण्यात यावी. त्यानंतर त्यांना पदोन्नतीमध्ये खंड देण्यात यावा.

(३) या ११ महिन्याच्या कालावधीत कनिष्ठ श्रेणीत ३ वर्षे पूर्ण झालेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांची पदोन्नतीसाठी पात्रता पुन्हा अजमाविण्यात यावी.

३. **सदर सवलत केवळ अनुशेषाची विशेष भरती मोहिम सुरु असेपर्यन्तच अनुज्ञेय राहिल.**

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

प्र.कृ.लोखंडे
**उप सचिव,महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
मा.उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
सर्व मंत्री /राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव,
सर्व मंत्रालयीन विभागांचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
मा.राज्यपालांचे सचिव,राजभवन,मलबार हिल,मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभाग,
* प्रबंधक,मूळ शाखा,उच्च न्यायालय,मुंबई ,
* प्रबंधक,अपील शाखा,उच्च न्यायालय,मुंबई,
* प्रबंधक,लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय,मुंबई,
* सचिव,महाराष्ट्र लोकसेवा आयोग,मुंबई ,
* सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानसभा) मुंबई,
* सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानपरिषद) मुंबई,
* राज्य निवडणूक आयुक्त,राज्य निवडणूक आयोग,नवीन प्रशासकीय भवन, मुंबई,
* सचिव, अनुसूचित जमाती कल्याण समिती,विधान भवन, मुंबई,
* महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र, मुंबई,
* महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई,
* महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र, नागपूर,
* महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा परीक्षा),महाराष्ट्र, नागपूर,
* महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई ( दोन प्रती )
अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी,मुंबई,
मुख्य लेखा परीक्षक (निवासी लेखे) कोकण भवन,नवी मुंबई,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
निरनिराळया मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवडनस्ती,

*पत्राने.

GR-200406251252225001-0100

**पदोन्नतीतील आरक्षण हे पदोन्नतीच्या सर्व टप्प्यावर लागू करणेबाबत.**

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक : बीसीसी २००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६-ब
मंत्रालय , मुंबई -४०० ०३२
**दिनांक : २५ मे, २००४**

__पहा__ :- १) शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग क्रमांक बीसीसी १०७२/जे, दिनांक २३ मे १९७४.
२) शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही १०७४ /डी , दिनांक २८ जानेवारी १९७५.
३)शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी १०८९/२५५१ (अ) / १६ब, दिनांक २३ जानेवारी १९९१.
४)शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक - बीसीसी १०९७/प्र.क्र.६३/९७/१६ब, दिनांक १८ ऑक्टोबर १९९७.

__प्रस्तावना :-__ मागासवर्गीय अधिकारी /कर्मचारी यांना पदोन्नतीमध्ये शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक - बीसीसी १०७२/जे, दिनांक २३ मे १९७४ अन्वये आरक्षणाचे तत्व लागू करण्यात आले होते. तसेच शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही १०७४/डी , दिनांक २८ जानेवारी १९७५ अन्वये कनिष्ठ स्तरावरुन वरीष्ठ स्तरावर पदोन्नती देताना पाळावयाची तत्वे विशद केलेली असून या शासन निर्णयान्वये वर्ग १ च्या पहिल्या पदापर्यंतची (पहिल्या टप्प्यापर्यंत ) पदोन्नती, ही " योग्यतेनुसार वरिष्ठता " ( seniority subject to fitness) या तत्वावर मागासवर्गीयाकरीता असलेले आरक्षण विचारात घेवून करण्याबाबत आदेश होते. या शासन निर्णयानुसार वर्ग-१ च्या पहिल्या पदानंतरची (पहिल्या टप्प्यानंतरची ) पदोन्नती "काटेकोर निवड" पध्दतीद्वारे (By strict selection ) करण्याबाबत आदेश दिलेले असून, त्यानुसार वर्ग १ च्या पहिल्या पदानंतरच्या पुढील पदांना / टप्प्यांना आरक्षणाचे तत्व लागू केलेले नव्हते. याशिवाय शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक - बीसीसी १०८९/२५५१ (अ) /१६ ब ,दिनांक २३ जानेवारी १९९१ अन्वये ज्या सेवा / संवर्गा मध्ये सरळसेवा भरतीचे प्रमाण ७५ % पेक्षा अधिक नाही, अशा सेवा /संवर्गामधून पदोन्नतीसाठी आरक्षण विहीत करण्याबाबत आदेश दिलेले होते. म्हणजेच ज्या सेवा/ संवर्गामध्ये सरळ सेवाभरतीचे प्रमाण ७५ % पेक्षा अधिक होते अशा वर्ग ४ ते वर्ग १ च्या पहिल्या टप्प्यापर्यंतच्या पदामध्ये पदोन्नती करीता आरक्षण लागू नव्हते.

२.     सद्य:स्थितीत महाराष्ट्र शासन राजपत्रात दिनांक २९/१/२००४ रोजी प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेनुसार सन २००४ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ मधील (आरक्षण कायदा ) कलम ५ मध्ये खालील प्रमाणे तरतूदी केलेल्या आहेत.

**(अ) कलम ५ पोटकलम (१) पदोन्नतीतील आरक्षण हे पदोन्नतीच्या सर्व टप्प्यावर असेल .**

**(ब) पोटकलम (२) हा अधिनियम अंमलात येण्याच्या दिनांकास , पदोन्नतीद्वारे भरावयाच्या कोणत्याही पदासाठी आरक्षणाची तरतूद करणारे शासनाचे आदेश अंमलात असल्यास, शासनाकडून त्यामध्ये फेरफार करण्यात आला नसेल किंवा ते रद्द करण्यात आले नसतील तर ते अंमलात असल्याचे चालू राहतील.**

३.     सध्या प्रचलित असलेल्या दिनांक २३ मे १९७४, २८ जानेवारी १९७५ व २३ जानेवारी १९९१ चे शासन निर्णय अधिक्रमित करुन आता नव्याने लागू केलेल्या वरील अधिनियमाच्या कलम ५ पोटकलम (१) व (२) च्या अनुषंगाने खालील प्रमाणे सुधारीत आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

**शासन निर्णय :-**

(अ) महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ मधील (आरक्षण कायदा) च्या कलम ५ मधील पोटकलम (१) नुसार जेथे पदे पदोन्नतीने भरली जातात तेथे आरक्षणाचे तत्व लागू होईल . त्यानुसार दिनांक २३/१/१९९१ च्या शासन निर्णयातील तरतूद रद्द करुन सरळ सेवेचे प्रमाण ७५ % पेक्षा अधिक असले तरीही उर्वरीत पदोन्नतीच्या पदांना आरक्षण लागू राहील.

(ब) पदोन्नतीमधील आरक्षण हे खालीलप्रमाणे असेल.

| | |
|---|---|
| १)अनुसूचीत जाती | १३ % |
| २)अनुसूचीत जमाती | ७ % |
| ३)विमुक्त जाती (अ) | ३ % |
| ४)भटक्या जमाती ( ब) | २.५% |
| ५)भटक्या जमाती (क) | ३.५% |
| ६)भटक्या जमाती (ड) | २ % |
| ७)विशेष मागास प्रवर्ग | २ % |
| एकूण | ३३ % |

**(क) जेथे पदोन्नतीकरीता सेवा प्रवेश नियमात तरतूद आहे तेथे पदोन्नती करीता अद्यापपर्यंत ज्या टप्प्यांना वा संवर्गांना आरक्षण लागू नव्हते, आता त्या पदोन्नतीच्यां सर्व टप्प्यांना / संवर्गांना आरक्षणाचे तत्व दिनांक २९/१/२००४ पासून लागू होईल.**

(ड) जे मागासवर्गीय अधिकारी वर्ग १ च्या वरील टप्प्यात दिनांक २९/१/२००४ या तारखेपर्यंत पदोन्नत झालेले आहेत ते सर्व सेवाजेष्ठता व गुणवत्तेनुसार झाले आहेत असे समजण्यात यावे .

(इ) या अधिनियमातील तरतुदीनुसार पदोन्नतीने भरण्यात येणारी आरक्षणाची पदे यापुढे रिक्त होणा-या पदांच्या उपलब्धतेनुसार टप्प्याटप्प्याने भरण्यात यावीत.

(फ) नव्याने आरक्षण लागू केलेल्या संवर्गाना / पदांना सामान्य प्रशासन विभागाच्या क्रमांकः बीसीसी -१०९७/प्र.क्र. ६३/९७/१६-ब , दिनांक १८/१०/१९९७ च्या शासन निर्णयातील आरक्षणा संबंधीचे आदेश लागू राहतील. मात्र ज्या संवर्गात नव्याने आरक्षण लागू करण्यात येणार आहे त्या संवर्गातील मंजूर पदांवर एकाच वेळी आरक्षण न लावता त्या संवर्गातील दिनांक २९/१/२००४ पासून रिक्त होणा-या पदांवरील टक्केवारी विचारात घेवून आरक्षणाची पदे विचारात घ्यावीत.

(ग) दिनांक २९/१/२००४ पूर्वी सुरु केलेल्या निवड प्रक्रियेमध्ये वर्ग १ च्यां पुढील टप्प्यामध्ये तसेच ज्या पदोन्नतीच्या टप्प्यांना आरक्षण लागू नव्हते अशा पदोन्नतीच्या टप्प्यांमध्ये सदर अधिनियमाच्या तरतूदी लागू होणार नाहीत. मात्र दिनांक २९/१/२००४ च्या नंतरच्या निवड प्रक्रियेमध्ये अधिनियमातील तरतूदीनुसार आरक्षणाचे तत्व लागू राहिल.

४. वरील आदेश मंत्रालयीन विभाग प्रमुखांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख याच्या निदर्शनास आणून वरील आदेशांची योग्य अंमलबजावणी करण्याबाबत आवश्यक त्या सूचना देण्यात याव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल याच्या आदेशानुसार व नावाने,

(यु.पी.एस.मदान)
सचिव , महाराष्ट्र शासन

प्रति,
मा.राज्यपाल यांचे सचिव
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव

उप मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
सर्व मंत्री /राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव /अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव /सचिव , सर्व मंत्रालयीन विभाग
सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
* प्रबंधक, उच्च न्यायालय , मूळ शाखा , मुंबई,
* प्रबंधक , उच्च न्यायालय , अपील शाखा, मुंबई,
* प्रबंधक , लोकआयूक्त व उप लोकआयुक्त यांचे कार्यालय,
* सचिव , महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
* आयुक्त, अनुसूचित जाती जमाती , भारत सरकार , पाचवा माळा, लोकनायक भवन , नवीदिल्ली
* उप संचालक, अनुसूचित जाती जमाती आयोग , भारत सरकार , चिपळणूकर भवन, शात्री मार्ग नवीपेठ, पुणे , ४११०३०.
* विशेष आयुक्त, महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र सदन , कोपर्निकस मार्ग, नवीदिल्ली ११०००१
संचालक, समाज कल्याण, पुणे
आयुक्त, आदिवासी विकास , नाशिक
आयुक्त , आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
संचालक,रोजगार व स्वंयरोजगार विभाग , मुंबई ,
सहायक आयुक्त (मागासवर्ग कक्ष ) सर्व विभागीय आयुक्तांची कार्यालये,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
निवड नस्ती,
* पत्राने

GR-200406251615560001-0100

**अनुसूचित जमातीच्या राखीव जागांवर दिनांक १५ जून, १९९५पूर्वीच सरळ सेवेने नियुक्त अथवा पदोन्नत झालेल्या विशेष मागास प्रवर्गातील कर्मचारी / अधिकारी यांची शासकीय /निमशासकीय सेवेतील जेष्ठता निश्चित करण्याबाबत**

महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग

शासन निर्णय क्रमांक : बीसीसी - २००४/प्र.क्र.४५/०४/१६-ब

मंत्रालय , मुंबई -४०० ०३२

**दिनांक : २४ जून , २००४**

**पहा** .- १) शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग , क्रमांक : बीसीसी -१०९४/ प्र.क्र ६८/९४/१६ब, दिनांक १५ जून १९९५

२)शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग , क्रमांक : बीसीसी -१०९४/ प्र.क्र ६८/९४/१६ब, दिनांक २४ जुलै. १९९८

३)शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग , क्रमांक : बीसीसी -१०९४/ प्र.क्र ६८/९४/१६ब, दिनांक २७ मे २००२.

**प्रस्तावना :-** अनुसूचित जमातीच्या यादीमध्ये ज्या जमातींचा समावेश करण्यात आलेला आहे अशा जमातीच्या नावाशी साधर्म्य असणा-या गोवारी,माना,कोष्टी,कोळी, मुन्नेरवार,या सारख्या जातींचा **विशेष मागास प्रवर्ग** म्हणून समाज कल्याण ,सांस्कृतिक कार्य ,क्रिडा विभाग, यांनी त्यांच्या क्रमांक -सीबीसी -१४९४/प्र.क्र.२३६/मावक -५, दिनांक ७ डिसेंबर १९९४ च्या शासन निर्णयान्वये घोषित केलेला आहे.

सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय क्रमांक- बीसीसी १०९४/प्र.क्र. ६८/९४/१६ब, दिनांक १५ जून १९९५ अन्वये विशेष मागास प्रवर्गासाठी सरळ सेवा व पदोन्नतीमध्ये २% आरक्षण विहीत करण्यात आले आहे. तसेच या विशेष मागास प्रवर्गातील ज्या व्यक्तींना दिनांक १५ जून १९९५ पूर्वी अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे शासकीय / निमशासकीय सेवेत प्रवेश मिळवून पदोन्नती प्राप्त केलेली आहे त्यांना पदावनत किंवा सेवेतून काढून टाकण्यात येवू नये अशा प्रकारचे संरक्षण दि.१५ जून १९९५ च्या शासन निर्णयान्वये दिलेले आहेत.

दिनांक १५ जून १९९५ च्या शासन निर्णयानुसार विशेष मागास प्रवर्गातील व्यक्तींना सेवेतील संरक्षण देण्याबाबत वरील प्रमाणे निर्णय घेतला असला तरी असे संरक्षण प्राप्त केलेल्या कर्मचारी / अधिकारी यांना त्यांच्या संरक्षित केलेल्या संवर्गातील ज्येष्ठता कशा प्रकारे विचारात घ्यावी याबाबत

निर्णय घेण्यात आलेला नव्हता. या अनुषंगाने श्री.एस.ए.कंदिकटला विरुध्द महाराष्ट्र शासन प्रकरणी महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण , मुंबई यांच्यासमोर दाखल झालेल्या मूळ अर्ज क्रमांक ३९८/२००१ प्रकरणी, दिनांक १५ जून १९९५ च्या शासन निर्णयात ज्या व्यक्तींना सेवेतील संरक्षणाचा फायदा देण्यात आलेला आहे तो फायदा त्या संवर्गातील त्यांची जेष्ठता संरक्षित करण्यासाठीही आहे असे स्पष्टपणे नमूद करणारे आदेश निर्गमित करण्याबाबत न्यायाधिकरणाने निर्णय दिलेला आहे. न्यायाधिकरणाचे आदेश विचारात घेवून दिनांक १५ जून १९९५ च्या शासन निर्णयानुसार सेवेत संरक्षण प्राप्त केलेल्या विशेष मागास प्रवर्गातील अधिकारी / कर्मचा-यांची सेवा जेष्ठता निश्चित करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. या अनुषंगाने शासनाने खालील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :-**

विशेष मागास प्रवर्गातील ज्या अधिकारी / कर्मचारी यांनी दिनांक १५ जून १९९५ पूर्वीच अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे शासकीय / निमशासकीय सेवेत प्रवेश मिळविला असेल अथवा पदोन्नती प्राप्त केलेली असेल अशा अधिकारी / कर्मचा-यांना उपरोक्त क्रमांक १ येथील दिनांक १५ जून १९९५ च्या शासन निर्णयाद्वारे संरक्षण देवून अशा संरक्षित केलेल्या अधिकारी/ कर्मचा-यांची सेवा ज्येष्ठता **दिनांक १५ जून १९९५** अशी विचारात घेण्यात यावी.

२. मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख यांच्या वरील आदेश निदर्शनास आणून निर्णयाच्या आदेशाप्रमाणे कार्यवाही करण्याच्या सूचना विनाविलंब देण्यात याव्यात .

३. हे आदेश शासकीय / निमशासकीय सेवा , मंडळे / महामंडळे, महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदा अनुदानित शैक्षणिक संस्था , सहकारी संस्था, शासनाचे सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम इत्यादी कार्यालयांना लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( यु.पी.एस.मदान )**
**सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

म.राज्यपाल यांचे सचिव
म.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
उप मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव

**आरक्षणाची पदे पदोन्नतीने भरण्यासंदर्भातील विहीत कार्यपध्दती....**

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक : बीसीसी २००१/१८८७/प्र.क्र. ६४/०१ /१६ ब
मंत्रालय मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २६ ऑक्टोबर, २००४.

**<u>पहा</u>** :- १) शासन निर्णय , सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : बीसीसी -१०७२/जे, दिनांक २३ मे १९७४
२) शासन निर्णय , सामान्य प्रशासन विभाग, क्रमांकः एसआरव्ही - १०७४ /डी , दिनांक -२८ जानेवारी १९७५.
३) शासन निर्णय , सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : बीसीसी -१०८९/२५५१/ १६-ब, दिनाक- २३ जानेवारी १९९१.
४)शासन निर्णय , सामान्य प्रशासन विभाग, क्रमाक : बीसीसी -१०९७/प्र.क्र.६३/९७/१६-ब, दिनांक -१८ ऑक्टोबर १९९७.
५) शासन निर्णय , सामान्य प्रशासन विभाग क्रमांक बीसीसी २००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६ ब, दिनांक २५ मे २००४

**शासन निर्णय : -**

महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती / अनूसूचित जमाती , निरधीसूचित जमाती (विमुक्त जाती ) भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण ) अधिनियमाला अनुसरुन दिनांक २५ मे २००४ रोजी शासन निर्णय काढण्यात आला आहे. ज्या पदोन्नतीच्या पदांना प्रथमच आरक्षण लागू करण्यात आले आहे असे रिक्त पदे भरण्याचे तत्व उक्त शासन निर्णयात स्पष्ट केले आहे. ही पदोन्नतीची पदे भरण्याची कार्यपध्दती निश्चित कशी असावी याबाबत विभागांकडून काही शंका उपस्थित करण्यात येत आहेत आणि त्यांचे स्पष्टीकरण या विभागाकडे विचारण्यात येत आहे. त्या अनुषंगाने शंका निरसनासाठी सर्व टप्प्यांवर पदोन्नतीची रिक्त पदे राखीव प्रवर्गामधून भरण्याची सविस्तर कार्यपध्दती पुढील प्रमाणे राहील.

१) पदोन्नतीकरीता निवडसूची ही प्रत्येक सेवाभरती वर्षामध्ये (१ सप्टेंबर ते ३१ ऑगस्ट ) तयार करावी. नेहमीची प्रथा अशी आहे की, विशिष्ट संवर्गात ज्यावेळी एखादे रिक्त पद किंवा रिक्त पदे निर्माण होतात त्यावेळी पदोन्नतीकरीता निवडावयाच्या उमेदवारांचे प्रस्ताव सादर करण्यात येतात. ही चुकीची पध्दत आहे भरती वर्षात एकूण किती रिक्त पदे उपलब्ध होऊ शकतील अशा संभाव्य रिक्त पदांच्या संख्येचा अचूक अंदाज काढावा व त्या वर्षातील अशा रिक्त पदांची संख्या विचारात घेऊन दरवर्षी निवडसूची तयार केली गेली पाहिजे. एखादया सेवा भरती वर्षात रिक्त असलेल्या व रिक्त होणा-या संभाव्य पदांचा अचूक अंदाज केल्यानंतर अशा रिक्त पदांवर ३३ टक्के आरक्षणाचे सूत्र लागू करुन आरक्षित करावयाच्या पदांची संख्या काढणे ही त्यापुढची पायरी आहे. राखीव पदांची संख्या अपूर्णांकात असेल तर ती जवळच्या पूर्ण संख्येत पूर्णांकात करण्यात येईल, जसे आरक्षणासाठी २.३ पदे असतील तर ती २ म्हणून समजण्यात येतील आणि २.६ पदे असतील तर ती ३ म्हणून समजण्यात येतील . २.५ हा आकडा या प्रयोजनासाठी २ म्हणून नव्हे तर ३ म्हणून समजण्यात येईल.

२) राखीव प्रवर्गातील उमेदवारांसाठी  उपलब्ध पदांची संख्या निश्चित केल्यावर कोणत्या विशिष्ट प्रवर्गासाठी  ती पदे वापरता येतील ते ठरविण्यात यावे.   या प्रयोजनार्थ दिनांक १८/१०/१९९७ च्या शासन निर्णया सोबतच्या पदोन्नतीसाठीच्या नमुनावजा १०० बिंदू नामावलीचे  सहाय्य घेण्यात यावे. पहिल्या भरती  वर्षात अशा उपलब्ध पदांसाठी नामावलीतील बिंदू हे प्रत्येक राखीव प्रवर्गाकरिता ते नामावलीमध्ये ज्या क्रमाने असतील त्याच क्रमाने अनुक्रमांक १ पासून सुरु होऊन वापरण्यात येतील. उदा.जर केवळ एकच राखीव पद उपलब्ध झाले तर ते पद अनूसूचित जातीच्या उमेदवारामधून भरण्यात यावे.   कारण बिंदू नामावलीतील पहिला अनुक्रमांक हा अनुसूचित जातीसाठी आहे.  जर दोन राखीव पदे असतील तर त्यापैकी एक अनुसूचित जातीच्या उमेदवाराला तर दुसरे अनुसूचित जमातीच्या उमेदवाराला मिळेल, कारण बिंदूनामावलीतील अनुक्रमांक १ व २ वरील राखीव बिंदू या प्रवर्गासाठी आहे.   तीन राखीव पदे असतील तर पहिले पद अनुसूचित जातीच्या, दुसरे पद अनुसूचित जमातीच्या व तिसरे पद विमुक्त जाती (अ) च्या  प्रवर्गाच्या जातीच्या उमेदवाराला मिळेल.    कारण अनुक्रमांक १, २ व ३ वरील राखीव बिंदू अनुक्रमे या प्रवर्गासाठी आहेत.  याच पध्दतीने बिंदू नामावलीमध्ये  दिलेल्या क्रमाने प्रत्येक राखीव प्रवर्गासाठीचा नामावली बिंदू वापरण्यात यावा.

३) पुढील भरती वर्षांमध्ये विशिष्ट वर्षात रिक्त होणाऱ्या आरक्षित  पदांसाठी वापरावयाचा नामावली बिंदू हा मागील वर्षात वापरलेल्या शेवटच्या मागासवर्गीयांच्या नामावली बिंदू पासून पुढे  सुरु होईल. स्पष्टीकरणार्थ- पहिल्या वर्षात जर एक रिक्त पद राखीव असेल व ते नामावली बिंदू क्रमांक १ वरील अनुसूचित जातीच्या उमेदवाराकडे गेले असेल आणि दुसऱ्या वर्षात पुन्हा एक रिक्त पद राखीव असेल तर ते अनुसूचित जातीच्या पुढे येणाऱ्या बिंदू नामावलीतील क्र.२ नुसार अनुसूचित जमातीच्या उमेदवाराकडे जाईल. त्याप्रमाणे पहिल्या वर्षी ३ रिक्त पदे राखीव असतील व ती पदे (बिंदू नामावली क्र.१,२ व ३ नुसार अनुक्रमे) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व विमुक्त जाती (अ) या प्रवर्गातील उमेदवाराकडे गेली असतील आणि जर पुढील वर्षात राखीव प्रवर्गासाठी आणखी ३ पदे उपलब्ध होणार असतील तर ही तीन पदे राखीव प्रवर्गात पुढे येणाऱ्या नामावली बिंदूनुसार  म्हणजेच अनु.क्र.४ वरील भटक्या जमाती   (क) अनु.क्र.७ वरील भटक्या जमाती (ब ) आणि अनु.क्र.११ वरील भटक्या जमाती (ड) यांच्याकडे जातील. अशारीतीने प्रत्येक संवर्गातील पुरेसे प्रतिनिधीत्व प्राप्त करण्याची सर्व राखीव प्रवर्गांना संधी मिळेल.

४) तथापि  संवर्गात  एकूण कर्मचारीसंख्या ३२ पेक्षा कमी असेल अशा संवर्गाकरिता ही स्थिती कधीही साध्य करता येणार नाही. कारण ३३ टक्क्यांची मर्यादा राखतांना विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब, क आणि ड) आणि विशेष मागास प्रवर्ग यांतील उमेदवारांना त्यांच्या प्रमाणशीर आरक्षणाच्या दृष्टीने प्रत्येकी एक पद सुध्दा मिळणार नाही. म्हणून अशा प्रकरणांमध्ये राखीव प्रवर्गांसाठी नंतरच्या बिंदू नामावली बिंदू क्रमाचा  अवलंब करण्याची पध्दत पुढे चालू ठेवण्यात यावी.

५)  पदांची  एकूण संख्या ही ३२ किंवा त्याहून अधिक असेल अशा संवर्गासाठी  वर स्पष्ट केल्याप्रमाणे, बिंदू नामावली पध्दतीचा वापर करतेवेळी नेहमीच प्रत्येक प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या पदांची एकूण संख्या लक्षात घ्यावी.  उदा.  एखादया  संवर्गाची संख्या ४० असल्यास  वैयक्तिक  व एकत्रितपणे  ३३ %  आरक्षण ठेवता येण्यासाठी   त्यापैकी ५ अनुसूचित जाती,  ३ अनुसूचित जमाती , ४ विमुक्त जाती  आणि  भटक्या जमाती ( अ, ब , क, ड यांसाठी  प्रत्येकी १ पद)  आणि १ विशेष मागास वर्गीय उमेदवार याप्रमाणे पदे घ्यावी लागतील.   बिंदू नामावलीतील बिंदूचा अवलंब करताना , काही  झाले तरी , ५,३,४ व १ ही मर्यादा ओलांडली गेलेली नाही याची खातरजमा करावी.   एखाद्या विशिष्ट वेळी  अनुसूचित जातीचे  ५ उमेदवार अगोदरच पदावर असतील आणि राखीव प्रवर्गासाठी

नवीन रिक्त पद निर्माण झाल्यास व बिंदूनामावलीतील त्यापुढील बिंदू हा पुन्हाअनुसूचित जातीचा असल्यास , त्या प्रवर्गाला अगोदरच १३ % इतके पुरेसे प्रतिनिधीत्व असल्यामुळे त्याकडे दुर्लक्ष करावे.
अशा प्रकरणांच्या बाबतीत राखीव प्रवर्गासाठी बिंदू नामावलीतील त्यांनतरचा नामावली बिंदू वापरण्यात यावा. समजा ज्या प्रवर्गासाठी बिंदू नामावलीतील नंतरचा नामावली बिंदू वापरावयाचा असेल त्या प्रवर्गाला देखील या अगोदरच विहीत टक्केवारी प्रमाणे आरक्षण मिळाले असल्यास त्यानंतरच्या आरक्षणासाठीचा नामावली बिंदू वापरण्यात यावा. जेणेकरुन प्रत्येक राखीव प्रवर्गाला पुरेसे प्रतिनिधीत्व मिळू शकेल . मात्र ज्यावेळी विहित टक्केवारीनुसार / बिंदूनामावली नुसार आरक्षित पदे उपलब्ध नसतील व मागासवर्गीय त्यांच्या ज्येष्ठतेनुसार पदोन्नतीस उपलब्ध असला तर त्यांना केवळ आरक्षित पद / बिंदू उपलब्ध नाही म्हणून पदोन्नती नाकारण्यात येवू नये, त्यांना त्यांच्या ज्येष्ठतेनुसार बिनराखीव पदावर पदोन्नती देण्यात यावी.

६ ) हा अधिनियम अंमलात येण्यापूर्वी पदोन्नती देण्यासाठी ज्या संवर्गामध्ये आरक्षणाची पध्दत लागू करण्यात येत होती अशा संवर्गासाठी सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १८/१०/१९९७ रोजीच्या शासन निर्णयामधील याबाबतीत नमूद केलेली पध्दती अनुसरण्यात येईल . त्याचप्रमाणे शासन निर्णय दिनांक २३/५/१९७४ व २८/१/१९७५ यामध्ये अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट दिनांक २५ मे २००४ चा शासन निर्णय किंवा हे परिपत्रक यांच्याशी विसंगत नसेल तर ती अंमलात असणे तसेच चालू राहील.

७) असेही स्पष्ट करण्यात येत आहे की, या अधिनियमात ज्यासाठी तरतूद करण्यात आली आहे असे आरक्षण ही पदे भरण्याकरीता निवड प्रक्रिया यापूर्वीच सुरु करण्यात आली नसेल तर हा अधिनियम अंमलात आणण्याच्या दिनांकास म्हणजे , दिनांक २९/१/२००४ रोजी रिक्त असलेल्या किंवा त्यानंतर रिक्त होणा-या सर्व पदोन्नतीच्या पदांना देखील लागू होईल. विचारार्थ क्षेत्रातील उमेदवारांच्या नावाची निवड करण्यासाठी विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीत उमेदवाराची निवड झाली असल्यास 'निवडप्रक्रिया' सुरु झाली असे समजण्यात यावे.
भविष्यात पदोन्नती संबंधातील सर्व प्रकरणे वर स्पष्ट करण्यात आलेल्या पध्दतीने हाताळण्यात येतील या पध्दतीपेक्षा कोणतीही वेगळी पध्दत अनुसरली जावू नये , जेणे करुन विशिष्ट प्रवर्गाला अपुरे किंवा जादा प्रतिनिधीत्व दिले जाईल व त्यामुळे अर्थातच या अधिनिमयाच्या तरतूदींच भंग केल्यासारखे होईल.

८) दिनांक २९ जानेवारी २००४ पूर्वी तदर्थ पदोन्नती (Ad-hoc) देताना ज्या प्रकरणात आरक्षणाचा विचार केलेला नसेल अशा प्रकरणी तदर्थ पदोन्नतीला पुन्हा मुदतवाढ देताना आरक्षण विहीत करुन पदोन्नती देण्याबाबत कार्यवाही करावी. तसेच मागासवर्गीयाच्या जागेवर खुल्या/इतर प्रवर्गांना दिलेल्या तात्पुरत्या पदोन्नत्या रद्द करुन त्या त्या प्रवर्गाला देण्यात याव्या व ते उपलब्ध नसतील तर दि.५/१२/१९९४ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार खुल्या व इतर प्रवर्गाला तात्पुरत्या स्वरुपात देण्यात याव्यात.

२. हे आदेश शासकीय / निमशासकीय सेवा , मंडळे / महामंडळे, महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदा अनुदानित शैक्षणिक संस्था , सहकारी संस्था, शासनाचे सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम इत्यादीं सर्व कार्यालयांना लागू राहतील.

३.     मंत्रालयीन विभागांनी सदरील आदेश त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख यांच्या निदर्शनास आणून निर्णयाच्या आदेशाप्रमाणे कार्यवाही करण्याच्या सूचना विनाविलंब देण्यात याव्यात .

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**संदीप बागची**
**प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

मा.राज्यपाल यांचे सचिव
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
उप मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
सर्व मंत्री /राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव /अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव /सचिव, मंत्रालयीन विभाग
सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
* प्रबंधक, उच्च न्यायालय , मूळ शाखा , मुंबई,
* प्रबंधक , उच्च न्यायालय , अपील शाखा, मुंबई,
* प्रबंधक , लोकआयुक्त व उप लोकआयुक्त यांचे कार्यालय,
* सचिव , महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
* आयुक्त, अनुसूचित जाती जमाती , भारत सरकार , पाचवा माळा, लोकनायक भवन , नवीदिल्ली
* संचालक, अनुसूचित जाती जमाती आयोग , भारत सरकार , चिपळणूकर भवन, शात्री मार्ग नवीपेठ, पुणे , ४११०३०.
* विशेष आयुक्त, महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र सदन , कोपर्निकस मार्ग, नवीदिल्ली ११०००१
संचालक, समाज कल्याण, पुणे
आयुक्त, आदिवासी विकास , नाशिक
आयुक्त , आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
संचालक,रोजगार व स्वंयरोजगार विभाग , मुंबई ,
सहायक आयुक्त (मागासवर्ग कक्ष ) सर्व विभागीय आयुक्तांची कार्यालये,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
निवड नस्ती,
* पत्राने

पदोन्नतीतील आरक्षण हे पदोन्नतीच्या सर्व टप्प्यावर लागू करणेबाबत

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय, क्रमांक : बीसीसी-२००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६-ब
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १४/२/२००५

वाचा : शासन निर्णय, क्रमांक : बीसीसी-२००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६-ब , दिनांक २५ मे, २००४

**शासन निर्णय :-**

श्री.विजय घोगरे आणि इतर यांनी राज्य शासनाच्या दिनांक २५.५.२००४ च्या आदेशांविरुध्द मुंबई उच्च न्यायालयात याचिका क्रमांक ८४५२/२००४ दाखल केली आहे. यासंदर्भात दिनांक ७.२.२००५ रोजी मुंबई उच्च न्यायालयात सुनावणी होऊन मुंबई उच्च न्यायालयाने "जैसे थे" (status quo) ठेवण्याचे आदेश दिलेले आहेत. तेव्हा दिनांक २५.५.२००४ च्या अनुषंगाने होणाऱ्या पदोन्नतीच्या कार्यवाहीस, पुढील आदेश होईपर्यंत जैसे थे स्थिती ठेवावी व सर्व संबंधितांनी यासंदर्भात न्यायालयाचा अवमान होणार नाही, याची कृपया दक्षता घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( संदिप बागची )
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

मा.राज्यपाल यांचे सचिव,
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
उप मुख्यमंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव/अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,

सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय,अपील शाखा, मुंबई,
* प्रबंधक, लोकायुक्त आणि उप लोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
* आयुक्त, अनुसूचित जाती जमाती, भारत सरकार, ५ वा माळा, लोकनायक भवन, नवी दिल्ली.
* उप संचालक, अनुसूचित जाती/जमाती आयोग भारत सरकार, चिपळूणकर भवन, शास्त्री मार्ग, नवी पेठ, पुणे - ४११ ०३०.
* विशेष आयुक्त, महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र सदन, कोपरनिकस मार्ग, नवी दिल्ली - ११० ००१.
संचालक, समाज कल्याण, पुणे,
आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक ,
आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,
संचालक, रोजगार व स्वयंरोजगार विभाग, मुंबई,
सहायक आयुक्त (मागासवर्ग कक्ष) सर्व विभागीय आयुक्तांची कार्यालये,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,महाराष्ट्र राज्य, मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभाग त्यांना विनंती करण्यात येते की, अपल्या नियंत्रणाखालील विभागप्रमुख/कार्यालय यांच्या निदर्शनास सदर आदेश आणावेत.
निवड नस्ती.

* पत्राने.

**सेवा प्रवेश नियम**
**पदोन्नतीसाठी पूर्व अट म्हणून निम्न संवर्गात/सेवेत/**
**श्रेणीत किमान सेवेच्या अनुभवाची अट विहित करणे**

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रक क्रमांकःएसआरव्ही-२००५/प्र.क्र.१/२००५/१२,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :-२५ फेब्रुवारी,२००५.

**पहा :-** (१) शासन परिपत्रक,सामान्य प्रशासन विभाग,क्रमांकःएसआरव्ही-१२७७/१२,दिनांक १४ ऑक्टोबर,१९७७.
(२) शासन परिपत्रक,सामान्य प्रशासन विभाग,क्रमांकःएसआरव्ही-१२७७/१२, दिनांक ३ सप्टेंबर,१९७९.
(३) शासन परिपत्रक,सामान्य प्रशासन विभाग,क्रमांकःएसआरव्ही-१०८०/१२, दिनांक २० जुलै,१९८१.
(४) शासन परिपत्रक,सामान्य प्रशासन विभाग,क्रमांकःएसआरव्ही-१०८८/१०९/१२,दिनांक २५ ऑगस्ट,१९८८.
(५) शासन परिपत्रक,सामान्य प्रशासन विभाग,क्रमांकःएसआरव्ही-१०८८/१०९/१२, दिनांक ३१ मे,१९८९.
(६) शासन परिपत्रक,सामान्य प्रशासन विभाग,क्रमांकःएसआरव्ही-१०८८/१०९/प्र.क्र.१/८८/१२,दि.४सप्टेंबर,१९९०

## परिपत्रक

वर नमूद केलेल्या संदर्भाधिन क्र.३, ४, ५ व ६ येथील परिपत्रकानुसार गट "क" पासून गट "अ" मधील दुसऱ्या टप्प्यापर्यन्तच्या पदावर आंतरश्रेणी पदोन्नतीसह प्रत्येक टप्प्यावर पदोन्नती करताना निकटतम निम्न पदावर तीन वर्षाच्या किमान सेवेच्या अनुभवाची अट विहित करण्यात आली होती आणि गट "अ" मधील दुसऱ्या टप्प्यानंतरच्या पदावरील प्रत्येक टप्प्यावरील पदोन्नत्याकरिता कोणताही अनुभवाचा कालावधी विहीत केलेला नव्हता. सदर आदेश अधिक्रमित करुन शासन आता असे आदेश देत आहे की, गट "क"(वर्ग-३) पासून गट "अ" (वर्ग-१) मधील सर्व टप्प्यापर्यन्तच्या आंतरश्रेणी पदोन्नतीसह प्रत्येक टप्प्यावर पदोन्नती करताना निकटतम निम्न पदावर नियमित तीन वर्षाच्या किमान सेवेची अट पदोन्नतीसाठीची पूर्व अट म्हणून राहील.

२. वर नमूद केल्याप्रमाणे आवश्यक ती तरतुद मंत्रालयाच्या विविध विभागांनी आपापल्या कक्षेतील सर्व पदांच्या सेवाप्रवेश नियमात अंतर्भूत करण्याची कार्यवाही तात्काळ करावी आणि अशा प्रकारे सेवाप्रवेश नियमात सुधारणा होईपर्यन्तच्या कालावधीपर्यन्त पदोन्नती करताना या तत्वाचा अवलंब करावा.

३. ज्या पदांच्या सेवाप्रवेश नियमांमध्ये पदोन्नतीसाठी अनुभवाचा कालावधी वरील सुधारीत अनुभवाच्या कालावधीपेक्षा विविक्षित कारणास्तव जास्त वर्षे विहित केला असेल तर त्या पदांच्या बाबतीत हे आदेश लागू होणार नाहीत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**बा.बा.नारायणकर**
**अवर सचिव,महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**
राज्यपालांचे सचिव,राजभवन,मलबार हिल,मुंबई,
मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
सर्व मंत्री /राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव,
सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
सर्व मंत्रालयीन विभाग,
*प्रबंधक,मूळ शाखा,उच्च न्यायालय,मुंबई ,
*प्रबंधक,अपील शाखा,उच्च न्यायालय,मुंबई,
*प्रबंधक,लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय,मुंबई,
*सचिव,महाराष्ट्र लोकसेवा आयोग,मुंबई ,
*सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानसभा) मुंबई,
*सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानपरिषद) मुंबई,
*राज्य निवडणूक आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई,
*महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र, मुंबई,
*महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई,
*महालेखापाल,महाराष्ट्र-२(लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र, नागपूर,
*महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व परीक्षा),महाराष्ट्र, नागपूर,
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई (प्रसिद्धीकरिता-२प्रती)
अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी,मुंबई,
मुख्य लेखा परीक्षक (निवासी लेखे) कोकण भवन,नवी मुंबई,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
सर्व मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवडनस्ती,

*पत्राने.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रक क्रमांक: आरटीआर-१४०३/८४/प्र.क्र.५४/०३/१३,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: १० मे, २००५

वाचा:- १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.आरटीआर-१०८५/८५३/प्र.क्र.७२/८५/१३, दि. १५-४-१९९१

२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसआरव्ही-१०९४/प्र.क्र.४/ ९४/१२, दि. ७-३-१९९६

३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. बीसीसी-१०९७/प्र.क्र.६३/ ९७/१६ब, दि. १८-१०-१९९७

**प्रस्तावना**

उपरोक्त अनुक्रमांक १ येथे नमूद केलेल्या दिनांक १५/४/१९९१ च्या शासन निर्णयान्वये गट "ड" मधील कर्मचाऱ्यांना गट "क" मधील लिपिक-टंकलेखक पदावर पदोन्नती देण्यासंदर्भात काही अटी व शर्ती विहित केलेल्या आहेत. त्यामधील एक अट अशी आहे की, सदर शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता होत असल्यास त्या त्या विभागात /कार्यालयात त्या त्या विशिष्ट वर्षी रिक्त झालेल्या लिपिक-टंकलेखक पदाच्या २५ टक्के पदांवर पदोन्नती द्यावी. तथापि, उपरोक्त अनुक्रमांक २ येथे नमूद केलेल्या दिनांक ७ मार्च, १९९६ च्या शासन निर्णयान्वये सेवाभरतीचे प्रमाण निश्चित करताना हे प्रमाण त्या त्या संवर्गातील कायम (Permanent) आणि हंगामी (Temporary) अशा दोन्ही स्वरूपांच्या एकूण मंजूर पदांच्या पदसंख्येला लावण्याबाबत आदेशित केले आहे. यास्तव दिनांक १५/४/१९९१ च्या आदेशातील विशिष्ट वर्षी रिक्त झालेल्या लिपिक-टंकलेखक पदाच्या २५ टक्के पदांवर पदोन्नती देण्याची तरतूद उपरोक्त क्रमांक २ येथील दिनांक ७ मार्च, १९९६ च्या शासन निर्णयान्वये अधिक्रमित झाली आहे.

त्याचप्रमाणे अनुक्रमांक ३ येथे नमूद केलेल्या दिनांक १८ ऑक्टोबर, १९९७ च्या शासन निर्णयातील आरक्षणविषयक तरतुदी गट "ड" मधील पात्र कर्मचाऱ्यांना गट "क" मधील लिपिक-टंकलेखक पदावर पदोन्नती देताना लागू करावयाच्या आहेत. कमी संवर्ग संख्या असलेल्या कार्यालयातील गट "ड" च्या कर्मचाऱ्यांना गट "क" मध्ये पदोन्नती मिळण्यासंदर्भात कोटा निश्चित करणे तसेच गट "ड" मधून गट "क" मध्ये पदोन्नती देण्यासाठी संगणक ज्ञानाची अर्हता आवश्यक करण्याबाबतचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय**

वरील सर्व बाबी विचारात घेऊन गट "ड" मधील पात्र कर्मचाऱ्यांना गट "क" मधील लिपिक-टंकलेखक या पदावर पदोन्नती देण्याबाबतच्या दिनांक १५/४/१९९१ च्या आदेशामध्ये अंशतः बदल करून आता पुढीलप्रमाणे सुधारणा करण्याचे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

१) गट "ड" मधील पात्र कर्मचाऱ्यांना गट "क" मधील लिपिक-टंकलेखक या पदावर पदोन्नती देताना प्रतिवर्षी रिक्त होणाऱ्या पदांच्या २५ टक्के पदांऐवजी लिपिक-टंकलेखक संवर्ग संख्येच्या एकूण मंजूर पदसंख्येच्या २५ टक्के पदांवर पदोन्नती देण्यात यावी.

मात्र असे करताना ज्या कार्यालयात लिपिकवर्गीयांची पदे ४ पेक्षा कमी आहेत त्या कार्यालयाकरीता पुढील सूत्राचा अवलंब करावा.

कृ.मा.प.

| लिपिकवर्गीय पदांची संख्या | गट "ड" मधील पदोन्नतीसाठी नियत करावयाची कमाल पदे |
|---|---|
| १ | ० |
| २ | १ |
| ३ | १ |

या सूत्रामुळे लिपिकवर्गीय पदे ४ पेक्षा कमी असल्यास २५ टक्क्यांची मर्यादा त्या त्या प्रमाणात शिथिल केल्याचे समजण्यात यावे.

२) गट "ड" मधील कर्मचारी गट "क" मध्ये पदोन्नत होण्यापूर्वी जर त्याने संगणकाची अर्हता प्राप्त केली नसेल तर गट "क" मधील पदावरील नियुक्तीपासून २ वर्षांच्या काळात विहित संगणक ज्ञानाची अर्हता त्यास प्राप्त करावी लागेल. अन्यथः त्याला गट "ड" मधील पदावर पदावनत व्हावे लागेल.

३) संदर्भाधीन क्रमांक ३ येथे नमूद केलेल्या दिनांक १८/१०/१९९७ च्या शासन निर्णयामधील आरक्षणविषयक तरतुदी लिपिक-टंकलेखक संवर्गातील पदोन्नतीच्या वाट्याला येणाऱ्या २५ टक्के पदांना लागू करून त्यानुसार होणारी आरक्षित पदे विचारात घेऊन पदोन्नत्या देण्यात याव्यात.

४) संदर्भाधीन क्रमांक १ येथील दि. १५/४/१९९१ च्या आदेशातील अर्हताप्राप्त उमेदवारांची परस्पर ज्येष्ठता राखणे, टंकलेखनाची विहित वेगमर्यादा प्राप्त करणे इत्यादी अटी यापुढे देखील तशाच कायम राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( प्रकाश लोखंडे )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

राज्यपालांचे सचिव,
मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने),
* प्रबंधक, मूळ न्यायशाखा, उच्च न्यायालय, मुंबई (पत्राने),
* प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई (पत्राने),
* प्रबंधक, लोकायुक्त व उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई (पत्राने),
* सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, (विधानसभा), मुंबई, (पत्राने),
* सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, (विधानपरिषद), मुंबई, (पत्राने),
* सचिव, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर, मुंबई, (पत्राने),
महालेखापाल-१ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई,
महालेखापाल-२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, नागपूर,
महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई,
महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व मंत्रालयीन विभागांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व विभगप्रमुख व कार्यालयप्रमुख
निवड नस्ती.

* पत्राने.

**मागासवर्गीय अधिकारी/कर्मचारी यांना कार्यकारी पदावर नियुक्त्या करण्याबाबत.**

## महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्र. बीसीसी १२०८/प्र.क्र.२२१/०८/१६-ब,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक : २८ मे, २००८.

**कृपया पहावे** : १) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही १०८०/ बारा, दिनांक ०३.१२.१९८०,
२) मा. मुख्य सचिव यांचे क्रमांक बीसीसी २००१/प्र.क्र.४०/२००१/ १६-ब, दिनांक २६.०६.२००१.

**शासन परिपत्रक :**

अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती आणि अन्य अल्पसंख्यांक समाजातील अधिकारी/ कर्मचारी यांना कार्यकारी पदावर नेमणुका देण्यासंदर्भात वरील क्रमांक १ च्या शासन परिपत्रकान्वये आदेश निर्गमित केलेले आहेत. तसेच याबाबत क्रमांक २ चे दिनांक २६.०६.२००१ च्या पत्रान्वये मा. मुख्य सचिव यांनी सदर आदेशाची अंमलबजावणी होण्याची दक्षता घेण्याबाबत निदेश देऊनसुध्दा त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे महत्वाच्या कार्यकारी पदावर मागासवर्गीय अधिकाऱ्यांच्या नेमणुका करण्यात येत नसल्याच्या शासनाकडे तक्रारी प्राप्त होत आहेत/झाल्या आहेत. यास्तव सर्व मंत्रालयीन विभागांना पुन्हा सूचना देण्यात येते की, अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती आणि अन्य अल्पसंख्यांक अधिकारी/कर्मचारी यांना कार्यकारी पदावर नेमणुका देण्यासंदर्भात वरील परिपत्रकातील आदेशाची अंमलबजावणी होईल याची दक्षता घेण्याबाबत पुनश्च सूचना देण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**( त्रि. वा. गेडाम )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. राज्यपाल यांचे सचिव,
२. मुख्यमंत्री यांचे सचिव,
३. सर्व मंत्री, राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक,
४. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,
५. सर्व विभागीय आयुक्त यांची कार्यालये,
६. सर्व जिल्हाधिकारी,
७. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
८. मंत्रालयीन विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख,
९. * प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा, मुंबई,
१०. * प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
११. * प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई,
१२. * प्रबंधक, लोकआयुक्त व उप लोकआयुक्त, मुंबई,
१३. * सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१४. * सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई,
१५. * सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई,
१६. निवड नस्ती.

**मा. सर्वोच्च न्यायालयाने तात्पुरत्या / अस्थायी**
**नियुक्त्या नियमित न करण्याबाबत दिलेले निर्णय.**

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक, क्रमांकःएसआरव्ही-२००५/प्र.क्र.४७/०५/१२,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :-२५ ऑगस्ट,२००५.

# परिपत्रक

शासकीय, निमशासकीय, महामंडळे, सार्वजनिक उपक्रम, स्वायत्त संस्था यामधील गट-अ ते ड मधील सरळसेवेच्या कोटयातील नामनिर्देशनाद्वारे भरावयाची पदे शासनाने विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोग, जिल्हा निवड समित्या आणि विविध विभागांनी नियुक्त केलेल्या निवडसमित्या यांच्यामार्फत स्पर्धा परीक्षाद्वारे निवड केलेल्या उमेदवारांमधून भरण्यात येतात. तथापि काही वेळा आयोग पुरस्कृत किंवा निवडसमित्यानी पुरस्कृत केलेले उमेदवार उपलब्ध नसल्यामुळे किंवा निवडसूची संपुष्टात आल्यामुळे नियमितरित्या नामनिर्देशनाद्वारे पदे भरणे शक्य होत नाही. तेव्हा तातडीची गरज म्हणून लोकसेवा आयोगाच्या किंवा निवड समित्यांच्या शिफारशीशिवाय काही नियुक्ती प्राधिकाऱ्यांकडून तीन महिन्याच्या किंवा चार महिन्याच्या तत्वावर तात्पुरत्या/अस्थायी नियुक्त्या केल्या जातात. तथापि अशा तात्पुरत्या / अस्थायी नियुक्त्या विशिष्ट मुदतीनंतर संपुष्टात आणल्या जात नाहीत. त्या दीर्घ काळ चालू राहतात. त्यामुळे असे अस्थायी कर्मचारी सेवेत कायम करण्याची मागणी करतात. त्यांची सदर मागणी मान्य न केल्यास ते न्यायालयात अर्ज दाखल करतात. मात्र संबंधित नियम, आदेश यांचा योग्य आधार घेऊन शासनाची बाजू योग्य रितीने न्यायालयात मांडली जात नाही. तसेच अशा प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालय/मा.उच्च न्यायालय यांनी दिलेले आदेश न्यायालयांच्या निदर्शनास आणले जात नाही. सबब अशा प्रकरणात निर्णय शासनाविरुध्द लागतात. परिणामी अशा कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत नियमित करावे लागते. अनेक प्रकरणात न्यायालयांच्या निर्देशांचे पालन करण्यासाठी सेवा प्रवेश नियमातील अटी देखील शिथिल कराव्या लागतात.

२. अशाच एका प्रकरणात मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी मा.सर्वोच्च न्यायालयाने अलिकडेच ए.उमरानी विरुध्द रजिस्ट्रार, को.ऑ.सोसायटीज, तामिळनाडू व इतर या सिव्हिल अपिल क्र.१४१३/२००३ आणि ३७७४-७६, ४४४६, ६४१५-१६, ७२८२, ९८५४, ९९३३, १०२४४-४५/२००३, ४४९५/२००४ आणि ४४७/२००४ या प्रकरणी दिनांक २८ जुलै,२००४ रोजी दिलेल्या निर्णयानुसार आदेश निर्गमित करण्याची सूचना केली होती. त्यास अनुसरुन सदर प्रकरणातील सर्वोच्च न्यायालयाच्या सदर निर्णयातील संक्षिप्त बाबी खालीलप्रमाणे सर्वांच्या निदर्शनास आणून देण्यात येत आहेत :-

a) Regularisation cannot be mode of recruitment by any State within the meaning of Article 12. It is a settled proposition that the appointment made in violation of the mandatory provision of the statute and in particular ignoring the minimum educational qualification and other qualifications would be wholly illegal and such illegality cannot be cured by taking recourse of regularisation.

b) Those who come by back door should go through that door.

c) Regularisation further cannot be given to the employees whose services are ad-hoc in nature.

d) No regularisation is permissible in exercise of the Statutory power conferred under Article 12 of the Constitution of India when the appointments are in contravention of the statutory rules.

e) No regularisation is permissible in exercise of the statutory power conferred under Article 162 of the Constitution if the appointments have been made in contravention of the statutory rules.

f) It is trite that appointments cannot be made on political considerations and in violation of the Government directions for reduction of establishment expenditure or filling up of vacant posts or creating new posts including regularisation of daily wage employees.

g) There is no scope for regularisation unless the appointments were made on a regular basis.

h) If the employees are appointed for the purpose of a scheme, they do not acquire vested right of continuance after the project is over.

३. तसेच मा.सर्वोच्च न्यायालयाने डॉ.(श्रीमती) चंचल गोयल विरुध्द राजस्थान शासन सिव्हिल अपिल क्र.७७४४/१९९७ याप्रकरणी दिनांक १८/२/२००३ रोजी पारीत केलेल्या आदेशात देखील स्पष्ट केले आहे की, मूळ नियुक्ती विहित मार्गाने केलेली असल्याशिवाय सेवा नियमित करता येणार नाही. सदर आदेशात आणखी स्पष्ट केले आहे की, लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील पदावर तात्पुरत्या/अस्थायी स्वरुपात नियुक्त केलेला कोणताही कर्मचारी त्या पदावर कितीही वर्षे सेवेत राहिला तरी कायम करण्याचा हक्क सांगू शकत नाही.

४. सर्वोच्च न्यायालयाच्या वरील दोन्ही निर्णयातील केवळ ठळक बाबी वर नमूद केलेल्या आहेत. अधिक तपशिलाकरीता संबंधितांनी मा.न्यायालयाचा संपूर्ण निकालांचे अवलोकन करावे, असेही सूचित करण्यात येत आहे.

५. सर्व मंत्रालयीन विभाग, विभाग प्रमुख आणि कार्यालय प्रमुख यांना निर्देशित करण्यात येते की, मा.सर्वोच्च न्यायालयाचे उपरोक्त आदेश पाहता सर्व पदावरील नियुक्त्या विहीत मार्गाने/माध्यमामार्फत करण्याची दक्षता घ्यावी. अत्यंत तातडीची गरज म्हणून तात्पुरत्या/अस्थायी नियुक्त्या कराव्या लागल्या तर त्या विहित वेळेत संपुष्टात आणण्याची दक्षता घ्यावी. तसेच अशा कर्मचा-यांनी त्यांना नियमित सामावून घेण्याची मागणी केल्यास ती मान्य करता येणार नसल्याचे त्यांना स्पष्टपणे सांगण्यात यावे. तसेच यासंदर्भात न्यायालयात प्रकरण दाखल झाल्यास मा.सर्वोच्च न्यायालयाच्या वरील न्याय निर्णयांचा संदर्भ देऊन युक्तीवाद करण्याच्या सुचना सरकारी वकीलांना देण्यात याव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

न. कुमार

(नवीन कुमार)
अपर मुख्य सचिव (सेवा)

प्रति,

राज्यपालांचे सचिव,राजभवन,मलबार हिल,मुंबई,
मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
सर्व मंत्री /राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव,

सर्व मंत्रालयीन विभागांचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
सर्व मंत्रालयीन विभाग,
* प्रबंधक,मूळ शाखा,उच्च न्यायालय,मुंबई ,
* प्रबंधक,अपील शाखा,उच्च न्यायालय,मुंबई,
* प्रबंधक,लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय,मुंबई,
* सचिव,महाराष्ट्र लोकसेवा आयोग,मुंबई ,
* प्रधान सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानसभा) मुंबई,
* सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानपरिषद) मुंबई,
* सचिव,राज्य निवडणूक आयोग,नवीन प्रशासकीय भवन, मुंबई,
* महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र, मुंबई,
* महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई,
* महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र, नागपूर,
* महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व परीक्षा),महाराष्ट्र, नागपूर,

अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी,मुंबई,
मुख्य लेखा परीक्षक (निवासी लेखे) कोकण भवन,नवी मुंबई,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
निरनिराळ्या मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवडनस्ती,
*पत्राने.

------

**अनुसूचित जमातीच्या राखीव जागांवर सरळ सेवेने नियुक्त अथवा पदोन्नत झालेल्या बिगर आदिवासी कर्मचारी/अधिकारी यांना शासकीय सेवेत घेतल्यानंतर त्यांच्या सेवेत पडलेला खंड नियमीत करणेबाबत.**

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांक : बीसीसी - २००५/प्र.क्र.२८/०५/१६-ब
मंत्रालय , मुंबई -४०० ०३२
दिनांक : १५/१२/२००५

पहा :- १) शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग , क्रमांक : बीसीसी -१०९४/ प्र.क्र ६८/९४/१६ब, दिनांक १५ जून १९९५

२) शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग , क्रमांक : बीसीसी -१०९४/ प्र.क्र ६८/९४/१६ब, दिनांक २७ मे २००२.

३) शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग , क्रमांक : बीसीसी -२००४/ प्र.क्र ४५/०४/१६ब, दिनांक २४ जून, २००४,

४) शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग , क्रमांक : बीसीसी -२००२/ प्र.क्र ९३/०४/१६ब, दिनांक ३० जून, २००४,

**प्रस्तावना :-**

संदर्भाधीन अ.क्र.१ येथे नमूद दिनांक १५ जून १९९५ च्या शासननिर्णयान्वये विशेष मागास प्रवर्गासाठी सरळ सेवा व पदोन्नतीमध्ये २% आरक्षण विहीत करण्यात आले असून या **विशेष मागास प्रवर्गातील** ज्या व्यक्तींना दिनांक १५ जून १९९५ पूर्वी अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे शासकीय / निमशासकीय सेवेत प्रवेश मिळवून पदोन्नती प्राप्त केलेली आहे त्यांना पदावनत किंवा सेवेतून काढून टाकण्यात येवू नये, अशा प्रकारचे संरक्षण दिलेले आहे. तसेच संदर्भाधीन अ.क्र.४ येथे नमूद केलेल्या दि.३०/६/२००४ च्या शासन निर्णयानुसार, **ज्या बिगर आदिवासींनी** अनुसूचित जमातीच्या राखीव जागांवर दि.१५ जून, १९९५ च्या पूर्वी शासकीय/निमशासकीय सेवेत नोकरी किंवा पदोन्नती मिळविलेल्या आहे, त्यांना सेवेतून काढण्यात येवू नये किंवा पदावनत करण्यात येवू नये. तसेच त्यांना ते ज्या घटकाचे आहेत त्या घटकात दाखविण्यात यावे व यापुढे त्यांना त्या त्या घटकाचे आरक्षणाचे फायदे देय राहतील व अशा प्रकारे रिक्त झालेली पदे आदिवासी जमातीमधून भरण्यात यावीत. असे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी
शाखा - ८३६
आवक नं.
17 JAN 2006

3332

३. दिनांक ३० जून २००४ च्या आदेशानुसार ज्या कर्मचारी / अधिका-यांची अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारावर दिनांक १५ जून १९९५ पूर्वी नियुक्ती किंवा पदोन्नती झाली आहे. तसेच अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र अवैध ठरल्यामुळे सदरील अधिकारी / कर्मचारी **विशेष मागास प्रवर्ग किंवा अन्य कोणत्याही मागास प्रवर्गातील प्रमाणपत्र** सादर करु शकले नाही थोडक्यात म्हणजे जे कर्मचारी खुल्या प्रवर्गातील ठरले त्यांना देखील सदर शासन निर्णयान्वये त्यांच्या नियुक्तीस व पदोन्नतीस संरक्षण प्राप्त झाले. तथापि, जे अधिकारी / कर्मचारी दि.१५/६/९५ च्या शासन निर्णयान्वये विशेष मागास प्रवर्गाचे प्रमाणपत्र सादर करु शकले नव्हते परंतू त्यांची नियुक्ती दिनांक १५/६/१९९५ पूर्वीची असून देखील त्यांना त्यांच्या नियुक्तीस संरक्षण प्राप्त झाले नव्हते. अशा कर्मचा-यांना सेवेतून काढून टाकले होते. अशा काढून टाकण्यात आलेल्या कर्मचा-यांना दिनांक ३० जून २००४ च्या शासन निर्णयानुसार सेवेत पुन्हा घेतल्यानंतर त्यांच्या सेवेत पडलेला सेवाखंड कशाप्रकारे नियमित करावा याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. याबाबत शासनाने आता खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**<u>शासन निर्णय :-</u>**

**दि.१५/६/९५ च्या शासन निर्णयातील तरतुदी विचारात घेवून सेवेत संरक्षण प्राप्त होण्यासाठी विशेष मागास प्रवर्गाचे प्रमाणपत्र सादर करु न शकल्यामुळे ज्या अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या सेवा समाप्त करण्यात आल्या होत्या व त्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना उपरोक्त दिनांक ३० जून, २००४ च्या शासन निर्णयानुसार पुन्हा सेवेत घेण्यात आले आहे, अशा अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवेतील खंड (दि.१५/६/९५ च्या शासन निर्णयानुसार सेवा समाप्त केल्याचा दिनांक व दिनांक ३० जुन, २००४ च्या शासन निर्णयानुसार पुन्हा शासन सेवेत घेतल्याचा दिनांक) यामधील कालावधी असाधारण रजा म्हणून नियमित करण्यात यावा. सदरील सेवाखंडीत कालावधीत त्या अधिकारी/कर्मचाऱ्यांनी प्रत्यक्ष काम केले नसल्याने वेतन व भत्ते अनुज्ञेय राहणार नाहे. तसेच सेवाखंडीत कालावधी हा निवृत्तीवेतन व इतर अनुषंगिक लाभासाठी देखील अनुज्ञे राहणार नाही.**

४. हे आदेश मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अखत्यारीतील सर्व शासकीय / निमशासकीय सेवा, मंडळ / महामंडळे, महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदा अनुदानित शैक्षणिक संस्था, सहकारी संस्था, शासनाचे सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम इत्यादी कार्यालयाच्या निदर्शनास आणावेत.

५. हे आदेश वित्त विभागाच्या सहमतीने त्या विभागाच्या अनौ.संदर्भ क्र.२४२/०५/सेवा-८, दि.२६/५/२००५ अन्वये निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(अशोक खोत)
अपर मुख्य सचिव(साविस),
महाराष्ट्र शासन

प्रति,

मा.राज्यपाल यांचे सचिव
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
उप मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
सर्व मंत्री /राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव /अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव /सचिव, मंत्रालयीन विभाग
सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
* प्रबंधक, उच्च न्यायालय , मूळ शाखा , मुंबई,
* प्रबंधक , उच्च न्यायालय , अपील शाखा, मुंबई,
* प्रबंधक , लोकआयुक्त व उप लोकआयुक्त यांचे कार्यालय,
* सचिव , महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
* आयुक्त, अनुसूचित जाती जमाती , भारत सरकार , पाचवा माळा, लोकनायक भवन , नवीदिल्ली
* उप संचालक, अनुसूचित जाती जमाती आयोग , भारत सरकार , चिपळूणकर भवन, शास्त्री मार्ग नवीपेठ, पुणे , ४११०३०.
* विशेष आयुक्त, महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र सदन , कोपर्निकस मार्ग, नवीदिल्ली ११०००१
संचालक, समाज कल्याण, पुणे
आयुक्त, आदिवासी विकास , नाशिक
आयुक्त , आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
संचालक,रोजगार व स्वंयरोजगार विभाग , मुंबई ,
सहायक आयुक्त (मागासवर्ग कक्ष ) सर्व विभागीय आयुक्तांची कार्यालये,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
निवड नस्ती,
* पत्राने

**पदोन्नतीतील आरक्षण हे पदोन्नतीच्या सर्व**
**<u>टप्प्यांवर लागू करणेबाबत....</u>**

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्र.बीसीसी-२००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६-ब,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २४ ऑगस्ट, २००६

**वाचा :** १) शासन निर्णय, सा.प्र.वि.क्र. .बीसीसी-२००१/१८८७/ प्र.क्र.६४/०१/१६-ब, दिनांक २५/५/२००४,
२) शासन निर्णय, सा.प्र.वि.क्र. .बीसीसी-२००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६-ब, दिनांक १४/२/२००५,
३) शासन पत्र, सा.प्र.वि.क्र. .बीसीसी-२००४/प्र.क्र.११८/०४/१६-ब, दिनांक १४/७/२००५.

**<u>प्रस्तावना</u> :-**

सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.८ (आरक्षण कायदा) च्या कलम-५ मधील पोटकलम (१) नुसार जेथे पदे पदोन्नतीने भरली जातात तेथे पदोन्नतीकरिता अद्यापपर्यन्त ज्या टप्प्यांना वा संवर्गांना आरक्षण लागू नव्हते त्या सर्व टप्प्यांना वा संवर्गांना आरक्षणाचे तत्व लागू करण्याचा धोरणात्मक निर्णय संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयान्वये घेतला आहे. या शासन निर्णयास श्री.विजय घोगरे व इतर यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका क्र.८४५२/२००४ दाखल करुन आव्हान दिले होते. या याचिकेच्या संदर्भात दिनांक ७/२/२००५ रोजी सुनावणी होऊन मा.उच्च न्यायालयाने "जैसे थे" ठेवण्याचे आदेश दिले होते. या आदेशांच्या अनुषंगाने संदर्भ क्र.२ वरील दिनांक १४/२/२००५ च्या शासन निर्णयान्वये दिनांक २५ मे, २००४ च्या शासन निर्णयामुळे होणाऱ्या पदोन्नतीच्या कार्यवाहीस पुढील आदेश होईपर्यन्त "जैसे थे" परिस्थिती ठेवावी असे आदेश दिले होते. तद्नंतर दिनांक २२/२/२००५ रोजी मा.मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक २५ मे, २००४ च्या शासन निर्णयाची पुढील आदेश होईपर्यन्त अंमलबजावणी न करण्याबाबतचे स्थगिती आदेश दिलेले होते. तसेच दिनांक २०/४/२००५ रोजी मा.उच्च न्यायालयाने हे स्थगिती आदेश कायम ठेवले होते. या स्थगिती आदेशांच्या अनुषंगाने पदोन्नतीमध्ये येणाऱ्या अडचणींच्या पार्श्वभूमीवर शासनाने " सिव्हील ॲप्लीकेशन क्र.१७८३/२००६ (इन रीट पिटीशन क्र.८४५२/२००४)" दाखल केले होते. या सिव्हील ॲप्लीकेशनच्या अनुषंगाने दिनांक १७ ऑगस्ट, २००६ रोजी मा.मुंबई उच्च न्यायालयाने खालीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत.

> " In view of the above, we permit the applicant..State of Maharashtra to fill in all promotional posts by suitable candidate. However, while filling up the said promotional posts, it shall be made apparently clear to the appointee that the said promotion is subject to final result in the above writ petition and said appointment will no way create any right."

**<u>शासन निर्णय</u> :-**

मा.मुंबई उच्च न्यायालयाचे वरील आदेश पहाता, यापूर्वी वर नमूद केलेले दिनांक १४/२/२००५ चे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

(कृ.मा.प.

मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व शासकीय/निमशासकीय इत्यादी कार्यालयांच्या निदर्शनास सदर आदेश आणून देण्यात यावेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २००६०८२४१५३५०७००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

गो. आ. लोखंडे

**( गो. आ. लोखंडे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

राज्यपाल यांचे सचिव,
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
उप मुख्यमंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव/अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व जिल्हा न्यायालये,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय,अपील शाखा, मुंबई,
* प्रबंधक, लोकायुक्त आणि उप लोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
* प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण,मुंबई,नागपूर,औरंगाबाद,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
उप संचालक, अनुसूचित जाती/जमाती आयोग भारत सरकार, चिपळूणकर भवन, शास्त्री मार्ग, तांबे पेठ, पुणे - ४११ ०३०.
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,महाराष्ट्र राज्य, मुंबई,
संचालक, समाज कल्याण, पुणे,
संचालक, सेवायोजन, मुंबई,
आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक ,
आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,
सहायक आयुक्त (मागासवर्ग कक्ष) सर्व विभागीय आयुक्तांची कार्यालये,
महालेखापाल, महाराष्ट्र १/२ ( लेखा व अनुज्ञेयता ), मुंबई / नागपूर,
महालेखापाल, महाराष्ट्र १/२ ( लेखा परीक्षा ), मुंबई / नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती.
* पत्राने.

H 1436-1 अ

GR 16-BC:\Documents and Settings\hp230014\My Documents

**विभागीय परीक्षा--**
**वरीष्ठ पदावर पदोन्नतीसाठी मागसवर्गीय उमेदवारांना सवलत.**

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय,क्र.परीक्षा-१२०६/प्र.क्र.७/०६/१७,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १६ नोव्हेंबर, २००६

वाचा :- शासन निर्णय, समान्य प्रशासन विभाग, क्र : ईएक्सएम-१०७५/१६८१/१७,
दिनांक : २४ ऑगस्ट, १९७६.

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि नागरिकांचा इतर मागासवर्ग यांमधील व्यक्तींसाठी लोकसेवांमधील व पदांमधील रिक्त जागांच्या आरक्षणाकरिता आणि तत्संबंधित व तदनुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरीता सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.८ विहित केला आहे. त्यानुसार विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांना देखील पदोन्नतीमध्ये आरक्षण विहित केलेले आहे. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमातींना देखील पदोन्नतीमध्ये आरक्षण यापूर्वीच विहित केलेले आहे. या प्रवर्गातील उमेदवारांना पदोन्नतीसाठीच्या परीक्षेमध्ये एक अतिरीक्त संधी व एक जादा वर्ष देण्यात येते त्याच धर्तीवर "विशेष मागास प्रवर्गातील" उमेदवारांना देखील पदोन्नतीकरिता विहित केलेल्या विभागीय परीक्षांमध्ये एक अतिरिक्त संधी व एक अतिरिक्त वर्ष देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. याबाबत शासनाने आता पुढील प्रमाणे निर्णय घेतला आहे :-

## शासन निर्णय

विविध विभागातील /कार्यालयातील वरिष्ठ पदावर पदोन्नती देण्यासाठी ज्या विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक ठरविले आहे, त्या विभागीय परीक्षा उत्तीर्ण होण्याकरीता अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या व विमुक्त जमातीच्या उमेदवारांना, सर्वसाधारण (खुल्या) उमेदवारांपेक्षा एक अतिरिक्त संधी व एका जादा वर्ष देण्याची तरतूद शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.ईएक्सएम-१०७५/१६८१/१७, दि.२४ ऑगस्ट, १९७६ च्या आदेशान्वये केलेली आहे. सदर सवलत आता "विशेष मागास प्रवर्गातील" उमेदवारांनाही लागू करण्यात येत आहे.

२. सर्व मंत्रालयीन विभागांना विनंती करण्यात येते की, त्यांच्या अखत्यारीतील विविध पदांवर पदोन्नतीसाठी अनिवार्य म्हणून विहित केलेल्या विभागीय परीक्षा नियमामध्ये "विशेष मागास प्रवर्गातील" उमेदवारांना देखील एक अतिरिक्त संधी व एक अतिरिक्त वर्षाचा कालावधी परीक्षा उत्तीर्ण होण्याबाबत अनुज्ञेय करण्याबाबत आवश्यक त्या सुधारणा करण्यात

(क्र. मा. पृ.

याव्यात. उचित कार्य पध्दतीचा अवलंब करून अशा सुधारणा नियमात होईपर्यंत या आदेशातील तरतुदीनुसार "विशेष मागास प्रवर्गातील" उमेदवारांना पदोन्नतीसाठी विहित विभागीय पदोन्नती परीक्षामध्ये एक जादा संधी व एक अतिरिक्त वर्ष देण्यात यावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(प्र.कृ.लोखंडे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
सर्व मंत्री /राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव,
सर्व मंत्रालयीन विभागांचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
सर्व मंत्रालयीन विभाग,
वित्त विभाग, सेवा-५,
* प्रबंधक,मूळ शाखा,उच्च न्यायालय,मुंबई ,
* प्रबंधक,अपील शाखा,उच्च न्यायालय,मुंबई,
प्रबंधक,लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय,मुंबई,
* सचिव,महाराष्ट्र लोकसेवा आयोग,मुंबई ,
* प्रधान सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानसभा) मुंबई,
* सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानपरिषद) मुंबई,
* सचिव, राज्य निवडणूक आयोग,नवीन प्रशासकीय भवन, मुंबई,
* सचिव, अनुसूचित जमाती कल्याण समिती,विधान भवन, मुंबई,
* महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र, मुंबई,
* महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई,
* महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र, नागपूर,
* महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व परीक्षा),महाराष्ट्र, नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी,मुंबई,
मुख्य लेखा परीक्षक (निवासी लेखे) कोकण भवन,नवी मुंबई,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
निरनिराळया मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवडनस्ती,
*पत्राने.

H 1867-1 अ

**महाराष्ट्र शासन**

क्र.बीसीसी-२००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६-ब,
सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दूरध्वनी क्र.२२०२५१७७
दिनांक : १/४/२००८

**प्रति,**

अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
सर्व मंत्रालयीन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

**विषय** : पदोन्नतीतील - आरक्षण दिनांक २५ मे, २००४ च्या शासन निर्णयाची अंमलबजावणी करणेबाबत

**संदर्भ** : १) मा.उच्च न्यायालयाचे दिनांक ९/३/२००७ चे आदेश.
२)शासन पत्र, सा.प्र.वि.क्र. बीसीसी-२००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६-ब, दिनांक १३/०३/२००७,

**महोदय/महोदया,**

उपरोक्त संदर्भ क्र.१ च्या आदेशान्वये मा.उच्च न्यायालयाने दिनांक ९/३/२००७ च्या आदेशामध्ये मुख्य याचिका क्रमांक ८४५२/२००४ अंतीम निकालात निघेपर्यंत विमुक्त जाती व भटक्या जमाती तसेच विशेष मागास प्रवर्गासाठी आरक्षित असलेली १३ % पदे पदोन्नतीने भरण्यास स्थगिती दिली होती. ही स्थगिती उठविण्यासाठी शासनाने सर्वोच्च न्यायालयामध्ये Petition for Special Leave Appeal [Civil] No.[s] १८५३४-१८५३७/२००७ दाखल केले होते. सदरहू एसएलपी वर सर्वोच्च न्यायालयामध्ये दिनांक २८/३/२००८ रोजी सुनावणी झाली असून न्यायालयाने खालीलप्रमाणे आदेश दिले आहेत.

"The High Court by the impugned order has directed the State Government no to fill the promotional posts to an extent of 13 % which are earmarked for VJNT de-notified tribes, nomadic tribes and special backward classes. The impugned order is modified to the extent that the State Government may also fill the post in respect of the said 13 % from VJNT candidates, subject to the final decision of the pending writ petition before the High Court. The special leave petitions are disposed of accordingly."

३. मा.सर्वोच्च न्यायालयाचे वरील आदेश लक्षात घेता आता विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गाची ११ % व विशेष मागास प्रवर्गाची २ % आरक्षणाची पदे पदोन्नतीने

भरण्याबाबतची कार्यवाही मा. उच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या मूळ याचिका क्रमांक ८४५२/२००४ च्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून करण्यात यावी.

४. सर्व पदोन्नत्या हया मूळ याचिका क्र.८४५२/२००४ च्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून कराव्यात व पदोन्नतीच्या आदेशामध्ये तसा स्पष्ट उल्लेख करण्यात यावा.

५. मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व शासकीय/निमशासकीय इत्यादी कार्यालयांना या शासन पत्रानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबतच्या सूचना द्याव्यात.

६. सदर पत्र महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २००८०४०११७५५४०००१ असा आहे.

**आपला,**

गो.आ. लोखंडे

**( गो.आ.लोखंडे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रत :**

मुख्य सचिव
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई,
प्रबंधक, उच्च न्यायालय,अपील शाखा, मुंबई,
प्रबंधक, लोकायुक्त आणि उप लोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण,मुंबई,नागपूर,औरंगाबाद,
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
उप संचालक, अनुसूचित जाती/जमाती आयोग भारत सरकार, चिपळूणकर भवन, शास्त्री मार्ग, तांबे पेठ, पुणे - ४११ ०३०.
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,महाराष्ट्र राज्य, मुंबई,
संचालक, समाज कल्याण, पुणे,
संचालक, सेवायोजन, मुंबई,
आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक ,
आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,
सहायक आयुक्त (मागासवर्ग कक्ष) सर्व विभागीय आयुक्तांची कार्यालये,
महालेखापाल, महाराष्ट्र १/२ ( लेखा व अनुज्ञेयता ), मुंबई / नागपूर,
महालेखापाल, महाराष्ट्र १/२ ( लेखा परीक्षा ), मुंबई / नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती.

# महाराष्ट्र शासन

क्र.बीसीसी-२००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६-ब,
सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दूरध्वनी क्र.२२०२५१७७
**दिनांक :** २४ एप्रिल, २००८.

**प्रति,**

**अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,**
सर्व मंत्रालयीन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

**विषय :** मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दि.२८.३.२००८ रोजीच्या आदेशान्वये विमुक्त जाती भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गाची पदोन्नतीची रिक्त पदे भरणेबाबत.

महोदय / महोदया,

मा. सर्वोच्च न्यायालयाने उपरोक्त नमूद केलेल्या आदेशाद्वारे विमुक्त जाती भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गाची १३% पदोन्नतीची पदे भरण्यास असलेली स्थगिती उठविली असून पदोन्नतीची कार्यवाही इतर प्रवर्गाप्रमाणेच सुरु करणेबाबत या विभागाच्या दि.१.४.२००८ च्या पत्रान्वये आपणास सूचना दिलेल्या आहेत. तद्नंतर विविध मागास प्रवर्गातील संघटनांनी शासनाच्या असे निदर्शनास आणून दिले आहे की, काही विभागाकडून विमुक्त जाती भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गाची पदे भरण्याबाबत दिरंगाई केली जात आहे. याबाबत विधानपरिषदेमध्ये नियम क्र.९३ अन्वये सूचना दाखल झाली होती. या सूचनेवरील निवेदनात विमुक्त जाती भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गाची पदोन्नती व सरळसेवेतील अनुशेष भरती प्रक्रीया तीन महिन्यात पुर्ण केली जाईल तसेच पदोन्नती व सरळसेवा अनुशेष भरतीबाबतची कार्यवाही एकाच वेळी समांतर पद्धतीने केली जाईल असे उत्तर मा.राज्यमंत्री, सामान्य प्रशासन विभाग यांनी दिले आहे. आता या अनुषंगाने विमुक्त जाती भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग अधिका-यांचा पदोन्नतीतील अनुशेष भरुन काढण्यासाठी आपणास खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१. ज्या विमुक्त जाती भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग कर्मचारी व अधिकाऱ्यांबाबत विभागीय पदोन्नती समितीने पात्रता तपासून त्यांचा निवडसूचीमध्ये समावेश केला आहे तथापि उच्च न्यायालयाचे आदेश विचारात घेता त्यांना पदोन्नती न देता त्यांची पदे रिक्त ठेवण्यात आली आहे अशा सर्व संवर्गातील अधिकारी / कर्मचा-यांचे पदोन्नती आदेश त्वरीत काढण्यात यावेत.

२. ज्या विमुक्त जाती भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील कर्मचा-यांच्या पदोन्नतीसाठी न्यायालयाचे आदेश विचारात घेता पदे रिक्त ठेवण्यात आली आहे तथापि त्यांची पात्रता विभागीय पदोन्नती समितीने निश्चित केली नाही अशा अधिकारी / कर्मचा-यांबाबत त्वरित विभागीय पदोन्नती समितीची बैठक बोलवून त्यांचा निवडसूचीमध्ये समावेश करावा. त्यांना पदोन्नती देण्याची कार्यवाही ३ महिन्यांच्या आत पुर्ण करावी.

३. या विभागाच्या दि.२५.५.२००४ च्या शासन निर्णयान्वये यापुर्वी पदोन्नतीमध्ये आरक्षणाची तरतूद ज्या संवर्गांना नव्हती त्या संवर्गांमध्ये दि.२९.१.२००४ पासून रिक्त होणा-या पदांना आरक्षण

कशाप्रमाणे लावावे याबाबत स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत. तथापि, उच्च न्यायालयाचे स्थगिती आदेश विचारात घेता दि.२९.१.२००४ पासून मागासवर्गीयांसाठी आरक्षित पदांवर खुल्या प्रवर्गातून तदर्थ स्वरुपाच्या केलेल्या सर्व पदोन्नत्या तात्काळ रद्द करुन अशी रिक्त झालेली पदे मागासवर्गीय अधिका-यांमधून त्वरीत भरण्यात यावीत.

प्रस्तुत प्रकरणी मा.राज्यमंत्री महोदयांनी विधानमंडळास दिलेल्या आश्वासनाच्या अनुषंगाने येत्या ३ महिन्यामध्ये कार्यवाही पुर्ण करणे आवश्यक असल्यामुळे आपण वैयक्तिक लक्ष घालून विमुक्त जाती भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गाची सर्व पदोन्नतीतील अनुशेषाची पदे भरण्यात येतील याची दक्षता घ्यावी व यासाठी कालबद्ध कार्यक्रम आपल्या स्तरावर आखून याबाबत आपण केलेल्या कार्यवाहीचा स्वयंस्पष्ट अहवाल या विभागास १६ ऑगस्ट, २००८ पर्यंत सादर करावा.

सदर पत्र महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २००४२४१६५८१९००१ असा आहे.

**आपला,**
**सही/-**
**( गो.आ.लोखंडे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रत :**

मुख्य सचिव
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई,
प्रबंधक, उच्च न्यायालय,अपील शाखा, मुंबई,
प्रबंधक, लोकायुक्त आणि उप लोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण,मुंबई,नागपूर,औरंगाबाद,
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
उप संचालक, अनुसूचित जाती/जमाती आयोग भारत सरकार, चिपळूणकर भवन, शास्त्री मार्ग,
तांबे पेठ, पुणे - ४११ ०३०.
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,महाराष्ट्र राज्य, मुंबई,
संचालक, समाज कल्याण, पुणे,
संचालक, सेवायोजन, मुंबई,
आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक ,
आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,
सहायक आयुक्त (मागासवर्ग कक्ष) सर्व विभागीय आयुक्तांची कार्यालये,
महालेखापाल, महाराष्ट्र १/२ ( लेखा व अनुज्ञेयता ), मुंबई / नागपूर,
महालेखापाल, महाराष्ट्र १/२ ( लेखा परीक्षा ), मुंबई / नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती.

**जात वैधता प्रमाणपत्राअभावी रिक्त राहणारी पदोन्नतीची पदे तात्पुरत्या पदोन्नतीने भरण्याबाबत.**

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक : बीसीसी-१२०७/प्र.क्र.५३/०८/१६-ब,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १६/६/२००८

वाचा : १) शासन शुद्धीपत्रक, आदिवासी विकास विभाग, क्र.एसटीसी-१४२०००/प्र.क्र.४३/का.१०, दि.२८.५.२००१,
२) शासन परिपत्रक, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय विभाग, क्र.सीबीसी-१०/२००४/प्र.क्र.५७०/मावक-५, दि.५.३.२००५.

**प्रस्तावना :**

अनुसूचित जमातीच्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना त्यांच्या जमातीच्या प्रमाणपत्राची तपासणी झाल्याशिवाय पदोन्नती देण्यात येऊ नये असे आदेश संदर्भाधीन अ.क्र.१ येथील शुद्धीपत्राअन्वये देण्यात आले आहेत. तसेच अनुसूचित जाती, वि.जा.भ.ज., इ.मा.व. व वि.मा.प्र.च्या अधिकारी / कर्मचाऱ्यांची जात प्रमाणपत्रे पडताळणी समितीकडे पाठवून वैधता प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतरच त्यांना पदोन्नती देण्यात यावी असे आदेश संदर्भाधीन क्र.२ च्या परिपत्रकान्वये देण्यात आले आहेत. या आदेशातील तरतूदीनुसार, ज्या मागासवर्गीय अधिकारी / कर्मचाऱ्यांची जात वैधता प्रमाणपत्रे प्राप्त झालेली नाहीत, त्यांना पदोन्नती देता येत नाही. यामुळे पदोन्नतीची बरीच पदे रिक्त राहतात. यामुळे प्रशासकीय कामकाजावर प्रतिकूल परिणाम होत असल्याचे निदर्शनास आले आहे. या अनुषंगाने उपाययोजना करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. शासनाने यासंदर्भात पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे :-

**शासन निर्णय :**

ज्या मागासवर्गीय अधिकारी / कर्मचाऱ्यांना निवडसूचीत / तदर्थ पदोन्नतीसूचीत समावेशनास (पदोन्नतीस) पात्र ठरविले आहे. परंतू त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त झालेले नसल्याने त्यांना पदोन्नती देता येत नाही अशा प्रकरणी संबंधित मागासवर्गीय अधिकारी / कर्मचाऱ्यांचा ज्या प्रवर्गातून (राखीव / खुल्या) समावेश झाला आहे त्या प्रवर्गातील त्याच्या लगत कनिष्ठ अधिकारी / कर्मचाऱ्यास निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात ११ महिन्यांच्या कालावधीसाठी पदोन्नती देण्यात यावी. ही पदोन्नती खालील अटींच्या अधीन राहून देण्यात यावी.

१) संबंधित लगत कनिष्ठ अधिकारी / कर्मचारी मागास प्रवर्गातील असल्यास त्याचे जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त झाले असणे आवश्यक राहील.

२) ही पदोन्नती निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असून संबंधित ज्येष्ठ अधिकारी / कर्मचाऱ्यांने जात वैधता प्रमाणपत्र सादर केल्यावर ती आपोआप संपुष्टात येईल असे आदेशात नमूद करण्यात यावे.

३) सदर पदोन्नती ११ महिन्यांकरीता वा ज्येष्ठ अधिकारी / कर्मचारी जात वैधता प्रमाणपत्र सादर करेल यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत सुरु राहील. तथापि या कालावधीत ज्येष्ठ अधिकारी / कर्मचाऱ्याने जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास ही पदोन्नती १ दिवसाचा (सुटीचा कालावधी वगळून) खंड देवून पुढे चालू ठेवता येईल.

४)	या तात्पुरत्या पदोन्नतीच्या परिणामी कनिष्ठ अधिकारी / कर्मचारी यांना सेवाज्येष्ठतेचा हक्क मिळणार नाही.

२.	संबंधित मागास अधिकारी / कर्मचाऱ्याने जात वैधता प्रमाणपत्र सादर केल्यानंतर त्यास पदोन्नती देण्यात यावी व कनिष्ठ कर्मचाऱ्याची तात्पुरती पदोन्नती संपुष्टात आणावी. सदर ज्येष्ठ अधिकारी / कर्मचारी यांची पदोन्नतीच्या पदावरील ज्येष्ठता अबाधित राहील.

३.	मंत्रालयीन विभागांनी सदर आदेशातील तरतूदीनुसार राजपत्रित पदावर पदोन्नतीबाबतचे प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागास सादर करावेत व अराजपत्रित पदांवर पदोन्नतीबाबत सर्व विभागप्रमुख /कार्यालय प्रमुख यांच्याकडून कार्यवाही होत असल्याची खात्री करुन घ्यावी.

४.	सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २००८०६१६१५३१४३००१ असा आहे.

५.	हा शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अनौ.संदर्भ क्र.४५/मावक ५, दिनांक ७/३/२००८ व आदिवासी विकास विभागाच्या क्र.अनौ.संदर्भ क्र.४२/का.१०, दिनांक ५/४/२००८ अन्वये तसेच सामान्य प्रशासन विभाग/का.१२ च्या अनौ.संदर्भ क्र.६५९/१२, दिनांक २८/४/२००८ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

सही /-
**( गो.आ.लोखंडे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**
राज्यपालांचे सचिव,राजभवन,मलबार हिल,मुंबई,
मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
सर्व मंत्री /राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव,
सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
सर्व मंत्रालयीन विभाग,
*प्रबंधक,मूळ शाखा,उच्च न्यायालय,मुंबई ,
*प्रबंधक,अपील शाखा,उच्च न्यायालय,मुंबई,
*प्रबंधक,लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय,मुंबई,
*सचिव,महाराष्ट्र लोकसेवा आयोग,मुंबई ,
*सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानसभा) मुंबई,
*सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानपरिषद) मुंबई,
*राज्य निवडणूक आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई,
सर्व विभागीय आयुक्त,
राज्यातील सर्व महामंडळ आणि उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व महापालिकांचे आयुक्त
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व मुख्याधिकारी, नगर परिषदा / नगरपालिका,
संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
आयुक्त, अपंग कल्याण, ३, चर्च रोड, पुणे
अवर सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
अवर सचिव, सामाजिक न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई
सर्व मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवडनस्ती/का.१६-ब / का.१२

*पत्राने.

<u>चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीबाबत.</u>

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्र.आरटीआर-१४०८/प्र.क्र.६४/२००८/१३,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ८ जुलै,२००८.

वाचा :- १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.आरटीआर-१०८५/८५३/प्र.क्र.७२/८५/१३, दि.१५ एप्रिल,१९९१.
२) शासन शुध्दीपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.आरटीआर-१०८५/८५३/प्र.क्र.७२/८५/१३, दि.११ जून,१९९१.
३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग,क्र.आरटीआर-१०८५/८५३/प्र.क्र.७२/८५/१३, दि.२९ जून,१९९३ .
४) शासन निर्णय , सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-१०९४/प्र.क्र.४/९४/१२, दि.७ मार्च, १९९६.
५) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.बीसीसी-१०९७/प्र.क्र.६३/९७/१६-ब, दि.१८ ऑक्टोबर,१९९७.
६) शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक आरटीआर-१४०३/८४/प्र.क्र.५४/०३/१३, दि.१० मे,२००५.

## प्रस्तावना

उपरोक्त क्र.१,२,३ व ६ येथील शासन निर्णयान्वये चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना लिपिक-टंकलेखक संवर्गात पदोन्नती देण्यासाठी अटी व शर्ती विहित करण्यात आल्या आहेत. यापैकी अनुक्रमांक-६ येथील शासन निर्णयान्वये चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना पदोन्नती देतांना लिपिक-टंकलेखक संवर्ग संख्येच्या एकूण मंजूर पदसंख्येच्या २५ टक्के पदावर पदोन्नती देण्याचे आदेश आहेत.

२. तथापि, अनेक प्रशासकीय विभागांच्या आस्थापनांतर्गत लिपिक-टंकलेखकाची पदे २५ टक्के प्रमाणानुसार पदोन्नतीने भरण्यासाठी पात्र उमेदवार उपलब्ध नसल्यामुळे मोठया प्रमाणावर रिक्त रहात/राहिल्याचे निदर्शनास आले आहे. राज्य शासनाची पद भरती मोहिम विचारात घेता लिपिक-टंकलेखक संवर्गातील २५ टक्के प्रमाणात पदे गट-ड मधून पदोन्नतीने भरण्याच्या निर्णयाचा पुनर्विचार करावा अशी मागणी विविध प्रशासकीय विभागांनी केली होती.

## शासन निर्णय

वरील सर्व बाबी विचारात घेऊन गट "ड" मधील पात्र कर्मचाऱ्यांना गट "क" मधील लिपिक-टंकलेखक या पदावर पदोन्नती देण्याबाबतच्या दि.१०.५.२००५ च्या आदेशामध्ये अंशत: बदल करुन आता खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत.

१) गट "ड" मधील पात्र कर्मचाऱ्यांना गट"क" मधील लिपिक-टंकलेखक या पदावर पदोन्नती देण्याचे प्रमाण लिपिक-टंकलेखक संवर्ग संख्येच्या एकूण मंजूर पदसंख्येच्या २५ टक्के पर्यंत राहील.

C:\Documents and Settings\hp231338\My Documents\2008785231114341134400\13.

वरील बदलानंतर ज्या आस्थापनांमध्ये गट-ड मधून गट-क मधील लिपिक-टंकलेखक पदावर पदोन्नती देण्यासाठी २५ टक्के पर्यंतच्या मर्यादेत उमेदवार उपलब्ध नसतील अशा आस्थापनेवरील पदे सरळसेवेने भरता येतील.

ज्या कार्यालयात लिपिकवर्गीयांची पदे ४ पेक्षा कमी आहेत त्या कार्यालयाकरीता दि.१०.५.२००५ च्या शासन निर्णय मधील सुत्राचा अवलंब करावा.

| लिपिकवर्गीय पदांची संख्या | गट "ड" मधील पदोन्नतीसाठी नियत करावयाची कमाल पदे |
|---|---|
| १ | ० |
| २ | १ |
| ३ | १ |

२) संदर्भाधीन क्रमांक १ ते ३ व ६ येथील दि.१५.४.१९९१, दि.११.६.१९१, दि.२९.६.१९९३ व दि.१०.५.२००५ च्या आदेशातील इतर अटी यापुढे देखील तशाच कायम राहतील.

वरील शासन निर्णय निर्गमित केल्याच्या दिनांकापासून अंमलात येईल.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २००८०७०८१७३१५८००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(प्र.ल.पाठक)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

राज्यपालांचे सचिव, राजभवन मलबार हिल, मुंबई
मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
* प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई
* प्रबंधक, लोकआयुक्त व उप लोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय (विधानसभा), मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय (विधानपरिषद), मुंबई,
* राज्य निवडणूक आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,मुंबई,
महालेखापाल-१ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर
महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व मंत्रालयीन विभाग,
निरनिराळ्या मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
निवड नस्ती

* पत्राने

C:\Documents and Settings\hp231338\My Documents\2008785231114341134400\14.

विभागीय परीक्षा नियमांमध्ये सुधारणा-
वयाधिक्यामुळे शासकीय कर्मचाऱ्यांना
परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्याविषयी.

**महाराष्ट्र शासन,**
सामान्य प्रशासन विभाग,
**परिपत्रक क्र.परीक्षा-१००८/४३८/प्र.क्र.२६/२००८/१७,**
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ४ डिसेंबर, २००८.

**वाचा :-** १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.ईएक्सडी-१०७६/१९४५/१३७/१७, दि.१.११.१९७७.

२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.ईएक्सडी-१०७६/२४६३/१७, दि.१९.४.१९७९.

३) परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.ईएक्सडी-१०७६/३४/१७, दि.१७.०५.१९८०.

## परिपत्रक

शासकीय कर्मचाऱ्यांना वयाची ४५ वर्षे पूर्ण केल्यानंतर विभागीय परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून उपरोक्त संदर्भाधिन दि.१.११.१९७७ च्या शासन निर्णयानुसार सूट देण्यात आली असून, त्यानुसार आवश्यक ती सुधारणा सर्व मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या परीक्षा नियमांमध्ये करावी असे निदेश देण्यात आले आहेत. परंतु अद्यापही काही विभागांनी त्यांच्या परीक्षा नियमांमध्ये त्यानुसार आवश्यक ती सुधारणा केली नाही. या विसंगतीमुळे या विभागाच्या उपरोक्त दि.१.११.१९७७ च्या शासन निर्णयाचा आधार घेऊन काही कर्मचाऱ्यांकडून विभागीय परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्याची मागणी केली जाते.

२. काही विभागांमध्ये तांत्रिक स्वरुपाचे कामकाज हाताळणाऱ्या कर्मचाऱ्यांना त्या पदाचे कौशल्य व जबाबदाऱ्या विचारात घेता विहित केलेली विभागीय परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देता येणे शक्य नसते. त्यामुळे पदोन्नती देण्यापूर्वी कर्मचाऱ्याने विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक असते. तथापि, तशी दुरुस्ती संबंधीत विभागाच्या परीक्षा नियमात केली जात नाही. त्यामुळे अशा कर्मचाऱ्यांकडून परीक्षेतून सूट मिळण्याकरीता न्यायालयात /न्यायाधिकरणात दावे दाखल केले जातात.

३. विभागीय परीक्षेतून सूट मिळण्यासंदर्भात अनेकजण न्यायालयात दावे दाखल करीत असल्यामुळे या विषयाच्या अनुषंगाने सर्व विभागांना सर्वसमावेशक स्पष्ट सूचना सामान्य

प्रशासन विभागाने द्याव्यात असे निदेश मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने एका न्यायालयीन प्रकरणात या विभागास दिले आहेत. त्यामुळे मा. न्यायाधिकरणाच्या निदेशास अनुसरुन सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांना खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत :-

१. प्रशासकीय विभागांनी त्यांच्याकडील तांत्रिक संवर्गातील अधिकारी /कर्मचाऱ्यांना वयाची ४५ वर्षे पूर्ण झाल्यानंतर विभागीय परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देता येणार नाही असा जाणीवपूर्वक निर्णय घेतला असेल तर त्यासंबंधीची योग्य ती तरतूद संबंधित पदांच्या विभागीय परीक्षा नियमांमध्ये तातडीने करण्याची कार्यवाही करावी.

२. विभागामध्ये काही पदांवर वयाच्या ४५ वर्षानंतरदेखिल नामनिर्देशनाव्दारे नियुक्त्या केल्या जातात. अशा प्रकारे नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना विहित केलेली विभागीय परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट न देण्याचा जाणीवपूर्वक निर्णय विभागाने घेतला असल्यास त्यासंदर्भातही योग्य ती तरतूद परीक्षा नियमात संबंधित विभागांनी करावी.

३. ज्या पदांना ४५ वर्षानंतर विभागीय परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट अनुज्ञेय असेल त्या पदांचे बाबतीत संबंधित विभागांनी तशी स्पष्ट तरतूद त्या पदाच्या विभागीय परीक्षा नियमात अंतर्भूत करण्याची कार्यवाही तात्काळ करावी. जरी अशी तरतूद शासन निर्णयान्वये यापूर्वी लागू केली असली तरीदेखिल ती परीक्षा नियमात अंतर्भूत करणे आवश्यक राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( वि.द.आठवले )
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रति,

१. राज्यपालांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव,
३. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
५. महालेखापाल-१ (लेखा व परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई,
६. महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई,
७. महालेखापाल-२, महाराष्ट्र राज्य, नागपूर,
८. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, वांद्रा-कुर्ला संकुल, वांद्रा (पूर्व), मुंबई,
९. वित्त विभाग (सेवा-२), मंत्रालय, मुंबई,
१०. सामान्य प्रशासन विभाग, का.क्र.८,१२,१४,१९, मंत्रालय, मुंबई,
११. सर्व मंत्रालयीन विभाग (आस्थापना),
१२. निवड नस्ती.

## महाराष्ट्र शासन

क्र.बीसीसी-२००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६-ब,
सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दूरध्वनी क्र.२२०२५१७७
**दिनांक :** २६ डिसेंबर, २००८.

**प्रति,**

**अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,**
सर्व मंत्रालयीन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

**विषय :** मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दि.२८.३.२००८ रोजीच्या आदेशान्वये विमुक्त जाती भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गाची पदोन्नतीची रिक्त पदे भरणेबाबत.

**संदर्भ :** १. शासनपत्र सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी-२००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६ब, दि.१३.३.२००७
२. शासनपत्र सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी-२००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६ब, दि.१.४.२००८
३. शासनपत्र सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी-२००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६ब, दि.२४.४.२००८.

महोदय / महोदया,

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दि.२८.३.२००८ च्या आदेशान्वये विमुक्त जाती भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गाची १३% पदोन्नतीची पदे भरण्यास असलेली स्थगिती उठविण्या आली आहे. त्यास अनुसरुन सदर प्रवर्गातील पदोन्नतीची कार्यवाही इतर प्रवर्गाप्रमाणेच सुरु करणेबाबत संदर्भाधीन क्र.१ येथील पत्रान्वये सर्व विभागांना सूचना देण्यात आल्या आहेत.

२. त्यांनतर काही विभागांकडून विमुक्त जाती भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गाची पदे भरण्याबाबत दिरंगाई केली जात आहे असे विविध मागास प्रवर्गातील संघटनांनी शासनाच्या निदर्शनास आणून दिले होते. यासंदर्भात विधानपरिषदेमध्ये नियम ९३ अन्वये सूचना दाखल झाली होती. या सूचनेवरील निवेदनात मा.राज्यमंत्री (सामान्य प्रशासन) यांनी दिलेल्या उत्तराच्या अनुषंगाने विमुक्त जाती भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील अधिका-यांचा पदोन्नतीतील अनुशेष भरुन काढण्यासाठी करावयाच्या कार्यवाहीसंबंधी सविस्तर सूचना संदर्भाधीन क्र.२ येथील पत्रान्वये देण्यात आल्या आहेत. मा.राज्यमंत्री महोदयांनी विधीमंडळास दिलेल्या आश्वासनाच्या अनुषंगाने प्रस्तुत प्रकरणी ३ महिन्यांमध्ये कार्यवाही पूर्ण करणे आवश्यक असल्याने या प्रकरणी वैयक्तिक लक्ष घालून विमुक्त जाती भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गाची सर्व पदोन्नतीतील अनुशेषाची पदे भरण्यात येतील याची दक्षता घ्यावी व यासाठी कालबद्ध कार्यक्रम आखून याबाबत केलेल्या कार्यवाहीचा स्वयंस्पष्ट अहवाल या विभागास दि.१६ ऑगस्ट २००८ पर्यंत सादर करावा अशा सूचनाही संदर्भाधीन क्र.२ येथील पत्रान्वये देण्यात आल्या होत्या. तथापि अद्यापही काही विभागांनी संदर्भाधीन क्र.१ व २ येथील पत्रान्वये दिलेल्या सूचनांस अनुसरुन विमुक्त जाती

भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गाची १३% पदोन्नतीची पदे भरण्याची कार्यवाही पुर्ण केलेली नाही असे निदर्शनास आले आहे, ही बाब निश्चितच योग्य नाही.

३. सर्व मंत्रालयीन विभागांना याद्वारे पुन्हा सूचना देण्यात येत आहेत की त्यांनी संदर्भाधीन क्र.१ व २ येथील पत्राद्वारे दिलेल्या सूचना विचारात घेऊन विमुक्त जाती भटक्या जमातीची ११% व विशेष मागास प्रवर्गाची २% आरक्षणाची पदे पदोन्नतीने भरण्याबाबतचे प्रस्ताव या विभागास तातडीने सादर करावेत व ही कार्यवाही कोणत्याही परिस्थितीत दि.३१ जानेवारी, २००९ पुर्वी पुर्ण करावी व केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल, मंत्रालय खुद्द विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील क्षेत्रिय आस्थापनेसह दि.१५ फेब्रुवारी, २००९ पुर्वी या विभागास सादर करावा.

सदर पत्र महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २००८१२२६१८२४१४००१ असा आहे.

**आपली,**

**सही/-**
**( सु.मो.महाडिक )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रत :**

मुख्य सचिव
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई,
प्रबंधक, उच्च न्यायालय,अपील शाखा, मुंबई,
प्रबंधक, लोकायुक्त आणि उप लोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण,मुंबई,नागपूर,औरंगाबाद,
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
उप संचालक, अनुसूचित जाती/जमाती आयोग भारत सरकार, चिपळूणकर भवन, शास्त्री मार्ग, तांबे पेठ, पुणे - ४११ ०३०.
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,महाराष्ट्र राज्य, मुंबई,
संचालक, समाज कल्याण, पुणे,
संचालक, सेवायोजन, मुंबई,
आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक ,
आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,
सहायक आयुक्त (मागासवर्ग कक्ष) सर्व विभागीय आयुक्तांची कार्यालये,
महालेखापाल, महाराष्ट्र १/२ ( लेखा व अनुज्ञेयता ), मुंबई / नागपूर,
महालेखापाल, महाराष्ट्र १/२ ( लेखा परीक्षा ), मुंबई / नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती.

**गट अ व गट ब (राजपत्रित) पदांवर पदोन्नतीसाठीच्या निवडसूचीचे प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागास सादर करण्याच्या कार्यपध्दतीबाबत.**

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक : एसआरव्ही-२०१०/प्र.क्र.३४७/१०/१२,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २४ फेब्रुवारी, २०११.

वाचाः शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-२००५/प्र.क्र.५/०५/१२, दि.२६.६.२००६.

## <u>शासन परिपत्रक</u>

प्रचलित कार्यपदतीनुसार शासन सेवेतील गट-अ मधील (असुधारित वे.श्रे.रु.१२०००-१६५०० व त्यापेक्षा कमी दर्जाच्या) आणि गट-ब (राजपत्रित) मधील पदांवर पदोन्नतीसाठीच्या निवडसूचीचे प्रस्ताव सामान्य प्रशासन विभाग कार्या.१२ व कार्या.१६-ब कडून तपासण्यात येतात. असे प्रस्ताव ब-याच वेळेस प्रशासकीय विभागाकडून योग्यप्रकारे सादर केले जात नसल्याचे व प्रस्तावासोबत आवश्यक कागदपत्रे सादर केली नसल्याचे आढळून येते. संबंधित मुद्यांच्या पूर्ततेसाठी व आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करण्याकरीता नस्ती प्रशासकीय विभागास परत करावी लागते. तसेच असे प्रस्ताव प्रथम कार्या.१२ कडून तपासून आरक्षणासंदर्भात कार्या.१६-ब कडे पाठविण्यात येतात. तथापि संबंधित निवडसूचीतील पदांचे आरक्षण विभागाने योग्य प्रकारे केले नसल्यास आरक्षणासंबंधीच्या मुद्यांची पूर्तता करण्यासाठी कार्या.१६-ब कडून प्रस्ताव विभागास परत करण्यात येतो. तसेच विभागाने नमूद केलेल्या आरक्षणामध्ये बदल झाल्यास त्यामुळे निवडसूचीतही बदल संभवतो. अशा परिस्थितीत निवडसूची योग्यप्रकारे अंतिम होण्यासाठी प्रस्ताव कार्या.१२ कडून पून्हा तपासणे आवश्यक ठरते. सबब निवडसूचीचा प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागात दोन कार्यासनांमध्ये वारंवार तपासावा लागतो. परीणामी निवडसूची अंतिम होण्यास व पदोन्नतीने पदे भरण्यामध्ये जास्त कालावधी लागतो.

२. वरीलपमाणे परिस्थिती उदभवू नये व निवडसूचीचे प्रस्ताव लवकरात लवकर कार्या.१२ कडून तसेच कार्या.१६-ब कडून (प्रत्येकी) शक्यतो १० (कार्यालयीन कामकाजाच्या) दिवसाच्या कालावधीत अंतिम व्हावेत या दृष्टीने कार्यवाहीसाठी खालीलप्रमाणे निदेश देण्यात येत आहेत.:-

(१) निवडसूची/तदर्थ, पदोन्नतीसूचीच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने विभागीय पदोन्नती समितीच्या (निवडसमितीच्या) बैठकीच्या कार्यवृत्तात या परिपत्रकासोबतच्या परिशिष्ट "अ" मधील सर्व बाबीचा तपशील नमूद करण्यात यावा.

या आदेशापुर्वी झालेल्या विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीच्या अनुषंगाने या परिपत्रकासोबतच्या परिशिष्ट "अ" मधील सर्व बाबीचा तपशील बैठकीच्या कार्यवृत्तात नमूद केला नसल्यास सदर तपशील स्वतंत्र प्रपत्रात सादर करण्यात यावा.

(२) निवडसूचीचे प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागास मान्यतेसाठी पाठविताना या परिपत्रकासोबतच्या परिशिष्ट "ब" मधील सर्व कागदपत्रे सादर करण्यात यावीत.

(३) आरक्षणासंदर्भात कार्या.१६-ब ने वेळोवेळी दिलेल्या निदेशानुसार आवश्यक कागदपत्रे, तपशील सादर करण्यात यावा.

(४) निवडसूचीसाठी उपलब्ध पदांचे आरक्षण तपासण्यासाठी विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीपुर्वीच बिंदूनामावलीसह प्रस्ताव प्रथम सामान्य प्रशासन विभाग/कार्या.१६-ब कडे सादर करण्यात यावा. कार्या.१६-ब कडून आरक्षण प्रमाणित करुन झाल्यानंतर विभागीय पदोन्नती समितीची बैठक आयोजित करण्यात यावी. कार्या.१६-ब ने प्रमाणित केलेले आरक्षण व अन्य आवश्यक बाबी विचारात घेऊन निवडसूची/तदर्थ पदोन्नतीसूची तयार करण्यात यावी. विभागीय पदोन्नती समितीच्या शिफारशी लक्षात घेऊन निवडसूची/तदर्थ पदोन्नतीसूचीस मान्यतेचा प्रस्ताव कार्या.१२ कडे सादर करण्यात यावा. कार्या.१२ कडून प्रस्ताव तपासून तो विभागास परत करण्यात येईल. मात्र आरक्षणाबाबत काही विशिष्ट मुददा उपस्थित होत असल्यासच त्यासंदर्भात अथवा मागासवर्गीय अधिकारी/कर्मचा-याचे गोपनीय अहवालानुसार अधिक्रमण होत असल्यास (अपात्र होत असल्यास) त्याअनुषंगाने प्रस्ताव कार्या.१६-ब कडे पाठविण्यात येईल.

(५) तदर्थ पदोन्नतीसूचीसाठी (नामनिर्देशनाच्या कोटयातील पदांवर तदर्थ स्वरुपात पदोन्नती द्यावयाची असल्यास) सदर पदांकरीता आयोगाकडे मागणीपत्र सादर केल्याचा तपशिल यामध्ये किती पदांकरिता, केव्हा मागणीपत्र पाठविले, मागणीपत्रात आयोगाने त्रुटी काढल्या आहेत काय? आयोगाने जाहिरात दिली आहे काय? मागणीपत्राबाबत आयोगाकडून झालेल्या कार्यवाहीची सद्यस्थिती, आयोगाकडून उमेदवार उपलब्ध होण्यास अपेक्षित कालावधी याचा समावेश असावा.

(६) प्रस्ताव सादर करताना पूर्वीच्या निवडसूचीस आयोगाची मान्यता घेतली आहे वा कसे त्याचा उल्लेख करुन मागील निवडसूचीच्या प्रस्तावावर सा.प्र.वि. ने काही विशिष्ट बाबींची पुर्तता करण्याचे अभिप्राय दिले असल्यास त्यानुसार पूर्तता करुन प्रस्ताव सादर करावा.

३. सर्व प्रशासकीय विभागांनी या निदेशांचे काटेकोरपणे पालन करावे. तसेच त्यांच्या अधिपत्याखालील ज्या विभागप्रमुखांकडून निवडसूचीचे प्रस्ताव सादर होत असतील त्या विभागप्रमुखांना या निदेशांचे पालन करण्याबाबत कळविण्यात यावे. यानुसार विभागप्रमुखांनी प्रस्ताव योग्यप्रकारे सादर केला आहे काय हे प्रशासकीय विभागाने तपासणे आवश्यक राहील. या परिपत्रकातील निदेशानुसार व सोबतच्या परिशिष्ट "अ" व "ब" नुसार

पूर्तता केली नसल्यास निवडसूचीचा प्रस्ताव तपासण्यास विलंब झाल्यास त्याची जबाबदारी संबंधित प्रशासकीय विभागाची राहील.

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध केले असून त्याचा संगणक संकेतांक २०११०२२४१८४६३७००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(श्री. प्र. पाटील)
सह सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

राज्यपालांचे सचिव,
मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
सर्व मंत्री /राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव,
सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
सर्व मंत्रालयीन विभाग,
सामान्य प्रशासन विभाग, कार्यासन १६-ब
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती.

**शासन परिपत्रक क्रमांक : एसआरव्ही-२०१०/प्र.क्र.३४७/१०/१२, दि. २४ फेब्रुवारी २०११ सोबतचे**

**परिशिष्ट "अ"**

(विभागीय पदोन्नती समितीच्या/निवडसमितीच्या बैठकीच्या कार्यवृत्तात नमूद करावयाच्या बाबी)

१) मंजूर आकृतीबंधानुसार संबंधित संवर्गाची मंजूर पदसंख्या आणि आकृतीबंध मंजूर झाल्यानंतर पदसंख्येत वाढ किंवा घट झाली असल्यास त्याची माहिती.

२) पदोन्नतीच्या पदाची वेतनश्रेणी (वेतनबँड व ग्रेड पे) व गट

३) ज्या पदावरुन पदोन्नती द्यावयाची आहे त्या पदाचे पदनाम व वेतनश्रेणी (वेतनबँड व ग्रेड पे.)

४) सेवा प्रवेश नियमानुसार भरतीचे मार्ग (पदोन्नती,नामनिर्देशन, इ.) व त्याचे प्रमाण तसेच पदोन्नतीकरिता एका पेक्षा अधिक निम्न संवर्ग असल्यास त्या संवर्गातून पदोन्नतीकरिता प्रमाण.

५) निवडसूचीचे वर्ष (सर्वसाधारणपणे १ सप्टेंबर ते ३१ ऑगस्ट)

६) मंजूर पदसंख्येनुसार पदोन्नती कोटयात येणारी पदे व त्यापैकी विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीच्या दिनांकास रिक्त असलेली व निवडसूची वर्षातील संभाव्य रिक्त पदे. (कोणत्या दिनाकापर्यंतची संभाव्य रिक्त पदे विचारात घेतली आहेत ते नमूद करावे.)

७) सेवा प्रवेश नियमात पदोन्नतीकरिता विहित केलेला निम्न संवर्गात नियमित सेवेचा निकष अथवा सेवा प्रवेश नियमात याबाबत तरतूद नसल्यास सा.प्र.वि. च्या आदेशानुसार किमान ३ वर्षे नियमित सेवेचा निकष तसेच सेवाप्रवेश नियमात शैक्षणिक अर्हता विहित केली असल्यास सदर निकष पूर्ण करतात वा कसे.

८) आधीच्या वर्षामध्ये संबंधित संवर्गातील नामनिर्देशनाच्या (सरळसेवा) कोटयातील पदावर तदर्थ पदोन्नती दिली असल्यास, उपलब्ध प्रवर्गनिहाय पदांवर त्यांची पदोन्नती नियमित होण्यासाठी त्यांचा निवडसूचीत समावेशनाचा विचार केला आहे काय. (तदर्थ पदोन्नती दिली नसल्यास, तसे प्रमाणित करणे).

९) बिंदूनामावलीनुसार मागासवर्गीयांच्या प्रत्येक प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या पदांचा (अनुशेषासह) कार्यासन १६ ब ने प्रमाणित केलेला तपशील (आरक्षणाचा तपशील).

१०) ज्या पदावरुन पदोन्नती द्यावयाची आहे त्या संवर्गाची विचारात घेतलेली ज्येष्ठतासूची. (कोणत्या वर्षापर्यंतची आहे.)

११) पदोन्नतीच्या विचारक्षेत्रातील व निकष पूर्ण करणाऱ्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांची नांवे व ज्येष्ठताक्रमांक, विभागीय चौकशी सुरु असल्यास त्याचा, जातवैधता प्रमाणपत्र सादर केला आहे वा कसे याचा तपशिल.

१२) अधिकारी/कर्मचाऱ्यांचा निलंबन, शिक्षा वा अन्य कारणास्तव विचार झाला नसेल त्याबाबतचा तपशील, विभागीय चौकशीअंती शिक्षा दिली असल्यास शिक्षेचे स्वरुप, आदेशाचा दिनांक व शिक्षा सुरु होण्याचा दिनांक.

१३) पदोन्नतीच्या विचार क्षेत्रातील अधिकारी/कर्मचारी यांच्या मागील ५ वर्षाच्या गोपनीय अहवालांची विभागीय पदोन्नती समितीमधील अध्यक्ष व सदस्यांनी स्वतंत्रपणे (अथवा एकत्रित) केलेली प्रतवारी व सरासरी प्रतवारी व केलेली (पात्र/अपात्र) शिफारस याचे विवरणपत्र (यामध्ये अधिकारी/कर्मचारी यांची नांवे, त्यांचा प्रवर्ग, ज्येष्ठता क्रमांक, पदोन्नतीसाठी पात्रता इ. तपशिल ) तसेच मागासवर्गीय अधिकारी/कर्मचारी गोपनीय अहवालाची प्रतवारी धारण करत नसल्यास अपात्र ठरविताना त्याचा सहानुभुतीपूर्वक विचार करुन तसा विचार केल्याचे नमूद करावे. तसेच गोपनीय अहवालानुसार अपात्र ठरविलेल्या अधिकारी/कर्मचा-यांना गोपनीय अहवालातील प्रतिकूल शेरे/ पदोन्नतीच्या पात्रतेपर्यंत न येणारे शेरे कळविले असल्याचे नमूद करावे.

१४) समितीने शिफारस केलेली निवडसूची/तदर्थ पदोन्नतीसूची. (निवडसूची/तदर्थ पदोन्नतीसूचीकरीता वरील अ.क्र.६ नुसार उपलब्ध पदांच्या मर्यादेत निवडसूची/तदर्थ पदोन्नतीसूची असावी.) निवडसूची /तदर्थ पदोन्नतीसूची यामध्ये अधिकारी/कर्मचा-यांची नावे, ज्येष्ठता क्रमांक, प्रवर्ग तसेच एकापेक्षा अधिक संवर्गातील अधिकारी/ कर्मचारी असल्यास त्यांचे पद याचा उल्लेख करावा. तसेच निवडसूची/तदर्थ पदोन्नतीसूची आपसातील ज्येष्ठताक्रमानुसार आहे याची दक्षता घ्यावी.

**१५) शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक ८.६.२०१० नुसार संबंधित संवर्गास विभागीय संवर्ग वाटप नियमावली लागू आहे वा कसे ते नमूद करावे व ही नियमावली लागू असल्यास विभागीय संवर्गनिहाय रिक्त पदांची विगतवारी नमूद करावी.**

**शासन परिपत्रक क्रमांक : एसआरव्ही-२०१०/प्र.क्र.३४७/१०/१२, दि. २४ फेब्रुवारी २०११ सोबतचे**

**परिशिष्ट "ब"**

**(निवडसूची/तदर्थ पदोन्नतीसूचीचे प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागास सादर करताना सोबत सादर करावयाचे कागदपत्र)**

१) सेवा प्रवेश नियमाची प्रत, त्यामध्ये सुधारणा केली असल्यास त्याची प्रत.

२) ज्या पदावरुन पदोन्नती द्यावयाची आहे त्या संवर्गाची प्रसिध्द केलेली अद्ययावत ज्येष्ठतासूची. ही ज्येष्ठतासूची योग्य असल्याचे संबंधित सचिव व सह सचिव/उपसचिव यांनी प्रमाणित करणे. या ज्येष्ठतासूचीतील जे अधिकारी/कर्मचारी पूर्वीच सेवानिवृत्त, पदोन्नत, निधन झाले असतील वा राजीनामा दिला आहे, त्याची नोंद करणे तसेच ज्येष्ठतासूचीसंदर्भात न्यायालयीन प्रकरण सुरु असल्यास त्याची सद्यस्थिती नमूद करणे.

३) विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीचे अध्यक्ष व सर्व सदस्यांनी स्वाक्षरीत केलेले कार्यवृत्त.

४) विभागीय पदोन्नती समितीने अपात्र ठरविलेल्या अधिकारी/कर्मचा-यांची गोपनीय अहवाल नस्ती. संबंधितांना प्रतिकूल शेरे अथवा पदोन्नतीच्या पात्रतेपर्यन्त न येणारे शेरे कळविल्याची नस्तीमधील ज्ञापने ठेवण्यात यावीत.

५) पदोन्नती नाकारल्याने पदोन्नतीसाठी विचार न झालेल्या अधिकारी/कर्मचा-यांचा त्यासंबंधीचा अर्ज. पदोन्नती कायमस्वरुपी नाकारली किंवा किती कालावधीकरीता नाकारली याचा स्पष्ट उल्लेख अर्जात असावा. याबाबत उल्लेख नसल्यास ते स्पष्ट करुन घ्यावे.

शासकीय/निमशासकीय/नगरपालिका/महानगरपालिका/ मंडळे/ महामंडळे /शासकीय उपक्रम / संविधानिक संस्था / अन्य संस्था इत्यादी यांनी एकूण मंजूर पदे, त्यानुसार भरावयाची आरक्षणाची पदे, भरलेली पदे व रिक्त पदे यांची माहिती वेबसाईटवर प्रसिध्द करण्याबाबत

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग

पूरकपत्र क्रमांक : बीसीसी-२०१०/प्र.क्र.५८४/१०/१६-ब

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक : २३ ऑगस्ट, २०११.

**संदर्भ** : सामान्य प्रशासन विभागाचे क्रमांक : बीसीसी-२०१०/प्र.क्र.५८४/१०/१६-ब, दिनांक ३० जून, २०११ चे शासन परिपत्रक

**पूरकपत्र :**

वरील संदर्भाधीन शासन परिपत्रकातील परिच्छेद क्र.५ मध्ये "खुद्द मंत्रालयातील जी पदे विविध मंत्रालयीन विभागाकडून भरण्याची कार्यवाही केली जाते, उदा. शिपाई संवर्ग अशा सर्व पदांबाबतची माहिती प्रत्येक मंत्रालयीन विभागाने संबंधित माहिती वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी सामान्य प्रशासन विभाग कार्यासन-१४ यांच्याकडे विहित कालावधीत पाठविणे आवश्यक राहिल." असे आदेश देण्यात आले आहेत. याबाबत आता असे सुधारित आदेश देण्यात येत आहेत की, खुद्द मंत्रालयातील जी पदे विविध मंत्रालयीन विभागांकडून भरण्याची कार्यवाही केली जाते, त्याबाबतची माहिती विभागांनी आपल्या वेब साईटवर स्वतंत्रपणे प्रसिध्द करावी.

२. सदर पूरकपत्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**( सु. ना. रणखांबे )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

राज्यपाल यांचे सचिव,

मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,

**शासन सेवेतील अधिकारी / कर्मचाऱ्यांची ज्येष्ठतासूची प्रत्येक वर्षी तयार करणे व प्रसिध्द करणे याबाबतचे सर्वंकष धोरण.**

**महाराष्ट्र शासन,**
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक : एसआरव्ही-२०११/प्र.क्र.२८४/१२,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- २१.१०.२०११.

वाचा :- (१) शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : एसआरव्ही-१०७६/१२, दि.२१.६.१९८२.
(२) शासन अधिसूचना,सामान्य प्रशासन विभाग,क्र.:एसआरव्ही-१०८६/२७७६/प्र.क्र.५/८७/१२, दि.२३.९.१९८८.
(३) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : एसआरव्ही-१०८७/६२४/१२, दि.२१.४.१९८७.
(४)शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : एसआरव्ही-१०९३/प्र.क्र.८/९३/१२, दि.१७.७.१९९३.
(५) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक :एसआरव्ही-२००२/प्र.क्र.३/२००२/१२, दि.२७.३.२००२.
(६) शासन परिपत्रक,सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक :एसआरव्ही-२००५/प्र.क्र.५६/२००५/१२, दि.३०.९.२००५.

## शासन निर्णय

शासकीय कर्मचाऱ्यांच्या ज्येष्ठतेसंबंधीच्या तरतूदी संदर्भाधीन अ.क्र. १ येथील अधिसूचनेन्वये विहित केलेल्या नियमावलीत असून त्यामध्ये संदर्भाधीन अ.क्र. २ येथील अधिसूचनेन्वये सुधारणा केली आहे. नियमावलीतील नियम ७ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे, नियुक्ती प्राधिका-यांनी त्या संवर्गाची ज्येष्ठतासूची प्रत्येक वर्षी, दि.१ जानेवारी हा आधारभूत दिनांक मानून तयार करुन प्रसिध्द करावयाची आहे. त्यानुसार ज्येष्ठतासूची तयार करुन प्रसिध्द करण्याची कार्यवाही करण्याबाबत संदर्भाधीन अ.क्र. ३, ४, ५ व ६ येथील शासन परिपत्रकान्वये सर्व संबंधितांना निदेश दिले आहेत.

२. वरीलप्रमाणे निदेश दिले असूनही ज्येष्ठतासूची वेळीच तयार करण्यात येत नाही व काहीवेळा फार विलंबाने तयार करुन प्रसिध्द करण्यात येते असे निदर्शनास आले आहे. परिणामी पदोन्नतीचे प्रस्ताव विचारात घेण्यात अडचणी येतात व विलंब होतो. ज्येष्ठतासूचीस न्यायालयीन स्थगिती, न्यायनिर्णयाच्या परिणामी वा प्रशासकीय कारणास्तव निवडसूची सुधारीत करावी लागणे, संबंधित संवर्गात कार्यरत अधिकारी / कर्मचारी यांची आवश्यक माहिती उपलब्ध नसणे इ. ज्येष्ठतासूची प्रसिध्द / अंतिम न करण्याची सर्वसाधारण कारणे आहेत.

याशिवाय एखाद्या संवर्गाची एका वर्षाची अंतिम ज्येष्ठतासूची प्रसिध्द केल्यावर पुढील वर्षाची ज्येष्ठतासूची तयार करताना, (१)आधीच्या ज्येष्ठतासूचीत समाविष्ट असलेले व सेवेत कार्यरत अधिकारी / कर्मचारी व (२) त्यानंतर संबंधित वर्षात नियमित नियुक्त अधिकारी / कर्मचारी यांचा समावेश करुन एकत्रित तात्पुरती (provisional) ज्येष्ठतासूची प्रसिध्द करण्यात येते. काही वेळा या ज्येष्ठतासूचीसंदर्भात संबंधित वर्षात नियुक्त अधिकारी/कर्मचाऱ्यांकडून तसेच आधीच्या वर्षी प्रसिध्द केलेल्या अंतिम ज्येष्ठतासूचीत समाविष्ट अधिकारी/कर्मचाऱ्यांकडूनही आक्षेप नोंदविण्यात येतात. यामुळे आक्षेपांची संख्या वाढते व सर्व आक्षेपांचे निराकरण करुन अंतिम ज्येष्ठतासूची प्रसिध्द होण्यास बराच कालावधी लागतो. ही बाब उदाहरणाने खालीलप्रमाणे स्पष्ट करण्यात येत आहे.:-

**उदा:-** एका संवर्गाची दि.१.१.१९९८ रोजीची प्रारुप / तात्पूरती ज्येष्ठतासूची १९९८ मध्ये प्रसिध्द केली. त्यामध्ये दि.३१.१२.१९९७ पर्यंतच्या २८५ कर्मचाऱ्यांचा समावेश होता. त्यासंदर्भात प्राप्त झालेल्या आक्षेपाचे निराकरण करुन अंतिम ज्येष्ठतासूची १९९८ मध्ये प्रसिध्द केली. दि.१.१.१९९८ ते दि.३१.१२.१९९८ या कालावधीत त्या संवर्गात ६० कर्मचारी

(पदोन्नती / सरळसेवा इ. मार्गाने) नियमित नियुक्त झाले. वर नमूद २८५ कर्मचारी व संबंधित वर्षात नियुक्त ६० कर्मचारी अशा ३४५ कर्मचा-यांचा समावेश असलेली दि.१.१.१९९९ रोजीची प्रारुप / तात्पुरती ज्येष्ठतासूची, १९९९ मध्ये प्रसिध्द केली. या ज्येष्ठतासूचीसंदर्भात दि.१.१.१९९८ रोजीच्या ज्येष्ठतासूचीतील २८५ पैकी काही कर्मचारी व दि.१.१.१९९८ ते दि.३१.१२.१९९८ या कालावधीत (नियमित) नियुक्त ६० पैकी काही कर्मचारी यांच्याकडून आक्षेप नोंदविण्यात आला. यामुळे आक्षेपांची संख्या जास्त असल्याने सर्व आक्षेपांचे निराकरण करुन ज्येष्ठतासूची अंतिमतः प्रसिध्द करण्यास दीर्घ कालावधी लागला.

**ज्येष्ठतासूचीअभावी पदोन्नतीने पदे भरण्यास विलंब होऊ नये तसेच ज्येष्ठतासूची प्रत्येक वर्षी प्रसिध्द करण्याचे काम सुटसुटीत व जलदगतीने करता यावे व ज्येष्ठतासूची लवकरात लवकर अंतिम करता यावी याकरिता ज्येष्ठतासूची तयार करणे व प्रसिध्द करणे याबाबत सर्वंकष धोरण विहित करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.**

**३. शासन असे आदेश देत आहे की, ज्येष्ठतासूची प्रत्येक वर्षी तयार करणे व प्रसिध्द करणे यासंदर्भात खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी. :-**

(१) महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियम, १९८२ मधील तरतुदीनुसार, संबंधित संवर्गाची प्रत्येक वर्षी दि. १ जानेवारी आधारभूत दिनांक मानुन तात्पुरती ज्येष्ठतासूची तयार करण्यात यावी. प्रत्येक संवर्गाची ज्येष्ठतासूची स्वतंत्र असावी. मात्र सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार पदोन्नतीसंदर्भात जे संवर्ग एकत्रित समजले आहेत वा आपसात बदलीपात्र आहेत अशा संवर्गांची ज्येष्ठतासूची एकत्रित ठेवता येईल.

(२) (अ) आधीच्या वर्षी प्रसिध्द झालेली अंतिम (final) ज्येष्ठतासूची पुढील वर्षी पून्हा नव्याने तात्पूरती (provisional) ज्येष्ठतासूची तयार करताना विचारात घेऊ नये व प्रसिध्द करण्यात येऊ नये. **केवळ त्या संबंधित वर्षात नियमित पदोन्नती, सरळसेवा, वा अन्य विहित मार्गाने नियुक्त अधिकारी / कर्मचाऱ्यांचा समावेश असलेली तात्पूरती अतिरिक्त (provisional additional) ज्येष्ठतासूची तयार करुन प्रसिध्द करावी.**

(ब) या तात्पूरत्या अतिरिक्त ज्येष्ठतासूचीतील अधिकारी / कर्मचारी यांना आक्षेप नोंदविण्यास १५ दिवस इतका कालावधी देण्यात यावा. आक्षेप नोंदविल्यास त्याचे निराकरण करुन ज्येष्ठतासूची विभाग / कार्यालयाच्या स्तरावर १५ दिवसात अंतिम करावी. मात्र, ही विभाग / कार्यालयाच्या स्तरावर अंतिम करण्यात आलेली ज्येष्ठतासूची स्वतंत्ररित्या प्रसिध्द करण्यात येऊ नये.

(क) आधीच्या वर्षाची अंतिम (final) ज्येष्ठतासूची व त्या संबंधित वर्षात विभाग / कार्यालयाच्या स्तरावर अंतिम केलेली ज्येष्ठतासूची एकत्रित करुन, पुढील वर्षाची दिनांक १ जानेवारी रोजीची अंतिम (final) ज्येष्ठतासूची १५ दिवसात प्रसिध्द करावी.

(३) **ज्या संवर्गांच्या दि.१.१.२०१० पर्यंतच्या तात्पुरत्या (provisional) व त्यानंतर अंतिम (final) ज्येष्ठतासूच्या अद्याप प्रसिध्द झालेल्या नाहीत त्यांच्याबाबतीत खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.:-**

**(अ)** ज्या संवर्गांच्या दि.१.१.२००० पर्यतच्या किंवा त्यापुर्वीच्या ज्येष्ठतासूच्या अद्याप प्रसिध्द झालेल्या नाहीत, त्यांच्याबाबतीत ज्या तारखेची अंतिम ज्येष्ठतासूची प्रसिध्द झाली असेल त्यानंतरची दि.३१.१२.२००० पर्यंतची एकत्रित ज्येष्ठतासूची तयार करुन दि.१.१.२००१ रोजीची तात्पुरती ज्येष्ठतासूची प्रसिध्द करावी. याबाबत आक्षेप नोंदविण्यास ३० दिवस इतका कालावधी देण्यात यावा. संबंधितांच्या आक्षेपाचे निराकरण करुन त्यानंतर ३० दिवसात अंतिम ज्येष्ठतासूची प्रसिध्द करावी. ही सर्व कार्यवाही शासन निर्णयाच्या दिनांकापासून ३ महिन्यात पूर्ण करावी. प्रत्येक वर्षाची ज्येष्ठतासूची न करता दि.१.१.२००१ पर्यंतची एकत्रित ज्येष्ठतासूची तयार करण्याची सूट एक विशेष बाब म्हणून देण्यात येत आहे.

**(ब)** ज्या संवर्गांची दि.१.१.२००१ रोजीची ज्येष्ठतासूची अंतिमतः प्रसिध्द झाली आहे, त्यांच्याबाबतीत तसेच वरील (अ) नुसार दि.१.१.२००१ रोजीची अंतिम ज्येष्ठतासूची प्रसिध्द करण्यात येईल त्यांच्याबाबतीत दि.३१.१२.२००५ पर्यंतची एकत्रित ज्येष्ठतासूची तयार करुन दि.१.१.२००६ रोजीची तात्पुरती ज्येष्ठतासूची प्रसिध्द करावी. याबाबत आक्षेप नोंदविण्यास तीन आठवडयाचा कालावधी देण्यात यावा. संबंधितांच्या

आक्षेपाचे निराकरण करुन त्यानंतर तीन आठवडयात अंतिम ज्येष्ठतासूची प्रसिध्द करावी. ही सर्व कार्यवाही शासन निर्णयाच्या दिनांकापासून २ महिन्यात अथवा (अ) प्रमाणे ३ महिन्यात कार्यवाही झाल्यावर २ महिन्यात पूर्ण करावी. प्रत्येक वर्षीची ज्येष्ठतासूची न करता दि.१.१.२००६ पर्यंतची एकत्रित ज्येष्ठतासूची तयार करण्याची सूट एक विशेष बाब म्हणून देण्यात येत आहे.

**(क)** ज्या संवर्गाची दि.१.१.२००६ रोजीची ज्येष्ठतासूची अंतिमत: प्रसिध्द झाली आहे, त्यांच्याबाबतीत तसेच वरील (ब) नुसार दि.१.१.२००६ रोजीची अंतिम ज्येष्ठतासूची प्रसिध्द करण्यात येईल त्यांच्याबाबतीत दि.३१.१२.२०१० पर्यंतची एकत्रित ज्येष्ठतासूची तयार करुन दि.१.१.२०११ रोजीची तात्पूरती ज्येष्ठतासूची प्रसिध्द करावी. याबाबत आक्षेप नोंदविण्यास तीन आठवडयाचा कालावधी देण्यात यावा. संबंधितांच्या आक्षेपाचे निराकरण करुन त्यानंतर तीन आठवडयात अंतिम ज्येष्ठतासूची प्रसिध्द करावी. ही सर्व कार्यवाही शासन निर्णयाच्या दिनांकापासून २ महिन्यात अथवा (अ) प्रमाणे ३ महिन्यात व (ब) प्रमाणे २ महिन्यात कार्यवाही झाल्यावर त्यानंतर २ महिन्यात पूर्ण करावी. प्रत्येक वर्षीची ज्येष्ठतासूची न करता दि.१.१.२०११ पर्यंतची एकत्रित ज्येष्ठतासूची तयार करण्याची सूट एक विशेष बाब म्हणून देण्यात येत आहे.

**(ड)** वर नमूद (अ), (ब) व (क) नुसार कार्यवाही पूर्ण झाल्यावर दि.१.१.२०१२ रोजीची व त्यापुढील ज्येष्ठतासूचीबाबतची कार्यवाही शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट "ब" मध्ये नमूद केलेल्या उदाहरणांनुसार काटेकोरपणे प्रत्येक वर्षी करावी. प्रत्येक वर्षीची तात्पूरती ज्येष्ठतासूची व त्यानंतर अंतिम ज्येष्ठतासूची प्रसिध्द करण्याची कार्यवाही ४५ दिवसात करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे प्रत्येक वर्षाची अंतिम ज्येष्ठतासूची ४५ दिवसात प्रसिध्द करावी.

(४) (अ) ज्या ज्येष्ठतासूचींबाबत न्यायालयीन प्रकरण सुरु असेल त्यांच्या बाबतीत न्यायालयीन निर्णयानुसार कार्यवाही करावी व त्यापुढील ज्येष्ठतासूचीसंदर्भात यथास्थिती वरील (३) (अ) / (ब) / (क) / (ड) नुसार उचित कार्यवाही करावी.

(ब) ज्येष्ठतासूचीस अथवा ज्येष्ठतासूचीच्या आधारे पदोन्नती देण्यास मा.न्यायालयाची स्थगिती असल्यास, संकीर्ण अर्ज / पिटीशन दाखल करुन, ज्येष्ठतासूची तयार करण्याची प्रस्तूत नवीन कार्यपध्दती मा.न्यायालयाच्या निदर्शनास आणून, नव्याने ज्येष्ठतासूची तयार करण्यास मान्यतेची विनंती करुन मा.न्यायालयाची परवानगी घ्यावी व ही कार्यवाही ठराविक मूदतीत पूर्ण करावी. ज्येष्ठतासूचीस मा.न्यायालयाची स्थगिती नसल्यास अशा संवर्गांच्याबाबतीत न्यायनिर्णयाच्या अधीन राहून तात्पूरती ज्येष्ठतासूची प्रसिध्द करावी व न्यायनिर्णय झाल्यावर त्यातील निदेशानुसार पुढील उचित कार्यवाही करण्यात यावी. यात विधीविषयक मुद्दा उपस्थित होत असल्यास विधी अधिकाऱ्यांचे / विधी व न्याय विभागाचे अभिप्राय घेऊन उचित कार्यवाही करण्यात यावी.

(क) महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियम, १९८२ मधील तरतुदीनुसार ज्येष्ठतेचा मानीव दिनांक दिला असेल अथवा सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार पदोन्नतीचा मानीव दिनांक मंजूर केला असेल अशा अधिकारी / कर्मचा-यांचा ज्येष्ठतासूचीत योग्य ठिकाणी समावेश करुन संबंधितांना त्यांच्या ज्येष्ठ अधिकारी / कर्मचाऱ्याच्या क्रमांकानंतर "अ" लावून तसा क्रमांक द्यावा.

**उदा:-**क्र.११४ नंतर व क्र. ११५ अगोदर नाव समाविष्ट होणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्याचा "**क्र.११४अ**" असा दर्शविण्यात यावा. तसेच अशाप्रकारे एकापेक्षा जास्त अधिकारी / कर्मचारी एकाच क्रमांकावर (एकाच ठिकाणी) समाविष्ट होत असल्यास **क्र.११४ ब, क्र.११४ क** ... यानुसार दर्शविण्यात यावा.

४. संबंधित संवर्गाची आस्थापना हाताळणाऱ्या (निवडसूचीचे प्रस्ताव तयार करुन पदोन्नतीचे आदेश काढणा-या) कक्ष / कार्यासनाने ज्येष्ठतासूचीबाबत कार्यवाही करावी.

५ **प्रारुप / तात्पुरती ज्येष्ठतासूची सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणण्यात यावी. याकरीता ज्येष्ठतासूची, विभाग / कार्यालयाच्या वेबसाईटवर उपलब्ध करुन, ज्येष्ठतासूची वेबसाईटवर उपलब्ध केल्याचे संबंधितांना अवगत करावे. अंतिम ज्येष्ठतासूचीबाबतही याप्रमाणे कार्यवाही करावी.**

६.	**यापुढे ज्येष्ठतासूची या शासन निर्णयासोबत विहित केलेल्या प्रपत्र "अ" (Format) नुसार प्रसिध्द करण्यात यावी.** तसेच ज्या संवर्गाच्या यापुर्वीच्या कालावधीच्या ज्येष्ठतासूची अद्याप प्रसिध्द केल्या नसतील त्या संवर्गाच्या बाबतीत, शक्य असल्यास ज्येष्ठतासूची या प्रपत्रानुसार तयार करुन प्रसिध्द करण्याची कार्यवाही करावी.

७.	नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी वरील निदेशाचे पालन करुन महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियम, १९८२ मधील तरतुदीनुसार, ज्येष्ठतासूची प्रत्येक वर्षी १ जानेवारी हा आधारभूत दिनांक मानून प्रसिध्द करण्याची व संबंधितांच्या निदर्शनास आणण्याची कार्यवाही करावी. **सूलभ संदर्भासाठी, ज्येष्ठतासूचीबाबतच्या कार्यपध्दतीची उदाहरणे शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट "ब" मध्ये दिली असून अधिक स्पष्टतेसाठी तळटिपा दिल्या आहेत. या उदाहरणांचे व त्याखालील टीपांचे काळजीपूर्वक अवलोकन करुन त्यानुसार उचित कार्यवाही करावी.**

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०११९०२११३०२४७००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

(Bakshi)

**के.पी.बक्षी**
**प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

राज्यपालांचे सचिव,राजभवन,मलबार हिल,मुंबई,
मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
सर्व विधान परिषद सदस्य, विधानसभा सदस्य,
मुख्य सचिव,
सर्व मंत्रालयीन विभागांचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली,
सर्व मंत्रालयीन विभाग (आस्थापना)
यांनी हा शासन निर्णय सर्व कार्यासनांच्या निदर्शनास आणावा व कार्यासनांनी विभागप्रमुखांच्या निदर्शनास आणावा.

* प्रबंधक,मूळ शाखा,उच्च न्यायालय,मुंबई ,
* प्रबंधक,अपील शाखा,उच्च न्यायालय,मुंबई,
* प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधीकरण, मुंबई.
* प्रबंधक,लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय,मुंबई,
* सचिव,महाराष्ट्र लोकसेवा आयोग,मुंबई ,
* प्रधान सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानपरिषद) मुंबई,
* प्रधान सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानसभा)मुंबई,
* राज्य निवडणूक आयुक्त,राज्य निवडणूक आयोग,नवीन प्रशासकीय भवन, मुंबई,

मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय,मुंबई, (२ प्रती प्रसिध्दीकरिता)
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख, प्रादेशिक विभागप्रमुख व कार्यालय प्रमुख,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने, निवडनस्ती,
*पत्राने.

**शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-२०११/प्र.क्र.२८४/१२, दि. २१.१०.२०११ सोबतचे प्रपत्र "अ"**

* संवर्गाची दिनांक रोजीची अंतिम ज्येष्ठतासुची

* संवर्गात दिनांक ते दिनांक या कालावधीत नियमित नियुक्त झालेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांची अंतिम ज्येष्ठतासुची

| अ.क्र. | ज्येष्ठता क्रमांक | नांव | प्रवर्ग # (नियुक्तीनंतर प्रवर्ग बदलला असल्यास त्याचा दिनांक) | जन्मतारीख | नियुक्ती दिनांक | $ नियुक्तीचा मार्ग (सरळसेवेने / मर्यादीत विभागीय परीक्षेद्वारे नियुक्त उमेदवारांचा गुणवत्ता क्रमांक व परीक्षेचे वर्ष. ) | ज्येष्ठता दिनांक/ ज्येष्ठतेचा मानीव दिनांक | सेवानिवृत्तीचा दिनांक | शैक्षणिक अर्हता @ | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |

* (टप्पा १ व टप्पा २ नुसार वेगवेगळया असल्याने जे लागू असेल ते नमूद करावे.

\# (१) सेवेत खुल्या प्रवर्गातून नियुक्ती झाली असून काही कालावधीनंतर मागास प्रवर्गाचा दावा सादर केला आहे व त्या प्रवर्गाचे वैध प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे
(२) सेवेत सर्वसाधारण (non-handicappped) घटकातून नियुक्ती झाली असेल व काही कालावधीनंतर अपंगत्वाचे वैध प्रमाणपत्र सादर केले असेल तर वरील (१) व (२) येथील प्रकरणी ज्या दिनांकास मागास प्रवर्गाचा दावा / अपंगत्वाचे वैध प्रमाणपत्र सादर केले असेल तो दिनांक नमूद करावा.

$ पदोन्नत / सरळसेवा / मर्यादीत विभागीय परीक्षा इ. (यापेक्षा वेगळया मार्गाने नियुक्ती झाली असल्यास त्याबाबत नमूद करावे.)

@ आवश्यक असल्यास अथवा पदोन्नतीकरिता शैक्षणिक अर्हता विहित केली असल्यास हा रकाना अंतर्भूत करावा.

## शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक- एसआरव्ही २०११/प्र.क्र.२८४/१२, दि. २१.१०.२०११ सोबतचे परिशिष्ट "ब"

**उदाहरण- {१}** (दि.१.१.२०११ साठी)

**तक्ता -१**

___________________कार्यालयातील ___________

संवर्गाची दिनांक १.१.२०१० रोजीची आधीच प्रसिध्द झालेली अंतिम (final) ज्येष्ठतासुची

| ज्येष्ठता क्रमांक | नांव | सेवानिवृत्तीचा दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|
| २ | ३ | ९ | |
| १ | श्री.कुलकर्णी | ३०.६.२०१३ | |
| २ | श्री.पवार | २८.२.२०१९ | |
| | | | |
| ३३ | श्री.आढाव | ३१.८.२०१७ | |
| | | | |
| १०६ | श्री.सलागरे | ३०.४.२०१२ | |

**तक्ता-१**
**टीप:-** ही ज्येष्ठतासूची आधीच अंतिमतः प्रसिध्द केली असल्याने दि.१.१.२०११ रोजी पून्हा तात्पूरती (provisional) प्रसिध्द करण्यात येऊ नये.

**टप्पा - १**

**तक्ता -२**

_____________कार्यालयातील _____________ संवर्गात दिनांक १.१.२०१० ते दि.३१.१२.२०१० या कालावधीत नियमित नियुक्त झालेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांची तात्पूरती अतिरिक्त (provisional additional) ज्येष्ठतासुची.

| ज्येष्ठता क्रमांक | नांव | सेवानिवृत्तीचा दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|
| १०७ | श्रीमती जोशी | ३१.३.२०१४ | |
| १०८ | श्री.मोरे | ३१.८.२०२० | |
| १०९ | श्री.कदम | ३०.९.२०१९ | |
| | | | |
| ११६ | श्री.पर्वते | २८.२.२०१९ | |

**तक्ता - २**
**टीप:-** फक्त दि.१.१.२०१० ते ३१.१२.२०१० या कालावधीत नियमित नियुक्त झालेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांचा समावेश असलेली दि.१.१.२०११ रोजीची तात्पूरती अतिरिक्त (provisional additional) ज्येष्ठतासूची प्रसिध्द करावी. या तात्पूरत्या अतिरिक्त ज्येष्ठतासूचीसंदर्भात आक्षेप नोंदविण्यास १५ दिवसाचा कालावधी देण्यात यावा व त्यानंतर आक्षेपाचे निराकरण करुन १५ दिवसात ज्येष्ठतासूची विभाग / कार्यालयाच्या स्तरावर अंतिम (final) करावी. परंतू अतिरिक्त अंतिम ज्येष्ठतासूची स्वतंत्ररित्या प्रसिध्द करण्यात येऊ नये. **त्यासंदर्भात टप्पा - २ चा अवलंब करावा.**

**टप्पा - २**

**तक्ता - ३**

___________________कार्यालयातील ___________

संवर्गाची दिनांक १.१.२०११ रोजीची अंतिम ज्येष्ठतासुची **(दि.१.१.२०१० रोजीची अंतिम ज्येष्ठतासूची व दि.१.१.२०१० ते ३१.१२.२०१० या कालावधीत नियमित नियुक्त झालेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांची अंतिम करण्यात आलेली ज्येष्ठतासूची एकत्रित करुन अंतिमतः प्रसिध्द करण्यात यावी.)**

| ज्येष्ठता क्रमांक | नांव | सेवानिवृत्तीचा दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|
| २ | ३ | ९ | |
| १ | श्री.कुलकर्णी | ३०.६.२०१३ | |
| २ | श्री.पवार | २८.२.२०१९ | |
| | | | |
| | | | |
| ३३ | श्री.आढाव | ३१.८.२०१७ | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| १०६ | श्री.सलागरे | ३०.४.२०१२ | |
| **खंड दिनांक १.१.२०१० ते दि.३१.१२.२०१०** | | | |
| १०७ | श्रीमती जोशी | ३१.३.२०१४ | |
| १०८ | *श्री.कदम | ३०.९.२०१९ | |
| १०९ | *श्री.मोरे | ३१.८.२०२० | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| ११६ | श्री.पर्वते | २८.२.२०१९ | |

**तक्ता - ३**
**टीप-१:-** दि.१.१.२०१० ची अंतिम (final) ज्येष्ठतासुची व १.१.२०१० ते ३१.१२.२०१० या कालावधीत नियमित नियुक्त झालेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांची अंतिम केलेली ज्येष्ठतासुची एकत्रित करुन दि.१.१.२०११ रोजीची अंतिम (final) ज्येष्ठतासूची प्रसिध्द करावी.
**टीप-२:-** वरीलप्रमाणे अंतिम (final) ज्येष्ठतासूची प्रसिध्द झाल्यानंतर यात समाविष्ट असलेल्या अधिकारी / कर्मचा-यांकडून नव्याने आक्षेप प्राप्त झाल्यास असे आक्षेप विचारात घेण्यात येऊ नये..
**टीप-३:-** या उदाहरणातील तात्पूरत्या अतिरिक्त ज्येष्ठतासूचीसदर्भात श्री..कदम यांचा आक्षेप विचारात घेऊन सर्वश्री कदम व मोरे यांच्या ज्येष्ठतेमध्ये बदल झाला आहे..

**टीप:-** उदाहरण स्वरुपात असल्याने केवळ ज्येष्ठता क्रमांक, नाव, सेवानिवृत्तीचा दिनांक हे रकाने भरले आहेत. तथापि अन्य रकाने विहित प्रपत्र "अ" नुसार राहतील.

**उदाहरण- {२}** (दि.१.१.२०१२ साठी)

**तक्ता - १**

____________________कार्यालयातील ____________

संवर्गाची दिनांक १.१.२०११ रोजीची आधीच प्रसिध्द झालेली अंतिम ज्येष्ठतासुची

| ज्येष्ठता क्रमांक | नांव | सेवानिवृत्तीचा दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|
| २ | ३ | ९ | |
| १ | श्री.कुलकर्णी | ३०.६.२०१३ | |
| २ | श्री.पवार | २८.२.२०१९ | |
| ३३ | श्री.आढाव | ३१.८.२०१७ | |
| | | | |
| १०६ | श्री.सलागरे | ३०.४.२०१२ | |
| **खंड दिनांक १.१.२०१० ते दि.३१.१२.२०१०** | | | |
| १०७ | श्रीमती जोशी | ३१.३.२०१४ | |
| १०८ | श्री.कदम | ३०.९.२०१९ | |
| १०९ | श्री.मोरे | ३१.८.२०२० | |
| | | | |
| ११६ | श्री.पर्वते | २८.२.२०१९ | |

**तक्ता - १**

**टीप**:- ही ज्येष्ठतासूची आधीच अंतिमत:प्रसिध्द केली असल्याने दि.१.१.२०१२ रोजी पून्हा तात्पूरती (provisional) प्रसिध्द करण्यात येऊ नये.

**टप्पा - १**

**तक्ता - २**

____________________कार्यालयातील ____________ संवर्गात दि.१.१.२०११ ते ३१.१२.२०११ या कालावधीत नियमित नियुक्त झालेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांची तात्पूरती अतिरिक्त (provisional additional) ज्येष्ठतासुची.

| ज्येष्ठता क्रमांक | नांव | सेवानिवृत्तीचा दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|
| ११७ | श्री.शिंदे | ३०.६.२०१३ | |
| ११८ | श्री. पाटणकर | २८.२.२०१९ | |
| | | | |
| १२७ | श्रीमती साळकर | २८.२.२०१९ | |

**तक्ता - २**

**टीप**:- फक्त दि.१.१.२०११ ते ३१.१२.२०११ या कालावधीत नियमित नियुक्त झालेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांचा समावेश असलेली दि.१.१.२०१२ रोजीची तात्पूरती अतिरिक्त (provisional additional) ज्येष्ठतासूची प्रसिध्द करावी. या तात्पूरत्या अतिरिक्त ज्येष्ठतासूचीसंदर्भात आक्षेप नोंदविण्यास १५ दिवसाचा कालावधी देण्यात यावा व त्यानंतर आक्षेपाचे निराकरण करुन १५ दिवसात ज्येष्ठतासूची विभाग / कार्यालयाच्या स्तरावर अंतिम (final) करावी. परंतू अतिरिक्त अंतिम ज्येष्ठतासूची स्वतंत्ररित्या प्रसिध्द करण्यात येऊ नये. **त्यासंदर्भात टप्पा - २ चा अवलंब करावा.**

**टप्पा - २**

**तक्ता - ३**

____________________कार्यालयातील ____________

संवर्गाची दिनांक १.१.२०१२ रोजीची अंतिम ज्येष्ठतासुची

**(दि.१.१.२०११ ची अंतिम (final) ज्येष्ठतासुची व दि.१.१.२०११ ते ३१.१२.२०११ या कालावधीत नियमित नियुक्त झालेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांची अंतिम करण्यात आलेली ज्येष्ठतासूची एकत्रित करुन अंतिमत: प्रसिध्द करण्यात यावी.)**

| ज्येष्ठता क्रमांक | नांव | सेवानिवृत्तीचा दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|
| २ | ३ | ९ | |
| १ | श्री.कुलकर्णी | ३०.६.२०१३ | |
| २ | श्री.पवार | २८.२.२०१९ | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| ३३ | श्री.आढाव | ३१.८.२०१७ | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| १०६ | श्री.सलागरे | ३०.४.२०१२ | |
| **खंड दिनांक १.१.२०१० ते दि.३१.१२.२०१०** | | | |
| १०७ | श्रीमती जोशी | ३१.३.२०१४ | |
| १०८ | श्री.कदम | ३०.९.२०१९ | |
| १०९ | श्री.मोरे | ३१.८.२०२० | |
| | | | |
| | | | |
| ११६ | श्री.पर्वते | २८.२.२०१९ | |
| **खंड दिनांक १.१.२०११ ते दि.३१.१२.२०११** | | | |
| ११७ | श्री.शिंदे | ३०.६.२०१३ | |
| ११८ | श्री. पाटणकर | २८.२.२०१९ | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| १२७ | श्रीमती साळकर | २८.२.२०१९ | |

**तक्ता - ३**

**टीप-१**:- दि.१.१.२०११ ची अंतिम (final) ज्येष्ठतासुची व दि.१.१.२०११ ते ३१.१२.२०११ या कालावधीत नियमित नियुक्त झालेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांची अंतिम केलेली ज्येष्ठतासुची एकत्रित करुन दि.१.१.२०१२ रोजीची अंतिम (final) ज्येष्ठतासूची प्रसिध्द करावी.

**टीप-२**:- वरीलप्रमाणे अंतिम (final) ज्येष्ठतासूची प्रसिध्द झाल्यानंतर यात समाविष्ट असलेल्या अधिकारी / कर्मचा-यांकडून नव्याने आक्षेप प्राप्त झाल्यास असे आक्षेप विचारात घेण्यात येऊ नये.

**टीप**:- उदाहरण स्वरुपात असल्याने केवळ ज्येष्ठता क्रमांक, नाव, सेवानिवृत्तीचा दिनांक हे रकाने भरले आहेत. तथापि अन्य रकाने विहित प्रपत्र "अ" नुसार राहतील.

**उदाहरण- {३}** (दि.१.१.२०१३ साठी)

**तक्ता -१**

______________ कार्यालयातील ______________

संवर्गाची दिनांक १.१.२०१२ रोजीची आधीच प्रसिध्द झालेली अंतिम (final) ज्येष्ठतासूची

| ज्येष्ठता क्रमांक | नांव | सेवानिवृत्तीचा दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|
| २ | ३ | ९ | |
| १ | श्री.कुलकर्णी | ३०.६.२०१३ | |
| | | | |
| १०६ | श्री.सलागरे | ३०.४.२०१२ | |
| **खंड दिनांक १.१.२०१० ते दि.३१.१२.२०१०** | | | |
| १०७ | श्रीमती जोशी | ३१.३.२०१४ | |
| | | | |
| ११६ | श्री.पर्वते | २८.२.२०१९ | |
| **खंड दिनांक १.१.२०११ ते दि.३१.१२.२०११** | | | |
| ११७ | श्री.शिंदे | ३०.६.२०१३ | |
| | | | |
| १२७ | श्रीमती साळकर | २८.२.२०१९ | |

**तक्ता -१**

**टीप**:- ही ज्येष्ठतासूची आधीच अंतिमतःप्रसिध्द केली असल्याने दि.१.१.२०१३ रोजी पून्हा तात्पूरती (provisional) प्रसिध्द करण्यात येऊ नये.

**टप्पा - १**

**तक्ता -२**

______________ कार्यालयातील ______________

संवर्गात दिनांक १.१.२०१२ ते दि.३१.१२.२०१२ या कालावधीत नियमित नियुक्त झालेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांची तात्पूरती अतिरिक्त (provisional additional) ज्येष्ठतासूची.

| ज्येष्ठता क्रमांक | नांव | सेवानिवृत्तीचा दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|
| १२८ | श्री.साठे | ३०.९.२०१५ | |
| १२९ | श्री. कानडे | ३१.१.२०१६ | |
| | | | |
| १३८ | श्री. कांबळे | ३१.१०.२०१९ | |

**तक्ता -२**

**टीप**:- फक्त दि.१.१.२०१२ ते ३१.१२.२०१२ या कालावधीत नियमित नियुक्त झालेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांचा समावेश असलेली दि.१.१.२०१३ रोजीची तात्पूरती अतिरिक्त (provisional additional) ज्येष्ठतासूची प्रसिध्द करावी. या तात्पूरत्या अतिरिक्त ज्येष्ठतासूचीसंदर्भात आक्षेप नोंदविण्यास १५ दिवसाचा कालावधी देण्यात यावा व त्यानंतर आक्षेपाचे निराकरण करुन १५ दिवसात ज्येष्ठतासूची विभाग / कार्यालयाच्या स्तरावर अंतिम (final) करावी. परंतू अतिरिक्त अंतिम ज्येष्ठतासूची स्वतंत्ररित्या प्रसिध्द करण्यात येऊ नये. **त्यासंदर्भात टप्पा - २ चा अवलंब करावा.**

**टप्पा - २**

**तक्ता -३**

______________ कार्यालयातील ______________

संवर्गाची दिनांक १.१.२०१३ रोजीची अंतिम ज्येष्ठतासूची **(दि.१.१.२०१२ ची अंतिम (final) ज्येष्ठतासुची व दि. १.१.२०१२ ते ३१.१२.२०१२ या कालावधीत नियमित नियुक्त झालेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांची अंतिम करण्यात आलेली ज्येष्ठतासूची एकत्रित करुन अंतिमतः प्रसिध्द करण्यात यावी.)**

| ज्येष्ठता क्रमांक | नांव | सेवानिवृत्तीचा दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|
| २ | ३ | ९ | |
| १ | श्री.कुलकर्णी | ३०.६.२०१३ | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| १०६ | श्री.सलागरे | ३०.४.२०१२ | |
| **खंड दिनांक १.१.२०१० ते दि.३१.१२.२०१०** | | | |
| १०७ | श्रीमती जोशी | ३१.३.२०१४ | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| ११६ | श्री.पर्वते | २८.२.२०१९ | |
| **खंड दिनांक १.१.२०११ ते दि.३१.१२.२०११** | | | |
| ११७ | श्री.शिंदे | ३०.६.२०१३ | |
| | | | |
| | | | |
| १२७ | श्रीमती साळकर | २८.२.२०१९ | |
| **खंड दिनांक १.१.२०१२ ते दि.३१.१२.२०१२** | | | |
| १२८ | श्री.साठे | ३०.९.२०१५ | |
| | | | |
| | | | |
| ० | श्री. कांबळे | ३१.१०.२०१९ | |

**तक्ता -३**

**टीप-१**:- दि.१.१.२०१२ ची अंतिम (final) ज्येष्ठतासूची व दि.१.१.२०१२ ते ३१.१२.२०१२ या कालावधीत नियमित नियुक्त झालेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांची अंतिम केलेली ज्येष्ठतासूची एकत्रित करुन दि.१.१.२०१३ रोजीची अंतिम (final) ज्येष्ठतासूची प्रसिध्द करावी.

**टीप-२**:- वरीलप्रमाणे अंतिम (final) ज्येष्ठतासूची प्रसिध्द झाल्यानंतर यात समाविष्ट असलेल्या अधिकारी / कर्मचा-यांकडून नव्याने आक्षेप प्राप्त झाल्यास असे आक्षेप विचारात घेण्यात येऊ नये.

**टीप:-** उदाहरण स्वरुपात असल्याने केवळ ज्येष्ठता क्रमांक, नाव, सेवानिवृत्तीचा दिनांक हे रकाने भरले आहेत. तथापि अन्य रकाने विहित प्रपत्र "अ" नुसार राहतील.

**उदाहरण- {४}** (दि.१.१.२०१४ साठी)

**तक्ता -१**

____________________ कार्यालयातील ____________

संवर्गाची दिनांक १.१.२०१३ रोजीची आधीच प्रसिध्द झालेली अंतिम (final) ज्येष्ठतासुची

| ज्येष्ठता क्रमांक | नांव | सेवानिवृत्तीचा दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|
| २ | ३ | ९ | |
| १ | श्री.कुलकर्णी | ३०.६.२०१३ | |
| | | | |
| १०६ | श्री.सलागरे | ३०.४.२०१२ | |
| **खंड दिनांक १.१.२०१० ते दि.३१.१२.२०१०** | | | |
| १०७ | श्रीमती जोशी | ३१.३.२०१४ | |
| | | | |
| ११६ | श्री.पर्वते | २८.२.२०१९ | |
| **खंड दिनांक १.१.२०११ ते दि.३१.१२.२०११** | | | |
| ११७ | श्री.शिंदे | ३०.६.२०१३ | |
| | | | |
| १२७ | श्रीमती साळकर | २८.२.२०१९ | |
| **खंड दिनांक १.१.२०१२ ते दि.३१.१२.२०१२** | | | |
| १२८ | श्री.साठे | ३०.९.२०१५ | |
| | | | |
| १३८ | श्री. कांबळे | ३१.१०.२०१९ | |

**तक्ता -१**

**टीप:-** ही ज्येष्ठतासूची आधीच अंतिमतः प्रसिध्द केली असल्याने दि.१.१.२०१४ रोजी पून्हा तात्पूरती (provisional) प्रसिध्द करण्यात येऊ नये.

**तक्ता -२**

____________________ कार्यालयातील ____________

संवर्गात दिनांक १.१.२०१३ ते दि.३१.१२.२०१३ या कालावधीत नियमित नियुक्त झालेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांची तात्पूरती अतिरिक्त (provisional additional) ज्येष्ठतासुची.

| ज्येष्ठता क्रमांक | नांव | सेवानिवृत्तीचा दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|
| १३९ | श्री.माने | ३१.३.२०१७ | |
| | | | |
| १४६ | श्रीमती पाटकर | ३०.४.२०१५ | |

**टप्पा - १**

**तक्ता -२**

**टीप:-** फक्त दि.१.१.२०१३ ते ३१.१२.२०१३ या कालावधीत नियमित नियुक्त झालेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांचा समावेश असलेली दि.१.१.२०१४ रोजीची तात्पूरती अतिरिक्त (provisional additional) ज्येष्ठतासूची प्रसिध्द करावी. या तात्पूरत्या अतिरिक्त ज्येष्ठतासूचीसंदर्भात आक्षेप नोंदविण्यास १५ दिवसाचा कालावधी देण्यात यावा व त्यानंतर आक्षेपाचे निराकरण करुन १५ दिवसात ज्येष्ठतासूची विभाग / कार्यालयाच्या स्तरावर अंतिम (final) करावी. परंतू अतिरिक्त अंतिम ज्येष्ठतासूची स्वतंत्ररित्या प्रसिध्द करण्यात येऊ नये. **त्यासंदर्भात टप्पा - २ चा अवलंब करावा.**

**टप्पा - २**

**तक्ता -३**

____________________ कार्यालयातील ____________

संवर्गाची दिनांक १.१.२०१४ रोजीची अंतिम ज्येष्ठतासुची

**(दि.१.१.२०१३ ची अंतिम (final) ज्येष्ठतासुची व १.१.२०१३ ते ३१.१२.२०१३ या कालावधीत नियमित नियुक्त झालेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांची अंतिम करण्यात आलेली ज्येष्ठतासूची एकत्रित करुन अंतिमतः प्रसिध्द करण्यात यावी.)**

| ज्येष्ठता क्रमांक | नांव | सेवानिवृत्तीचा दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|
| २ | ३ | ९ | |
| १ | श्री.कुलकर्णी | ३०.६.२०१३ | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| १०६ | श्री.सलागरे | ३०.४.२०१२ | |
| **खंड दिनांक १.१.२०१० ते दि.३१.१२.२०१०** | | | |
| १०७ | श्रीमती जोशी | ३१.३.२०१४ | |
| | | | |
| | | | |
| ११६ | श्री.पर्वते | २८.२.२०१९ | |
| **खंड दिनांक १.१.२०११ ते दि.३१.१२.२०११** | | | |
| ११७ | श्री.शिंदे | ३०.६.२०१३ | |
| | | | |
| | | | |
| १२७ | श्रीमती साळकर | २८.२.२०१९ | |
| **खंड दिनांक १.१.२०१२ ते दि.३१.१२.२०१२** | | | |
| १२८ | श्री.साठे | ३०.९.२०१५ | |
| | | | |
| | | | |
| १३८ | श्री. कांबळे | ३१.१०.२०१९ | |
| **खंड दिनांक १.१.२०१३ ते दि.३१.१२.२०१३** | | | |
| १३९ | श्री.माने | ३१.३.२०१७ | |
| | | | |
| | | | |
| १४६ | श्रीमती पाटकर | ३०.४.२०१५ | |

**तक्ता -३**

**टीप-१:-** दि.१.१.२०१३ ची अंतिम (final) ज्येष्ठतासुची व दि.१.१.२०१३ ते ३१.१२.२०१३ या कालावधीत नियमित नियुक्त झालेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांची अंतिम केलेली ज्येष्ठतासुची एकत्रित करुन दि.१.१.२०१४ रोजीची अंतिम (final) ज्येष्ठतासूची प्रसिध्द करावी.

**टीप-२:-** वरीलप्रमाणे अंतिम (final) ज्येष्ठतासूची प्रसिध्द झाल्यानंतर यात समाविष्ट असलेल्या अधिकारी / कर्मचा-यांकडून नव्याने आक्षेप प्राप्त झाल्यास असे आक्षेप विचारात घेण्यात येऊ नये.

**टीप:-** उदाहरण स्वरुपात असल्याने केवळ ज्येष्ठता क्रमांक, नाव, सेवानिवृत्तीचा दिनांक हे रकाने भरले आहेत. तथापि अन्य रकाने विहित प्रपत्र "अ" नुसार राहतील.

**उदाहरण- {५}**(दि.१.१.२०१५ साठी)

**तक्ता -१**

____________________कार्यालयातील ____________

संवर्गाची दिनांक १.१.२०१४ रोजीची आधीच प्रसिध्द झालेली अंतिम (final) ज्येष्ठतासुची

| ज्येष्ठता क्रमांक | नांव | सेवानिवृत्तीचा दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|
| २ | ३ | ९ | |
| १ | श्री.कुलकर्णी | ३०.६.२०१३ | |
| १०६ | श्री.सलागरे | ३०.४.२०१२ | |
| **खंड दिनांक १.१.२०१० ते दि.३१.१२.२०१०** | | | |
| १०७ | श्रीमती जोशी | ३१.३.२०१४ | |
| ११६ | श्री.पर्वते | २८.२.२०१९ | |
| **खंड दिनांक १.१.२०११ ते दि.३१.१२.२०११** | | | |
| ११७ | श्री.शिंदे | ३०.६.२०१३ | |
| १२७ | श्रीमती साळकर | २८.२.२०१९ | |
| **खंड दिनांक १.१.२०१२ ते दि.३१.१२.२०१२** | | | |
| १२८ | श्री.साठे | ३०.९.२०१५ | |
| १३८ | श्री. कांबळे | ३१.१०.२०१९ | |
| **खंड दिनांक १.१.२०१३ ते दि.३१.१२.२०१३** | | | |
| १३९ | श्री.माने | ३१.३.२०१७ | |
| १४६ | श्रीमती पाटकर | ३०.४.२०१५ | |

**तक्ता -१**

**टीप**:- ही ज्येष्ठतासूची आधीच अंतिमतः प्रसिध्द केली असल्याने दि.१.१.२०१५ रोजी पून्हा तात्पूरती (provisional) प्रसिध्द करण्यात येऊ नये.

**टप्पा - १**

**तक्ता -२**

____________________कार्यालयातील ____________

संवर्गात दिनांक १.१.२०१४ ते दि.३१.१२.२०१४ या कालावधीत नियमित नियुक्त झालेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांची तात्पूरती अतिरिक्त (provisional additional) ज्येष्ठतासुची.

| ज्येष्ठता क्रमांक | नांव | सेवानिवृत्तीचा दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|
| १४७ | श्री.गेडाम | ३०.६.२०१९ | |
| १५३ | श्री. गोरे | २८.२.२०१९ | |

**तक्ता -२**

**टीप**:- फक्त दि.१.१.२०१४ ते ३१.१२.२०१४ या कालावधीत नियमित नियुक्त झालेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांचा समावेश असलेली दि.१.१.२०१५ रोजीची तात्पूरती अतिरिक्त (provisional additional) ज्येष्ठतासूची प्रसिध्द करावी. या तात्पूरत्या अतिरिक्त ज्येष्ठतासूचीसंदर्भात आक्षेप नोंदविण्यास १५ दिवसाचा कालावधी देण्यात यावा व त्यानंतर आक्षेपाचे निराकरण करुन १५ दिवसात ज्येष्ठतासूची विभाग / कार्यालयाच्या स्तरावर अंतिम (final) करावी. परंतू अतिरिक्त अंतिम ज्येष्ठतासूची स्वतंत्ररित्या प्रसिध्द करण्यात येऊ नये. **त्यासंदर्भात टप्पा - २ चा अवलंब करावा.**

**टप्पा - २**

**तक्ता -३**

____________________कार्यालयातील ____________

संवर्गाची दिनांक १.१.२०१५ रोजीची अंतिम ज्येष्ठतासुची

**(दि.१.१.२०१४ ची अंतिम (final) ज्येष्ठतासुची व १.१.२०१४ ते ३१.१२.२०१४ या कालावधीत नियमित नियुक्त झालेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांची अंतिम करण्यात आलेली ज्येष्ठतासूची एकत्रित करुन अंतिमतः प्रसिध्द करण्यात यावी.)**

| ज्येष्ठता क्रमांक | नांव | सेवानिवृत्तीचा दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|
| २ | ३ | ९ | |
| १ | श्री.कुलकर्णी | ३०.६.२०१३ | |
| | | | |
| १०६ | श्री.सलागरे | ३०.४.२०१२ | |
| **खंड दिनांक १.१.२०१० ते दि.३१.१२.२०१०** | | | |
| १०७ | श्रीमती जोशी | ३१.३.२०१४ | |
| | | | |
| ११६ | श्री.पर्वते | २८.२.२०१९ | |
| **खंड दिनांक १.१.२०११ ते दि.३१.१२.२०११** | | | |
| ११७ | श्री.शिंदे | ३०.६.२०१३ | |
| | | | |
| १२७ | श्रीमती साळकर | २८.२.२०१९ | |
| **खंड दिनांक १.१.२०१२ ते दि.३१.१२.२०१२** | | | |
| १२८ | श्री.साठे | ३०.९.२०१५ | |
| | | | |
| १३८ | श्री. कांबळे | ३१.१०.२०१९ | |
| **खंड दिनांक १.१.२०१३ ते दि.३१.१२.२०१३** | | | |
| १३९ | श्री.माने | ३१.३.२०१७ | |
| १४६ | श्रीमती पाटकर | ३०.४.२०१५ | |
| | | | |
| **खंड दिनांक १.१.२०१४ ते दि.३१.१२.२०१४** | | | |
| १४७ | श्री.गेडाम | ३०.६.२०१९ | |
| | | | |
| १५३ | श्री. गोरे | २८.२.२०१९ | |

**तक्ता -३**

**टीप-१**:- दि.१.१.२०१४ ची अंतिम (final) ज्येष्ठतासुची व दि.१.१.२०१४ ते ३१.१२.२०१४ या कालावधीत नियमित नियुक्त झालेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांची अंतिम केलेली ज्येष्ठतासुची एकत्रित करुन दि.१.१.२०१५ रोजीची अंतिम (final) ज्येष्ठतासूची प्रसिध्द करावी.

**टीप-२:**- वरीलप्रमाणे अंतिम (final) ज्येष्ठतासूची प्रसिध्द झाल्यानंतर यात समाविष्ट असलेल्या अधिकारी / कर्मचा-यांकडून नव्याने आक्षेप प्राप्त झाल्यास असे आक्षेप विचारात घेण्यात येऊ नये.

**टीप**:- उदाहरण स्वरुपात असल्याने केवळ ज्येष्ठता क्रमांक, नाव, सेवानिवृत्तीचा दिनांक हे रकाने भरले आहेत. तथापि अन्य रकाने विहित प्रपत्र "अ" नुसार राहतील.

## उदाहरण- {६} दि.१.१.२०१६ रोजीची सर्वसमावेशक पंचवार्षिक ज्येष्ठतासूची.

**(१) दि.१.१.२०११ ते दि. १.१.२०१५ रोजीच्या अंतिम ज्येष्ठतासूच्यांमधील दि.३१.१२.२०१५ अखेर असलेले अधिकारी / कर्मचारी व (२) दि.१.१.२०१५ ते दि.३१.१२.२०१५ या कालावधीत नियमित नियुक्त अधिकारी / कर्मचारी यांची एकत्रित ज्येष्ठतासूची.**

____________ कार्यालयातील ________ संवर्गाची

दिनांक १.१.२०१६ ची तात्पुरती (provisional) ज्येष्ठतासूची

| ज्येष्ठता क्रमांक | नांव | सेवानिवृत्तीचा दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|
| २ | ३ | ९ | |
| १ | श्री.आढाव | ३१.८.२०१७ | |
| | | | |
| ६८ | श्री.कदम | ३०.९.२०१९ | |
| ६९ | श्री.मोरे | ३१.८.२०२० | |
| | | | |
| ८५ | श्री.कानडे | ३१.१.२०१६ | |
| ९४ | श्री.कांबळे | ३१.१०.२०१९ | |
| ९५ | श्री.माने | ३१.३.२०१७ | |
| १०१ | श्री.गेडाम | ३०.६.२०१९ | |
| १०५ | @श्री.शेख | ३१.८.२०१८ | |
| १०७ | श्री.गोरे | २८.२.२०१९ | |
| १०८ | #श्री.डिसोझा | ३०.११.२०२० | |
| १०९ | $कु.बेंद्रे | ३१.३.२०४२ | |

*श्री.कुलकर्णी, सेवानिवृत्त दि.३०.६.२०१३ श्री.पवार, तसेच श्री.आढाव यांना ज्येष्ठ असलेले सर्व अधिकारी / कर्मचारी, वरीष्ठ पदावर नियमित पदोन्नत / सेवानिवृत्त इ. श्री.सलागरे,से.नि.३०.४.२०१२,श्रीमती जोशी, से.नि.३१.३.२०१४, श्री.पर्वते, मयत १८.३.२०११, श्री.शिंदे, से.नि.३०.६.२०१३, श्री.पाटणकर, राजीनामा ३१.१२.२०१३, श्रीमती साळकर, स्वे.नि. ३१.५.२०१४, श्री.साठे, से.नि. ३०.९.२०१५, श्रीम.पाटकर, से.नि ३०.४.२०१५,@श्री.शेख यांना यापदावर पदोन्नतीचा मानीव दिनांक दिला आहे. #श्री.डिसोझा १५.६.२०१५ रोजी नियमित पदोन्नती. $कु.बेंद्रे सरळसेवेने (नियमित) नियुक्ती २५.१२.२०१५. (ही नावे उदाहरणादाखल दिली असून या अधिकारी/कर्मचाऱ्यांची नावे तात्पूरत्या व अंतिम ज्येष्ठतासूचीत अंतर्भूत होणार नाहीत. त्याबाबत ज्येष्ठतासूचीत वा त्याखाली उल्लेख करण्याची आवश्यकता नसावी.)

**टीप:-१** दि.१.१.२०११, १.१.२०१२, १.१.२०१३, १.१.२०१४, १.१.२०१५, रोजीच्या अंतिम ज्येष्ठतासूचीत समावेश असलेल्या अधिकारी / कर्मचा-यांपैकी सेवानिवृत्त, स्वेच्छानिवृत्त, मृत्यू, राजीनामा व अन्य कारणांमुळे दि.३१.१२.२०१५ रोजी सेवेत नसलेल्या तसेच **वरिष्ठ पदावर नियमित पदोन्नतीमुळे** दि.३१.१२.२०१५ रोजी या संवर्गात कार्यरत नसलेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांची नावे वगळण्यात यावी. व दि.१.१.२०१५ ते ३१.१२.२०१५ या कालावधीत नियमित नियुक्त झालेल्या अधिकारी / कर्मचा-यांसह दि.३१.१२.२०१५ रोजी या संवर्गात कार्यरत असलेल्या सर्व अधिकारी/कर्मचा-यांचा या ज्येष्ठतासूचीत समावेश करण्यात यावा.

**टीप-२**:- दि.३१.१२.२०१५ पुर्वी **वरिष्ठ पदावर तदर्थ पदोन्नती** दिलेल्या अधिकारीकर्मचाऱ्यांचाही या ज्येष्ठतासूचीत समावेश कायम ठेवण्यात यावा.

**टीप-३**:- यासंदर्भात आक्षेप नोंदविण्यास फक्त १५ दिवसाचा कालावधी न देता ३० दिवसाचा कालावधी देण्यात यावा व त्यानंतर आक्षेपाचे निराकरण करुन ३० दिवसात अंतिम ज्येष्ठतासूची प्रसिध्द करण्यात यावी.

____________ कार्यालयातील ________ संवर्गाची

दिनांक १.१.२०१६ रोजीची अंतिम (final) ज्येष्ठतासुची

| ज्येष्ठता क्रमांक | नांव | सेवानिवृत्तीचा दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|
| २ | ३ | ९ | |
| १ | श्री.आढाव | ३१.८.२०१७ | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| ६८ | श्री.कदम | ३०.९.२०१९ | |
| ६९ | श्री.मोरे | ३१.८.२०२० | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| ८५ | श्री.कानडे | ३१.१.२०१६ | |
| | | | |
| | | | |
| ९४ | श्री.कांबळे | ३१.१०.२०१९ | |
| ९५ | श्री.माने | ३१.३.२०१७ | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| १०१ | श्री.गेडाम | ३०.६.२०१९ | |
| | | | |
| | | | |
| १०५ | श्री.शेख | ३१.८.२०१८ | |
| | | | |
| १०७ | श्री.गोरे | २८.२.२०१९ | |
| १०८ | श्री.डिसोझा | ३०.११.२०२० | |
| १०९ | कु.बेंद्रे | ३१.३.२०४२ | |

**टीप-१**:- दि.१.१.२०१६ नंतरच्या वापरासाठी ही ज्येष्ठतासूची विचारात घ्यावी.

**टीप-२**:- दि.३१.१२.२०१५ अखेर या संवर्गात (वरिष्ठ पदावर तदर्थ पदोन्नत झालेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांसह) १०९ अधिकारी / कर्मचारी कार्यरत आहेत..

**टीप:-** उदाहरण स्वरुपात असल्याने केवळ ज्येष्ठता क्रमांक, नाव, सेवानिवृत्तीचा दिनांक हे रकाने भरले आहेत. तथापि अन्य रकाने विहित प्रपत्र "अ" नुसार राहतील.

**शासन परिपत्रक दिनांक ५.११.२००९ मधील क्रमांक ७ च्या आदेशास मा. उच्च न्यायालयाने स्थगिती दिली असल्याने सुधारित आदेश निर्गमित करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग

शासन निर्णय क्रमांक : बीसीसी २०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक : १२ डिसेंबर, २०११

**वाचा:** शासन परिपत्रक,सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक:बीसीसी २००९/प्र.क्र.२९१/०९/१६-ब, दिनांक ५ नोव्हेंबर, २००९.

**प्रस्तावना :-**

शासन परिपत्रक,सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक:बीसीसी २००९/प्र.क्र.२९१/०९/१६-ब, दिनांक ५ नोव्हेंबर, २००९ मधील क्रमांक ७ मध्ये शासनाने पुढीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत:-
"मागास प्रवर्गाच्या उमेदवारांना नियुक्ती अथवा पदोन्नती देत असताना जात वैधता प्रमाणपत्र असल्याखेरीज यापुढे नियुक्ती अथवा पदोन्नती देण्यात येवू नये."

याचिका क्र.२१३६/२०११ श्रीकांत चंद्रकांत सैदाणे विरुध्द महाराष्ट्र शासन यासह एकूण १५ याचिकांवर मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दि.२५ ऑगस्ट २०११ रोजी दिलेल्या आदेशान्वये शासन परिपत्रक दि.५.११.२००९ मधील क्रमांक ७ पुढील आदेश रद्द ठरविले आहेत.

**शासन निर्णय :-**

मा.उच्च न्यायालयाचे उपरोक्त आदेश विचारात घेवून शासन खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे :-

१) शासन परिपत्रक,सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक:बीसीसी २००९/प्र.क्र.२९१/०९/१६-ब, दिनांक ५ नोव्हेंबर, २००९ मधील क्रमांक ७ मध्ये शासनाने दिलेले आदेश याद्वारे रद्द करण्यात येत आहे.

२) सरळसेवाभरतीमध्ये ज्या उमेदवाराची निवड विशिष्ट मागासप्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागेवर झाली आहे, अशा उमेदवारास, त्याच्या जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्याच्या अधिन राहून तात्पुरती नियुक्ती करण्याबाबत नियुक्ती प्राधिकाऱ्याने आदेश निर्गमित करावेत.

३) नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर अशा उमेदवाराने नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आत आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता संबंधित जात पडताळणी समितीकडून करुन घेणे आवश्यक राहील. त्याने नियुक्ती स्विकारताच जात वैधता तपासणी करण्यासाठी प्रस्ताव संबंधित जात पडताळणी समितीकडे सादर करावा व जात पडताळणी समितीने दिलेल्या पोचपावतीची साक्षांकित प्रत नियुक्ती प्राधिका-यास सादर करावी. मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निदेशानुसार, संबंधित जात पडताळणी समितीने उमेदवारांचे जात पडताळणीचे प्रस्ताव सहा महिन्यांच्या आत निकाली काढावेत. जात पडताळणी समितीने त्याचे जात प्रमाणपत्र अवैध ठरविले, तर त्यास दिलेले

नियुक्ती आदेश त्वरीत रद्द करावेत, आणि त्या उमेदवाराविरुध्द नियुक्ती प्राधिकाऱ्याने महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० यातील तरतुदीनुसार त्वरीत कारवाई करावी.

याचिका क्र.२१३६/२०११ व अन्य याचिकांवर मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दि.२५ ऑगस्ट २०११ रोजी दिलेल्या आदेशाच्या विरोधात मा.सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथे एसएलपी दाखल करण्यात आली आहे, यावर मा.सर्वोच्च न्यायालयाकडून जे काही आदेश दिले जातील, त्या आदेशाच्या अधीन राहून उपरोक्त आदेश राहतील.

सर्व प्रशासकीय विभागांनी त्यांच्या सर्व अधिनस्त कार्यालयांच्या निदर्शनास सदर शासन निर्णय आणून द्यावा.

प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग आणि प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग यांनी सर्व जात पडताळणी समित्यांना वरील आदेशांचे काटेकोरपणे पालन करण्याचे निदेश द्यावेत व जात पडताळणी समित्यांकडे प्रलंबित असलेल्या प्रकरणांचा त्यांनी दरमहा आढावा घ्यावा, आढावा घेण्यात आल्यानंतर मासिक प्रगती अहवाल प्रधान सचिव (सा.वि.स.), सामान्य प्रशासन विभाग यांना पाठवावा.

सदरहू शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक२०१११२२८१०२२२२१२२२००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( सु. ना. रणखांबे )
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,
राज्यपाल यांचे सचिव,
मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव,
अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव सर्व मंत्रालयीन विभाग,
प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग आणि आदिवासी विकास विभाग
यांच्या अंतर्गत असलेल्या सर्व जात पडताळणी समित्यांचे सदस्य सचिव,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ शाखा, मुंबई,
प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,

प्रबंधक, लोकायुक्त आणि उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई,
राज्यातील सर्व महामंडळे आणि उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक,
सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,
सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका,
संचालक, समाजकल्याण, पुणे,
आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक,
संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,
संचालक, सेवायोजन, मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर,
महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा व परीक्षा), मुंबई/नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील विभाग व कार्यालय प्रमुख,
सर्व मंत्रालयीन विभाग,
ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई
निवड नस्ती, कार्यासन १६-ब

**मागासवर्गीयांकरीता पदोन्नतीसाठी**
**छोटया संवर्गातील आरक्षित पदे-**

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांक : बीसीसी २०११/प्र.क्र.१०५६/२०११/१६-ब,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ५ जानेवारी , २०१२

**वाचा:** **१)** शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: बीसीसी १०९४/सीआर ५७/९४/१६-ब, दिनांक ५ डिसेंबर, १९९४
**२)** शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: बीसीसी १०९७/प्र.क्र.२/९७/१६-ब, दिनांक २९ मार्च, १९९७
**३)** शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:बीसीसी १०९७/प्र.क्र.६३/९७/१६-ब, दिनांक १८ ऑक्टोबर, १९९७.
**४)** शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: बीसीसी २००८/प्र.क्र.४०७/०८/१६-ब, दिनांक २७ ऑक्टोबर, २००८

**शासन निर्णय :-**

याचिका क्र.३०७७/२०११ मागासवर्ग कर्मचारी/अधिकारी सुरक्षा महासंघ विरुध्द महाराष्ट्र शासन या प्रकरणी मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दि.२९ सप्टेंबर २०११ रोजी दिलेल्या आदेशान्वये वरील संदर्भ क्र.४ येथील शासन परिपत्रक दि.२७.१०.२००८ मधील आदेशास अंतरिम स्थगिती दिलेली आहे. त्यामुळे **दि.२७.१०.२००८ च्या शासन परिपत्रकाची अंमलबजावणी पुढील आदेश होईपर्यंत स्थगित करण्यात येत आहे.**

सर्व प्रशासकीय विभागांनी त्यांच्या सर्व अधिनस्त कार्यालयांच्या निदर्शनास सदर शासन निर्णय आणावा.

सदरहू शासन निर्णय शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१२०१०५०९४६४७१४७००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**( दि. रा. डिंगळे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

राज्यपाल यांचे सचिव,

D:\My Document\G.R.-B.C/G.R.

मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव,
अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ शाखा, मुंबई,
प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
प्रबंधक, लोकायुक्त आणि उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई,
राज्यातील सर्व महामंडळे आणि उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक,
सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,
सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका,
संचालक, समाजकल्याण, पुणे,
आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक,
संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,
संचालक, सेवायोजन, मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर,
महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा व परीक्षा), मुंबई/नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील विभाग व कार्यालय प्रमुख,
सर्व मंत्रालयीन विभाग,
ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई
निवडनस्ती,कार्यासन१६-ब

**अनुसूचित जमातीच्या राखीव जागांवर सरळ सेवेने नियुक्त अथवा पदोन्नत झालेल्या बिगर आदिवासी कर्मचारी /अधिकारी यांना शासकीय सेवेत घेतल्या-नंतर त्यांच्या सेवेत पडलेला खंड नियमित करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग,
शुध्दीपत्रक क्रमांक : बीसीसी २०११/प्र.क्र.९२९/११/१६-ब
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
दिनांक :- ७ जानेवारी, २०१२.

**वाचा :-** १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : बीसीसी -१०९४/प्र.क्र.६८/९४/ १६-ब, दिनांक १५ जून, १९९५.

२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : बीसीसी -१०९४/प्र.क्र. ६८/९४/ १६-ब, दिनांक २७ मे, २००२.

३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : बीसीसी -२००४/प्र.क्र.४५/०४/ १६-ब, दिनांक २४ जून, २००४.

४) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : बीसीसी -२००२/प्र.क्र.९३/०४/ १६-ब, दिनांक ३० जून, २००४.

५) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : बीसीसी -२००५/प्र.क्र.२८/०५/ १६-ब, दिनांक १५ डिसेंबर, २००५.

**<u>प्रस्तावना</u> :-** उपरोक्त क्रमांक १-४ येथील शासन निर्णयान्वये ज्या कर्मचारी /अधिकाऱ्यांनी दिनांक १५ जून, १९९५ पूर्वी अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे शासकीय / निमशासकीय सेवेत प्रवेश मिळविला आहे, अशा कर्मचारी /अधिकाऱ्यांचे जात वैधता प्रमाणपत्र अवैध ठरल्यास त्यांना पदावनत करण्यात येवू नये किंवा सेवेतून काढून टाकण्यात येवू नये, असे शासनाने ठरविले असून अशा कर्मचारी/ अधिकारी यांची सेवाजेष्ठता दिनांक १५ जून, १९९५ अशी निश्चित करण्यात यावी, असे शासनाने आदेश दिले आहेत. संदर्भाधीन क्रमांक ३ येथील दिनांक ३०.०६.२००४ च्या शासन निर्णयामध्ये "ज्या बिगर आदिवासींनी अनुसूचित जमातीच्या राखीव जागांवर दिनांक १५ जून, १९९५ च्या पूर्वी शासकीय/ निमशासकीय सेवेत नोकरी किंवा पदोन्नती मिळविलेल्या आहेत, त्यांना सेवेतून काढण्यात येवू नये किंवा पदावनत करु नये. त्यांना ते ज्या घटकाचे आहेत, त्या घटकात दाखविण्यात यावे यापुढे त्यांना त्या त्या घटकांचे आरक्षणाचे फायदे देय राहतील. अशा प्रकारे रिक्त झालेली पदे आदिवासी जमातीमधून भरण्यात यावीत", असे आदेश दिले आहेत.

ज्या अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या सेवा समाप्त करण्यात आल्या होत्या व ज्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना उपरोक्त संदर्भ क्र.४ येथील दि.३० जून, २००४ च्या शासन निर्णयानुसार पुन्हा सेवेत घेण्यात आले आहे, अशा अधिकारी/ कर्मचारी यांच्या सेवेतील खंड कसा नियमित करावा, याबाबत संदर्भाधीन क्रमांक ५ येथील दिनांक १५.१२.२००५ च्या शासन निर्णयानुसार आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. परंतु सदर शासन निर्णय दिनांक १५.१२.२००५ मधील प्रस्तावनेतील परिच्छेद २ मध्ये काही चुकीचे शब्दप्रयोग झाले असल्याचे निदर्शनास आल्यामुळे खालील प्रमाणे शुध्दीपत्रक निर्गमित करण्यात येत आहे.

**<u>शुध्दीपत्रक :-</u>**

शासन निर्णय क्रमांक : बीसीसी २००५/प्र.क्र.२८/०५/१६-ब, दिनांक १५.१२.२००५ मध्ये प्रस्तावनेमधील परिच्छेद ३ (सदर परिच्छेदाचा क्रमांक २ ऐवजी ३ असा चुकीने टंकलिखित झाला आहे.) खालील तक्त्यातील रकाना क्र.२ मध्ये दिल्याप्रमाणे वाचावा :-

| दि.१५.१२.२००५ च्या शासन निर्णयातील मूळ परिच्छेद | मूळ परिच्छेदाऐवजी समाविष्ट करावयाचा परिच्छेद |
|---|---|
| १ | २ |
| ३. दिनांक ३० जून २००४ च्या आदेशानुसार ज्या कर्मचारी/अधिकाऱ्यांची अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारावर दिनांक १५ जून १९९५ पूर्वी नियुक्ती किंवा पदोन्नती झाली आहे, तसेच अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र अवैध ठरल्यामुळे सदरील अधिकारी /कर्मचारी **विशेष मागास प्रवर्ग किंवा अन्य कोणत्याही मागास प्रवर्गातील प्रमाणपत्र** सादर करू शकले नाही. थोडक्यात महणजे जे कर्मचारी खुल्या प्रवर्गातील ठरले त्यांना देखील सदर शासन निर्णयान्वये त्यांच्या नियुक्तीस व पदोन्नतीस संरक्षण प्राप्त झाले. तथापि, जे अधिकारी / कर्मचारी दि.१५.६.९५ च्या शासन निर्णयान्वये विशेष मागास प्रवर्गाचे प्रमाणपत्र सादर करू शकले नव्हते, परंतु त्यांची नियुक्ती दिनांक १५.६.१९९५ पूर्वीची असून देखील त्यांना त्यांच्या नियुक्तीस संरक्षण प्राप्त झाले नव्हते. अशा कर्मचाऱ्यांना सेवेतून काढून टाकले होते. अशा काढून टाकण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना दिनांक ३० जून २००४ च्या शासन निर्णयानुसार सेवेत पुन्हा घेतल्यानंतर त्यांच्या सेवेत पडलेला सेवाखंड कशाप्रकारे नियमित करावा याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. याबाबत शासनाने आता खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे. | २. वरील निर्णयानुसार संबंधित कर्मचारी / अधिकारी यांनी सेवेस संरक्षण प्राप्त होण्यासाठी ते ज्या मागास प्रवर्गात आहेत, त्या मागास प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र /जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. तथापि, त्यांनी ते सादर केले नाही, या कारणास्तव अथवा वरील निर्णय घेतले जाण्यापूर्वी अथवा नंतर ज्यांना सेवेतून काढून टाकले होते व कांही कालावधीनंतर पुन्हा सेवेत घेण्यात आले आहे, अशा कर्मचारी /अधिकाऱ्यांच्या सेवेत पडलेला सेवाखंड कशा प्रकारे नियमित करावा, याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. याबाबत शासनाने आता खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे. |

हे शुध्दीपत्रक शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१२०१०९१००२०६१६००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**(सु. ना. रणखांबे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

मा. राज्यपाल यांचे सचिव,
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव / अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव /सचिव, मंत्रालयीन विभाग,
सर्व मंत्रालयीन विभाग
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
* प्रबंधक, लोकआयुक्त व उप लोकआयुक्त यांचे कार्यालय,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
* आयुक्त, अनुसूचित जाती /जमाती, भारत सरकार, पाचवा माळा, लोकनायक भवन, नवी दिल्ली,
* उप संचालक, अनुसूचित जाती /जमाती आयोग, भारत सरकार, चिपळूणकर भवन, शात्री मार्ग नवीपेठ, पुणे -४११ ०३०.
* विशेष आयुक्त, महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस मार्ग, नवी दिल्ली -११० ००१.
संचालक, समाज कल्याण, पुणे,
आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक,
आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,
संचालक, रोजगार व स्वंयरोजगार विभाग, मुंबई,
सहाय्यक आयुक्त (मागासवर्ग कक्ष) सर्व विभागीय आयुक्तांची कार्यालये,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुबई/ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
निवड नस्ती,
* पत्राने.

**सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा/विभागीय परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्यासंदर्भात लक्षात घ्यावयाच्या बाबी**

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग
परिपत्रक क्र.परीक्षा २०१२/प्र.क्र.३/१७
मंत्रालय,मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १३ सप्टेंबर,२०१२.

वाचा :- १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.ईएक्सडी १०७६/१९४५/१३७/१७, दिनांक १.११.१९७७
२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.ईएक्सडी १०७६/४५२/१७, दिनांक २८.११.१९७९
३) शासन परिपत्रक,क्र.सामान्य प्रशासन विभाग क्र.ईएक्सडी १०८०/३४/१७, दिनांक १७.५.१९८०.

**परिपत्रक**

शासन सेवेत विविध पदांवर कार्यरत असलेले अधिकारी / कर्मचारी यांना सेवेत कायम करणे, त्यांचा परिविक्षा कालावधी नियमित करणे, वरिष्ठ पदावर पदोन्नतीकरीता अर्हता ठरविणे इत्यादी कारणांसाठी, शासनाने सदर पदांवर कार्यरत असताना सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा/ विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक ठरविले असून त्याअनुषंगाने संबंधित परीक्षेचे नियम विहित केले आहेत. शासनाच्या असे निदर्शनास आले की, शासकीय कर्मचा-यांना विशिष्ट वयानंतर सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा / विभागीय परीक्षांच्या अभ्यासाकडे लक्ष केंद्रीत करुन विहित मुदतीत परीक्षा उत्तीर्ण होणे शक्य होत नाही. परिणामी त्यांना कायमपणाचे फायदे देता येत नाहीत. अशा परिस्थितीत त्यांना खालच्या पदावर पदावनत व्हावे लागते किंवा ते वरिष्ठ पदावर पदोन्नतीकरीता अपात्र ठरतात, त्यामुळे या बाबींचा सारासार विचार करुन, ज्या शासकीय कर्मचा-यांनी वयाची ४५ वर्षे पूर्ण केली आहेत, अशा कर्मचा-यांना वयाची ४५ वर्षे पूर्ण केल्यानंतर संबंधीत पदाकरीता विहित केलेली विभागीय परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्याकरीता संबंधीत विभागांनी त्यांच्याकडे अस्तित्वात असलेल्या विभागीय परीक्षा नियमात तरतूद करण्याचे व त्यांचा अंमल दि.१.११.१९७७ पासून देण्याचे निदेश संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये सर्व मंत्रालयीन विभागांना दिले आहेत. तसेच ज्या पदांच्या सेवा प्रवेश नियमामध्ये, परिविक्षा कालावधीत विभागीय परीक्षा उत्तीर्ण न केल्यास अशा उमेदवाराची / अधिका-यांची सेवा समाप्त

करण्याची तरतूद आहे अशा पदावर नियुक्त शासकीय कर्मचा-यांना, विभागीय परीक्षा उत्तीर्ण होण्यातून सूट देण्याचे आदेश लागू नसल्याचे संदर्भ क्र.२ येथील दि.२८.११.१९७९ च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र.१ (अ) अन्वये स्पष्ट करण्यात आले आहे.

२. उपरोक्त संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयाचा आधार घेवून विविध मंत्रालयीन विभाग, विभाग प्रमुख, नियुक्ती प्राधिका-यांकडून, वयाची ४५ वर्षे पूर्ण झालेल्या अधिकारी / कर्मचा-यांना सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा / विभागीय परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्याचे आदेश निर्गमित करण्यात येतात. परंतु यामध्ये एकसुत्रता नसल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. वस्तुतः शासकीय कर्मचा-यास विभागीय परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्यापूर्वी, संबंधीत कर्मचारी त्या पदावर कार्यरत आहे वा कसे, तो कर्मचारी त्या पदाकरीता विहित केलेल्या विभागीय परीक्षेस बसण्यास पात्र आहे वा कसे ? इत्यादी बाबी तपासून न पाहताच विभागीय परीक्षा उत्तीर्ण होण्यातून सूट देण्याचे आदेश संबंधित प्राधिका-यांकडून निर्गमित केले जातात. ही कार्यवाही योग्य नाही.

३. संबंधित पदांच्या सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा/ विभागीय परीक्षा नियमांमध्ये त्या परीक्षेकरीता बसण्यासंदर्भात आवश्यक ठरवलेली अर्हता व सेवेच्या कालावधीचा निकष पूर्ण केल्याशिवाय संबंधितांना परीक्षेला बसण्याची अनुमती देता येत नाही. उदा.मंत्रालय व महाराष्ट्र लोकसेवा आयोग कार्यालयामधील सहायकांना कक्ष अधिकारी पदावर पदोन्नतीकरीता विहित केलेल्या विभागीय परीक्षेला बसण्यासाठी सहायक पदाची सेवा प्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा उत्तीर्ण होणे आणि त्याने सहायक म्हणून ५ वर्षांची अखंड ( व नियमित) सेवा पूर्ण करणे आवश्यक आहे. या अटी पूर्ण केल्याशिवाय त्यांना कक्ष अधिकारी पदावर पदोन्नतीसाठीच्या विभागीय परीक्षेला बसता येत नाही. त्यामुळे या परीक्षेला बसण्यासाठी विहित केलेली अर्हता धारण करणा-या सहायकाला, (म्हणजेच सहायक पदावर ५ वर्षांची अखंड नियमित सेवा पूर्ण केल्यानंतर ) वयाची ४५ वर्षे पूर्ण झाल्यावर ही परीक्षा उत्तीर्ण होण्यातून सूट देता येईल,

४. जे कर्मचारी संबंधित पदाकरीता विहित केलेली सेवा प्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा किंवा विभागीय अर्हता परीक्षेला बसण्यासाठी पात्र नाहीत त्यांना सदर परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्याची कार्यवाही योग्य नाही. मंत्रालयीन विभागाच्या बाबतीत असेही निदर्शनास आले की, एक लिपिक टंकलेखकाने वयाची ४५ वर्षे पूर्ण केल्यानंतर त्या लिपिक- टंकलेखकास, लिपिक-टंकलेखकाची सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा, सहायकाची सेवा प्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा व कक्ष अधिकारी पदावर पदोन्नतीकरीता विहित केलेली विभागीय परीक्षा उत्तीर्ण होण्यातून सूट देण्याबाबत एकाच वेळी (एकाच दिनांकास सूट देण्याबाबत) आदेश एका विभागाने निर्गमित केले. विभागाची

सदर कार्यवाही योग्य नसल्याने त्या विभागास, आदेशात आवश्यक बदल करण्याबाबत कळविण्यात आले. आता देखील ब-याच विभागांकडून, तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती दिलेल्या लिपिक-टंकलेखक /सहायकास, वयाची ४५ वर्षे पूर्ण केल्यामुळे संबंधीत पदाची सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा उत्तीर्ण होण्यातून सूट देण्याबाबत अभिप्राय देण्याची विनंती सामान्य प्रशासन विभागाकडे करण्यात येते.

५. याअनुषंगाने वयाची ४५ वर्षे पूर्ण झालेल्या शासकीय कर्मचा-यांना विहित सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा/विभागीय परीक्षा उत्तीर्ण होण्यातून सूट देण्याची तरतूद संबंधित परीक्षा नियमात असल्यास सदर परीक्षा उत्तीर्ण होण्यातून सूट देण्याची कार्यवाही कशा प्रकारे करावी ही बाब खालील उदाहरणाद्वारे स्पष्ट करण्यात येत आहे :-

**उदा :-** मंत्रालयातील एका विभागातील शिपाई संवर्गातील "क्ष" (जन्म तारीख दि.१५-०७-१९६०) कर्मचा-यास लिपिक-टंकलेखक पदावर पदोन्नतीकरीता विहित केलेले निकष पूर्ण करीत असल्यामुळे पदोन्नती कोटयातील पदावर दि. १६-०८-२००६ रोजी ( वयाच्या ४६ व्या वर्षी ) नियमित पदोन्नती देण्यात आली.

**(अ)** या कर्मचा-याने शिपाई पदावर असतानाच वयाची ४५ वर्षे पूर्ण केली असली तरी त्याने ज्या दिवशी ( दि.१५-०७-२००५ रोजी ) ४५ वर्षे पूर्ण केली, त्या दिवसापासून त्याला लिपिक-टंकलेखकाची सेवा प्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा, सहायकाची सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा व सहायकांना कक्ष अधिकारी पदावर पदोन्नतीकरीता विहित केलेली विभागीय परीक्षा, या तीनही परीक्षा उत्तीर्ण होण्यातून सूट देता येणार नाही. सदर कर्मचारी संबंधित पदांकरीता विहित केलेल्या परीक्षेस बसण्यास पात्र आहे काय याची प्रथम तपासणी करावी लागेल. लिपिक-टंकलेखक पदासाठी विहित केलेल्या परीक्षेला बसण्यासाठी किमान कालावधी विहित केलेला नाही. तथापि, या पदावरील नियुक्ती नियमित असणे आवश्यक आहे. त्यामुळे या प्रकरणात "क्ष" कर्मचा-याने पदोन्नतीने लिपिक-टंकलेखक पदावर प्रत्यक्ष नियुक्तीनंतरच्या दुस-या दिवसापासून म्हणजेच दि.१७-०८-२००६ पासून त्याला लिपिक - टंकलेखक पदाकरीता विहित केलेल्या सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षेतून सूट देता येईल.

**(ब)** लिपिक-टंकलेखक पदावरुन सहायक पदावर पदोन्नती देण्यात येते. या पदावर पदोन्नतीसाठी सेवाप्रवेश नियमानुसार लिपिक-टंकलेखक पदावर किमान ३ वर्षे नियमित सेवा पूर्ण करणे आवश्यक आहे. सदर "क्ष" कर्मचा-यास सहायक पदावर पदोन्नती कोटयातील पदावर नियमित पदोन्नत देण्यात येईल (अथवा "क्ष" कर्मचारी सहायकांची मर्यादित विभागीय परीक्षा

उत्तीर्ण होऊन या पदावर पदोन्नत होईल) त्याच्या दुस-या दिवसापासून त्याला सहायकाची सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा उत्तीर्ण होण्यातून सूट देता येईल. "क्ष" कर्मचा-यास लिपिक-टंकलेखक पदावरील नियुक्तीनंतर ५ वर्षाने म्हणजेच दिनांक २०.११.२०११ रोजी सहायक पदी नियमित पदोन्नती मिळाली असे गृहित धरल्यास त्या कर्मचा-यास दि.२१-११-२०११ पासून सहायकाची सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा उत्तीर्ण होण्यातून सूट देता येईल.

**(क)** सहायक पदावरुन कक्ष अधिकारी पदावर पदोन्नतीकरीता विहित केलेल्या विभागीय परीक्षेस बसण्यासाठी सहायक पदावर किमान ५ वर्षाची नियमित सेवा पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यामुळे "क्ष" कर्मचारी सहायक पदावरील ५ वर्षाची नियमित सेवा ज्या दिनांकास पूर्ण करील त्यानंतरच्या दुस-या दिवसापासून या उदाहरणात दि.२१-११-२०१६ पासून त्याला कक्ष अधिकारी पदावर पदोन्नतीकरीता विहित केलेली परीक्षा उत्तीर्ण होण्यातून सूट देता येईल.

६. सर्व प्रशासकीय विभागांना निदेशित करण्यात येते की, संबंधीत पदाच्या सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण / विभागीय वा अन्य परीक्षा नियमात कर्मचा-यांना वयाची ४५ वर्षे पूर्ण केल्यानंतर सदर परीक्षा उत्तीर्ण होंण्यातून सूट देण्याची तरतूद असल्यास अशा कर्मचा-यांना परीक्षा उत्तीर्ण होण्यातून सूट देण्याबाबत वर स्पष्ट केल्यानुसार तपासणी करुन उचित कार्यवाही करावी. तसेच ज्या परीक्षा नियमात वयाची ४५ वर्षे झाल्यानंतर परीक्षा उत्तीर्ण होण्यातून सूट देण्याबाबत तरतूद नसल्यास, अशी तरतूद केल्याशिवाय परीक्षा उत्तीर्ण होण्यातून सूट देण्याबाबत कार्यवाही करु नये. आवश्यक वाटत असल्यास तरतूद करण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाच्या सहमतीने उचित कार्यवाही करावी. **ज्यांची सध्याच्या पदावरील सेवा नियमीत स्वरूपाची आहे व त्या पदाकरीता विहित केलेल्या परीक्षेला बसण्यासाठी विहित केलेली अर्हता व सेवा कालावधीचा निकष पूर्ण केला आहे अशा कर्मचाऱ्यांना ते ज्या दिवशी त्या परीक्षेला बसण्यासाठी पात्र असतील व त्यांनी वयाची ४५ वर्षे पूर्ण केली असतील फक्त अशा कर्मचाऱ्यांनाच त्या दिनांकापासून फक्त ती परीक्षा उत्तीर्ण होण्यातून सूट देता येईल. परीक्षा नियमात सूट देण्याची तरतूद असल्यास अशी सूट देता येईल. वयाची ४५ वर्षे पूर्ण केली याकारणास्तव सरसकट सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा / विभागीय परीक्षा अशा सर्व परीक्षा उत्तीर्ण होण्यातून सूट देण्याची तसेच ज्या कर्मचा-यांना तात्पुरती / तदर्थ स्वरुपात पदोन्नती दिली आहे व ते कर्मचारी त्या पदावरील परीक्षेस बसण्यास पात्रतेचा निकष पूर्ण करीत नाहीत अशा कर्मचा-यांना त्या पदाकरीता विहित केलेली सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा / विभागीय परीक्षा उत्तीर्ण होण्यातून सूट देता येणार नाही.** तसेच प्रशासकीय विभागाने मंत्रालयीन संवर्गातील कर्मचा-यांच्या बाबतीत लिपिक

टंकलेखक, सहायक पदाच्या सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा व कक्ष अधिकारी पदावर पदोन्नतीसाठीची विभागीय परीक्षा उत्तीर्ण होण्यातून एकाच आदेशान्वये व एकाच दिनांकापासून सूट देण्यात येणार नाही याची दक्षता घ्यावी.

७. वरील परिच्छेद २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे ज्या पदांच्या सेवा प्रवेश नियमामध्ये परिविक्षा कालावधीत विभागीय परीक्षा उत्तीर्ण न केल्यास संबंधित उमेदवारांची सेवा समाप्त करण्याची तरतूद आहे, अशा परिविक्षाधीन अधिकारी / कर्मचा-यांनी वयाची ४५ वर्षे पूर्ण केली तरी संदर्भाधीन दि.२८.११.१९७९ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार सदर विभागीय परीक्षा उत्तीर्ण होण्यातून सूट देता येणार नाही. त्यामुळे या शासन निर्णयात स्पष्ट केल्यानुसार परिविक्षाधीन अधिकारी / कर्मचारी यांना विभागीय परीक्षा उत्तीर्ण होण्यातून सूट देण्यात येऊ नये.

८. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग व विभाग प्रमुख यांनी वरील आदेशाचे काटेकोरपणे पालन करुन अधिकारी / कर्मचा-यांना संबंधित परीक्षा नियमातील तरतुदींच्या आधारे तपासणी करुनच परीक्षा उत्तीर्ण होण्यातून सूट देण्याबाबत उचित कार्यवाही करावी.

९. सदर परिपत्रक शासनाच्या वेबसाईटवरुन असून त्याचा संगणक संकेतांक क्र. 201209141128100100 असा आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

**( श्री . प्र. पाटील )**
**सह सचिव,महाराष्ट्र शासन**

प्रति,

१. मा. राज्यपालांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३. मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
४. सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
५. सचिव,महाराष्ट्र लोकसेवा आयोग,मुंबई
६. महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र,मुंबई,
७. महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा परीक्षा),महाराष्ट्र,मुंबई,
८. महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र,नागपूर,
९. महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा परीक्षा),महाराष्ट्र,नागपूर,
१०.अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई
११. निवासी लेखा परीक्षा अधिकारी,वांद्रा-कुर्ला संकुल,वांद्रा (पूर्व) मुंबई
१२. वित्त विभाग (सेवा-३),मंत्रालय,मुंबई
१३. सामान्य प्रशासन विभाग,का.क्र.८, १२, १४ अ/१४ ब, १९, मंत्रालय,मुंबई
१४. सर्व मंत्रालयीन विभाग (आस्थापना)
१५. सर्व विभाग प्रमुख
१६. निवड नस्ती.

मागासवर्गीय प्रवर्गातील कर्मचाऱ्यांबाबत जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी व जात प्रमाणपत्र अवैध ठरल्यास पुढील कार्यवाहीबाबत अनुसरावयाची कार्यपध्दती.

## महाराष्ट्र शासन

### सामान्य प्रशासन विभाग

याखेरीज संदर्भ २ वरील दि.१४.०९.२००९ च्या पत्रासोबतच्या इतिवृत्तामध्ये मानीव दिनांकाची प्रकरणे मान्य करताना शासनाची मान्यता घेतल्यानंतरच मानीव दिनांकाचे आदेश निर्गमित करण्याबाबतच्या सूचना दिलेल्या आहेत. मात्र प्रशासनात गतीमानता येण्यासाठी मानीव दिनांकाचे आदेश निर्गमित करण्याची प्रकरणे शासनास सादर न करता प्रशासकीय विभागाच्या सचिव स्तरावर निर्णय घेऊन निकाली काढण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय -**

वरील बाब लक्षात घेऊन मानीव दिनांकाच्या प्राधिकारासंदर्भात या शासन निर्णयान्वये खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत:-

१. पदोन्नतीच्या कोट्यातील पदावर नियमित पदोन्नती दिलेल्या कनिष्ठाच्या नियमित पदोन्नतीचा दिनांक हा ज्येष्ठ अधिकारी/कर्मचाऱ्यास मानीव दिनांक देण्याच्या अनुषंगाने गट-ब (अराजपत्रित), गट-क आणि गट-ड संवर्गातील पदांवर पदोन्नतीचे मानीव दिनांक देण्याचे

प्राधिकार विभाग प्रमुखांना राहतील. मात्र सदर विभाग प्रमुख मंत्रालयाच्या सचिव दर्जाचे अधिकारी असणे बंधनकारक राहील. परंतु जे विभाग प्रमुख सचिव दर्जाचे नसतील त्यांच्या नियंत्रणाखालील वरील संवर्गातील कर्मचाऱ्यांना मानीव दिनांक प्रदान करण्याचे प्राधिकार संबंधित मंत्रालयीन विभागाच्या सचिवांना राहतील.

२. गट-अ व गट-ब (राजपत्रित) या संवर्गातील अधिकाऱ्यांना मानीव दिनांक प्रदान करताना पूर्वीप्रमाणेच सामान्य प्रशासन विभाग आणि वित्त विभाग यांची मान्यता घेणे आवश्यक राहील. तथापि मानीव दिनांकास सामान्य प्रशासन विभाग व वित्त विभागाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर **मानीव दिनांकाचे आदेश निर्गमित करण्याचे अधिकार याव्दारे संबंधित प्रशासकीय विभागाच्या सचिवांना प्रदान करण्यात येत आहेत. परिणामी अशा प्रकरणी यापुढे शासनाची मान्यता घेण्याची आवश्यकता असणार नाही.**

३. प्रशासकीय विभागाने वा विभागप्रमुखाने सरळसेवेच्या कोट्यातील पदावर अथवा तदर्थ स्वरुपात दिलेल्या पदोन्नतीचा दिनांक हा मानीव दिनांक म्हणून देण्यास मान्यता देऊ नये वा असे प्रस्ताव सामान्य प्रशासन व वित्त विभागांच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येऊ नयेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०८२४१२०२४८१८०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Bhagwan Sahai

Digitally signed by Bhagwan Sahai
DN: c=IN, o=All India Service, ou=IAS, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Bhagwan Sahai
Date: 2015.08.24 12:06:04 +05'30'

**(डॉ. भगवान सहाय)**
**अपर मुख्य सचिव (सेवा), महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
२. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३. सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद / विधानसभा, विधानभवन, मुंबई,
५. सर्व मा. संसद सदस्य/विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य,
६. मा.मुख्य सचिव,
७. सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
८. सर्व मंत्रालयीन विभाग,

९. *प्रबंधक, मूळ शाखा, उच्च न्यायालय, मुंबई, औरंगाबाद व नागपूर,
१०. *प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई, औरंगाबाद व नागपूर,
११. *प्रबंधक, लोकायुक्त आणि उप लोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
१२.*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१३.*प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानसभा), मुंबई,
१४. *प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानपरिषद), मंबई,
१५.*सचिव, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई,
१६.*महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई,
१७.*महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई,
१८. *महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर,
१९. *महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, नागपूर,
२०. *सचिव, राज्य मुख्य माहिती आयुक्त यांचे कार्यालय, नवीन प्रशासन भवन, मुंबई,
२१. *प्रबंधक, राज्य मानवी हक्क आयोग, मुंबई ४०० ००१,
२२. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई (२ प्रती प्रसिध्दीकरिता),
२३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
२४. निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई,
२५. सर्व विभागीय आयुक्त,
२६. सर्व जिल्हाधिकारी,
२७. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
२८. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
२९. सर्व मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख, (मंत्रालयीन विभागांनी संबंधितांना प्रत पाठवावी)
३०. सामान्य प्रशासन विभाग/का. ३९ (महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्दीकरिता),
३१.ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ग्रंथालय, सहावा मजला, विधान भवन, मुंबई ४०० ०३२ (१० प्रती)
३२.सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
३३.निवड नस्ती.

**शासन सेवेत नियुक्ती करताना चारित्र्य पडताळणी संदर्भातील प्रकरणांबाबत निर्णय घेण्याकरिता मार्गदर्शनार्थ सूचना व समिती गठीत करण्याबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक : चापअ १०१२/प्र.क्र.६३/१६-अ
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २६ ऑगस्ट, २०१४.

**वाचा** :- १) शासन परिपत्रक, राजकीय व सेवा विभाग, क्रमांक ३३१०/४६, दिनांक १२.८.१९४८.
२) शासन परिपत्रक, राजकीय व सेवा विभाग, क्रमांक १७२४/३४, दिनांक २०.१०.१९४८.
३) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: व्हीसीए १०६०-डी, दिनांक २७.९.१९६०.
४) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक चापअ-१००१/ प्र.क्र.११०/२००१/१६-अ, दिनांक २६.११.२००२
५) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक चापअ-१००८/ प्र.क्र.५७/२००८/१६-अ, दिनांक ३०.०९.२००८.

**<u>प्रस्तावना</u> :-**

शासन सेवेत नियुक्ती करण्यापूर्वी उमेदवाराचे चारित्र्य व पूर्व चारित्र्य यांची तपासणी करुन ते सदोष नाही याची खात्री करुन घेण्याची आवश्यकता, याबाबतच्या सूचना संदर्भाधिन क्रमांक १ च्या आदेशात स्पष्ट करण्यात आल्या आहेत.

उमेदवाराचे चारित्र्य व पूर्व चारित्र्य यांचा तपासणी अहवाल सदोष असल्यास/ असमाधानकारक असल्यास, अशा प्रकरणी प्रत्येक प्रकरणातील गुन्हयाचे स्वरुप विचारात घेऊन संबंधित उमेदवारास शासन सेवेत घ्यावे किंवा कसे याबाबत सावधपणे जाणीवपूर्वक निर्णय घेण्याची आवश्यकता, याबाबतच्या सूचना संदर्भाधीन क्रमांक २ च्या आदेशात देण्यात आल्या आहेत.

शासन सेवेतील गट 'क' आणि गट 'ड' च्या पदावर उमेदवारांच्या नेमणुका करण्यापूर्वी / नेमणुकीनंतर चारित्र्य व पूर्वचारित्र्य यांची तपासणी करण्याबाबतच्या सूचना संदर्भाधीन क्रमांक ३ च्या आदेशान्वये देण्यात आल्या आहेत. संदर्भाधीन क्रमांक ३ च्या परिपत्रकान्वये गट 'क' व गट 'ड' ची पदे तात्काळ भरण्याबाबत नियुक्ती अधिका-यांची खात्री

झाल्यास चारित्र्य व पूर्व चारित्र्य पडताळणीच्या अधिन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदे भरण्याची मुभा देण्यात आली आहे.

संदर्भाधीन क्रमांक ४ च्या परिपत्रकान्वये शासनांतर्गत पदांवर नेमणुका करताना उमेदवाराचे चारित्र्य व पूर्व चारित्र्य याची पडताळणी करण्यासंदर्भात सुधारित साक्षांकन नमुना विहित करुन देण्यात आला आहे. सदर विहित नमुन्यात उमेदवाराने आपली वैयक्तिक माहिती भरुन दयावयाची आहे. सदर माहितीत उमेदवारांविरुध्द कोणत्याही न्यायालयात फौजदारी खटला सुरु आहे किंवा कसे, सुरु असल्यास त्याचा तपशील, प्रकरण क्रमांक, कोणत्या न्यायालयात प्रकरण प्रलंबित आहे, गुन्हा कोणत्या कलमाखाली नोंदविला आहे, इत्यादी तपशील नमूद करावयाचा आहे.

शासन सेवेत नियुक्ती देताना ज्या उमेदवारांविरुध्द पोलीस ठाण्यात तक्रार दाखल आहे वा त्यांचेवर गुन्हयाचा आरोप आहे अथवा ज्या उमेदवारांचे प्रकरण कोणत्याही न्यायालयात न्यायप्रविष्ठ आहे अथवा ज्यांना किरकोळ गुन्हयाकरिता शिक्षा झाली आहे अथवा ज्यांना सक्षम न्यायालयाने निर्दोष सोडले आहे , अशा उमेदवारांना शासन सेवेत नियुक्ती देता येईल किंवा कसे याचे निकष ठरविणे तसेच या प्रयोजनार्थ समतोल निर्णय घेण्यासाठी सर्व नियुक्ती प्राधिकारी यांना सहाय्य होण्याकरिता शासन स्तरावर तसेच जिल्हा स्तरावर एक समिती अथवा आवश्यकतेनुसार समित्या गठित करण्याच्या दृष्टीने सूचना निर्गमित करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यास अनुसरून आता खालील प्रमाणे सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

**<u>शासन परिपत्रक</u> :-**

महाराष्ट्र लोकसेवा आयोग पुरस्कृत उमेदवार किंवा अन्य कोणत्याही विहीत निवड प्रक्रियेव्दारे जिल्हास्तरीय व स्थानिक पातळीवरील सरळ सेवा भरतीसाठी पुरस्कृत उमेदवारांच्या नियुक्ती संदर्भात चारित्र्य व पूर्वचारित्र्य पडताळणीच्या साक्षांकन नमुन्यात उमेदवारांनी दिलेली माहिती तसेच अशा उमेदवारांच्या संदर्भात पोलीस विभागातर्फे करण्यांत आलेल्या पडताळणीच्या अनुषंगाने संबंधित नियुक्ती प्राधिका-याकडे सादर करण्यात आलेले सदर उमेदवाराचे चारित्र्य व पूर्वचारित्र्य पडताळणी अहवाल याचा साकल्याने विचार करून सदर उमेदवाराची शासन सेवेत नियुक्ती करावी किंवा कसे वा ज्यांची नियुक्ती अशा चारित्र्य व पूर्वचारित्र्य पडताळणी अहवाल प्राप्त होण्याच्या अधीन राहून करण्यात आलेली असेल ती पुढे चालू ठेवावी किंवा समाप्त करावी या करिता सक्षम नियुक्ती प्राधिकारी यांनी खालील निकष विचारात घ्यावेत तसेच पुढील कार्यपध्दतीचा अवलंब करावा:-

| | |
|---|---|
| ज्या उमेदवारांविरुध्द दिवाणी स्वरुपाचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत व त्यांचा अंतिमत: निकाल लागलेला आहे अशा गुन्ह्यांबाबत. | जे गुन्हे निव्वळ किरकोळ स्वरुपाचे आहेत व त्याबाबतीत न्यायालयात रितसर खटला चालवून आरोपींना रु.२,०००/- (रुपये दोन हजार फक्त) पर्यंत दंड किंवा किरकोळ स्वरुपाची शिक्षा झाली आहे अशा उमेदवारांना नियुक्ती देण्यास हरकत नसावी. |
| दिवाणी स्वरुपाचे गुन्हे जे न्यायप्रविष्ट आहेत वा अशा उमेदवारांविरुध्द प्राप्त झालेल्या तक्रारी दिवाणी स्वरुपाच्या आहेत अशा गुन्ह्यांबाबत. | अशा गुन्ह्याचे स्वरुप व त्याकरिता कायद्यानुसार निर्धारित महत्तम शिक्षा व दंड या सर्व बाबींचा साकल्याने विचार करुन नियुक्ती प्राधिकारी यांनी निर्णय घ्यावा. ज्या गुन्ह्याकरिता संभाव्य दंडाची कमाल मर्यादा रु.२,०००/-(रुपये दोन हजार फक्त) पर्यंत दंड किंवा किरकोळ स्वरुपाची शिक्षा असेल अशा उमेदवारांना नियुक्ती देण्यास हरकत नसावी. |
| ज्या उमेदवारांविरुध्द फौजदारी स्वरुपाचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत वा प्राप्त झालेल्या तक्रारी फौजदारी स्वरुपाच्या आहेत अशा गुन्ह्यांच्या दोन याद्या परिशिष्ट 'A' व परिशिष्ट 'B' येथे जोडल्या आहेत. | सदर दोन्ही याद्यांमधील नमूद असलेल्या गुन्हयांच्या संदर्भात अशा उमेदवारांविरुध्द सक्षम न्यायाधिकरणासमोर कार्यवाही सुरु असेल/प्रलंबित असेल त्या स्तरावर वा अशी कार्यवाही पूर्ण होऊन उमेदवारास अंतिमत: दोषी ठरविण्यात आल्यास त्या स्तरावर त्यांना नियुक्ती देण्यात येऊ नये/त्यांच्या सेवा समाप्त कराव्यात, अशा दोन्ही प्रकारच्या कार्यवाहीचे देखील सदर याद्यांमध्ये स्पष्टीकरण देण्यात आले आहे. त्यानुसार या गुन्ह्यांमध्ये अडकलेल्या/संशयित उमेदवारांना शासन सेवेत नियुक्ती देण्यात येऊ नये/नियुक्ती दिली असल्यास त्यांच्या सेवा समाप्त करण्यात याव्यात. |

दिवाणी व फौजदारी स्वरुपाचे गुन्हे जे न्यायप्रविष्ट आहेत अशा प्रकरणी तसेच फौजदारी स्वरुपाचे न्यायप्रविष्ट गुन्हे, FIR नोंदविण्यात आलेली प्रकरणे तसेच फौजदारी स्वरुपाच्या गुन्ह्यासंदर्भात संबंधित पोलीस ठाण्याकडे देण्यात आलेल्या तक्रार अर्जाबाबतच्या प्रकरणी पक्षकार असलेल्या उमेदवारास नियुक्ती दयावी किंवा कसे याबाबत समतोल (Balanced) निर्णय घेण्याकरिता नियुक्ती प्राधिकारी यांना सहाय्य (Assistance) होणे आवश्यक आहे. या व अनुषंगिक मुद्यांचा विचार करून निर्णय घेण्याकरिता खालीलप्रमाणे समिती/समित्या गठीत करण्यात येत आहेत-

**समिती – अ**

| **समिती – अ** | **सरळसेवेने भरावयाच्या सर्व स्तरावरील गट 'अ' व 'ब' च्या पदांकरिता व मंत्रालयीन व मुंबई विभागातील गट 'क' व 'ड' च्या पदांकरिता** |
|---|---|
| अध्यक्ष | अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग |
| सदस्य | प्रधान सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग |
| सदस्य | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (साविस) सा.प्र.विभाग |
| सदस्य | संबंधित विभागाचे सचिव |
| सदस्य | सचिव (विधी), विधी व न्याय विभाग |
| सदस्य | पोलीस महासंचालक अथवा त्यांचे प्रतिनिधी जे वर्ग -१ चे अधिकारी असतील |
| सदस्य सचिव | संबंधित विभागाचे उपसचिव |

शासकीय, निमशासकीय, महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदा, शासकीय अनुदानप्राप्त संस्था, विद्यापीठे, सहकारी संस्था, शासकीय उपक्रमे, महामंडळे, मंडळे, इत्यादी कार्यालयातील विविध पदांपैकी गट **'अ'** व गट **'ब'** च्या सरळसेवेने भरावयाच्या पदांच्या संदर्भात पोलिस विभागाकडून उमेदवाराचा चारित्र्य पडताळणी अहवाल प्रतिकूल प्राप्त झाल्यानंतर मंत्रालयातील संबंधित प्रशासकीय विभागाने अशी प्रकरणे निर्णयाकरिता उपरोक्त समितीसमोर सादर करावीत. समितीचा निर्णय प्राप्त करून घेवून अशी प्रकरणे विभागाने आपल्या विभागाच्या मा.मंत्री यांचेमार्फत मा.मुख्यमंत्री यांना मान्यतेसाठी सादर करावीत.

सरळसेवेने भरावयाच्या मंत्रालयीन व मुंबई विभागातील गट **'क'** व गट **'ड'** च्या पदांच्या संदर्भात अशी प्रकरणे विभागाने आपल्या विभागाच्या राज्यमंत्री यांचेमार्फत मा.राज्यमंत्री (सा.प्र.वि.) यांना मान्यतेसाठी सादर करावीत.

**समिती – ब**

| **समिती – ब** | **सरळसेवेने भरावयाच्या जिल्हा स्तरावरील गट 'क' व गट 'ड' च्या पदांकरिता** |
|---|---|
| अध्यक्ष | जिल्हाधिकारी |
| सदस्य | नियुक्ती प्राधिकारी |
| सदस्य | मा.उच्च न्यायालयाच्या संबंधित खंडपीठाकडील विधी व न्याय विभागाचे सह सचिव अथवा विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई येथील उप सचिव |
| सदस्य | पोलीस उपायुक्त / पोलीस अधिक्षक |
| सदस्य सचिव | निवासी उप जिल्हाधिकारी |

समिती-**ब** पुढे सादर करण्यात आलेल्या प्रकरणावर समितीने निर्णय दिल्यानंतर संबंधित

विभागाने या निर्णयानुसार संबंधित उमेदवारास नियुक्ती देण्यापूर्वी प्रकरण विभागाच्या मा.मंत्री महोदयांना सादर करावे.

उपरोक्त दोन्ही समित्यांनी या आदेशाच्या दिनांकापासून १५ दिवसांत पहिली बैठक बोलवावी व त्यामध्ये त्यांच्या कार्यकक्षे अंतर्गत येणा-या सर्व नियुक्ती प्राधिका-यांकडे प्राप्त झालेले उमेदवारांचे चारित्र्य व पूर्वचारित्र्य पडताळणी अहवालाच्या अनुषंगाने नियुक्ती देण्यासंदर्भात निर्णय घेण्याकरिता प्रलंबित असलेल्या प्रकरणांचा आढावा घेऊन उपरोक्तप्रमाणे सूचित केलेली कार्यवाही करावी. तसेच त्यापुढे किमान ३ महिन्यांतून एक बैठक आयोजित करुन या कालावधीतील अशा प्रकारच्या सर्व प्रकरणी निर्णय घ्यावा.

या दोन्ही समितीच्या सदस्य सचिव यांनी उपरोक्त विहीत मुदतीत कार्यवाही करण्यात येईल याची कटाक्षाने दक्षता घ्यावी व समितीच्या कार्यकक्षेत येणा-या सर्व शासकीय/निमशासकीय, स्वायत्त संस्था, महामंडळे, मंडळे, शासकीय उपक्रमे, विद्यापीठे यांच्या कार्यालयातील नियुक्ती प्राधिकारी यांना प्रथम बैठकीची व तद्नंतर आयोजित होणा-या सर्व बैठकांची वेळ प्रत्येक नियोजित बैठकीच्या किमान १० दिवस अगोदर सूचित करुन त्यांचेकडे प्रलंबित असलेल्या प्रकरणांची यादी व संबंधित माहिती गोळा करावी.

हे आदेश शासकीय, निमशासकीय कार्यालये, महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदा, शासकीय अनुदानप्राप्त संस्था, विद्यापीठे, सहकारी संस्था, शासकीय उपक्रमे, महामंडळे, मंडळे इत्यादींना लागू राहतील.

सदर परिपत्रक गृह विभाग, महसूल व वन विभाग व विधी व न्याय विभाग यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक २०१४०८२६१६२८३०३००७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Pramod Tryambakrao Nalawade

Digitally signed by Pramod Tryambakrao Nalawade
DN: c=IN, o=All India Services, ou=IAS, postalCode=110001, st=New Delhi, cn=Pramod Tryambakrao Nalawade
Date: 2014.08.27 14:42:18 +05'30'

**(प्रमोद त्र्यं. नलावडे)**
सचिव (सा.वि.स.), सामान्य प्रशासन विभाग,
महाराष्ट्र शासन.

**प्रत,**

१) मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई-३२,

२) सर्व सन्माननीय विधानपरिषद/विधानसभा व संसद सदस्य, महाराष्ट्र राज्य,
३) मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई -४०० ०३५,
४) मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव,मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२,
५) मा. उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२,
६) सर्व मा. मंत्री /मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२,
७) मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२,
८) शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२,
९) प्रधान सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानपरिषद),विधानभवन, मुंबई -४०० ०३२,
१०) प्रधान सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय ( विधानसभा), विधानभवन, मुंबई -४०० ०३२,
११) सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई -४०० ०३२,
१२) सचिव, राज्य माहिती आयोग, मुंबई -४०० ०३२,
१३) प्रबंधक, मा. उच्च न्यायालय, (मूळ न्याय शाखा), मुंबई, औरंगाबाद, नागपूर,
१४) प्रबंधक, मा.उच्च न्यायालय, (अपील शाखा), मुंबई, औरंगाबाद, नागपूर,
१५) प्रबंधक, मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, औरंगाबाद, नागपूर,
१६) प्रबंधक, मा. लोक आयुक्त व मा. उप लोक आयुक्त, मुंबई,
१७) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१८) सरकारी वकील, मा.उच्च न्यायालय, मूळ शाखा व अपील शाखा, मुंबई, औरंगाबाद, नागपूर,
१९) सरकारी वकील, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, औरंगाबाद, नागपूर,,
२०) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई,
२१) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर,
२२) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई - ४०० ०३२ (५ प्रती),

**त्यांना विनंती की, प्रस्तुत शासन परिपत्रक सर्व प्रसिध्दी माध्यमातून प्रसिध्द करण्यात यावे.**

२३) सर्व विभागीय आयुक्त/सर्व जिल्हाधिकारी,
२४) सर्व विभागातील उप सचिव (आस्था), मंत्रालय, मुंबई -४०० ०३२,
२५) सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,
२६) सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका,
२७) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
२८) राज्यातील सर्व महामंडळे, मंडळे आणि सार्वजनिक उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक,
२९) विधीमंडळ ग्रंथालय, विधानभवन, मुंबई (१० प्रती),
३०) सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांची मध्यवर्ती कार्यालये (प्रत्येकी ५ प्रती),
३१) निवड नस्ती/कार्या. १६-अ, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

**संबंधित उमेदवार ज्या गुन्ह्यामध्ये आरोपी आहेत अशा गुन्ह्यांची यादी व अशा गुन्ह्यात अडकलेल्या उमेदवारावर सुरु असलेली न्यायालयीन प्रक्रिया कोणत्या स्तरावर असेल तर त्याला शासकीय सेवेत नियुक्ती देण्यांत येऊ नये याचा तपशील (ही सर्व समावेशक यादी नाही. उदाहरणार्थ यादी आहे) (Illustrative List)**

परिशिष्ट -A

| Sr.No. | Crime Head | Candidates should be rejected on following criteria | |
|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **गुन्हा** | **उमेदवारास अपात्र ठरविण्याबाबत खालील निकष लागू राहतील** | |
| 1 | Murder | Convicted | Pending Trial |
| | मनुष्यवध/हत्या | दोषी | प्रलंबित खटला |
| 2 | Attempt to commit murder | Convicted | Pending Trial |
| | खुनाचा प्रयत्न | दोषी | प्रलंबित खटला |
| 3 | Culpable homicide not amounting to murder | Convicted | Pending Trial |
| | सदोष मानवहत्येचा प्रयत्न | दोषी | प्रलंबित खटला |
| 4 | Rape | Convicted | Pending Trial |
| | बलात्कार | दोषी | प्रलंबित खटला |
| 5 | Kidnapping & abduction | Convicted | Pending Trial |
| | अपहरण | दोषी | प्रलंबित खटला |
| 6 | Dacoity | Convicted | Pending Trial |
| | दरोडा | दोषी | प्रलंबित खटला |
| 7 | Preparation assembly for dacoity | Convicted | Pending Trial |
| | दरोड्याच्या उद्देशाने एकत्र जमणे | दोषी | प्रलंबित खटला |
| 8 | Robbery | Convicted | Pending Trial |
| | लूटमारी | दोषी | प्रलंबित खटला |
| 9 | Burglary | Convicted | -- |
| | चोरी/घरफोडी | दोषी | -- |
| 10 | Theft | Convicted | -- |
| | चोरी | दोषी | -- |
| 11 | Riots | Convicted | -- |
| | दंगल | दोषी | -- |
| 12 | Criminal breach of trust | Convicted | -- |
| | फौजदारी स्वरुपाचा विश्‍वासघात | दोषी | -- |
| 13 | Cheating/Forgery | Convicted | -- |
| | फसवणूक | दोषी | -- |

| | | | |
|---|---|---|---|
| **14** | Counterfeiting | Convicted | Pending Trial |
| | लबाडी/बनावट दस्तावेज तयार करणे | दोषी | प्रलंबित खटला |
| **15** | Arson | Convicted | -- |
| | मालमत्तेची नासधुस | दोषी | -- |
| **16** | Grave Hurt | Convicted | Pending Trial |
| | गंभीर इजा/दुखापत | दोषी | प्रलंबित खटला |
| **17** | Dowry Death | Convicted | -- |
| | हुंडाबळी | दोषी | -- |
| **18** | Molestation | Convicted | -- |
| | विनयभंग | दोषी | -- |
| **19** | Sexual Harassment | Convicted | -- |
| | लैंगिक अत्याचार | दोषी | -- |
| **20** | Cruelty by husband or relatives | Convicted | -- |
| | पती व त्याच्या नातेवाईकाकडून छळ | दोषी | -- |
| **21** | Importation of girl | Convicted | -- |
| | मुलींची तस्करी | दोषी | -- |

**संबंधित उमेदवार ज्या कायदयाखाली आरोपी आहेत अशा कायदयांची यादी व त्या कायदयाखाली सुरु असलेली न्यायालयीन प्रक्रिया कोणत्या स्तरावर असेल तर त्याला शासकीय सेवेत नियुक्ती देण्यांत येऊ नये याचा तपशील**
**(ही सर्व समावेशक यादी नाही. उदाहरणार्थ यादी आहे) (Illustrative List)**

**परिशिष्ट 'B'**

| Sr.No. | Special/Local Laws | Candidates should be rejected on following criteria | |
|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **अधिनियम** | **उमेदवारास अपात्र ठरविण्याबाबत खालील निकष लागू राहतील** | |
| 1 | Immoral Traffic (Prevention) Act, 1956 | Convicted | -- |
| | मानवी तस्करी (प्रतिबंध) अधिनियम, १९५६ | दोषी | -- |
| 2 | Explosive Substance Act, 1908 | Convicted | -- |
| | स्फोटक पदार्थ अधिनियम, १९०८ | दोषी | -- |
| 3 | The Dowry Prohibition Act, 1961 | Convicted | -- |
| | हुंडा प्रतिबंधक अधिनियम, १९६१. | दोषी | -- |
| 4 | Narcotic Drugs and Psychotropic Substances Act, 1985. | Convicted | Pending Trial |
| | मादक द्रव्ये व अंमली पदार्थ अधिनियम, १९८५. | दोषी | प्रलंबित खटला |
| 5 | Arms Act, 1959. | Convicted | Pending Trial |
| | शस्त्रास्त्रे अधिनियम, १९५९. | दोषी | प्रलंबित खटला |
| 6 | Scheduled Castes and Scheduled Tribes (Prevention of Atrocities)Act, 1989. | Convicted | Pending Trial |
| | अ.जा./अ.ज.यांचेवरील अत्याचार (प्रतिबंध) अधिनियम, १९८९. | दोषी | प्रलंबित खटला |
| 7 | Essential Commodity Act,1955 | Convicted | -- |
| | अत्यावश्यक वस्तु अधिनियम,१९५५ | दोषी | -- |

**पदोन्नतीच्या निवडसूचीस मान्यता घेणे व निवडसूचीनुसार रिक्त पदांवर पदोन्नतीने नियुक्ती देण्याचा प्रस्ताव एकत्रितरित्या शासनास सादर करण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन शुध्दीपत्रक क्रमांकः एसआरव्ही २०१५/व्हीआयपी २०९/प्र.क्र.४११ /कार्यासन १२**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०००३२
तारीख: २९ सप्टेंबर, २०१५

वाचा-

१. समक्रमांकाचे शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग दिनांक २४ ऑगस्ट २०१५

**शुध्दीपत्रक** -

संदर्भाधीन शासन परिपत्रकातील परिच्छेद २ मध्ये " सचिव व सचिव समकक्ष व त्यावरील पदांकरिता " ऐवजी " मंत्रालयीन सचिव व सचिव समकक्ष व त्यावरील पदांकरिता " असे वाचावे.

सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१५०९२९११०७०४२००७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sanjay Dhananjay Tavarej

Digitally signed by Sanjay Dhananjay Tavarej
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=DEPUTY SECRETARY, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=3aa0457256d1492696e8751c12e2206cc354b97121be5c1e55042e70e6f7e4f7, cn=Sanjay Dhananjay Tavarej
Date: 2015.09.29 11:10:54 +05'30'

**सं.ध.तवरेज**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
२. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३. सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद / विधानसभा, विधानभवन, मुंबई,
५. सर्व मा. संसद सदस्य/विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य,
६. मा.मुख्य सचिव,
७. सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
८. सर्व मंत्रालयीन विभाग,
९. *प्रबंधक, मूळ शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
१०. *प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
११. *प्रबंधक, लोकायुक्त आणि उप लोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
१२.*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१३.*प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानसभा), मुंबई,
१४. *प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानपरिषद), मंबई,

१५.*सचिव, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई,
१६.*महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई,
१७.*महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई,
१८. *महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर,
१९. *महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, नागपूर,
२०. *सचिव, राज्य मुख्य माहिती आयुक्त यांचे कार्यालय, नवीन प्रशासन भवन, मुंबई,
२१. *प्रबंधक, राज्य मानवी हक्क आयोग, मुंबई ४०० ००१,
२२. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई (२ प्रती प्रसिध्दीकरिता),
२३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
२४. निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई,
२५. सर्व विभागीय आयुक्त,
२६. सर्व जिल्हाधिकारी,
२७. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
२८. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
२९. सर्व मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
३०. सामान्य प्रशासन विभाग/का. ३९ (महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्दीकरिता),
३१.ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ग्रंथालय, सहावा मजला, विधान भवन, मुंबई ४०० ०३२ (१० प्रती)
३२.सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
३३.निवड नस्ती.

पदोन्नतीची प्रक्रिया पूर्ण होण्याच्या अनुषंगाने
करावयाच्या कार्यवाहीचे वेळापत्रक.

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः एसआरव्ही - २०१५/प्र.क्र. ५६६ /का-१२**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख : ०८ जानेवारी, २०१६

**शासन परिपत्रक -**

प्रशासकीय विभागाच्या अधिपत्याखालील अधिकारी/कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्याकरीता दरवर्षी दि.१ सप्टेंबर ते ३१ ऑगस्ट या कालावधीत रिक्त होणारी पदे विचारात घेऊन निवडसूच्या तयार केल्या जातात. सदरहू निवडसूचीतील अधिकारी/कर्मचाऱ्यांना पदोन्नती देऊन निरनिराळ्या कार्यालयातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येत असते. सदरच्या निवडसूच्या बनविण्याची कार्यवाही वेळीच केल्यास रिक्त झालेली व रिक्त होणारी पदे लगेच भरण्यास मदत होते. मात्र निवडसूच्या बनविण्याची कार्यवाही लांबल्यास प्रशासनातील रिक्त पदे भरण्यास अडचणी निर्माण होतात व त्यामुळे रिक्त पदांअभावी प्रशासनातील कामकाज चालविणे अडचणीचे ठरते.

वरील सर्व बाबी विचारात घेऊन खालील वेळापत्रकानुसार दरवर्षी पदोन्नतीची प्रक्रिया पूर्ण करण्याबाबत या शासन परिपत्रकान्वये सूचना देण्यात येत आहेत :-

| अ.क्र | दरवर्षी कार्यवाही पूर्ण करण्याची अंतिम तारीख | मुद्दा | करावयाची कार्यवाही |
|---|---|---|---|
| १ | दि. ३१ मार्च | अंतिम ज्येष्ठता यादी प्रसिध्द करणे | संबंधित वर्षाची दि.१ जानेवारी रोजीची ज्येष्ठतायादी अंतिम करुन प्रसिध्द करणे. |
| २ | दि. ३० जून | गोपनीय अहवाल संस्करण करणे | दि.३० जून अखेर गोपनीय अहवाल संस्करण करुन संबंधितांना कळविण्याचे आदेश असल्यामुळे सर्व अधिकाऱ्यांचे गोपनीय अहवाल दि.१ जुलै पर्यंत उपलब्ध करुन घेणे. |
| ३ | दि. ३१ जुलै | विचारक्षेत्रातील अधिकारी यांचा सेवा तपशिल संकलित करणे. | विचारक्षेत्रातील अधिकारी/ कर्मचाऱ्यांचा सेवा विषयक तपशिल जसे परिविक्षा कालावधी समाप्त करणे, विभागीय परीक्षा किंवा व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण होणे, मत्ता व दायित्व विवरणपत्र, जातवैधता प्रमाणपत्र याबाबतची माहिती उपलब्ध करुन घेणे. |
| ४ | दि. ३१ ऑगस्ट | रिक्त पदांची संख्या निश्चित करून मागासवर्ग | विभागाने दि. १ सप्टेंबर ते ३१ ऑगस्ट या कालावधीतील रिक्त पदांची संख्या |

| | | | |
|---|---|---|---|
| | | कक्षाकडून आरक्षण निश्चित करणे. | निश्चित करुन भरावयाच्या पदांवर मागासवर्गीय कक्षाचे किंवा सामान्य प्रशासन विभागाच्या कार्यासन १६-ब कडून आरक्षण निश्चित करुन घेणे. |
| ५ | दि.३० सप्टेंबर | विभागीय पदोन्नती समितीच्या बैठका आयोजित करणे. | भरावयाच्या पदांचे आरक्षण निश्चित केल्यानंतर विभागीय पदोन्नती समितीच्या बैठका आयोजित करणे व बैठकीचे इतिवृत्त अंतिम करणे. |
| ६ | दि.१५ ऑक्टोबर | १. सामान्य प्रशासन विभागाशी संबंधित नसलेल्या प्रकरणात नागरी सेवा मंडळाच्या शिफरशी प्राप्त करणे व नियुक्ती प्राधिकारी यांच्या मान्यतेने पदोन्नतीचे आदेश निर्गमित करणे.<br><br>२. सामान्य प्रशासन विभागाशी संबंधित प्रकरणात निवडसूचीचा प्रस्ताव साप्रवि कडे सादर करणे. | १. ज्या प्रकरणात सामान्य प्रशासन विभागाला निवडसूच्यांचे प्रस्ताव पाठविण्याची आवश्यकता नाही अशा प्रकरणात संबंधित नियुक्ती प्राधिकारी यांनी महसूली विभाग वाटपाबाबत असलेल्या अधिकारानुसार महसूल विभाग वाटप विचारात घेऊन व नागरी सेवा मंडळाच्या शिफारशी प्राप्त करुन दि. १५ ऑक्टोबर पूर्वी पदोन्नतीचे आदेश निर्गमित करणे.<br>२. ज्या प्रकरणात सामान्य प्रशासन विभागाचे अभिप्राय आवश्यक आहेत असे निवडसूचींचे प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागाकडे सादर करणे. |
| ७ | दि.३१ ऑक्टोबर | सामान्य प्रशासन विभागाने नियमानुसार सहमती दर्शविणे | सामान्य प्रशासन विभागाकडे प्राप्त झालेल्या प्रस्तावावर सामान्य प्रशासन विभागाने नियमानुसार तपासणी केल्यानंतर सहमती दर्शवून प्रस्ताव विभागास परत करणे. |
| ८ | दि. ३० नोव्हेंबर | १. विभागीय संवर्ग वाटपाचे विकल्प मागविणे.<br><br>२. विभागीय संवर्ग वाटपाचे व पदस्थापनेचे अधिकार | १. संबंधित प्रशासकीय विभागाने विभागीय संवर्ग वाटपाचे विकल्प मागवून पदस्थापनेचे प्रस्ताव नागरी सेवा मंडळापुढे सादर करणे.<br>२. ज्या राजपत्रित पदांचे विभागीय संवर्ग वाटपाचे व पदस्थापनेचे अधिकार |

| | | | |
|---|---|---|---|
| | | विभाग प्रमुखांना प्रत्यार्पित केले असल्यास निवडसूचीतील अधिकाऱ्यांची नावे त्यांच्या अधिपत्याखालील संबंधित विभाग प्रमुखांना कळविणे. | विभाग प्रमुखांना प्रत्यार्पित केले असतील अशा प्रकरणात निवडसूच्यांना शासनाची मान्यता घेऊन, संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागाने विभागीय संवर्ग वाटप करण्याकरीता व पदस्थापनेकरीता निवडसूचीतील अधिकाऱ्यांची नावे त्यांच्या अधिपत्याखालील संबंधित विभाग प्रमुखांना कळवतील. |
| | | ३. विभागप्रमुखांनी नागरी सेवा मंडळाच्या शिफारशी विचारात घेऊन पदस्थापनेची कार्यवाही करणे. | ३. ज्या प्रकरणात विभाग प्रमुखांना ज्या राजपत्रित पदांचे विभागीय संवर्ग वाटपाचे व पदस्थापनेचे अधिकार आहेत त्या प्रकरणात विभाग प्रमुखांनी विभागीय संवर्ग वाटपाचे विकल्प मागवावेत व पदस्थापनेचे प्रस्ताव नागरी सेवा मंडळापुढे सादर करावे. नागरी सेवा मंडळाच्या शिफारशी विचारात घेऊन निवडसूचीतील अधिकाऱ्यांना पदस्थापना देणे. |
| | | ४.मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी त्यांच्याकडील निवडसूचीच्या प्रस्तावास व निवडसूचीतील अधिकाऱ्यांच्या शासनाच्या मान्यतेनंतर आदेश निर्गमित करणे. | ४. मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी त्यांच्याकडील निवडसूचीच्या प्रस्तावास व निवडसूचीतील अधिकाऱ्यांच्या संदर्भातील नागरी सेवा मंडळाच्या शिफारशी विचारात घेऊन पदस्थापनेला शासनाची (प्रकरणपरत्वे मा. मंत्री वा मा. मुख्यमंत्री) मान्यता घेऊन पदोन्नतीचे आदेश निर्गमित करणे. |

तरी सर्व प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिपत्याखालील अधिकारी/कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्याकरीता वरील वेळापत्रकानुसार पदोन्नतीची प्रक्रिया पूर्ण करण्याची दक्षता घ्यावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०१०८१५२४५२८१०७ असा आहे. हे शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sanjay Dhananjay Tavarej

Digitally signed by Sanjay Dhananjay Tavarej
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=DEPUTY SECRETARY, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=3aa0457256d1492696e8751c12e2206cc354b97121be5c1e55042e70e6f7e4f7, cn=Sanjay Dhananjay Tavarej
Date: 2016.01.08 15:26:24 +05'30'

**(श्री.संजय ध.तवरेज)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
२. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३. सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद / विधानसभा, विधानभवन, मुंबई,
५. सर्व मा. संसद सदस्य/विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य,
६. मा.मुख्य सचिव,
७. सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
८. सर्व मंत्रालयीन विभाग,
९. सर्व विभागीय आयुक्त,
१०. सर्व जिल्हाधिकारी,
११. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
१२. सर्व मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख (मंत्रालयीन प्रशासकीय विभागामार्फत),
१३. सामान्य प्रशासन विभाग/का. ३९ (महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्दीकरिता),
१४. निवडसूची, सा.प्र.वि.-१२

**शासन सेवा प्रवेशाची कमाल वयोमर्यादा वाढविणेबाबत.**

# महाराष्ट्र शासन
## सामान्य प्रशासन विभाग
## शासन निर्णय क्रमांकः एसआरव्ही २०१५/प्र.क्र.४०४/कार्या.१२

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
तारीख: २५ एप्रिल, २०१६

वाचा :-

**१) शासन निर्णय क्रमांकः सामान्य प्रशासन विभाग क्र. एसआरव्ही-१०९२/प्र.क्र.१४/९२/१२, दि.२८ ऑक्टोबर, १९९२**

**प्रस्तावना :-**

शासन निर्णय क्रमांक-एसआरव्ही-१०९२/प्र.क्र.१४/९२/१२, दि.२८.१०.१९९२ अन्वये शासन सेवेतील गट-अ ते गट-ड मधील पदांवर नियुक्तीसाठी खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी ३० वर्षे व मागासवर्गीयांसाठी ३५ वर्षे कमाल वयोमर्यादा विहित करण्यात आलेली होती. तद्नंतर शासन निर्णय दि.१७.०८.२००४ अन्वये शासन सेवेतील गट-अ ते ड मधील सर्व पदांवर नियुक्तीसाठी कमाल वयोमर्यादा खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी ३३ वर्षे व मागासवर्गीयांसाठी ३८ वर्षे इतकी करण्यात आली. सदर वयोमर्यादा महाराष्ट्र लोकसेवा आयोग आणि विविध मंत्रालयीन विभागांनी/विभाग प्रमुखांनी नियुक्त केलेल्या राज्यस्तरीय निवडसमित्या, विभागीय स्तरावरील निवडसमित्या व जिल्हानिवड समित्या यांच्यामार्फत घेण्यात येणाऱ्या निरनिराळ्या पदांसाठीच्या स्पर्धा परीक्षाअन्वये शासन सेवा प्रवेशासाठी लागू करण्यात आली होती. शासन सेवा प्रवेशासाठी वयोमर्यादा वाढविणेबाबत विविध लोकप्रतिनिधी व मा.मंत्री तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेसाठी बसणाऱ्या उमेदवार यांचेकडून मागण्या/निवेदने प्राप्त झाली होती. त्यानुसार शासन सेवा प्रवेशासाठी वयोमर्यादा वाढविण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :-**

२. महाराष्ट्र लोकसेवा आयोग आणि विविध मंत्रालयीन विभागांनी/विभाग प्रमुखांनी नियुक्त केलेल्या राज्यस्तरीय निवडसमित्या, विभागीय स्तरावरील निवडसमित्या व जिल्हानिवड समित्या यांच्यामार्फत घेण्यात येणाऱ्या निरनिराळ्या पदांसाठीच्या स्पर्धा परीक्षाअन्वये शासन सेवेतील प्रवेशासाठी, खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी सध्या कमाल वयोमर्यादा ३३ वर्षे आहे त्यामध्ये ५ वर्षांनी वाढ करुन त्यांची कमाल वयोमर्यादा ३८ वर्षे व मागासवर्गीय उमेदवारांसाठी सध्या कमाल वयोमर्यादा ३८ वर्षे आहे त्यामध्ये ५ वर्षांनी वाढ करुन त्यांची कमाल वयोमर्यादा ४३ वर्षे करण्यात येत आहे.

३. या शिवाय ज्या प्रवर्ग/ घटकांकरीता सध्या असलेली कमाल वयोमर्यादा ४३ वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक आहे त्यामध्ये कोणतीही वाढ करण्यात येणार नाही.

४. एखाद्या पदाच्या भरतीच्या अनुषंगाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने/संबंधीत निवडसमितीकडून जाहिरात दिली असेल व जाहिरातीनुसार अर्ज करण्याची मुदत या निर्णयाच्या दिनांकापूर्वी संपली

असेल, अशा प्रकरणी सदर वाढीव वयोमर्यादा लागू होणार नाही. सबब या पुढील भरती प्रक्रियेसाठी सदर वाढीव मर्यादा लागू राहील.

५. मंत्रालयाच्या विविध विभागांनी आपापल्या कक्षेतील पदांच्या संदर्भात संबंधित सेवाप्रवेश नियमात वरील बदल अंतर्भूत करण्याची कार्यवाही करावी आणि अशाप्रकारे कार्यवाही पूर्ण होईपर्यंतच्या कालावधीतील नेमणूका देखील या वाढीव वयोमर्यादेनुसार कराव्यात.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०४२५१५४८५३११०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Bhagwan Muralidhar Sahai

Digitally signed by Bhagwan Muralidhar Sahai
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=GAD, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=57dd6ec1681532b63c78bdc2d0f79ab4b9efccc6814de3df1f59d557777b3c45, cn=Bhagwan Muralidhar Sahai
Date: 2016.04.25 15:52:13 +05'30'

**( डॉ.भगवान सहाय )**

अपर मुख्य सचिव (सेवा), महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
२. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३. सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद / विधानसभा, विधानभवन, मुंबई,
५. सर्व मा. संसद सदस्य/विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य,
६. मा.मुख्य सचिव,
७. सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
८. सर्व मंत्रालयीन विभाग,
९. *प्रबंधक, मूळ शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
१०. *प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
११. *प्रबंधक, लोकायुक्त आणि उप लोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
१२.*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१३.*प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानसभा), मुंबई,
१४. *प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानपरिषद), मंबई,
१५.*सचिव, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई,
१६.*महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई,
१७.*महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई,

१८. *महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर,
१९. *महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, नागपूर,
२०. *सचिव, राज्य मुख्य माहिती आयुक्त यांचे कार्यालय, नवीन प्रशासन भवन, मुंबई,
२१. *प्रबंधक, राज्य मानवी हक्क आयोग, मुंबई ४०० ००१,
२२. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई (२ प्रती प्रसिध्दीकरिता),
२३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
२४. निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई,
२५. सर्व विभागीय आयुक्त,
२६. सर्व जिल्हाधिकारी,
२७. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
२८. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
२९.सर्व मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
३०. सामान्य प्रशासन विभाग/का. ३९ (महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्दीकरिता),
३१.ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ग्रंथालय, सहावा मजला, विधान भवन, मुंबई ४०० ०३२ (१० प्रती)
३२.सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
३३. निवड नस्ती.

# महाराष्ट्र शासन

**क्रमांक:** -बीसीसी-२०१६/प्र.क्र. २९५A/१६-ब
सामान्य प्रशासन विभाग,
हुतात्मा राजगुरू चौक,मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
**दिनांक-** २२ जुलै, २०१६

**प्रति,**

**सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव /सचिव**
सर्व मंत्रालयीन विभाग,
मंत्रालय, मुंबई ३२.

**विषय:- १) सरळसेवा बिंदुनामावली / मागणीपत्र सादर करणेबाबत.**
**२) पदोन्नतीची बिंदुनामावली व आरक्षण निश्चितीचे प्रस्ताव सादर करण्याबाबत.**

महोदय,

राज्य शासनातील गट-अ व गट-ब या संवर्गातील सरळसेवा भरती व पदोन्नत्या संबंधित प्रशासकीय विभागामार्फत करण्यात येतात. त्यासाठी प्रशासकीय विभागाने संबंधित विभागाची बिंदुनामावली व आरक्षण निश्चितीस सामान्य प्रशासन विभाग, कार्यासन १६-ब ची मान्यता घेणे आवश्यक आहे.

२. पदोन्नतीचे प्रस्ताव कशा पध्दतीने सामान्य प्रशासन विभागास सादर करावेत, याविषयीच्या सविस्तर सुचना या विभागाच्या क्र. एसआरव्ही-२०१०/प्र.क्र.३४७/१०/१२, दिनांक २४.२.२०११ च्या परिपत्रकान्वये तसेच शासन पत्र क्रमांक बीसीसी-२०१३/प्र.क्र.१०२५/१६-ब दिनांक ३०.११.२०१२ अन्वये दिलेल्या आहेत. सदर परिपत्रक व पत्रामध्ये प्रशासकीय विभागाकडून सादर होणाऱ्या प्रस्तावांमध्ये कोणकोणत्या कागदपत्रांची आवश्यकता आहे याबाबत स्पष्ट केले आहे. तरीही प्रशासकीय विभागाकडून सादर होणाऱ्या प्रस्तावाची तपासणी करताना साधारणत: खालील प्रमाणे त्रुटी आढळून येतात. :-

१) प्रस्तावासोबत सेवा प्रवेश नियम जोडलेले नसतात. त्यामुळे पदभरतीचे प्रमाण स्पष्ट होत नाही. पदोन्नतीची अर्हता स्पष्ट होत नाही.

२) प्रस्तावासोबत मंजूर पदे स्पष्ट होण्यासाठी, मंजूर पदांचा आकृतीबंध सादर केलेला नसतो अथवा वेगवेगळया शासन निर्णयाच्याआधारे पदे मंजूर असल्यास त्यांचा परिपूर्ण तपशील दिलेला नसतो.

३) बिंदुनामावली प्रस्तावासोबत सादर केलेली नसते अथवा त्यातील नोंदी विहित नमुन्यात तसेच अद्ययावत नसतात.

४) अद्ययावत सेवा ज्येष्ठता यादी सादर केलेली नसते.

यास्तव उपरोक्त त्रुटींची पूर्तता करून खालील प्रमाणे प्रस्ताव सामान्य प्रशासन विभाग, कार्यासन १६-ब यांना आरक्षण तपासणीसाठी प्रस्ताव सादर करावेत.

**पदोन्नती बिंदुनामावली व आरक्षण निश्चितीचे प्रस्ताव :-**

१) सामान्य प्रशासन विभागाच्या क्रमांक बीसीसी-१०९७/प्र.क्र.६३/९७/१६-ब, दिनांक १८.१०.१९९७ मध्ये पदोन्नतीची बिंदुनामावली जोडलेली आहे. त्यानुसार बिंदुनामावली लिहिणे आवश्यक आहे.

२) सामान्य प्रशासन विभागाच्या क्रमांक एसआरव्ही-२०१०/प्र.क्र.३४७/१०/१२, दिनांक २४.२.२०११ च्या परिपत्रकातील सूचनांप्रमाणे पदोन्नतीचा प्रस्ताव तयार करण्यात यावा.

३) त्यानुसार सर्व प्रशासकीय विभागांनी पदोन्नतीच्या प्रस्तावांवर विहित मुदतीत कार्यवाही होण्याच्या दृष्टिने नमुना-अ मध्ये विहित केलेल्या विवरण पत्रात प्रस्ताव सादर करण्याबाबत पुन्हा सूचना देण्यात येत आहे.(प्रत संलग्न)

४) विभागांनी ऑनलाईन बिंदुनामावली त्वरीत तयार करुन त्यानुसार बिंदुनामावल्या तपासून घेण्याबाबत कार्यवाही करावी.

५) दिनांक १ सप्टेंबर रोजीची स्थिती दर्शविणारी स्थिती प्रमाणित बिंदुनामावली (उदा. दिनांक ३१.८.२०१६ अखेरची प्रमाणित बिंदुनामावली) व निवडसूचीकरिता दिनांक१.९.२०१६ ते ३१.८.२०१७ असे भरती वर्ष विचारात घ्यावे.

६) विभागाने ऑनलाईन बिंदुनामावली या विभागाकडून मान्य करुन घेतली असल्यास आरक्षण निश्चिती करतांना सदर प्रमाणित ऑनलाईन बिंदुनामावलीची प्रत प्रस्तावासोबत सादर करावी.

**सरळसेवा बिंदुनामावली व मागणीपत्राचे प्रस्ताव :-**

**३.** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील पदे दिर्घकाळ रिक्त राहू नयेत, यासाठी विहित कालावधीत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे मागणीपत्र पाठविण्याची कार्यपध्दती शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-मलोआ-२०१०/प्र.क्र.२८०/१०/आठ, दिनांक ८ एप्रिल, २०११ अन्वये निश्चित करण्यात आलेली आहे. याशिवाय विभागाचे लक्ष शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-एसआरव्ही-२०१२/प्र.क्र.१८६/१२, दिनांक २८ फेब्रुवारी, २०१२ कडे वेधण्यात येत आहे. त्यानुसार सर्व प्रशासकीय विभागांनी कार्यवाही करणे अभिप्रेत आहे.

१) या शासन पत्राव्दारे गट-अ व गट-ब (राजपत्रित) ची सरळसेवेची दिनांक ३१.१२.२०१५ अखेर रिक्त पदे व दिनांक १.१.२०१६ ते दि.३१.१२.२०१६ अखेर रिक्त होणारी पदे

भरण्यासाठी मागणीपत्र पाठविण्याची कार्यवाही विहित मुदतीत विभागाने करणे अपेक्षित आहे. त्यानुसार विभागाने **नमुना-ब मध्ये** प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. :-

२. दिनांक १ जानेवारी रोजीची स्थिती दर्शविणारी प्रमाणित बिंदुनामावली (**उदा.** दि.१.१.२०१६ अखेरची प्रमाणित बिंदुनामावली) व निवडसूचीकरिता दि.१.१.२०१६ ते ३१.१२.२०१६ असे भरती वर्ष विचारात घ्यावे.

३. सदर सरळसेवेची बिंदुनामावली तयार करताना शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभागाच्या क्रमांक बीसीसी-१०९७/प्र.क्र.२/९७/१६-ब, दिनांक २९.३.१९९७ मधील बिंदुनामावली विचारात घ्यावी.

४. बिंदुनामावलीमध्ये विहित करण्यात आलेले रकाने सोबतच्या विवरणपत्र **"क"** मध्ये दर्शविण्यात येत आहेत. त्यामुळे यापुढे सरळसेवा/ पदोन्नतीची बिंदुनामावली लिहिताना ती, विवरणपत्र **"क"** मध्ये दर्शविलेल्या रकान्यानुसार तपशील नमूद करून, लिहिण्याची कार्यवाही विभागाने करावी

४. आपणास विनंती करण्यात येते की, विविध संवर्गातील पदोन्नती व सरळसेवा कोटयातील रिक्त पदे तातडीने भरण्याच्या दृष्टिने प्रस्तुत पत्रात नमूद केल्याप्रमाणे, पदोन्नतीची बिंदुनामावली/आरक्षण निश्चितीचे प्रस्ताव सोबतच्या **नमुना-अ** मधील टिप्पणीत दर्शविल्यानुसार तसेच सरळसेवेची बिंदुनामावली व मागणीपत्राचे प्रस्ताव सोबतच्या **नमुना-ब** मध्ये विभागाचे परिपूर्ण प्रस्ताव सादर करावेत. जेणेकरून प्रस्तावाची तपासणी करणे व आरक्षणाच्या दृष्टीने मान्यता देणे या विभागास सुलभ होईल.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्यांचा संगणक संकेतांक २०१६०७२२१३१७५७५९०७ हे परिपत्रक डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

Bajirao Ramchandra Jadhav

Digitally signed by Bajirao Ramchandra Jadhav
DN: c=IN, o=All India Services, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=da7af9a688a9961efe4eae0cdd0d1faf68b32eafe7e333344d14d91248f753bf, cn=Bajirao Ramchandra Jadhav
Date: 2016.08.04 11:19:14 +05'30'

**सहपत्र :- १) टिपणीचा नमुना-अ व ब**
**२) विवरणपत्र-क**

**( बाजीराव जाधव )**
**सचिव, महाराष्ट्र शासन.**

**नमुना-अ (पदोन्नती प्रस्ताव)**

**विभागाचे नांव/कार्यासन क्रमांक**

**--------------या पदावर पदोन्नती द्यावयाच्या प्रस्तावाचा तपशील**

**पदोन्नती बिंदुनामावली-:**

| | | |
|---|---|---|
| १ | **पदोन्नतीची बिंदुनामावली तपासावयाचा संवर्ग** | |
| २ | **ज्या संवर्गातून पदोन्नती दयावयाची आहे ते पद** | |
| ३ | **वरिष्ठ संवर्गाची मंजूर पदसंख्या** | |
| ४ | **सेवाप्रवेश नियमानुसार सेवाभरतीचे प्रमाण** (भरतीचे प्रमाण व अर्हता स्पष्ट करावी.) | |
| ५ | **पदोन्नतीच्या कोटयातील पदे** | |
| ६ | **प्रस्तावासोबत प्रमाणित बिंदुनामावली सादर केली आहे काय? (** दिनांक ३१.८.२०१६ ची स्थिती दर्शविणारी उप सचिवांकडून प्रमाणित केलेली बिंदुनामावली तपासणीसाठी सादर करावी.) | |
| | **अ) मंजुर सेवा प्रवेश नियम** | |
| | **ब) मंजुर पदाचा आकृतिबंध** (यामध्ये मंजूर पदे स्पष्टपणे कळून येतील असे पहावे. अनेक शासन निर्णयानुसार पदनिर्मिती झाली असल्यास त्याचा तक्ता (Table) दर्शविण्यात यावा.) | |
| | **क) कनिष्ठ संवर्गाची अद्ययावत जेष्ठता यादी.**(दिनांक १.१.२०१६ अखेरची) | |

गट-अ मधील दुस-या टप्प्याच्या पदास आरक्षण कायदा लागू झाल्यापासून म्हणजेच दिनांक २९.१.२००४ पासून आरक्षण लागू झाले आहे. तेव्हा दिनांक २९.१.२००४ पूर्वी पदोन्नतीच्या पदावर कार्यरत असलेल्या अधिका-यांची यादी (स्वतंत्रपणे जोडावी.)

४) **दि.३१.८.२०१६ अखेरची स्थिती**

| अ क्र | तपशील | अ.जा. १३% | अ.ज. ७% | वि.जा.अ . ३% | भ.ज.ब २.५% | भ.ज.क ३.५% | भ.ज.ड २% | वि.मा.प्र. २% | खुला ६७% | एकूण १००% |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मंजूर पदे | | | | | | | | | |
| २ | भरलेली पदे | | | | | | | | | |
| ३ | रिक्त पदे | | | | | | | | | |

**१. पदोन्नतीचा कोटा - पदोन्नतीकरिता उपलब्ध असलेल्या पदांची सद्य:स्थिती पुढीलप्राणे राहील :-**

| अ. क्र. | प्रवर्गाचे नांव | आरक्षण टक्केवारी | आरक्षण टक्केवारी नुसार पदे | कार्यरत पदे | रिक्त पदे (अ.क्र.४-५) | संभाव्य रिक्त होणारी पदे | एकूण रिक्त पदे (अ.क्र.६+७) | समायोजनानंतर पदोन्नतीकरिता उपलब्ध पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | अ.जाती | १३ % | | | | | | |
| २ | अ.जमाती | ७% | | | | | | |
| ३ | वि.जा.(अ) | ३% | | | | | | |
| ४ | भ.ज.(ब) | २.५% | | | | | | |
| ५ | भ.ज.(क) | ३.५% | | | | | | |
| ६ | भ.ज.(ड) | २% | | | | | | |
| ७ | वि.मा.प्र. | २% | | | | | | |
| ८ | खुला | ६७% | | | | | | |
| | एकूण | १००% | | | | | | |

**अ) दि.१ सप्टेंबर रोजी रिक्त असलेले बिंदू कमांक**

| अ.क्र. | प्रवर्गाचे नांव | दि.१ सप्टेंबर रोजी रिक्त असलेले बिंदू कमांक |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | अ.जाती | |
| २ | अ.जमाती | |
| ३ | वि.जा.(अ) | |
| ४ | भ.ज.(ब) | |
| ५ | भ.ज.(क) | |
| ६ | भ.ज.(ड) | |
| ७ | वि.मा.प्र. | |
| ८ | खुला | |
| | एकूण | |

**ब) संभाव्य रिक्त पदांचे बिंदू क्रमांक**

| अ.क्र. | प्रवर्गाचे नांव | संभाव्य रिक्त पदांचे बिंदू क्रमांक |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | अ.जाती | |
| २ | अ.जमाती | |
| ३ | वि.जा.(अ) | |
| ४ | भ.ज.(ब) | |
| ५ | भ.ज.(क) | |
| ६ | भ.ज.(ड) | |
| ७ | वि.मा.प्र. | |
| ८ | खुला | |
| | एकूण | |

क) खुल्या प्रवर्गात कार्यरत असलेले मागास प्रवर्गातील अधिकारी यांचे बिंदू क्रमांक :-

पदसंख्या जास्त असल्यास वरील तपशील स्वतंत्र पानावर दर्शविण्यात यावा.

(अ) कार्यरत असलेल्या व पदोन्नतीसाठी प्रस्तावित असलेल्या मागास प्रवर्गाच्या कर्मचारी/अधिका-यांची जाती प्रमाणपत्राची वैधता झाली आहे किंवा नाही.

(ब) अनुसूचित जमातीबाबत :- दिनांक १५.६.१९९५ पूर्वी अनुसूचित जमाती प्रमाणपत्राच्या आधारे सेवेत लागलेल्या कर्मचा-यांची अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र अवैध ठरल्यास व त्यांनी ते ज्या मागास प्रवर्गाचे आहेत, त्या प्रवर्गाचे जाती प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र सादर केल्यास दिनांक १५.६.१९९५ व दिनांक ३०.६.२००४ च्या शासन निर्णयानुसार त्यांच्या सेवेस संरक्षण प्राप्त झाले आहे, त्यानुसार अशा कर्मचा-यांच्या बाबतीत त्यांची जात वैधता तपासली आहे व त्याप्रमाणे त्यांची सेवा ज्येष्ठता निश्चित केली आहे, असे कर्मचारी/अधिकारी किती आहेत ज्यांचा पदोन्नतीच्या प्रस्तावात समावेश केला आहे त्याचा तपशील प्रस्तावात देण्यात यावा.

**खुल्या प्रवर्गात कार्यरत मागास प्रवर्गातील अधिकारी ते आता त्यांच्या संबंधी प्रवर्गात रिक्तता झाल्याने समायोजित होतील, असे बिंदु क्रमांक :-**

**(क) ऑनलाईन बिंदूनामावली तपासून घेतली असल्यास त्याचा तपशील.**

नमुना-ब (सरळसेवा प्रस्ताव)

विभागाचे नांव/कार्यासन क्रमांक

--------------या पदावर सरळसेवेने नियुक्ती देण्यासाठी पाठवावयाच्या मागणीपत्राचा तपशील

सरळसेवा बिंदुनामावली-:

| | | |
|---|---|---|
| १ | सरळसेवेची बिंदुनामावली तपासावयाचा संवर्ग, वेतनश्रेणी, पदाचा गट-अ, गट-ब<br>गट-अ मधील पहिल्या अथवा त्यापुढील टप्प्याचे पद असल्यास त्याबाबतचा तपशील. | |
| २ | एकूण मंजुर पद संख्या | |
| ३ | सेवा प्रवेश नियमानुसार सेवा भरतीचे प्रमाण | % पदोन्नती : % सरळसेवा |
| ४ | सरळसेवेच्या कोटयातील पदे | पदे |
| ५ | प्रस्तावासोबत प्रमाणित बिंदुनामावली सादर केली आहे काय | |
| ६ | मंजुर सेवा प्रवेश नियम | पृष्ठ / प.वि. |
| ७ | मंजुर पदाचा आकृति बंध | पृष्ठ / प.वि. |

दि.१.०१.२०१४ ची स्थिती.

| अ क्र | तपशील | अ.जा. १३% | अ.ज. ७% | वि.जा.अ ३% | भ.ज.ब २.५% | भ.ज.क ३.५% | भ.ज.ड २% | वि.मा.प्र. २% | इ.मा.व. १९% | खुला ४८% | एकूण १००% |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मंजूर पदे | | | | | | | | | | |
| २ | भरलेली पदे | | | | | | | | | | |
| ३ | रिक्त पदे (१-२) | | | | | | | | | | |

**..........या पदाचे मागणीपत्र पाठवावयाचा प्रस्ताव**

**मागणीपत्राचा तपशील**

| अ. क्र. | तपशील | अ.जा. १३% | अ.ज. ७% | वि.जा.अ ३% | भ.ज.ब २.५% | भ.ज.क ३.५% | भ.ज.ड २% | वि.मा.प्र. २% | इ.मा.व. १९% | खुला ४८% | एकूण १००% |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मंजूर पदे | | | | | | | | | | |
| २ | आयोगाच्या शिफारशीनुसार भरलेली पदे | | | | | | | | | | |
| ३ | रिक्त पदे | | | | | | | | | | |
| ४ | भरलेल्या पदावरील टक्केवारी नुसार आरक्षणाची पदे | | | | | | | | | | |
| ५ | शा.नि. २.८.२०११ नुसार भरलेल्या) पदांवरील **अनुशेषाची पदे** | | | | | | | | | | |
| ६ | चालू आरक्षणाची पदे | | | | | | | | | | |
| ७ | पुढे ओढावयाची पदे | | | | | | | | | | |
| ८ | मागणीपत्रासाठी चालू आरक्षणाची एकूण उपलब्ध पदे | | | | | | | | | | |

(अ) सरळसेवेने कार्यरत असलेल्या मागास प्रवर्गाच्या कर्मचारी/अधिका-यांची जाती प्रमाणपत्राची वैधता झाली आहे किंवा नाही.

(ब) अनुसूचित जमातीबाबत :- दिनांक १५.६.१९९५ पूर्वी अनुसूचित जमाती प्रमाणपत्राच्या आधारे सेवेत लागलेल्या कर्मचा-यांची अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र अवैध ठरल्यास व त्यांनी ते ज्या मागास प्रवर्गाचे आहेत, त्या प्रवर्गाचे जाती प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र सादर केल्यास दिनांक १५.६.१९९५ व दिनांक ३०.६.२००४ च्या शासन निर्णयानुसार त्यांच्या सेवेस संरक्षण प्राप्त झाले आहे, त्यानुसार अशा कर्मचा-यांच्या बाबतीत त्यांची जात वैधता तपासली आहे व त्याप्रमाणे त्यांची सेवा ज्येष्ठता निश्चित केली आहे, असे कर्मचारी/अधिकारी किती आहेत त्याचा तपशील प्रस्तावात देण्यात यावा.

(क) ऑनलाईन बिदुनामावलीबाबत तपशील देण्यात यावा.

## नमुना-क

## बिंदूनामावली नोंदवही

| बिंदू क्रमांक | बिंदूचा प्रवर्ग | बिंदूवरील कर्मचा-यांचे नांव | कर्मचा-यांचा स्वत:चा जात प्रवर्ग | सध्याच्या पदावरील नियुक्तीचा दिनांक | जन्म दिनांक | सेवा निवृत्ती दिनांक | जात प्रमाणपत्र क्रमांक व दिनांक | जात प्रमाणपत्र देणा-या प्राधिका-याचे पदनाम | जात वैधता प्रमाणपत्र क्रमांक व दिनांक | जात वैधता प्रमाणपत्र देणा-या समितीचे नांव | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |

**बिदुनामावली लेखन अद्ययावतीकरणाबाबत सूचना :-**

**अ) प्रत्येक संवर्गाच्या सेवा प्रवेश नियमातील सेवा भरतीच्या तरतुदीनुसार बिंदुनामावल्या ठेवताना सर्वसाधारणत: खालील ३ प्रकारच्या बिंदुनामावल्या ठेवण्याची आवश्यकता असते.**

१) **सरळसेवा :-** सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, दिनांक २९.३.१९९७ च्या आदेशानुसार.

२) **पदोन्नती :-** सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, दिनांक १८.१०.१९९७ च्या आदेशानुसार.
सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, दिनांक २५.५.२००४ च्या आदेशानुसार
(ज्या पदांना नव्याने आरक्षण लागू झाले त्या पदांच्या बाबतीत)

३) **सरळसेवेच्या कोटयातील तदर्थ पदोन्नती :-** सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, दिनांक १८.१०.१९९७ च्या आदेशानुसार

**ब) बिंदुनामावली बांधणी केलेल्या पुस्तिकेच्या/नोंदवहीच्या स्वरूपात ठेवण्यात यावी.**

**क) पदोन्नतीसाठी बिंदुनामावली दरवर्षी दिनांक १ सप्टेंबर ते ३१ ऑगस्ट पर्यंत लिहिण्यात यावी.**

**ड) सरळसेवेसाठी बिंदुनामावली दरवर्षी दिनांक १ जानेवारी ते ३१ डिसेंबर पर्यंत लिहिण्यात यावी.**

**इ) प्रत्येक संवर्गाची बिंदुनामावली** सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक, दिनांक ५.११.२००९ च्या आदेशानुसार प्रमाणित करून घ्यावी

**ई)** बिंदुनामावली प्रत्येक वर्षी प्रवर्गनिहाय आरक्षित पदे, कार्यरत पदे, रिक्त पदे इत्यादीं तपशीलासह विहित नमुन्यातील गोषवारा तयार करून तो सक्षम प्राधिका-यांने सही/शिक्क्यानिशी प्रमाणित करावा.

**फ)** बिंदुनामावलीच्या सुरवातीला/शेवटच्या पानावर सदर बिंदुनामावलीत एकूण किती पृष्ठे आहेत व त्यापैकी किती पृष्ठांपर्यंत बिंदुनामावली लिहिण्यासाठी वापर करण्यात आला आहे, त्याची संख्या प्रमाणपत्राच्या स्वरूपात करण्यात यावी. तसेच बिंदुनामावलीच्या शेवटच्या पानावर अंतिम गोषवा-याचा पृष्ठ क्रमांक व त्या गोषवा-याचे संबंधित वर्ष याचा लेखी स्पष्टपणे उल्लेख करावा.

*********

**शासकीय अधिकारी /कर्मचारी यांच्या प्रतिनियुक्तीने नियुक्तीसाठी अटी व शर्ती, आणि नियुक्तीची कार्यपध्दती याबाबतचे धोरण.**

# महाराष्ट्र शासन

**सामान्य प्रशासन विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः एसआरव्ही-२०११/प्र.क्र.१३७/कार्यासन १२**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख: :१७/१२/२०१६

विभागीय चौकशी प्रलंबित असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांच्या पदोन्नतीसाठी विचार करताना कोणती कार्यपध्दती वापरावी याबाबतच्या सविस्तर सूचना दि.०२.०४.१९७६ च्या शासन परिपत्रकान्वये दिलेल्या आहेत. तर विभागीय चौकशी प्रलंबित असताना जाणीवपूर्वक निर्णय घेऊन तात्पुरती पदोन्नती देण्यात आलेल्या अधिकारी/कर्मचारी यांना चौकशीनंतरच्या निर्णयानुसार वेतनवाढ/वेतनवाढी रोखण्याची शिक्षा दिल्यास कशा प्रकारे कार्यवाही करावी याबाबतच्या सूचना दि.२२.०४.१९९६ च्या शासन निर्णयान्वये दिलेल्या आहेत.

२. दि.०२.०४.१९७६ व दि.२२.०४.१९९६ मधील तरतूदी विचारात घेऊन प्रशासकीय विभाग किंवा सक्षम प्राधिकारी, विभागीय चौकशी सुरु असलेल्या शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीसाठी जाणीवपूर्वक निर्णय घेत असतात. मात्र असे निर्णय घेतल्यानंतर विभागीय चौकशीअंती दिलेल्या तात्पुरत्या पदोन्नत्या नियमित करणे किंवा संबंधित अधिकाऱ्याच्या/ कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीचे पुनर्विलोकन करणे आवश्यक असते. तथापि, सक्षम प्राधिकाऱ्याकडून अशी कार्यवाही केल्याचे प्रकरण आढळून येत नाही. या खेरीज श्री.जानकीरामन विरुध्द केंद्र शासन प्रकरणात मा. सर्वोच्च न्यायालयाने विभागीय चौकशी सुरु असलेल्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या बाबतीत कशा प्रकारे कार्यवाही करावी याबाबत निर्देश दिलेले आहेत.

३. केंद्र शासनाने देखील, केंद्र शासकीय कर्मचाऱ्यांसंदर्भात ज्यांच्याविरुध्द शिस्तभंगविषयक वा न्यायालयीन कार्यवाही प्रलंबित आहे, त्यांच्याबाबतीत कशाप्रकारे पदोन्नतीची कार्यवाही करावी याबाबत वेळोवेळी आदेश निर्गमित केले आहेत. मा.सर्वोच्च न्यायालयाचे आदेश व केंद्र शासनाचे आदेश विचारात घेऊन या विभागाच्या दि.०२.०४.१९७६ च्या शासन परिपत्रकातील व दि.२२.४.१९९६ च्या शासन निर्णयामधील तरतूदी रद्द करुन सुधारीत तरतूदी लागू करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते. या अनुषंगाने दि.०२.०४.१९७६ च्या शासन परिपत्रकातील व दि.२२.०४.१९९६ च्या शासन निर्णयातील आदेश रद्द करुन प्रस्तावित सुधारीत कार्यपध्दती संदर्भ क्र.३ येथील शासन परिपत्रक प्रसिध्द करुन, या कार्यपध्दतीबाबत अधिकारी/कर्मचारी व त्यांच्या संघटनांना काही सुधारणा सुचवावयाच्या असल्यास त्यांच्याकडून सूचना/सुधारणा मागविण्यात आल्या होत्या.

**<u>शासन निर्णय</u> :-**

प्रस्तावनेतील बाबी व संदर्भ क्र.३ वरील शासन परिपत्रकान्वये मागविण्यात आलेल्या सूचना विचारात घेता, संदर्भ क्र.१ वरील दि.०२.०४.१९७६ चे शासन परिपत्रक आणि संदर्भ क्र.२ वरील दि.२२.०४.१९९६ चा शासन निर्णय या शासन निर्णयान्वये रद्द करण्यात येत असून, विभागीय चौकशी व न्यायालयीन प्रकरणे प्रलंबित असलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या पदोन्नती देण्याच्या कार्यपध्दतीबाबत पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत :-

## विभागीय चौकशी/न्यायालयीन कार्यवाही सुरु असलेल्या राज्य शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना पदोन्नती देताना अवलंबवयाची कार्यपध्दती

१. राज्य शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांना पदोन्नती देताना शिस्तभंगविषयक अथवा न्यायालयीन कार्यवाही सुरू असलेल्या कर्मचाऱ्यासंदर्भात समान कार्यपध्दती अवलंबिली जावी या दृष्टीने व केंद्र शासनाच्या कर्मचाऱ्यांसाठी केंद्र शासनाने विहित केलेल्या कार्यपध्दतीशी सुसंगत अशी कार्यपध्दती ठेवण्याच्या दृष्टीने या विभागाचे दि.०२.०४.१९७६ चे शासन परिपत्रक व दि.२२.०४.१९९६ चा शासन निर्णय रद्द करुन खालील कार्यपध्दती विहीत करण्यात येत आहेत.

१) विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीच्या दिनांकाला

*अ) जे अधिकारी /कर्मचारी निलंबीत आहेत,*

*ब) ज्या अधिकारी/कर्मचाऱ्यांच्याविरुध्द शिस्तभंग विषयक कार्यवाहीच्या अनुषंगाने दोषारोप बजावून शिस्तभंग विषयक कार्यवाही सुरु झालेली आहे,*

*क) ज्या अधिकारी/कर्मचाऱ्याच्याविरुध्द फौजदारी आरोपाचे न्यायालयीन प्रकरण प्रलंबित आहे,*

*फौजदारी आरोपाचे न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असल्याचे केव्हा समजण्यात येईल या साठी* म.ना.से. (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ मधील नियम २७(६)(बी)(एक) मध्ये दिलेला खालील अर्थ विचारात घेण्यात येईल :-

*(बी) न्यायिक कार्यवाही -*

*(एक) फौजदारी कार्यवाहीच्या बाबतीत, दंडाधिकारी जिची दखल घेतो अशी तक्रार किंवा प्रतिवेदन, पोलीस अधिकाऱ्याने ज्या तारखेस दाखल केले असेल त्या तारखेस सुरू केली असल्याचे मानण्यात येईल.*

अशा अधिकारी /कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीच्या प्रकरणात विभागीय पदोन्नती समिती त्यांची गोपनीय अभिलेखाच्या व इतर सेवाप्रवेश नियमाच्या तरतुदींच्या अनुषंगाने पात्रता तपासेल. मात्र संबंधीत अधिकारी/कर्मचाऱ्यांच्यासंदर्भात विभागीय पदोन्नती समितीने केलेले मूल्यमापन (Assessment) आणि दिलेली प्रतवारी स्वतंत्र पाकीटात मोहोरबंद करुन ठेवण्यात येईल. या पाकीटावर "श्री. _________ ________ ________ (सरकारी कर्मचाऱ्याचे नाव) यांच्याबाबतीत या पदावरुन (निम्न पदाचे सध्याच्या पदाचे नाव) या पदावर (पदोन्नतीच्या पदाचे नाव) पदोन्नती देण्याकरिता आवश्यक योग्यतेबाबतचे निष्कर्ष श्री. ________ ___________ ______________यांच्याविरुध्दच्या शिस्तभंगाच्या प्रकरणाची /फौजदारी खटल्याची समाप्ती होईपर्यंत हे पाकीट उघडण्यात येवू नये" असा मायना लिहीण्यात यावा.

२) विभागीय पदोन्नती समितीच्या इतिवृत्तामध्ये संबंधीत अधिकारी/कर्मचाऱ्याच्या नावासमोर पात्र/अपात्र न लिहीता निष्कर्ष "**सोबतच्या मोहोरबंद पाकीटात**" असा शेरा/अभिप्राय नमूद करावे.

३) संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्याच्या पदोन्नतीचे प्रकरण मोहोरबंद पाकीटात ठेवल्यामुळे संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्याच्याऐवजी जेष्ठतेनुसार पात्र ठरणाऱ्या अन्य अधिकारी/कर्मचाऱ्याचा निवडसूचीत समावेश करण्याबाबत विचार करावा.

४) विभागीय चौकशीच्या कार्यवाहीस खूप विलंब लागू नये यासाठी विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीच्या दिनांकानंतर सहा महिन्यांनी नियुक्ती प्राधिकारी यांनी मोहोरबंद पाकीटात ठेवलेल्या पदोन्नती प्रकरणाचे पुनर्विलोकन करावे. या अनुषंगाने नियुक्ती प्राधिकारी संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्याची शिस्तभंगविषयक/न्यायालयीन कार्यवाहीची सद्य:स्थिती जाणून घेईल.

५) विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीच्या दिनांकाला जरी एखादा अधिकारी/ कर्मचारी निलंबीत नसेल अथवा त्याच्याविरुध्द शिस्तभंगविषयक/न्यायालयीन कार्यवाही सुरु झाली नसेल मात्र, संबंधीत अधिकारी/कर्मचाऱ्याचे प्रत्यक्ष पदोन्नतीचे आदेश निर्गमीत होण्यापूर्वी संबंधीत अधिकारी/कर्मचारी निलंबीत

झाल्यास वा त्याच्याविरुध्द शिस्तभंगविषयक/ न्यायालयीन कार्यवाही सुरु झाल्यास, नियुक्ती प्राधिकारी संबंधीत अधिकारी/कर्मचाऱ्याचे पदोन्नतीचे प्रकरण उपपरिच्छेद (१) मधील सूचनेनुसार मोहोरबंद पाकीटात ठेवेल.

६) विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीच्या दिनांकाच्या ६ महिन्यांनंतर मोहोरबंद पाकीटात ठेवलेले प्रकरण नियुक्ती प्राधिकारी यांनी पुनर्विलोकित करावे. पुनर्विलोकनाच्यावेळी निलंबीत अधिकाऱ्यास पुन:स्थापीत केले असल्याचे व त्यांचेविरुध्द कोणतीही शिस्तभंगविषयक कार्यवाही सुरू झालेली नसल्याचे आढळून आल्यास, मोहोरबंद लिफाफा उघडून त्यातील निष्कर्षानुसार तो पदोन्नतीस पात्र असल्यास त्यास पदोन्नती देण्यात यावी. तसेच ज्या अधिकारी/ कर्मचाऱ्याविरुध्दची शिस्तभंगविषयक कार्यवाही संपुष्टात येवून शिक्षा दिली असल्यास, अशा अधिकारी/कर्मचाऱ्यांचे सीलबंद लिफाफे न उघडता त्यांची पदोन्नतीसाठीची पात्रता पुढील नियमित विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीमध्ये तपासण्यात यावी.

७) सहा महिन्यांच्या पुनर्विलोकनाच्यावेळी ज्या प्रकरणात प्रलंबित असलेली शिस्तभंगाविषयक/न्यायालयीन कार्यवाही पूर्ण झालेली नसेल अशा प्रकरणात मोहोरबंद पाकीट उघडून निर्णय घेण्यात येवू नये.

८) विभागीय पदोन्नती समितीच्या पहिल्या बैठकीत मोहोरबंद पाकीटात निष्कर्ष ठेवण्यात आलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्याची दुसऱ्या व त्यापुढील विभागीय पदोन्नती समितीच्या नियमित बैठकीत पुन्हा पात्रता तपासण्याची आवश्यकता नाही. मात्र अशा प्रकरणांचे दुसरे पुनर्विलोकन पुढील वर्षी होणाऱ्या विभागीय पदोन्नती समितीच्या नियमित बैठकीत करण्यात यावे. विभागीय पदोन्नती समितीची नियमित बैठक होणार नसल्यास पुनर्विलोकनासाठी विभागीय पदोन्नती समितीची बैठक घ्यावी. सदर विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीत मोहोरबंद पाकीटात निष्कर्ष ठेवण्यात आलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या शिस्तभंगविषयक/न्यायालयीन कार्यवाहीचा आढावा घेण्यात यावा.

९) विभागीय पदोन्नती समितीच्या मूळ बैठकीच्या दिनांकापासून दोन वर्षे झाल्यानंतरही मोहोरबंद पाकीटात निष्कर्ष ठेवलेल्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या, शिस्तभंगविषयक /न्यायालयीन कार्यवाही प्रकरणी अंतिम निर्णय झालेला नसल्यास, अशा प्रकरणी नियुक्ती प्राधिकारी स्वविवेकानुसार संबंधीत अधिकारी/कर्मचाऱ्याला तदर्थ पदोन्नती देण्याबाबत जाणीवपूर्वक निर्णय घेईल. असा निर्णय घेताना नियुक्ती प्राधिकारी, खालील मुद्दे विचारात घेईल.

अ) संबंधितांविरुध्दची शिस्तभंगविषयक/न्यायालयीन कार्यवाही बराच काळ प्रलंबित राहण्याची शक्यता,

ब) दोषारोपांचे गांभीर्य,

क) द्यावयाची पदोन्नती जनहिताच्या विरुध्द जाईल का,

ड) शिस्तभंगविषयक/न्यायालयीन कार्यवाही लांबण्यास संबंधीत अधिकारी /कर्मचारी जबाबदार आहे का?

इ) संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यास तदर्थ पदोन्नती दिल्यानंतर, पदोन्नतीच्या पदावर काम केल्यामुळे, संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्याच्या शिस्तभंगविषयक /न्यायालयीन कार्यवाहीच्या प्रकरणांवर परिणाम होण्याची शक्यता आहे का? किंवा संबंधीत अधिकारी/कर्मचारी पदोन्नतीच्या पदाचा त्यासाठी दुरुपयोग करण्याची शक्यता आहे का?

फ) न्यायालयीन कार्यवाही बाबतची सद्यस्थिती / अभियोगाबाबतचे किती टप्पे पार पडले याबाबतची माहिती करुन घ्यावी.

ग) सेवानिवृत्तीस १ वर्ष शिल्लक असेल तर पदोन्नती न देण्याच्या अनुषंगाने सेवानिवृत्तीचा कालावधी विचारात घेणे (तदर्थ पदोन्नती दिल्यास वरिष्ठ वेतनश्रेणी प्राप्त झाल्यामुळे सेवानिवृत्तीनंतर मिळणारे सेवानिवृत्ती वेतनाचा ज्यादा लाभ प्राप्त होणार असल्यामुळे सेवानिवृत्तीस एक वर्ष शिल्लक असलेल्यांना तदर्थ पदोन्नती देण्यात येऊ नये याकरीता ही बाब तपासणे आवश्यक आहे.)

१०) एकाच शिस्तभंगविषयक कार्यवाहीत गट अ, ब आणि क या निरनिराळ्या गटातील अधिकारी व कर्मचारी गुंतलेले असल्यास, अशा शिस्तभंगविषयक प्रकरणात जो सर्वोच्च अधिकारी असेल त्यांना तदर्थ पदोन्नती देण्यास जो सक्षम प्राधिकारी असेल तोच प्राधिकारी अशा प्रकरणातील इतर कर्मचाऱ्यांच्या बाबतीतही निर्णय घेण्यास सक्षम प्राधिकारी असेल.

११) विभागीय पदोन्नती समितीच्या पहिल्या बैठकीनंतर दोन वर्षांनी शिस्तभंगविषयक/न्यायालयीन कार्यवाहीच्या अंतिम निर्णयाच्या अधिन संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यास तदर्थ पदोन्नती देणे आवश्यक आहे, असे सक्षम प्राधिकाऱ्याचे मत झाल्यास मोहोरबंद पाकिट उघडण्यात येवू नये. विभागीय पदोन्नती समितीची बैठक बोलावून संबंधित अधिकारी /कर्मचाऱ्याची पात्रता/अपात्रता नव्याने तपासावी. पुन्हा नव्याने पात्रता तपासल्यानंतर संबंधीत अधिकारी/कर्मचारी पदोन्नतीसाठी पात्र ठरल्यास, त्यांना ११ महिन्यांसाठी किंवा विभागीय चौकशी/न्यायालयीन कार्यवाही अंतिम होईल यापैकी जे अगोदर होईल तेवढ्या कालावधीसाठी खालील अटींच्या अधीन

राहून निव्वळ तदर्थ पदोन्नती देण्यात यावी. खालील अटी व शर्ती तदर्थ पदोन्नतीच्या आदेशामध्ये सुस्पष्टपणे नमूद कराव्यात :

i) शिस्तभंगविषयक/न्यायालयीन कार्यवाहीच्या अधिन दिली जाणारी तदर्थ पदोन्नती केवळ तात्पुरती असेल व या तदर्थ पदोन्नतीमुळे नियमितपणाचे व ज्येष्ठतेचे कोणतेही लाभ अशा अधिकारी/कर्मचाऱ्यांना मिळणार नाहीत

ii) ही तदर्थ पदोन्नती “पुढील आदेशापर्यंत असेल”. तसेच कोणत्याही वेळी दिलेली तदर्थ पदोन्नती रद्द करुन मूळ पदावर पदावनत करण्याचा हक्क शासन राखून ठेवीत आहे .

१२) **शिस्तभंगविषयक/न्यायालयीन कार्यवाही चालू असलेल्या प्रकरणी संबंधित अधिकारी/कर्मचारी दोषमुक्त ठरल्यास किंवा फौजदारी खटल्यात निर्दोष सुटल्यास, खालीलप्रमाणे कार्यवाही करावी :-**

अ) तदर्थ पदोन्नती दिलेली नसल्यास त्याचे मोहोरबंद पाकीट उघडून त्यातील निष्कर्षानुसार तो पदोन्नतीसाठी पात्र ठरत असल्यास, त्याला नियमीत पदोन्नती द्यावी.

ब) अधिकारी/कर्मचाऱ्यास तदर्थ पदोन्नती दिलेली असल्यास, दिलेली तदर्थ पदोन्नती नियमीत करण्यात यावी.

क) मोहोरबंद पाकीटातील शिफारशीनुसार तो पदोन्नतीसाठी पात्र असल्यास, संबंधीत अधिकारी/कर्मचाऱ्यास कनिष्ठ असलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्याला ज्या निवडसूचीत स्थान देण्यात येवून नियमीत पदोन्नती देण्यात आली असेल, अशा कनिष्ठ अधिकारी/कर्मचाऱ्याच्या पदोन्नतीचा दिनांक हा त्यांना पदोन्नतीचा मानीव दिनांक देण्यात यावा.

१३) **शिस्तभंगविषयक/न्यायालयीन कार्यवाही चालू असलेल्या प्रकरणी एखाद्या अधिकारी/कर्मचाऱ्यास तदर्थ पदोन्नती दिली असेल, मात्र शिस्तभंगविषयक कार्यवाहीमध्ये संबंधीत अधिकारी/कर्मचारी दोषी ठरवून त्याला शिक्षा लादल्यास खालीलप्रमाणे कार्यवाही करावी -**

अ) ठपका ठेवण्याची शिक्षा दिल्यास, नियमित पदोन्नतीकरीता संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्याचा ज्या मूळ निवडसूचीत समावेश झाला असता, त्या निवडसूचीत मोहोरबंद ठेवलेले पाकीट उघडून ते पदोन्नतीसाठी पात्र असल्यास संबंधित मूळ निवडसूचीत त्यांचे स्थान निवडसूचीतील लगतच्या ५ अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या खाली आणणे किंवा निवडसूचीत शेवटचे स्थान दर्शविणे यापैकी जे कमी असेल त्याप्रमाणे कार्यवाही करण्याच्या अधीन, त्यांना दिलेली तदर्थ पदोन्नती संपुष्टात आणून त्यांची पदोन्नती नियमित करण्यात यावी.

ब) एक किंवा अधिक वर्षे वेतनवाढ रोखण्याची किंवा विनिर्दिष्ट कालावधीसाठी वेतनश्रेणीतील वेतन खालच्या टप्प्यावर आणण्याची शिक्षा झाल्यास तदर्थ पदोन्नती संपुष्टात आणावी. एखाद्या प्रकरणात अधिकारी/कर्मचाऱ्यांना दिलेल्या शिक्षेचा अंमल त्या निवडसूची वर्षाच्या कालावधीतच संपणार असल्यास व शिक्षेचा कालावधी संपुष्टात येण्याच्या आधीच विभागीय पदोन्नती समितीची बैठक होणार असल्यास, त्या बैठकीत संबंधीत अधिकारी/कर्मचाऱ्याचा पदोन्नतीसाठी विचार करावा व गोपनीय अहवालाच्या आधारे असे अधिकारी पात्र ठरत असल्यास, त्यांना शिक्षेचा कालावधी संपल्यानंतर पदोन्नती देण्यात यावी. मात्र अन्य प्रकरणात अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या शिक्षेचा कालावधी संपल्यानंतर विभागीय पदोन्नती समितीच्या पुढील नियमित बैठकीमध्ये, अशा अधिकाऱ्यांच्या पदोन्नतीचा प्रस्ताव इतर अधिकारी/कर्मचाऱ्यांसोबत विचारार्थ ठेवावा व ते पदोन्नतीस पात्र ठरत असल्यास त्यांना पदोन्नती देण्यात यावी.

क) पदोन्नती रोखण्याची शिक्षा झाल्यास तदर्थ पदोन्नती संपूष्टात आणावी. एखाद्या प्रकरणात अधिकारी/कर्मचाऱ्यांना दिलेल्या शिक्षेचा अंमल त्या निवडसूची वर्षाच्या कालावधीतच संपणार असल्यास व शिक्षेचा कालावधी संपुष्टात येण्याच्या आधीच विभागीय पदोन्नती समितीची बैठक होणार असल्यास, त्या बैठकीत संबंधीत अधिकारी/कर्मचाऱ्याचा पदोन्नतीसाठी विचार करावा व गोपनीय अहवालाच्या आधारे असे अधिकारी पात्र ठरत असल्यास त्यांना शिक्षेचा कालावधी संपल्यानंतर पदोन्नती देण्यात यावी. मात्र अन्य प्रकरणात अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या शिक्षेचा कालावधी संपल्यानंतर विभागीय पदोन्नती समितीच्या पुढील नियमित बैठकीमध्ये अशा अधिकाऱ्यांच्या पदोन्नतीचा प्रस्ताव इतर अधिकारी/कर्मचाऱ्यांसोबत विचारार्थ ठेवावा व ते पदोन्नतीस पात्र ठरत असल्यास त्यांना पदोन्नती देण्यात यावी.

ड) एखाद्या अधिकारी/कर्मचाऱ्यास विनिर्दिष्ट कालावधीसाठी तो ज्या वेतन समयश्रेणीमध्ये, श्रेणीमध्ये,पदांवर किंवा सेवेमध्ये असेल, त्यापेक्षा खालच्या वेतन समयश्रेणीमध्ये, श्रेणीमध्ये, पदावर किंवा सेवेमध्ये आणण्याची शिक्षा झाल्यास अशा प्रकरणात दिलेली तदर्थ पदोन्नती रद्द करुन, तो ज्या वेतन समयश्रेणीमध्ये, श्रेणीमध्ये,पदांवर किंवा सेवेमध्ये असताना शिस्तभंगविषयक कार्यवाही चालू होती त्या वेतनसमयश्रेणीतून, श्रेणीमधून, पदावरून किंवा सेवेतून अधिकारी/ कर्मचाऱ्यास खालच्या वेतन समयश्रेणीमध्ये, श्रेणीमध्ये, पदावर किंवा सेवेमध्ये अवनत करण्यासंदर्भात शिस्तभंगविषयक कार्यवाही करावी. सदरहू शास्ती/ शिक्षेनुसार संबंधीत अधिकारी/ कर्मचाऱ्याची सेवाज्येष्ठता अधिकारी/ कर्मचाऱ्याच्या शिक्षेच्या/

शास्तीच्या आदेशामध्ये नमूद केल्यानुसार निश्चित करण्यात यावी. शिक्षेचा कालावधी संपल्यानंतर त्याच्या मूळ वेतन समयश्रेणीमध्ये, श्रेणीमध्ये, पदावर किंवा सेवेमध्ये परत आणल्यानंतर त्याची मूळ सेवाज्येष्ठता कशी राहील हे विचारात घ्यावी. सुधारीत सेवाज्येष्ठतेनुसार पदोन्नतीच्या विचारक्षेत्रात येत नसल्यास विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीमध्ये त्याचा पदोन्नतीच्या पदाकरीता विचार करण्यात येवू नये. मात्र तो सुधारीत सेवाज्येष्ठतेनुसार पदोन्नतीच्या विचारक्षेत्रात येत असल्यास विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीमध्ये त्याचा पदोन्नतीच्या पदाकरीता विचार करण्यात यावा व तो पदोन्नतीस पात्र ठरत असल्यास त्याला पदोन्नती देण्यात यावी.

इ) ज्या प्रकरणात संबंधीत अधिकारी/कर्मचाऱ्यास सक्तीने सेवानिवृत्ती, सेवेतून काढून टाकणे किंवा बडतर्फी या शिक्षांपैकी कोणतीही एक शिक्षा झाली असेल, तर त्यांची तदर्थ पदोन्नती संपुष्टात आणावी व शिस्तभंगविषयक कार्यवाही ज्या पदावर चालू होती त्या पदावर जबर शिक्षेची अंमलबजावणी सुरु करावी.

१४) **शिस्तभंगविषयक कार्यवाही/न्यायालयीन कार्यवाही सुरु असताना अधिकारी/कर्मचाऱ्याला तदर्थ पदोन्नती न देताच त्याच्यावरील शिस्तभंगविषयक कार्यवाहीच्या अनुषंगाने तो दोषी ठरत असल्यास व त्याच्यावर शिक्षा/शास्ती लादल्यास त्याच्याबाबतीत खालीलप्रमाणे कार्यवाही करावी-**

अ) शिस्तभंगविषयक कार्यवाहीमध्ये ठपका ठेवण्याची शिक्षा झाल्यास, मोहोरबंद पाकीट उघडून ते पदोन्नतीसाठी पात्र असल्यास त्यांना वरीष्ठ पदावर पदोन्नती देण्यात यावी. त्यांचा नियमित पदोन्नतीकरीता ज्या निवडसूचीत विचार केला होता, त्या निवडसूचीत संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्याचे स्थान निवडसूचीतील लगतच्या ५ अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या खाली आणणे किंवा निवडसूचीत शेवटचे स्थान दर्शविणे यापैकी जे कमी असेल त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी. संबंधित अधिकारी/कर्मचारी मोहोरबंद पाकिटातील निष्कर्षानुसार ते पदोन्नतीसाठी पात्र ठरत नसल्यास त्यांची पात्रता पुढील वर्षाच्या निवडसूचीत तपासून ते पदोन्नतीसाठी पात्र ठरल्यास त्यांना पदोन्नती देण्यात यावी.

ब) एक किंवा अधिक वर्षे वेतनवाढ रोखण्याची किंवा विनिर्दिष्ट कालावधीसाठी वेतनश्रेणीतील वेतन खालच्या टप्प्यावर आणण्याची शिक्षा झाल्यास, एखाद्या प्रकरणात अधिकारी/कर्मचाऱ्यांना दिलेल्या शिक्षेचा अंमल त्या निवडसूची वर्षाच्या कालावधीतच संपणार असल्यास व शिक्षेचा कालावधी संपुष्टात येण्याच्या आधीच विभागीय पदोन्नती समितीची बैठक

होणार असल्यास त्या बैठकीत संबंधीत अधिकारी/कर्मचाऱ्याचा पदोन्नतीसाठी विचार करावा व गोपनीय अहवालाच्या आधारे असे अधिकारी / कर्मचारी पात्र ठरत असल्यास त्यांना शिक्षेचा कालावधी संपल्यानंतर पदोन्नती देण्यात यावी. मात्र अन्य प्रकरणात अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या शिक्षेचा कालावधी संपल्यानंतर विभागीय पदोन्नती समितीच्या पुढील नियमित बैठकीमध्ये अशा अधिकाऱ्यांच्या पदोन्नतीचा प्रस्ताव इतर अधिकारी/कर्मचाऱ्यांसोबत विचारार्थ ठेवावा व ते पदोन्नतीस पात्र ठरत असल्यास त्यांना पदोन्नती देण्यात यावी.

क) पदोन्नती रोखण्याची शिक्षा झाल्यास एखाद्या प्रकरणात अधिकारी/कर्मचाऱ्यांना दिलेल्या शिक्षेचा अंमल त्या निवडसूची वर्षाच्या कालावधीतच संपणार असल्यास व शिक्षेचा कालावधी संपुष्टात येण्याच्या आधीच विभागीय पदोन्नती समितीची बैठक होणार असल्यास त्या बैठकीत संबंधीत अधिकारी/कर्मचाऱ्याचा पदोन्नतीसाठी विचार करावा व गोपनीय अहवालाच्या आधारे असे अधिकारी पात्र ठरत असल्यास, त्यांना शिक्षेचा कालावधी संपल्यानंतर पदोन्नती देण्यात यावी. मात्र अन्य प्रकरणात अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या शिक्षेचा कालावधी संपल्यानंतर विभागीय पदोन्नती समितीच्या पुढील नियमित बैठकीमध्ये अशा अधिकाऱ्यांच्या पदोन्नतीचा प्रस्ताव इतर अधिकारी /कर्मचाऱ्यांसोबत विचारार्थ ठेवावा व ते पदोन्नतीस पात्र ठरत असल्यास त्यांना पदोन्नती देण्यात यावी.

ड) एखाद्या अधिकारी/कर्मचाऱ्यास विनिर्दिष्ट कालावधीसाठी तो ज्या वेतन समयश्रेणीमध्ये, श्रेणीमध्ये,पदांवर किंवा सेवेमध्ये असेल त्यापेक्षा खालच्या वेतन समयश्रेणीमध्ये, श्रेणीमध्ये, पदावर किंवा सेवेमध्ये आणण्याची शिक्षा झाल्यास अशा प्रकरणात, तो ज्या वेतन समयश्रेणीमध्ये, श्रेणीमध्ये,पदांवर किंवा सेवेमध्ये असताना शिस्तभंगविषयक कार्यवाही चालू होती त्या वेतनसमयश्रेणीतून, श्रेणीमधून, पदावरून किंवा सेवेतून अधिकारी/ कर्मचाऱ्यास खालच्या वेतन समयश्रेणीमध्ये, श्रेणीमध्ये, पदावर किंवा सेवेमध्ये अवनत करण्यासंदर्भात शिस्तभंगविषयक कार्यवाही करावी. सदरहू शास्ती/ शिक्षेनुसार संबंधीत अधिकारी/ कर्मचाऱ्याची सेवाज्येष्ठता अधिकारी/ कर्मचाऱ्याच्या शिक्षेच्या/ शास्तीच्या आदेशामध्ये नमूद केल्यानुसार निश्चित करण्यात यावी. शिक्षेचा कालावधी संपल्यानंतर त्याच्या मूळ वेतन समयश्रेणीमध्ये, श्रेणीमध्ये, पदावर किंवा सेवेमध्ये परत आणल्यानंतर, त्याची मूळ सेवाज्येष्ठता कशी राहील हे विचारात घ्यावी. सुधारीत सेवाज्येष्ठतेनुसार पदोन्नतीच्या विचारक्षेत्रात येत नसल्यास विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीमध्ये त्याचा पदोन्नतीच्या पदाकरीता विचार करण्यात येवू नये. मात्र तो सुधारीत सेवाज्येष्ठतेनुसार पदोन्नतीच्या

विचारक्षेत्रात येत असल्यास विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीमध्ये त्याचा पदोन्नतीच्या पदाकरीता विचार करण्यात यावा व तो पदोन्नतीस पात्र ठरत असल्यास त्याला पदोन्नती देण्यात यावी.

इ) ज्या प्रकरणात संबंधीत अधिकारी/कर्मचाऱ्यास सक्तीने सेवानिवृत्ती, सेवेतून काढून टाकणे किंवा बडतर्फी या शिक्षांपैकी कोणतीही एक शिक्षा झाल्यास, त्यावरील अपिलाची वाट न पाहता, शिस्तभंगविषयक कार्यवाही ज्या पदावर चालू होती त्या पदावर जबर शिक्षेची अंमलबजावणी सुरु करावी.

१५) न्यायालयीन कार्यवाही चालू असताना एखाद्या अधिकारी/कर्मचाऱ्यास जाणीवपूर्वक निर्णय घेवून तदर्थ पदोन्नती दिलेली असल्यास व न्यायालयीन कार्यवाहीमध्ये न्यायालयाने शिक्षा ठोठावल्यास संबंधीत अधिकारी/कर्मचाऱ्याची तदर्थ पदोन्नती तात्काळ संपुष्टात आणावी व न्यायालयाच्या निर्णयानुसार शिक्षेची अंमलबजावणी सुरु करावी. प्रस्तुत प्रकरणात संबंधीत कर्मचाऱ्याने कनिष्ठ न्यायालयाच्या निर्णयाच्या विरोधात वरिष्ठ न्यायालयात जरी अपिल केले वा अपिलात वरिष्ठ न्यायालयाने कनिष्ठ न्यायालयाच्या निर्णयाला स्थगिती आदेश दिले तरी अशा कर्मचाऱ्यांची तदर्थ पदोन्नती चालू ठेवण्यात येवू नये.

१६) न्यायालयीन कार्यवाही चालू असलेल्या प्रकरणात एखाद्या अधिकारी/कर्मचाऱ्यास तदर्थ पदोन्नती दिलेली नसल्यास व न्यायालयीन कार्यवाहीमध्ये संबंधीत अधिकारी/कर्मचारी दोषी ठरल्यास व न्यायालयाने त्यांना शिक्षा ठोठावल्यास संबंधीत अधिकारी/कर्मचाऱ्यास मोहोरबंद पाकीट उघडून पदोन्नती देण्याचा प्रश्न उद्भवत नाही. न्यायालयाने दिलेल्या शिक्षेची अंमलबजावणी करण्याची कार्यवाही सुरू करावी. प्रस्तुत प्रकरणात संबंधीत अधिकारी/कर्मचाऱ्याने कनिष्ठ न्यायालयाच्या निर्णयाच्या विरोधात वरिष्ठ न्यायालयात जरी अपील दाखल केले व अपिलात वरिष्ठ न्यायालयाने कनिष्ठ न्यायालयाच्या निर्णयाला स्थगिती आदेश दिले तरी संबंधीत अधिकारी/कर्मचाऱ्याला मोहोरबंद पाकीट उघडून पदोन्नती देवू नये.

१७) अ) न्यायालयीन कार्यवाही सुरु असलेल्या प्रकरणात एखाद्या अधिकारी/कर्मचाऱ्यास सबळ पुराव्याअभावी किंवा तांत्रिक मुद्यावर निर्दोष ठरविल्यास व कनिष्ठ न्यायालयाच्या निर्णयाच्या विरोधात वरिष्ठ न्यायालयात अपिल दाखल केल्यानंतर वरिष्ठ न्यायालयाने कनिष्ठ न्यायालयाच्या निर्णयाला स्थगिती दिल्यास,

१. तदर्थ पदोन्नती दिली असल्यास ती चालू ठेवावी, मात्र ती तदर्थ पदोन्नती वरिष्ठ न्यायालयाचा अंतिम निर्णय होईपर्यंत नियमीत करण्यात येवू नये.

२. मात्र तदर्थ पदोन्नती दिली नसल्यास, मोहोरबंद पाकीट उघडून त्याला तदर्थ पदोन्नती देण्यात येवू नये.

ब) न्यायालयीन कार्यवाही सुरु असलेल्या प्रकरणात एखादा अधिकारी/कर्मचारी सबळ पुराव्याअभावी किंवा तांत्रिक मुद्यावर निर्दोष ठरल्यास व वरिष्ठ न्यायालयातील अपिलामध्ये कनिष्ठ न्यायालयाचा निर्णय फिरवून संबंधीत अधिकारी/कर्मचाऱ्यास दोषी ठरविल्यास, यापूर्वीच्या उप परिच्छेद १५ व १६ नुसार कार्यवाही करावी.

क) न्यायालयीन कार्यवाही सुरु असलेल्या प्रकरणात एखादा अधिकारी/कर्मचारी सबळ पुराव्याअभावी किंवा तांत्रिक मुद्यावर निर्दोष ठरल्यास व सदर निर्णयाविरोधात वरिष्ठ न्यायालयात अपिल दाखल न करण्याचा निर्णय विभागाने घेतल्यास किंवा वरिष्ठ न्यायालयात केलेल्या अपिलामध्ये वरिष्ठ न्यायालयाने कनिष्ठ न्यायालयाचा निर्णय कायम ठेवल्यास उपपरिच्छेद क्रमांक १२ नुसार कार्यवाही करावी.

१८) ज्या अधिकारी/कर्मचाऱ्यांचे पदोन्नतीचे प्रकरण त्यांच्याविरुध्द शिस्तभंगविषयक /न्यायालयीन कार्यवाही सुरु असल्यामुळे विभागीय पदोन्नती समितीच्या पहिल्या बैठकीत मोहोरबंद पाकीटात ठेवले आहे अशा प्रकरणात, संबंधीत अधिकारी/कर्मचारी कालांतराने पूर्णत: निर्दोष सुटला व त्याला मोहोरबंद पाकिटात ठेवलेल्या निष्कर्षानुसार पदोन्नती देताना, नंतरच्या कालावधीत दुसरी विभागीय चौकशी किंवा न्यायालयीन कार्यवाही, त्याच्या कनिष्ठास पदोन्नती दिल्याच्या दिनांकानंतर सुरू झाली असेल, तर अशा प्रकरणी संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यास पहिल्या विभागीय पदोन्नती समितीच्या निष्कर्षानुसार त्याला पदोन्नती देण्यात यावी व त्याला कनिष्ठ असलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यास देण्यात आलेला पदोन्नतीचा दिनांक हा मानीव दिनांक म्हणून देण्यात यावा [कनिष्ठाच्या पदोन्नतीच्या दिनांकास अशा अधिकाऱ्याविरूध्द कोणतीही विभागीय चौकशी अथवा न्यायालयीन कार्यवाही सुरू नसल्यामुळे अशा कर्मचाऱ्याला प्रत्यक्ष पदोन्नती नाकारता येणार नाही ( Even if the second departmental proceeding or judicial proceeding relates to his misconduct during the period for which his assessment for promotion was done by the first DPC)]. परंतु ज्या प्रकरणी अशा कर्मचाऱ्याच्या कनिष्ठ कर्मचाऱ्यास पदोन्नती देण्यात आली नसेल, तत्पूर्वी किंवा संबंधित कनिष्ठ कर्मचाऱ्यास पदोन्नती दिल्याच्या दिनांकापूर्वी, अशा अधिकाऱ्याविरुध्द दुसरी विभागीय चौकशी किंवा न्यायालयीन कार्यवाही सुरू झाली असेल अशा प्रकरणी मात्र उपरोक्त परिच्छेद १ (१) मधील तरतुदी लागू होतील.

१९) हे आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकाला शासन परिपत्रक दि.२.४.१९७६ नुसार विचारात घेतलेली ज्या अधिकारी/कर्मचाऱ्यांची प्रकरणे, प्रलंबित आहेत त्यांच्या बाबतीत खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

अ) विभागीय चौकशी /न्यायालयीन प्रकरणांच्या अनुषंगाने एखाद्या अधिकारी/ कर्मचाऱ्यास दि.२.४.१९७६ च्या शासन परिपत्रकानुसार जाणीवपूर्वक निर्णय घेऊन

पदोन्नती नाकारली असल्यास त्यांचे प्रकरण मोहरबंद पाकीटात ठेवल्याचे समजून या प्रस्तावातील परि.१ (१ ते ११) प्रमाणे कार्यवाही करावी.

ब) ज्या प्रकरणात दि.२.४.१९७६ च्या शासन परिपत्रकान्वये जाणीवपूर्वक निर्णय घेऊन तात्पुरती पदोन्नती दिली असल्यास त्यांच्या बाबतीत प्रकरणपरत्वे प्रस्तावातील परिच्छेद १(१३) किंवा १(१५) किंवा १(१७) प्रमाणे कार्यवाही करावी.

क) ज्या प्रकरणात दि.२.४.१९७६ च्या शासन परिपत्रकानुसार जाणीवपूर्वक निर्णय घेऊन तदर्थ पदोन्नती दिली नसेल आणि तदर्थ पदोन्नती न देताच त्यांच्यावरील शिस्तभंगविषयक कारवाईच्या अनुषंगाने तो दोषी ठरत असल्यास व त्यांच्यावर शिक्षा/शास्ती बजावल्यास त्यांच्याबाबतीत प्रकरणपरत्वे परिच्छेद १(१४) किंवा १(१६) किंवा १(१७) प्रमाणे कार्यवाही करावी.

२. सदर शासन निर्णयातील सूचना सर्व विभाग/कार्यालय प्रमुखांनी त्यांच्या अधिपत्याखालील अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणाव्यात.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१७१२१४११३५२६७९०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Geeta Rahul Kulkarni

Digitally signed by Geeta Rahul Kulkarni
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=87e2e317e0d978442ac6b599d6a0abcf73fe717ee5299444 3a8509075101cc93, serialNumber=92d474843b842720200d1a10946d5fc9348b9450f86 7605a47d177207c9bd384, cn=Geeta Rahul Kulkarni
Date: 2017.12.19 16:43:30 +05'30'

**(गीता कुलकर्णी)**
**उप सचिव (सेवा), महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,
३. सर्व मा.मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद / विधानसभा, विधानभवन, मुंबई,
५. सर्व मा.संसद सदस्य, /मा. विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य,
६. मा. मुख्य सचिव,
७. सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
८. सर्व मंत्रालयीन विभाग (आस्थापना),
-त्यांनी हे आदेश सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणावे.
९. *प्रबंधक, मूळ शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
१०.*प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
११.* प्रबंधक, लोक आयुक्त व उपलोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,

१२.*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१३.*सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानसभा) मुंबई,
१४.*सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधान परिषद) मुंबई,
१५.*राज्य निवडणूक आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई,
१६.*सचिव, राज्य माहिती आयोग, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई,
१७.*महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, मुंबई.
१८. *महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा परीक्षा) महाराष्ट्र, मुंबई,
१९.*महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, नागपूर,
२०.*महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा परीक्षा) महाराष्ट्र, नागपूर,
२१.महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,मुंबई (प्रसिध्दीकरिता ५ प्रती)
२२.ग्रंथपाल , महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ग्रंथालय, सहावा मजला, विधान भवन, मुंबई ४०० ०३२ (१० प्रती)
२३.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
२४.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
२५.मुख्य लेखापरीक्षक (निवासी लेखे), कोंकण भवन, नवी मुंबई,
२६.सर्व विभागीय आयुक्त
२७.सर्व जिल्हाधिकारी
२८. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
२९.सर्व मंत्रालयीन विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख,
३०.*सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांची मान्यता प्राप्त संघटना, (कार्यासन -१६ अ, सामान्य प्रशासन विभागामार्फत)
३१.सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
३२.निवड नस्ती.
(*-पत्राद्वारे)

**महाराष्ट्र शासन**

क्रमांक: बीसीसी-२०१७/प्र.क्र.३१२ A/१६- ब,
सामान्य प्रशासन विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
दिनांक- २९ डिसेंबर, २०१७

**प्रति,**

अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव
सर्व प्रशासकीय विभाग,
मंत्रालय, मुंबई.

**विषय:-** पदोन्नतीचे आरक्षण रद्द करण्यासंदर्भात मा.उच्च न्यायालयाने याचिका क्र.२७९७/२०१५ वर दिनांक ४.८.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने पदोन्नती देण्यासंदर्भात मार्गदर्शनपर सूचना.

**संदर्भ :-** १) मा.उच्च न्यायालयाने याचिका क्र.२७९७/२०१५ संदर्भात दिनांक ४.८.२०१७ रोजी दिलेला निर्णय
२) शासनाची समक्रमांकाची दिनांक १८.१०.२०१७ व २.११.२०१७ ची पत्रे.

विषयांकित प्रकरणी मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र. २७९७/२०१५ या प्रकरणी दिनांक ४.८.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयान्वये, दिनांक २५.५.२००४ चा शासन निर्णय रद्द करुन पदोन्नतीमधील आरक्षण अवैध ठरविले आहे. तथापि, मा.उच्च न्यायालयाने आपल्या दिनांक ४.८.२०१७ च्या निर्णयास १२ आठवडयाची स्थगिती दिली असल्यामुळे संदर्भाधिन क्र. २ येथील दिनांक १८.१०.२०१७ च्या पत्रान्वये सदर स्थगिती कालावधीत पदोन्नतीमध्ये आरक्षण देऊन पदोन्नती देण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आले होते. हा स्थगिती कालावधी दिनांक २७.१०.२०१७ रोजी संपुष्टात आला आहे.

२. या प्रकरणी मा.उच्च न्यायालयाच्या उक्त निर्णयास स्थगिती देण्याच्या अनुषंगाने, मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६ /२०१७ संदर्भात दिनांक ३०.१०.२०१७ रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाच्या दिनांक ४.८.२०१७ च्या निर्णयास कोणतीही स्थगिती दिलेली नाही अथवा परिस्थिती “जैसे थे” ठेवण्याबाबत देखिल कोणतेही आदेश दिलेले नाहीत. त्यामुळे शासन निर्णय दि. २५.५.२००४ मधील तरतुदीनुसार मागासवर्गीयांना पदोन्नतीमध्ये आरक्षण देता येणार नाही. यास्तव, मा.सर्वोच्च न्यायालयाचे आदेश होईपर्यंत सर्व स्तरावरील पदोन्नती प्रक्रिया स्थगित ठेवण्याबाबतच्या सुचना संदर्भाधिन दि.२.११.२०१७ च्या पत्रान्वये देण्यात आल्या होत्या.

३. सदर प्रकरणी दिनांक १५.११.२०१७ रोजी झालेल्या सुनावणीच्यावेळी मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाच्या दि.४.८.२०१७ च्या आदेशास स्थगिती देण्याबाबत अथवा परिस्थिती जैसे थे ठेवण्याबाबत कोणतेही आदेश पारित केले नाहीत. त्यामुळे दि.२७.१०.२०१७ पासून राज्यातील सर्व स्तरावरील पदोन्नतीची प्रक्रीया पुर्णपणे ठप्प झाली आहे. मा.उच्च न्यायालयाने पदोन्नतीतील आरक्षण अवैध ठरविले असल्याने सर्वच स्तरावरील पदोन्नतीची प्रक्रीया स्थगित न ठेवता, खुल्या प्रवर्गातील रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत विविध प्रशासकीय विभाग तसेच खुल्या प्रवर्गातील अधिकारी/कर्मचा-यांकडून शासनास निवेदने प्राप्त झाली आहेत.तसेच मा.सर्वोच्च न्यायालयात राज्य शासनाने दाखल केलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ अद्याप प्रलंबित आहे, ही बाब विचारात घेता, याबाबत विधि व न्याय विभागाचे अभिप्राय घेण्यात आले. त्या विभागाने दि.२८.१२.२०१७ रोजी दिलेल्या अभिप्रायानुसार खुल्या प्रवर्गातील कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यास कोणतीही वैधानिक अडचण नसल्याचे अभिप्राय दिले आहेत. त्यानुसार तुर्तास पदोन्नतीच्या कोटयातील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून भरण्यात यावीत.अशी कार्यवाही करतांना सेवाजेष्ठता यादीमधील मागासवर्गीय अधिकारी/कर्मचारी यांना पदोन्नती देण्यापुर्वी ते , दि.२५.५.२००४ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार आरक्षणाचा लाभ मिळून सेवाजेष्ठता यादीत वरच्या स्थानावर आले नाहीत, याची खात्री प्रत्येक प्रशासकीय विभागाने करावी.

४. सर्व प्रशासकीय विभागांनी उपरोक्त आदेश त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व क्षेत्रीय कार्यालयांना तातडीने निदर्शनास आणून सदर आदेशाचे काटेकोरपणे पालन करावे.

५. सदर शासन पत्र महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून, त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१७१२२९१४२१५२५८०७ असा आहे. हे पत्र डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

Rasik Ambadas khadse

Digitally signed by Rasik Ambadas khadse
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=GAD, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=46b7df2d2f9479d2bb9092a9859cf1644735a09d26dba77f04d38c1354b35457, cn=Rasik Ambadas khadse
Date: 2017.12.29 14:26:54 +05'30'

**( र.अं.खडसे )**

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१) राज्यपाल यांचे सचिव,

२) मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव,

३) सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,

४) विरोधी पक्ष नेता, विधानसभा व विधानपरिषद यांचे खाजगी सचिव

५) मुख्य सचिव,

६) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,

७) सर्व विभागीय आयुक्त,

८) सर्व सहायक आयुक्त मागास वर्ग कक्ष,कोकण विभाग,पुणे विभाग,नाशिक विभाग ,नागपूर विभाग,अमरावती विभाग,औरंगाबाद विभाग,

९) सर्व जिल्हाधिकारी,

१०) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,

११) प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ शाखा, मुंबई,

१२) प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,

१३) प्रबंधक, लोकायुक्त आणि उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,

१४) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,

१५) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,

१६) राज्यातील सर्व महामंडळे आणि उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक,

१७) सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,

१८) सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका,

१९) संचालक, समाजकल्याण, पुणे,

२०) आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक,

२१) संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,

२२) संचालक, सेवायोजन, मुंबई,

२३) महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर,

२४) महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा परीक्षा), मुंबई/नागपूर,

२५) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,

२६) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,

२७) सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,

२८) सर्व मंत्रालयीन विभाग, त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख यांना सदर पत्राची प्रत,त्यांच्या स्तरावरुन स्वतंत्रपणे पाठवून कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात याव्यात.

२९) ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई

३०) निवड नस्ती, कार्यासन १६-ब.

**महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ चा नियम २३**

---

कार्यवाहीबाबतच्या सूचनांचा पुनरुच्चार

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक वशिअ-१११७/प्र.क्र. १४०/११**
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक २९ डिसेंबर, २०१७

**पहा** :- शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र सीडीआर-१००६/
प्र.क्र.१२/०६/अकरा, दि. १७.०८.२००६

**प रि प त्र क**

महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मधील नियम २३ च्या तरतुदीन्वये, कोणताही शासकीय कर्मचारी त्याच्या शासकीय सेवेसंबंधीच्या कोणत्याही बाबीच्या संबंधात कोणत्याही वरिष्ठ प्राधिकरणावर कोणताही राजकीय किंवा इतर बाह्य दबाव आणणार नाही किंवा तसा प्रयत्न करणार नाही असे विहित करण्यात आले आहे. त्यानुसार, शासकीय कर्मचाऱ्यांनी त्यांच्या सेवाविषयक बाबींसंबंधीच्या तक्रारीचे निवारण करुन घेण्यासाठी तसेच वैयक्तिक कामे करुन घेण्यासाठी राजकीय कार्यकर्ते व अन्य अशासकीय व्यक्तींमार्फत दबाव आणल्याचे आढळून आल्यास ते शिस्तभंगविषयक कारवाईस पात्र ठरतात. अशा प्रकरणी करावयाच्या कारवाईसंबंधीच्या सूचना शासनाने वेळोवेळी निर्गमित केल्या आहेत. यासंबंधीच्या अद्ययावत सूचना वर नमूद दिनांक १७ ऑगस्ट, २००६ च्या परिपत्रकात समाविष्ट आहेत.

२. सदर शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक १७ ऑगस्ट, २००६ मधील सूचनांन्वये, शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्याने त्याच्या सेवाविषयक बाबींसंदर्भात कोणत्याही वरिष्ठ प्राधिकरणावर दबाव आणल्याचे वा तसा प्रयत्न केल्याचे निदर्शनास आल्यास प्रथम संबंधित अधिकारी /कर्मचाऱ्याकडून त्याबाबत खुलासा घेण्यात यावा. तसेच, असा खुलासा करताना संबंधित अधिकारी / कर्मचारी यांनी संबंधित सक्षम प्राधिकाऱ्यास "आपला अशा पत्रव्यवहाराशी संबंध नसून त्याची दखल घेऊ नये" असे स्पष्टपणे कळविल्याखेरीज संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्यासंदर्भात प्राप्त झालेल्या पत्रव्यवहाराची/शिफारशींची दखल घेण्यात येऊ नये. अन्यथा, संबंधित अधिकारी/कर्मचारी यांची सदर पत्रव्यवहारास वा कृतीस अप्रत्यक्ष संमती वा मूकसंमती गृहीत धरून संबंधितांवर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ मधील तरतुदीनुसार समुचित शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्याने शिस्तभंगाची कारवाई करावी, असे कळविण्यात आले आहे. सदर सूचनांकडे सर्व संबंधितांचे पुन्हा लक्ष वेधण्यात येत आहे. लोकप्रतिनिधींनी स्वत:हून अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक बाबींसंदर्भात विनंती / शिफारस केल्यास त्याचा विचार करण्यास वरील सूचनांद्वारे प्रतिबंध करण्यात आलेला नाही, याकडेही लक्ष वेधण्यात येत आहे.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संकेताक २०१७१२३०१७१४१८६३०७ असा आहे. हे आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Ramakant Shivajirao Ghatge

Digitally signed by Ramakant Shivajirao Ghatge
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=G.A.D, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=927f16b596a85f3f04b621916641eefd1bb6b4367c467eb0b061a30ce41ba8ec, cn=Ramakant Shivajirao Ghatge
Date: 2017.12.30 18:11:59 +05'30'

(र.शि.घाटगे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. राज्यपालांचे सचिव,
२. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव,
३. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव,
४. मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव,
५. विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानसभा,
६. विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानपरिषद,
७. मुख्य सचिव,
८. सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव,
९. सर्व मंत्री/ राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/ स्वीय सहायक,
१०. सर्व मंत्रालयीन विभाग,
११. मंत्रालयीन विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व विभागप्रमुख व कार्यालयप्रमुख,
१२. सर्व विभागीय आयुक्त,
१३. सर्व जिल्हाधिकारी,
१४. *प्रबंधक, मूळ शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
१५. *प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
१६. *प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
१७. *सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
१८. *सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१९. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई (५ प्रती),
२०. सर्व विधानमंडळ सदस्य,
२१. विधीमंडळ ग्रंथालय, विधानभवन, मुंबई (१० प्रती),
२२. सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
२३. निवडनस्ती

* पत्राने

**महाराष्ट्र शासन**

क्रमांक: बीसीसी-२०१७/प्र.क्र.३१२ A/१६- ब,
सामान्य प्रशासन विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
दिनांक- २९ डिसेंबर, २०१७

**प्रति,**

अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव
सर्व प्रशासकीय विभाग,
मंत्रालय, मुंबई.

**विषय:-** पदोन्नतीचे आरक्षण रद्द करण्यासंदर्भात मा.उच्च न्यायालयाने याचिका क्र.२७९७/२०१५ वर दिनांक ४.८.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने पदोन्नती देण्यासंदर्भात मार्गदर्शनपर सूचना.

**संदर्भ :-** १) मा.उच्च न्यायालयाने याचिका क्र.२७९७/२०१५ संदर्भात दिनांक ४.८.२०१७ रोजी दिलेला निर्णय
२) शासनाची समक्रमांकाची दिनांक १८.१०.२०१७ व २.११.२०१७ ची पत्रे.

विषयांकित प्रकरणी मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र. २७९७/२०१५ या प्रकरणी दिनांक ४.८.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयान्वये, दिनांक २५.५.२००४ चा शासन निर्णय रद्द करुन पदोन्नतीमधील आरक्षण अवैध ठरविले आहे. तथापि, मा.उच्च न्यायालयाने आपल्या दिनांक ४.८.२०१७ च्या निर्णयास १२ आठवडयाची स्थगिती दिली असल्यामुळे संदर्भाधिन क्र. २ येथील दिनांक १८.१०.२०१७ च्या पत्रान्वये सदर स्थगिती कालावधीत पदोन्नतीमध्ये आरक्षण देऊन पदोन्नती देण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आले होते. हा स्थगिती कालावधी दिनांक २७.१०.२०१७ रोजी संपुष्टात आला आहे.

२. या प्रकरणी मा.उच्च न्यायालयाच्या उक्त निर्णयास स्थगिती देण्याच्या अनुषंगाने, मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६ /२०१७ संदर्भात दिनांक ३०.१०.२०१७ रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाच्या दिनांक ४.८.२०१७ च्या निर्णयास कोणतीही स्थगिती दिलेली नाही अथवा परिस्थिती “जैसे थे” ठेवण्याबाबत देखिल कोणतेही आदेश दिलेले नाहीत. त्यामुळे शासन निर्णय दि. २५.५.२००४ मधील तरतुदीनुसार मागासवर्गीयांना पदोन्नतीमध्ये आरक्षण देता येणार नाही. यास्तव, मा.सर्वोच्च न्यायालयाचे आदेश होईपर्यंत सर्व स्तरावरील पदोन्नती प्रक्रिया स्थगित ठेवण्याबाबतच्या सुचना संदर्भाधिन दि.२.११.२०१७ च्या पत्रान्वये देण्यात आल्या होत्या.

३. सदर प्रकरणी दिनांक १५.११.२०१७ रोजी झालेल्या सुनावणीच्यावेळी मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाच्या दि.४.८.२०१७ च्या आदेशास स्थगिती देण्याबाबत अथवा परिस्थिती जैसे थे ठेवण्याबाबत कोणतेही आदेश पारित केले नाहीत. त्यामुळे दि.२७.१०.२०१७ पासून राज्यातील सर्व स्तरावरील पदोन्नतीची प्रक्रीया पुर्णपणे ठप्प झाली आहे. मा.उच्च न्यायालयाने पदोन्नतीतील आरक्षण अवैध ठरविले असल्याने सर्वच स्तरावरील पदोन्नतीची प्रक्रीया स्थगित न ठेवता, खुल्या प्रवर्गातील रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत विविध प्रशासकीय विभाग तसेच खुल्या प्रवर्गातील अधिकारी/कर्मचा-यांकडून शासनास निवेदने प्राप्त झाली आहेत.तसेच मा.सर्वोच्च न्यायालयात राज्य शासनाने दाखल केलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ अद्याप प्रलंबित आहे, ही बाब विचारात घेता, याबाबत विधि व न्याय विभागाचे अभिप्राय घेण्यात आले. त्या विभागाने दि.२८.१२.२०१७ रोजी दिलेल्या अभिप्रायानुसार खुल्या प्रवर्गातील कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यास कोणतीही वैधानिक अडचण नसल्याचे अभिप्राय दिले आहेत. त्यानुसार तुर्तास पदोन्नतीच्या कोटयातील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून भरण्यात यावीत.अशी कार्यवाही करतांना सेवाजेष्ठता यादीमधील मागासवर्गीय अधिकारी/कर्मचारी यांना पदोन्नती देण्यापुर्वी ते , दि.२५.५.२००४ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार आरक्षणाचा लाभ मिळून सेवाजेष्ठता यादीत वरच्या स्थानावर आले नाहीत, याची खात्री प्रत्येक प्रशासकीय विभागाने करावी.

४. सर्व प्रशासकीय विभागांनी उपरोक्त आदेश त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व क्षेत्रीय कार्यालयांना तातडीने निदर्शनास आणून सदर आदेशाचे काटेकोरपणे पालन करावे.

५. सदर शासन पत्र महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून, त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१७१२२९१४२१५२५८०७ असा आहे. हे पत्र डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

Rasik Ambadas khadse

Digitally signed by Rasik Ambadas khadse
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=GAD, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=46b7df2d2f9479d2bb9092a9859cf1644735a09d26dba77f04d38c1354b35457, cn=Rasik Ambadas khadse
Date: 2017.12.29 14:26:54 +05'30'

**( र.अं.खडसे )**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१) राज्यपाल यांचे सचिव,
२) मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव,
३) सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४) विरोधी पक्ष नेता, विधानसभा व विधानपरिषद यांचे खाजगी सचिव

५) मुख्य सचिव,
६) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,
७) सर्व विभागीय आयुक्त,
८) सर्व सहायक आयुक्त मागास वर्ग कक्ष,कोकण विभाग,पुणे विभाग,नाशिक विभाग ,नागपूर विभाग,अमरावती विभाग,औरंगाबाद विभाग,
९) सर्व जिल्हाधिकारी,
१०) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
११) प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ शाखा, मुंबई,
१२) प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
१३) प्रबंधक, लोकायुक्त आणि उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
१४) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१५) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
१६) राज्यातील सर्व महामंडळे आणि उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक,
१७) सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,
१८) सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका,
१९) संचालक, समाजकल्याण, पुणे,
२०) आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक,
२१) संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,
२२) संचालक, सेवायोजन, मुंबई,
२३) महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर,
२४) महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा परीक्षा), मुंबई/नागपूर,
२५) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
२६) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
२७) सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
२८) सर्व मंत्रालयीन विभाग, त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख यांना सदर पत्राची प्रत,त्यांच्या स्तरावरुन स्वतंत्रपणे पाठवून कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात याव्यात.
२९) ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
३०) निवड नस्ती, कार्यासन १६-ब.

**मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अनुषंगाने करार /कंत्राटी पध्दतीने निर्माण केलेल्या पदांवरील नेमणुकीच्या अटी- शर्तींबाबत तसेच सदर पदावर नियुक्त कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित न करणेबाबत**

**महाराष्ट्र शासन**

**सामान्य प्रशासन विभाग**

**शासन परिपत्रक क्रमांकः एसआरव्ही २०१७/प्र.क्र.४५५/कार्या.१२**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
तारीख : ०९ फेब्रुवारी, २०१८

<u>वाचा</u> :-

**सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक : एसआरव्ही-२००५/प्र.क्र.४७/०५/१२, दि.२५ ऑगस्ट,२००५.**

<u>शासन परिपत्रक</u> :-

संदर्भाधीन शासन परिपत्रकाद्वारे मा.सर्वोच्च न्यायालयाने नियमित पदावरील तात्पुरत्या/अस्थायी नियुक्त्या नियमित न करण्याबाबत वेळोवेळी दिलेल्या न्यायनिणर्याच्या अनुषंगाने, सर्व पदांवरील नियुक्त्या विहित मार्गाने/माध्यमांमार्फत करण्याची दक्षता घेण्याबाबत, तसेच अत्यंत तातडीची गरज म्हणून तात्पुरत्या / अस्थायी नियुक्त्या कराव्या लागल्या तर त्या संपुष्टात आणण्याची दक्षता घेण्याबाबत, तसेच अशा कर्मचाऱ्यांनी त्यांना, नियमित सेवेत सामावून घेण्याची मागणी केल्यास ती मान्य करता येणार नसल्याचे, त्यांना स्पष्टपणे सूचित करण्याबाबतच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

त्यानंतर शासनाने कंत्राटी तत्वावर पद नियुक्तीसाठी निर्माण केलेल्या पदांवरील कंत्राटी पध्दतीने नियुक्त कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित करण्याच्या अनुषंगाने, मा.सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल अपिल क्रमांक ६१३२-३३/२०१६ या प्रकरणात दिनांक १२ जुलै, २०१६ रोजी दिलेल्या न्यायनिर्णयानुसार कंत्राटी पद्धतीने निर्माण केलेली पदे कायम स्वरूपी समजण्यात येवू नये, अशा स्वरुपाचे आदेश दिले आहेत. **मा.सर्वोच्च न्यायालयाच्या सदर निर्णयाची प्रत आवश्यक कार्यवाहीसाठी व माहितीस्तव या सोबत जोडण्यात आली आहे.** सबब, मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अनुषंगाने, कंत्राटी पध्दतीने नियुक्तीसाठी निर्माण केलेल्या पदांवरील नियुक्त्या नियमित न करण्याबाबतची दक्षता घेण्यात यावी.

मा.सर्वोच्च न्यायालयाच्या सदर निर्णयाचे अवलोकन केले असता, त्यामधील परिच्छेद क्रमांक १३ व १५ अन्वये मा.न्यायालयाने गृह विभागाच्या दिनांक २१ ऑगस्ट, २००६ व दिनांक १५/०९/२००६ च्या शासन निर्णयाद्वारे विधी सल्लागार/अधिकारी व विधी निर्देशक या पदनामाची ४७१ पदे कंत्राटी तत्वावर भरण्याबाबतच्या शासन निर्णयातील अटी /शर्ती विचारात घेऊन त्या आधारे सदर कंत्राटी पध्दतीवर निर्माण केलेली पदे नियमित समजण्यात येऊ नये असा निर्णय दिला आहे.

सबब, सर्व प्रशासकीय विभागांनी किंवा त्यांच्या अधिपत्याखालील क्षेत्रीय कार्यालयाने यापुढे कंत्राटी पध्दतीने निर्माण करण्यात आलेल्या पदांवर नियुक्ती करतांना निर्गमित करावयाच्या आदेशामध्ये खाली नमूद केल्याप्रमाणे अटी / शर्ती अंतर्भूत करण्याची दक्षता घ्यावी.

१) कंत्राटी पध्दतीने पद निर्मिती करतांना निर्गमित करावयाच्या **शासन निर्णयात** अंतर्भूत करावयाच्या **अटी / शर्ती** सोबतच्या **विवरणपत्र- अ** येथे नमूद करण्यात आल्या आहेत.
२) कंत्राटी पध्दतीने नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यासोबत करावयाच्या **करारनाम्यामध्ये** अंतर्भूत करावयाच्या **अटी / शर्ती** सोबतच्या **विवरणपत्र- ब** येथे नमूद करण्यात आल्या आहेत.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१८०२१२१२२७१६८५०७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Geeta Rahul Kulkarni

Digitally signed by Geeta Rahul Kulkarni
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=87e2e317e0d978442ac6b599d6a0abcf73fe717ee52994443a8509075101cc93, serialNumber=92d474843b842720200d1a10946d5fc9348b9450f867605a47d177207c9bd384, cn=Geeta Rahul Kulkarni
Date: 2018.02.12 12:35:38 +05'30'

**( गीता रा. कुलकर्णी )**
**उप सचिव (सेवा), महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२) मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,
३) सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४) मा.मुख्य सचिव,
५) सर्व मंत्रालयीन विभागांचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
६) सर्व मंत्रालयीन विभाग,
७) *प्रबंधक,मूळ शाखा, उच्च न्यायालय,मुंबई,
८) *प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय,मुंबई,
९) *प्रबंधक,लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय,मुंबई
१०)*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग,मुंबई,
११)*प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानसभा),मुंबई,
१२)*सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानपरिषद), मुंबई,
१३)*सचिव, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासकीय भवन,मुंबई,
१४)*महालेखापाल,महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई,
१५)*महालेखापाल,महारार्ष्ट-१ (लेखा व परिक्षा), महाराष्ट्र,मुंबई,
१६)*महालेखापाल,महाराष्ट्र-२ (लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र,नागपूर
१७)*महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व परीक्षा), महाराष्ट्र, नागपूर,

१८) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१९) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई,
२०) मुख्य लेखा परीक्षक (निवासी लेखे) कोकण भवन, नवी मुंबई,
२१) सर्व विभागीय आयुक्त,
२२) सर्व जिल्हाधिकारी,
२३) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
२४) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
२५) निरनिराळया मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
२६) सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
२७) निवडनस्ती,
*पत्राने.

## शासन परिपत्रक, क्र :- एसआरव्ही २०१७/प्र.क्र.४५५/कार्या.१२, दिनांक ०९ फेब्रुवारी, २०१८
## सोबतचे विवरणपत्र- अ

## कंत्राटी पध्दतीने पद निर्मिती करताना निर्गमित करावयाच्या शासन निर्णयात अंतर्भूत करावयाच्या अटी / शर्ती

१) कंत्राटी तत्वावर भरतीसाठी ------- नविन पदे निर्माण करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२) सदर पदे नियमित वेतनश्रेणीत न भरता रु.--------- इतक्या एकत्रित वेतनावर कंत्राटी पध्दतीने खालील अटींच्या अधीन राहून भरण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

- सदर पदांची नेमणूक ही पूर्णत: कंत्राटी पध्दतीने असेल.
- या पदावरील अधिकारी/कर्मचारी यांना शासकीय कर्मचारी म्हणून गणले जाणार नाही.
- कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करावयाच्या पदांची शैक्षणिक अर्हता, अनुभव तसेच कर्तव्य व जबाबदाऱ्या याबाबतचा तपशिल सोबतच्या .............. या परिशिष्टामध्ये देण्यात आला आहे. (संबंधित प्रशासकीय विभागाने त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयासाठी निर्माण केलेल्या कंत्राटी पदांसाठी आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता, अनुभव तसेच कर्तव्य व जबाबदाऱ्या याबाबतचा तपशिल नमूद करणारे परिशिष्ट जोडणे आवश्यक राहिल.)
- कंत्राटी पध्दतीने भरावयाच्या पदांसाठी निवडमंडळ गठित करण्यात येऊन सदर निवड मंडळामार्फत शासनाच्या प्रचलित धोरणानुसार उमेदवारांची निवड करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.
- सदर नेमणूका या करार पध्दतीने प्रथमत: ११ महिन्यांसाठी करण्यात याव्यात. ११ महिन्यांनंतर आवश्यक असल्यास करारनाम्याची मुदत वेळोवेळी वाढविता येईल. तथापि, अशी मुदत वाढवितांना एका वेळी ही मुदत ११ महिन्यांपेक्षा अधिक असणार नाही यांची काळजी नियुक्ती प्राधिकारी यांनी घ्यावी. अशा प्रकारे जास्तीत जास्त ३ वेळा नियुक्ती करता येईल. त्यानंतर अशा उमेदवाराची पुनश्च नियुक्त करणे आवश्यक आहे असे सक्षम प्राधिकाऱ्याचे मत असल्यास त्या उमेदवारास पुनश्च निवड प्रक्रियेस सामोरे जावे लागेल.
- संबंधित नियुक्ती प्राधिकारी शासनाच्या वतीने नियुक्तीच्या वेळी संबंधितांबरोबर विहित प्रपत्रात करार करतील. (विहित प्रपत्र विवरणपत्र-ब येथे नमूद करण्यात आले आहे.) कराराची सर्व कागदपत्रे जतन करून ठेवणे ही त्या संबंधित कार्यालयाची जबाबदारी असेल.

शासन परिपत्रक, क्र :- एसआरव्ही २०१७/प्र.क्र.४५५/कार्या.१२, दिनांक ०९ फेब्रुवारी, २०१८
सोबतचे विवरणपत्र- ब

## कंत्राटी पध्दतीने नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यासोबत करावयाच्या करारनाम्यामध्ये अंतर्भूत करावयाच्या अटी / शर्ती

## AGREEMENT

| २१ | १४ | प्रथम अ.जा.-३ अ.ज.-३, वि.जा.- (अ)-१, भ.ज.(ब)-१,{(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड)}इ.मा.व-२,तद्नंतर ,वि.मा.प्र., या क्रमाने आळीपाळीने एसईबीसी-४ पद उपलब्ध होईल |
| २२ | १४ | प्रथम अ.जा.-३ अ.ज.-३, वि.जा.- (अ)-१, भ.ज.(ब)-१,{(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड)}इ.मा.व-२,तद्नंतर ,वि.मा.प्र., या क्रमाने आळीपाळीने एसईबीसी-४ पद उपलब्ध होईल |
| २३ | १५ | प्रथम अ.जा.-३ अ.ज.-३, वि.जा.- (अ)-१, भ.ज.(ब)-१,भ.ज.(क)-१{(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड)}इ.मा.व-२,तद्नंतर ,वि.मा.प्र., या क्रमाने आळीपाळीने एसईबीसी-४ पद उपलब्ध होईल |
| २४ | १६ | प्रथम अ.जा.-३ अ.ज.-३, वि.जा.- (अ)-१, भ.ज.(ब)-१,भ.ज.(क)-१{(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड)}इ.मा.व-३,तद्नंतर ,वि.मा.प्र., या क्रमाने आळीपाळीने एसईबीसी-४ पद उपलब्ध होईल |
| २५ | १७ | प्रथम अ.जा.-३ अ.ज.-४, वि.जा.- (अ)-१, भ.ज.(ब)-१,भ.ज.(क)-१{(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड)}इ.मा.व-३,तद्नंतर ,वि.मा.प्र., या क्रमाने आळीपाळीने एसईबीसी-४ पद उपलब्ध होईल |
| २६ | १७ | प्रथम अ.जा.-३ अ.ज.-४, वि.जा.- (अ)-१, भ.ज.(ब)-१,भ.ज.(क)-१{(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड)}इ.मा.व-३,तद्नंतर ,वि.मा.प्र., या क्रमाने आळीपाळीने एसईबीसी-४ पद उपलब्ध होईल |

| | | |
|---|---|---|
| २७ | १८ | प्रथम अ.जा.-३ अ.ज.-४, वि.जा.- (अ)-१, भ.ज.(ब)-१,भ.ज.(क)-१,भ.ज.(ड)-१{(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड)}इ.मा.व-३,तद्नंतर ,वि.मा.प्र., या क्रमाने आळीपाळीने एसईबीसी-४ पद उपलब्ध होईल |
| २८ | १९ | प्रथम अ.जा.-४ अ.ज.-४, वि.जा.- (अ)-१, भ.ज.(ब)-१,भ.ज.(क)-१,भ.ज.(ड)-१{(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड)}इ.मा.व-३,तद्नंतर ,वि.मा.प्र., या क्रमाने आळीपाळीने एसईबीसी-४ पद उपलब्ध होईल |
| २९ | २० | प्रथम अ.जा.-४ अ.ज.-४, वि.जा.- (अ)-१, भ.ज.(ब)-१,भ.ज.(क)-१,भ.ज.(ड)-१{(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड)}इ.मा.व-३,तद्नंतर ,वि.मा.प्र., या क्रमाने आळीपाळीने एसईबीसी-५ पद उपलब्ध होईल |
| ३० | २० | प्रथम अ.जा.-४ अ.ज.-४, वि.जा.- (अ)-१, भ.ज.(ब)-१,भ.ज.(क)-१,भ.ज.(ड)-१{(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड)}इ.मा.व-३,तद्नंतर ,वि.मा.प्र., या क्रमाने आळीपाळीने एसईबीसी-५ पद उपलब्ध होईल |
| ३१ | २१ | प्रथम अ.जा.-४ अ.ज.-५, वि.जा.- (अ)-१, भ.ज.(ब)-१,भ.ज.(क)-१,भ.ज.(ड)-१{(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड)}इ.मा.व-३,तद्नंतर ,वि.मा.प्र., या क्रमाने आळीपाळीने एसईबीसी-५ पद उपलब्ध होईल |
| ३२ | २२ | प्रथम अ.जा.-४ अ.ज.-५, वि.जा.- (अ)-१, भ.ज.(ब)-१,भ.ज.(क)-१,भ.ज.(ड)-१{(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड)}इ.मा.व-४,तद्नंतर ,वि.मा.प्र., या क्रमाने आळीपाळीने एसईबीसी-५ पद उपलब्ध होईल |
| ३३ | २२ | प्रथम अ.जा.-४ अ.ज.-५, वि.जा.- (अ)-१, भ.ज.(ब)-१,भ.ज.(क)-१,भ.ज.(ड)-१{(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड)}इ.मा.व-४,तद्नंतर ,वि.मा.प्र., या क्रमाने आळीपाळीने एसईबीसी-५ पद उपलब्ध होईल |
| ३४ | २३ | प्रथम अ.जा.-४ अ.ज.-५, वि.जा.- (अ)-१, भ.ज.(ब)-१,भ.ज.(क)-१,भ.ज.(ड)-१{(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड)}इ.मा.व-४,तद्नंतर ,वि.मा.प्र.-१, या क्रमाने आळीपाळीने एसईबीसी-५ पद उपलब्ध होईल |

| | | |
|---|---|---|
| सरळसेवेकरिता छोटया संवर्गासाठी आरक्षित पदांचा तपशील-अनुसूची--क रायगड (अनुसूचित जमाती - ९%) | | |
| पद संख्या | आरक्षणाची पदे | अभिप्राय |
| १ | ० | आरक्षण अधिनियम कलम ३ (१) (घ) मधील तरतुदीनुसार एकाकी पदास आरक्षण लागू नाही |
| २ | १ | प्रथम अ.जा.-१ व तद्नंतर , अ.ज., वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड),इ.मा.व.,वि.मा.प्र. एसईबीसी,या क्रमाने आळीपाळीने आरक्षणाचे एक पद उपलब्ध होईल. |
| ३ | २ | प्रथम अ.जा.-१ व तद्नंतर , अ.ज., वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड),वि.मा.प्र. एसईबीसी,या क्रमाने आळीपाळीने ,व इ.मा.व-१ असे आरक्षणाचे पद उपलब्ध होईल. |
| ४ | २ | प्रथम अ.जा.-१ व तद्नंतर , अ.ज., वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड),वि.मा.प्र. एसईबीसी,या क्रमाने आळीपाळीने ,व इ.मा.व-१ असे आरक्षणाचे पद उपलब्ध होईल. |
| ५ | ३ | प्रथम अ.जा.-१ व तद्नंतर , अ.ज., वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड),,वि.मा.प्र. या क्रमाने आळीपाळीने , इ.मा.व-१ ,एसईबीसी-१,असे आरक्षणाचे पद उपलब्ध होईल. |
| ६ | ४ | अ.जा.-१ ,अ.ज.-१ तद्नंतर , वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड),,वि.मा.प्र. या क्रमाने आळीपाळीने , इ.मा.व-१ ,एसईबीसी-१,असे आरक्षणाचे पद उपलब्ध होईल. |
| ७ | ५ | अ.जा.-१ ,अ.ज.-१ , वि.जा. भ.ज.-१ {(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड)},वि.मा.प्र. या क्रमाने आळीपाळीने , इ.मा.व-१ ,एसईबीसी-१,असे आरक्षणाचे पद उपलब्ध होईल. |
| ८ | ५ | अ.जा.-१ ,अ.ज.-१ , वि.जा. भ.ज.-१ {(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड)},वि.मा.प्र. या क्रमाने आळीपाळीने , इ.मा.व-१ ,एसईबीसी-१,असे आरक्षणाचे पद उपलब्ध होईल. |
| ९ | ६ | अ.जा.-१ ,अ.ज.-१ , वि.जा. भ.ज.-१ {(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड)},वि.मा.प्र. या क्रमाने आळीपाळीने , इ.मा.व-२ ,एसईबीसी-१,असे आरक्षणाचे पद उपलब्ध होईल. |
| १० | ७ | अ.जा.-१ ,अ.ज.-१ , वि.जा. भ.ज.-१ {(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड)},वि.मा.प्र. या क्रमाने आळीपाळीने , इ.मा.व-२ ,एसईबीसी-२,असे आरक्षणाचे पद उपलब्ध होईल. |
| ११ | ७ | अ.जा.-१ ,अ.ज.-१ , वि.जा. भ.ज.-१ {(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड)},वि.मा.प्र. या क्रमाने आळीपाळीने , इ.मा.व-२ ,एसईबीसी-२,असे आरक्षणाचे पद उपलब्ध होईल. |
| १२ | ७ | अ.जा.-१ ,अ.ज.-१ , वि.जा. भ.ज.-१ {(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड)},वि.मा.प्र. या क्रमाने आळीपाळीने , इ.मा.व-२ ,एसईबीसी-२,असे आरक्षणाचे पद उपलब्ध होईल. |
| १३ | ८ | अ.जा.-१ ,अ.ज.-१ , वि.जा. भ.ज.-१ {(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड)},वि.मा.प्र. या क्रमाने आळीपाळीने , इ.मा.व-३ ,एसईबीसी-२,असे आरक्षणाचे पद उपलब्ध होईल. |
| १४ | ९ | अ.जा.-१ ,अ.ज.-१ , वि.जा.(अ)-१, भ.ज.(ब)-१, {वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड)},वि.मा.प्र. या क्रमाने आळीपाळीने , इ.मा.व-३ ,एसईबीसी-२,असे आरक्षणाचे पद उपलब्ध होईल. |
| १५ | १० | अ.जा.-२ ,अ.ज.-१ , वि.जा.(अ)-१, भ.ज.(ब)-१, {वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड)},वि.मा.प्र. या क्रमाने आळीपाळीने , इ.मा.व-३ ,एसईबीसी-२,असे आरक्षणाचे पद उपलब्ध होईल.. |
| १६ | ११ | अ.जा.-२ ,अ.ज.-१ , वि.जा.(अ)-१, भ.ज.(ब)-१, {वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड)},वि.मा.प्र. या क्रमाने आळीपाळीने , इ.मा.व-३ ,एसईबीसी-३,असे आरक्षणाचे पद उपलब्ध होईल. |
| १७ | १२ | अ.जा.-२ ,अ.ज.-२ , वि.जा.(अ)-१, भ.ज.(ब)-१, {वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड)},वि.मा.प्र. या क्रमाने आळीपाळीने , इ.मा.व-३ ,एसईबीसी-३,असे आरक्षणाचे पद उपलब्ध होईल. |
| १८ | १२ | अ.जा.-२ ,अ.ज.-२ , वि.जा.(अ)-१, भ.ज.(ब)-१, {वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड)},वि.मा.प्र. या क्रमाने आळीपाळीने , इ.मा.व-३ ,एसईबीसी-३,असे आरक्षणाचे पद उपलब्ध होईल. |
| १९ | १३ | अ.जा.-२ ,अ.ज.-२ , वि.जा.(अ)-१, भ.ज.(ब)-१, {वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड)},वि.मा.प्र. या क्रमाने आळीपाळीने , इ.मा.व-४ ,एसईबीसी-३,असे आरक्षणाचे पद उपलब्ध होईल. |
| २० | १३ | अ.जा.-२ ,अ.ज.-२ , वि.जा.(अ)-१, भ.ज.(ब)-१, {वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड)},वि.मा.प्र. या क्रमाने आळीपाळीने , इ.मा.व-४ ,एसईबीसी-३,असे आरक्षणाचे पद उपलब्ध होईल. |
| २१ | १४ | अ.जा.-३ ,अ.ज.-२ , (वि.जा.)(अ)-१, भ.ज.(ब)-१, {वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड)},वि.मा.प्र. या क्रमाने आळीपाळीने , इ.मा.व-४ ,एसईबीसी-३,असे आरक्षणाचे पद उपलब्ध होईल. |
| २२ | १५ | अ.जा.-३ ,अ.ज.-२ , (वि.जा.)(अ)-१, भ.ज.(ब)-१, {(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड)},वि.मा.प्र. या क्रमाने आळीपाळीने , इ.मा.व-४ ,एसईबीसी-४,असे आरक्षणाचे पद उपलब्ध होईल. |
| २३ | १६ | अ.जा.-३,अ.ज.-२, (वि.जा.)(अ)-१, भ.ज.(ब)-१,भ.ज.(क)-१{(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क),भ.ज.(ड)} ,वि.मा.प्र. या क्रमाने आळीपाळीने , इ.मा.व-४ ,एसईबीसी-४,असे आरक्षणाचे पद उपलब्ध होईल. |
| २४ | १६ | अ.जा.-३,अ.ज.-२, (वि.जा.)(अ)-१, भ.ज.(ब)-१,भ.ज.(क)-१{(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क),भ.ज.(ड)} ,वि.मा.प्र. या क्रमाने आळीपाळीने , इ.मा.व-४ ,एसईबीसी-४,असे आरक्षणाचे पद उपलब्ध होईल. |
| २५ | १७ | अ.जा.-३,अ.ज.-२, (वि.जा.)(अ)-१, भ.ज.(ब)-१,भ.ज.(क)-१{(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क),भ.ज.(ड)} ,वि.मा.प्र. या क्रमाने आळीपाळीने , इ.मा.व-५,एसईबीसी-४,असे आरक्षणाचे पद उपलब्ध होईल. |
| २६ | १७ | अ.जा.-३,अ.ज.-२, (वि.जा.)(अ)-१, भ.ज.(ब)-१,भ.ज.(क)-१{(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क),भ.ज.(ड)} ,वि.मा.प्र. या क्रमाने आळीपाळीने , इ.मा.व-५ ,एसईबीसी-४,असे आरक्षणाचे पद उपलब्ध होईल. |

| | | |
|---|---|---|
| २७ | १८ | अ.जा.-४,अ.ज.-२, (वि.जा.)(अ)-१, भ.ज.(ब)-१,भ.ज.(क)-१{(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क),भ.ज.(ड) } ,वि.मा.प्र. या क्रमाने आळीपाळीने , इ.मा.व-५ ,एसईबीसी-४,असे आरक्षणाचे पद उपलब्ध होईल. |
| २८ | १९ | अ.जा.-४,अ.ज.-२, (वि.जा.)(अ)-१, भ.ज.(ब)-१,भ.ज.(क)-१{(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क),भ.ज.(ड) } ,वि.मा.प्र. या क्रमाने आळीपाळीने , इ.मा.व-५ ,एसईबीसी-५,असे आरक्षणाचे पद उपलब्ध होईल. |
| २९ | २० | अ.जा.-३,अ.ज.-३, (वि.जा.)(अ)-१, भ.ज.(ब)-१,भ.ज.(क)-१{(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क),भ.ज.(ड) } ,वि.मा.प्र. या क्रमाने आळीपाळीने , इ.मा.व-६,एसईबीसी-५,असे आरक्षणाचे पद उपलब्ध होईल. |
| ३० | २० | अ.जा.-३,अ.ज.-३, (वि.जा.)(अ)-१, भ.ज.(ब)-१,भ.ज.(क)-१{(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क),भ.ज.(ड) } ,वि.मा.प्र. या क्रमाने आळीपाळीने , इ.मा.व-६,एसईबीसी-५,असे आरक्षणाचे पद उपलब्ध होईल. |
| ३१ | २१ | अ.जा.-३,अ.ज.-३, (वि.जा.)(अ)-१, भ.ज.(ब)-१, भ.ज.(क)-१ {(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड) }, या क्रमाने आळीपाळीने , वि.मा.प्र.-१,इ.मा.व-६ ,एसईबीसी-५,असे आरक्षणाचे पद उपलब्ध होईल. |
| ३२ | २२ | अ.जा.-४ ,अ.ज.-३, (वि.जा.)(अ)-१, भ.ज.(ब)-१,भ.ज.(क)-१ {(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड) }, या क्रमाने आळीपाळीने , वि.मा.प्र.-१,इ.मा.व-६ ,एसईबीसी-५,असे आरक्षणाचे पद उपलब्ध होईल. |
| ३३ | २३ | अ.जा.-४ ,अ.ज.-३, (वि.जा.)(अ)-१, भ.ज.(ब)-१,भ.ज.(क)-१ , भ.ज.(ड)-१ , {(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड) }, या क्रमाने आळीपाळीने , वि.मा.प्र.-१,इ.मा.व-६ ,एसईबीसी-५,असे आरक्षणाचे पद उपलब्ध होईल. |

| सरळसेवेकरिता छोटया संवर्गासाठी आरक्षित पदांचा तपशील-अनुसूची--ड यवतमाळ (अनुसूचित जमाती-१४%) | | |
|---|---|---|
| पद संख्य | आरक्षणाची पदे | अभिप्राय |
| १ | ० | आरक्षण अधिनियम कलम ३ (१) (घ) मधील तरतुदीनुसार एकाकी पदास आरक्षण लागू नाही. |
| २ | १ | प्रथम अ.जा.-१ व तद्नंतर , अ.ज., वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड),इ.मा.व.,वि.मा.प्र. एसईबीसी, असे आरक्षणाचे पद उपलब्ध होईल. |
| ३ | २ | प्रथम अ.जा.-१ तद्नंतर , अ.ज., वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड),इ.मा.व.,वि.मा.प्र. या क्रमाने व एसईबीसी-१, असे आरक्षणाचे पद उपलब्ध होईल. |
| ४ | ३ | प्रथम अ.जा.-१ व अ.ज.-१,तद्नंतर , वि.जा. भ.ज.- {(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड)},इ.मा.व ,वि.मा.प्र.आळीपाळीने, या क्रमाने व एसईबीसी-१, असे आरक्षणाचे पद उपलब्ध होईल. |
| ५ | ३ | प्रथम अ.जा.-१ व अ.ज.-१,तद्नंतर , वि.जा. भ.ज.- {(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड)},इ.मा.व ,वि.मा.प्र.आळीपाळीने, या क्रमाने व एसईबीसी-१, असे आरक्षणाचे पद उपलब्ध होईल. |
| ६ | ४ | अ.जा.-१ ,अ.ज.-१, वि.जा. भ.ज.{(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड)},वि.मा.प्र.आळीपाळीने, या क्रमाने व इ.मा.व -१, एसईबीसी-१, असे आरक्षणाचे पद उपलब्ध होईल. |
| ७ | ५ | अ.जा.-१ ,अ.ज.-१, वि.जा.(अ)-१ {(वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड)},वि.मा.प्र.आळीपाळीने,या क्रमाने व इ.मा.व -१,एसईबीसी-१, असे आरक्षणाचे पद उपलब्ध होईल. |
| ८ | ५ | अ.जा.-१ ,अ.ज.-१, वि.जा.(अ)-१ {(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड)},वि.मा.प्र.आळीपाळीने,या क्रमाने व इ.मा.व -१,एसईबीसी-१, असे आरक्षणाचे पद उपलब्ध होईल. |
| ९ | ६ | अ.जा.-१ ,अ.ज.-१, वि.जा.(अ)-१ {(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड)},वि.मा.प्र.आळीपाळीने,या क्रमाने व इ.मा.व -१,एसईबीसी-२, असे आरक्षणाचे पद उपलब्ध होईल. |
| १० | ६ | अ.जा.-१ ,अ.ज.-१, वि.जा.(अ)-१ {(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड)},वि.मा.प्र.आळीपाळीने,या क्रमाने व इ.मा.व -१,एसईबीसी-२, असे आरक्षणाचे पद उपलब्ध होईल. |
| ११ | ७ | अ.जा.-१ ,अ.ज.-२, वि.जा.(अ)-१ {(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड)},वि.मा.प्र.आळीपाळीने,या क्रमाने व इ.मा.व -१,एसईबीसी-२, असे आरक्षणाचे पद उपलब्ध होईल. |
| १२ | ८ | अ.जा.-१ ,अ.ज.-२, वि.जा.(अ)-१ {(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड)},वि.मा.प्र.आळीपाळीने,या क्रमाने व इ.मा.व -२,एसईबीसी-२, असे आरक्षणाचे पद उपलब्ध होईल. |
| १३ | ९ | अ.जा.-२ ,अ.ज.-२, वि.जा.(अ)-१ {(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड)},वि.मा.प्र.आळीपाळीने,या क्रमाने व इ.मा.व -२,एसईबीसी-२, असे आरक्षणाचे पद उपलब्ध होईल. |
| १४ | ९ | अ.जा.-२ ,अ.ज.-२, वि.जा.(अ)-१ {(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड)},वि.मा.प्र.आळीपाळीने,या क्रमाने व इ.मा.व -२,एसईबीसी-२, असे आरक्षणाचे पद उपलब्ध होईल. |
| १५ | १० | अ.जा.-२ ,अ.ज.-२, वि.जा.(अ)-१, भ.ज.(ब)-१ ,{(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड)},वि.मा.प्र.आळीपाळीने,या क्रमाने व इ.मा.व -२,एसईबीसी-२, असे आरक्षणाचे पद उपलब्ध होईल. |
| १६ | ११ | अ.जा.-२ ,अ.ज.-२, वि.जा.(अ)-१, भ.ज.(ब)-१ ,{(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड)},वि.मा.प्र.आळीपाळीने,या क्रमाने व इ.मा.व -२,एसईबीसी-३, असे आरक्षणाचे पद उपलब्ध होईल. |
| १७ | ११ | अ.जा.-२ ,अ.ज.-२, वि.जा.(अ)-१, भ.ज.(ब)-१ ,{(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड)},वि.मा.प्र.आळीपाळीने,या क्रमाने व इ.मा.व -२,एसईबीसी-३, असे आरक्षणाचे पद उपलब्ध होईल. |
| १८ | १२ | अ.जा.-२ ,अ.ज.-२, वि.जा.(अ)-१, भ.ज.(ब)-१ ,{(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड)},वि.मा.प्र.आळीपाळीने,या क्रमाने व इ.मा.व -३,एसईबीसी-३, असे आरक्षणाचे पद उपलब्ध होईल. |
| १९ | १३ | अ.जा.-२ ,अ.ज.-३, वि.जा.(अ)-१, भ.ज.(ब)-१ ,{(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड)},वि.मा.प्र.आळीपाळीने,या क्रमाने व इ.मा.व -३,एसईबीसी-३, असे आरक्षणाचे पद उपलब्ध होईल. |
| २० | १४ | अ.जा.-२ ,अ.ज.-३, वि.जा.(अ)-१, भ.ज.(ब)-१ , भ.ज.(क)-१ ,{(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड)},वि.मा.प्र.आळीपाळीने,या क्रमाने व इ.मा.व -३,एसईबीसी-३, असे आरक्षणाचे पद उपलब्ध होईल. |

| | | |
|---|---|---|
| २१ | १४ | अ.जा.-२ ,अ.ज.-३, वि.जा.(अ)-१, भ.ज.(ब)-१ , भ.ज.(क)-१ , {(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड) },वि.मा.प्र.आळीपाळीने,या क्रमाने व इ.मा.व -३,एसईबीसी-३, असे आरक्षणाचे पद उपलब्ध होईल. |
| २२ | १५ | अ.जा.-२ ,अ.ज.-३, वि.जा.(अ)-१, भ.ज.(ब)-१ , भ.ज.(क)-१ {(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड) },वि.मा.प्र.आळीपाळीने,या क्रमाने व इ.मा.व -३,एसईबीसी-४, असे आरक्षणाचे पद उपलब्ध होईल. |
| २३ | १६ | अ.जा.-३ ,अ.ज.-३, वि.जा.(अ)-१, भ.ज.(ब)-१ , भ.ज.(क)-१ , {(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड) },वि.मा.प्र.आळीपाळीने,या क्रमाने व इ.मा.व -३,एसईबीसी-४, असे आरक्षणाचे पद उपलब्ध होईल. |
| २४ | १६ | अ.जा.-३ ,अ.ज.-३, वि.जा.(अ)-१, भ.ज.(ब)-१ , भ.ज.(क)-१ , {(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड) },वि.मा.प्र.आळीपाळीने,या क्रमाने व इ.मा.व -३,एसईबीसी-४, असे आरक्षणाचे पद उपलब्ध होईल. |
| २५ | १७ | अ.जा.-३ ,अ.ज.-४, वि.जा.(अ)-१, भ.ज.(ब)-१ , भ.ज.(क)-१ , {(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड) },वि.मा.प्र.आळीपाळीने,या क्रमाने व इ.मा.व -३,एसईबीसी-४, असे आरक्षणाचे पद उपलब्ध होईल. |
| २६ | १८ | अ.जा.-३ ,अ.ज.-४, वि.जा.(अ)-१, भ.ज.(ब)-१ , भ.ज.(क)-१ , {(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड) },वि.मा.प्र.आळीपाळीने,या क्रमाने व इ.मा.व -४,एसईबीसी-४, असे आरक्षणाचे पद उपलब्ध होईल. |
| २७ | १८ | अ.जा.-३ ,अ.ज.-४, वि.जा.(अ)-१, भ.ज.(ब)-१ , भ.ज.(क)-१ , {(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड) },वि.मा.प्र.आळीपाळीने,या क्रमाने व इ.मा.व -४,एसईबीसी-४, असे आरक्षणाचे पद उपलब्ध होईल. |
| २८ | १९ | अ.जा.-३ ,अ.ज.-४, वि.जा.(अ)-१, भ.ज.(ब)-१ , भ.ज.(क)-१ , {(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड) },वि.मा.प्र.आळीपाळीने,या क्रमाने व इ.मा.व -४,एसईबीसी-५, असे आरक्षणाचे पद उपलब्ध होईल. |
| २९ | २० | अ.जा.-३ ,अ.ज.-४, वि.जा.(अ)-१, भ.ज.(ब)-१ , भ.ज.(क)-१ , {(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड) }आळीपाळीने,या क्रमाने व वि.मा.प्र.-१,इ.मा.व -४,एसईबीसी-५, असे आरक्षणाचे पद उपलब्ध होईल. |
| ३० | २१ | अ.जा.-३ ,अ.ज.-४, वि.जा.(अ)-१, भ.ज.(ब)-१ , भ.ज.(क)-१ , भ.ज.(ड)-१, {(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड) }आळीपाळीने,या क्रमाने व वि.मा.प्र.-१,इ.मा.व -४,एसईबीसी-५, असे आरक्षणाचे पद उपलब्ध होईल. |
| ३१ | २१ | अ.जा.-३ ,अ.ज.-४, वि.जा.(अ)-१, भ.ज.(ब)-१ , भ.ज.(क)-१ , भ.ज.(ड)-१, {(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड) }आळीपाळीने,या क्रमाने व वि.मा.प्र.-१,इ.मा.व -४,एसईबीसी-५, असे आरक्षणाचे पद उपलब्ध होईल. |

| सरळसेवेकरिता छोटया संवर्गासाठी आरक्षित पदांचा तपशील-अनुसूची--इ गडचिरोली (अनुसूचित जमाती-२४%) | | |
|---|---|---|
| पद संख्या | आरक्षणाची पदे | अभिप्राय |
| १ | ० | आरक्षण अधिनियम कलम ३ (१) (घ) मधील तरतुदीनुसार एकाकी पदास आरक्षण लागू नाही. |
| २ | १ | प्रथम अ.जा.-१ तद्नंतर अ.ज. , वि.जा. भ.ज., {(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड) } ,इ.मा.व.,वि.मा.प्र., एसईबीसी या क्रमाने आळीपाळीने आरक्षणाचे एक पद उपलब्ध होईल. |
| ३ | २ | प्रथम अ.जा.-१ अ.ज-१ ,तद्नंतर वि.जा. भ.ज., {(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड) } ,इ.मा.व.,वि.मा.प्र., एसईबीसी या क्रमाने आळीपाळीने पद उपलब्ध होईल. |
| ४ | ३ | प्रथम अ.जा.-१ अ.ज-१ ,तद्नंतर वि.जा. भ.ज., {(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड) } ,इ.मा.व.,वि.मा.प्र.,या क्रमाने आळीपाळीने व एसईबीसी -१ पद उपलब्ध होईल. |
| ५ | ३ | प्रथम अ.जा.-१ अ.ज-१ ,तद्नंतर वि.जा. भ.ज., {(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड) } ,इ.मा.व.,वि.मा.प्र.,या क्रमाने आळीपाळीने व एसईबीसी -१ पद उपलब्ध होईल. |
| ६ | ४ | प्रथम अ.जा.-१ अ.ज-१ ,तद्नंतर वि.जा.)(अ)-१., {(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड) } ,इ.मा.व.,वि.मा.प्र.,या क्रमाने आळीपाळीने व एसईबीसी -१ पद उपलब्ध होईल. |
| ७ | ५ | प्रथम अ.जा.-१ अ.ज-२ ,तद्नंतर वि.जा.)(अ)-१., {(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड) } ,इ.मा.व.,वि.मा.प्र.,या क्रमाने आळीपाळीने व एसईबीसी -१ पद उपलब्ध होईल. |
| ८ | ५ | प्रथम अ.जा.-१ अ.ज-२ ,तद्नंतर वि.जा.)(अ)-१., {(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड) } ,इ.मा.व.,वि.मा.प्र.,या क्रमाने आळीपाळीने व एसईबीसी -१ पद उपलब्ध होईल. |
| ९ | ६ | प्रथम अ.जा.-१ अ.ज-२ ,तद्नंतर वि.जा.)(अ)-१., {(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड) } ,वि.मा.प्र.,या क्रमाने आळीपाळीने इ.मा.व-१.,व एसईबीसी -१ पद उपलब्ध होईल. |
| १० | ७ | प्रथम अ.जा.-१ अ.ज-२ ,तद्नंतर वि.जा.)(अ)-१., {(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड) } ,वि.मा.प्र.,या क्रमाने आळीपाळीने इ.मा.व-१.,व एसईबीसी -२ पदे उपलब्ध होईल. |
| ११ | ७ | प्रथम अ.जा.-१ अ.ज-२ ,तद्नंतर वि.जा.)(अ)-१., {(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड) } ,वि.मा.प्र.,या क्रमाने आळीपाळीने इ.मा.व-१.,व एसईबीसी -२ पदेउपलब्ध होईल. |
| १२ | ८ | प्रथम अ.जा.-१ अ.ज-३ ,तद्नंतर वि.जा.)(अ)-१., {(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड) } ,वि.मा.प्र.,या क्रमाने आळीपाळीने इ.मा.व-१.,व एसईबीसी -२ पदे उपलब्ध होईल. |
| १३ | ९ | अ.जा.-२ अ.ज-३ ,तद्नंतर वि.जा.)(अ)-१., {(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड) } ,वि.मा.प्र.,या क्रमाने आळीपाळीने इ.मा.व-१.,व एसईबीसी -२ पदे उपलब्ध होईल. |
| १४ | ९ | प्रथम अ.जा.-२ अ.ज-३ ,तद्नंतर वि.जा.)(अ)-१., {(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड) } ,वि.मा.प्र.,या क्रमाने आळीपाळीने इ.मा.व-१.,व एसईबीसी -२ पदेउपलब्ध होईल. |
| १५ | १० | अ.जा.-२ अ.ज-४ ,तद्नंतर वि.जा.)(अ)-१., {(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड) } ,वि.मा.प्र.,या क्रमाने आळीपाळीने इ.मा.व-१.,व एसईबीसी -२ पदे उपलब्ध होईल. |
| १६ | ११ | अ.जा.-२ अ.ज-४ ,तद्नंतर वि.जा.)(अ)-१., {(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड) } ,वि.मा.प्र.,या क्रमाने आळीपाळीने इ.मा.व-१.,व एसईबीसी -३ पदे उपलब्ध होईल. |
| १७ | ११ | अ.जा.-२ अ.ज-४ ,तद्नंतर वि.जा.)(अ)-१., {(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड) } ,वि.मा.प्र.,या क्रमाने आळीपाळीने इ.मा.व-१.,व एसईबीसी -३ पदे उपलब्ध होईल. |
| १८ | १२ | अ.जा.-२ अ.ज-४ ,तद्नंतर वि.जा.)(अ)-१.,भ.ज.(ब)-१ {(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड) } ,वि.मा.प्र.,या क्रमाने आळीपाळीने इ.मा.व-१.,व एसईबीसी -३ पदे उपलब्ध होईल. |
| १९ | १३ | अ.जा.-२ अ.ज-५ ,तद्नंतर वि.जा.)(अ)-१.,भ.ज.(ब)-१ {(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड) } ,वि.मा.प्र.,या क्रमाने आळीपाळीने इ.मा.व-१.,व एसईबीसी -३ पदे उपलब्ध होईल. |
| २० | १३ | अ.जा.-२ अ.ज-५ ,तद्नंतर वि.जा.)(अ)-१.,भ.ज.(ब)-१ {(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड) } ,वि.मा.प्र.,या क्रमाने आळीपाळीने इ.मा.व-१.,व एसईबीसी -३ पदे उपलब्ध होईल. |
| २१ | १४ | अ.जा.-३ अ.ज-५ ,तद्नंतर वि.जा.)(अ)-१.,भ.ज.(ब)-१ {(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड) } ,वि.मा.प्र.,या क्रमाने आळीपाळीने इ.मा.व-१.,व एसईबीसी -३ पदे उपलब्ध होईल. |
| २२ | १५ | अ.जा.-३ अ.ज-५ ,तद्नंतर वि.जा.)(अ)-१.,भ.ज.(ब)-१ {(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड) } ,वि.मा.प्र.,या क्रमाने आळीपाळीने इ.मा.व-१.,व एसईबीसी -४ पदे उपलब्ध होईल. |

| | | |
|---|---|---|
| २३ | १६ | अ.जा.-३ अ.ज-६ ,तद्नंतर वि.जा.)(अ)-१.,भ.ज.(ब)-१{(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड)},वि.मा.प्र.,या क्रमाने आळीपाळीने इ.मा.व-१.,व एसईबीसी -४ पदे उपलब्ध होईल. |
| २४ | १६ | अ.जा.-३ अ.ज-६ ,तद्नंतर वि.जा.)(अ)-१.,भ.ज.(ब)-१{(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड)},वि.मा.प्र.,या क्रमाने आळीपाळीने इ.मा.व-१.,व एसईबीसी -४ पदे उपलब्ध होईल |
| २५ | १७ | अ.जा.-३ अ.ज-६ ,तद्नंतर वि.जा.)(अ)-१.,भ.ज.(ब)-१{(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड)},वि.मा.प्र.,या क्रमाने आळीपाळीने इ.मा.व-२.,व एसईबीसी -४ पदे उपलब्ध होईल. |
| २६ | १७ | अ.जा.-३ अ.ज-६ ,तद्नंतर वि.जा.)(अ)-१.,भ.ज.(ब)-१{(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड)},वि.मा.प्र.,या क्रमाने आळीपाळीने इ.मा.व-२.,व एसईबीसी -४ पदे उपलब्ध होईल. |
| २७ | १८ | अ.जा.-३ अ.ज-७,तद्नंतर वि.जा.)(अ)-१.,भ.ज.(ब)-१{(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड)},वि.मा.प्र.,या क्रमाने आळीपाळीने इ.मा.व-२.,व एसईबीसी -४ पदे उपलब्ध होईल. |
| २८ | १९ | अ.जा.-३ अ.ज-७,तद्नंतर वि.जा.)(अ)-१.,भ.ज.(ब)-१{(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड)},वि.मा.प्र.,या क्रमाने आळीपाळीने इ.मा.व-२.,व एसईबीसी -५ पदे उपलब्ध होईल. |
| २९ | १९ | अ.जा.-३ अ.ज-७,तद्नंतर वि.जा.)(अ)-१.,भ.ज.(ब)-१{(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड)},वि.मा.प्र.,या क्रमाने आळीपाळीने इ.मा.व-२.,व एसईबीसी -५ पदे उपलब्ध होईल. |
| ३० | २० | अ.जा.-४ अ.ज-७,तद्नंतर वि.जा.)(अ)-१.,भ.ज.(ब)-१{(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड)},वि.मा.प्र.,या क्रमाने आळीपाळीने इ.मा.व-२.,व एसईबीसी -५ पदे उपलब्ध होईल. |
| ३१ | २१ | अ.जा.-४ अ.ज-७,तद्नंतर वि.जा.)(अ)-१.,भ.ज.(ब)-१,भ.ज.(क)-१{(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड)},वि.मा.प्र.,या क्रमाने आळीपाळीने इ.मा.व-२.,व एसईबीसी -५ पदे उपलब्ध होईल. |
| ३२ | २२ | अ.जा.-४ अ.ज-८,तद्नंतर वि.जा.)(अ)-१.,भ.ज.(ब)-१,भ.ज.(क)-१{(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड)},वि.मा.प्र.,या क्रमाने आळीपाळीने इ.मा.व-२.,व एसईबीसी -५ पदे उपलब्ध होईल. |
| ३३ | २२ | अ.जा.-४ अ.ज-८,तद्नंतर वि.जा.)(अ)-१.,भ.ज.(ब)-१,भ.ज.(क)-१{(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड)},वि.मा.प्र.,या क्रमाने आळीपाळीने इ.मा.व-२.,व एसईबीसी -५ पदे उपलब्ध होईल. |
| ३४ | २३ | अ.जा.-४ अ.ज-८,तद्नंतर वि.जा.)(अ)-१.,भ.ज.(ब)-१,भ.ज.(क)-१{(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड)},वि.मा.प्र.,या क्रमाने आळीपाळीने इ.मा.व-२.,व एसईबीसी -६पदे उपलब्ध होईल. |
| ३५ | २४ | अ.जा.-४ अ.ज-९,तद्नंतर वि.जा.)(अ)-१.,भ.ज.(ब)-१,भ.ज.(क)-१{(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड)},वि.मा.प्र.,या क्रमाने आळीपाळीने इ.मा.व-२.,व एसईबीसी -६ पदे उपलब्ध होईल. |
| ३६ | २४ | अ.जा.-४ अ.ज-९,तद्नंतर वि.जा.)(अ)-१.,भ.ज.(ब)-१,भ.ज.(क)-१{(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड)},वि.मा.प्र.,या क्रमाने आळीपाळीने इ.मा.व-२.,व एसईबीसी -६ पदे उपलब्ध होईल. |
| ३७ | २५ | अ.जा.-४ अ.ज-९,तद्नंतर वि.जा.)(अ)-१.,भ.ज.(ब)-१,भ.ज.(क)-१{(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड)}या क्रमाने आळीपाळीने ,वि.मा.प्र-१.,इ.मा.व-२.,व एसईबीसी -६ पदे उपलब्ध होईल. |
| ३८ | २६ | अ.जा.-५ अ.ज-९,तद्नंतर वि.जा.)(अ)-१.,भ.ज.(ब)-१,भ.ज.(क)-१{(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड)},या क्रमाने आळीपाळीने ,वि.मा.प्र-१.इ.मा.व-२.,व एसईबीसी -६ पदे उपलब्ध होईल. |
| ३९ | २६ | अ.जा.-५ अ.ज-९,तद्नंतर वि.जा.)(अ)-१.,भ.ज.(ब)-१,भ.ज.(क)-१{(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड)},या क्रमाने आळीपाळीने ,वि.मा.प्र-१.इ.मा.व-२.,व एसईबीसी -६ पदे उपलब्ध होईल. |
| ४० | २७ | अ.जा.-५ अ.ज-१०,तद्नंतर वि.जा.)(अ)-१.,भ.ज.(ब)-१,भ.ज.(क)-१{(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड)},या क्रमाने आळीपाळीने ,वि.मा.प्र-१.इ.मा.व-२.,व एसईबीसी -६ पदे उपलब्ध होईल. |
| ४१ | २८ | अ.जा.-५ अ.ज-१०,तद्नंतर वि.जा.)(अ)-१.,भ.ज.(ब)-१,भ.ज.(क)-१{(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड)},या क्रमाने आळीपाळीने ,वि.मा.प्र-१.इ.मा.व-२.,व एसईबीसी -७ पदे उपलब्ध होईल. |
| ४२ | २९ | अ.जा.-५ अ.ज-१०,तद्नंतर वि.जा.)(अ)-१.,भ.ज.(ब)-१,भ.ज.(क)-१{(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड)},या क्रमाने आळीपाळीने ,वि.मा.प्र-१.इ.मा.व-३.,व एसईबीसी -७ पदे उपलब्ध होईल. |
| ४३ | २९ | अ.जा.-५ अ.ज-१०,तद्नंतर वि.जा.)(अ)-१.,भ.ज.(ब)-१,भ.ज.(क)-१{(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड)},या क्रमाने आळीपाळीने ,वि.मा.प्र-१.इ.मा.व-३.,व एसईबीसी -७ पदे उपलब्ध होईल. |
| ४४ | ३० | अ.जा.-५ अ.ज-१०,तद्नंतर वि.जा.)(अ)-१.,भ.ज.(ब)-१,भ.ज.(क)-१, भ.ज.(ड)-१{(वि.जा.)(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड)},या क्रमाने आळीपाळीने ,वि.मा.प्र-१.इ.मा.व-३.,व एसईबीसी -७ पदे उपलब्ध होईल. |

" <u>शासकीय कर्मचाऱ्याच्या विनंतीनुसार संवर्गाअंतर्गत एका नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या आस्थापनेवरुन दुसऱ्या नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या आस्थापनेवर कायमस्वरुपी समावेशन करण्याबाबतचे धोरण."</u>

**महाराष्ट्र शासन**

**सामान्य प्रशासन विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः एसआरव्ही २०१६ /प्र.क्र.५०९ /कार्या.१२**

मादाम कामा मार्ग, राजगुरु चौक,मंत्रालय, मुंबई ४०००३२

तारीख: १५ मे ,२०१९

<u>वाचा -</u>

१) महाराष्ट्र राज्य, शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम-२००५ ,सामान्य प्रशासन विभाग ,शासन अधिसूचना क्रमांक एसआरव्ही-२००४/प्र.क्र.१५/०४/१२ , दि.२५ मे,२००६

२) सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक, क्रमांक एसआरव्ही-२००४/प्र.क्र.१५/०४/१२ दि.७.६.२००६

३) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-२०१०/प्र.क्र.२१०/१०/१२ दि.३.६.२०११

<u>प्रस्तावना</u>-

बदली अधिनियमानुसार शासकीय कर्मचारी हा एका ठराविक परिघामध्येच (उदा. जिल्हास्तर, महसूल विभाग स्तर, राज्यस्तर ) बदलीपात्र असतो. पदभरतीची जाहिरात देताना निवड होणारा उमेदवार कोणत्या स्तरावर बदलीपात्र आहे हे नमूद करण्यात आलेले असते व त्याची त्याला पूर्ण कल्पना व जाणीव असते व तो स्वेच्छेने परिक्षेद्वारे त्या पदावर शासन सेवेत नियुक्ती स्विकारतो. त्यामुळे बदली अधिनियमानुसार त्या त्या स्तरावर /परिघामध्ये करण्यात येणारी बदली स्विकारणे त्याला क्रमप्राप्त आहे.

तथापि, काही वेळा नियुक्तीनंतर काही वर्षांनी भविष्यात कर्मचाऱ्यांच्या, अशा काही अपवादात्मक वैयक्तिक अडचणी निर्माण होतात की, संबंधित शासकीय कर्मचाऱ्यास त्याच्या बदलीपात्र स्तराबाहेर/ परिघाबाहेरील शासकीय कार्यालयात कायमस्वरुपी समावेशन मिळणे गरजेचे ठरते. अशावेळी बदली अधिनियमाच्या मर्यादा विचारात घेता, मानवतावादी दृष्टीकोनातून यावर तोडगा काढण्यासाठी संदर्भाधीन क्र.३ च्या शासन निर्णयाद्वारे संवर्गबाह्य बदलीचे धोरण निश्चित करण्यात आले होते.

या धोरणाच्या अंमलबजावणीच्या वेळी असे निदर्शनास आले की, या धोरणाचे मूळ प्रयोजन विचारात न घेता कोणत्याही सर्वसाधारण वैयक्तिक अडचणींसाठी या धोरणाचा आधार घेतला जात आहे. प्रकरणपरत्वे अपवादात्मक परिस्थिती न पाहता सरसकट अशा स्वरुपाच्या संवर्गबाह्य बदल्या केल्यामुळे, प्रशासनाच्या मूळ संवर्गातील पदे रिक्त राहून त्याचा कामकाजावर विपरीत परिणाम होत आहे. तसेच, या धोरणाचा चुकीचा अन्वयार्थ लावल्यामुळे क्षेत्रीय स्तरावर यानुसार कार्यवाही करताना चुकीची कार्यवाही होत असल्याचे निदर्शनास आले आहे. या कारणास्तव या धोरणाचे पुनर्विलोकन/ पुनर्विचार करणे आवश्यक झाले आहे.

सबब, मानवतावादी दृष्टीकोनातून केवळ अपवादात्मक परिस्थितीत कर्मचाऱ्याचे हित विचारात घेताना, शासकीय कामकाजाच्या निकडीचाही समतोलपणे विचार करुन कार्यवाही करणे आवश्यक आहे. तसेच, धोरणाचा अर्थ सुस्पष्ट करणे गरजेचे ठरत आहे. यावर साधकबाधक विचार करुन, संदर्भ क्र.३ येथील शासन निर्णयातील धोरण अधिक्रमित करुन सुधारीत नवीन धोरण निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय-**

या शासन निर्णयाद्वारे संदर्भ क्र.३ येथील दि.३.६.२०११ चा शासन निर्णय अधिक्रमित करण्यात येत असून खालीलप्रमाणे **शासकीय कर्मचाऱ्याच्या विनंतीनुसार संवर्गाअंतर्गत एका नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या आस्थापनेवरुन दुसऱ्या नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या आस्थापनेवर कायमस्वरुपी समावेशन करण्याबाबतचे धोरण** निश्चित करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १ . | **कायमस्वरुपी समावेशनासाठी पात्र शासकीय कर्मचारी :-** | |
| | राज्य शासकीय सेवेतील केवळ **गट "क" मधील कर्मचाऱ्यांना हे** धोरण लागू होईल. | |
| २. | **कायमस्वरुपी समावेशनासाठी सेवा कालावधी व इतर बाबी:-** | |
| | (१) | संबंधित कर्मचाऱ्याची संबंधित संवर्गात **किमान ५ वर्षे सलग सेवा** पूर्ण झाली असणे आवश्यक राहील. |
| | (२) | कर्मचारी ज्या संवर्गात कार्यरत आहे त्या संवर्गाच्या सेवा प्रवेश नियमात नमूद केलेल्या सर्व अर्हतांची ( उदा.विविध परीक्षा इ.)पूर्तता करणे आवश्यक राहील. |
| | (३) | सदर कालावधीत कर्मचाऱ्यास स्थायित्व लाभ प्रमाणपत्र मिळालेले असणे आवश्यक राहील. |
| | (४) | मूळ संवर्गात त्यांची कामगिरी किमान "ब" दर्जाची असली पाहिजे. म्हणजेच त्याच्या मूळ संवर्गातील सेवाकालावधीत प्रतिवर्षीच्या कार्यमूल्यमापन अहवालातील संख्यात्मक गुणांकन किमान ४ असले पाहिजे. |
| | (५) | संबंधित कर्मचाऱ्याविरुध्द कोणतीही विभागीय चौकशी/न्यायालयीन प्रकरणे चालू /प्रस्तावित नसावे. |
| ३. | **कायमस्वरुपी समावेशन कोणत्या कारणास्तव अनुज्ञेय राहील:-** | |
| | सोबत जोडलेल्या **"परिशिष्ट -एक"** मध्ये नमूद कारणास्तव कायमस्वरुपी समावेशन अनुज्ञेय राहील. | |
| ४. | **संवर्गांतर्गत कायमस्वरुपी समावेशन म्हणजे :-** | |
| | गट क मधील केवळ **समान पदनाम, समान वेतनश्रेणी, समान सेवाप्रवेश नियमातील तरतूदी आणि समान कर्तव्य व जबाबदाऱ्या** असलेल्या पदावर कायमस्वरुपी समावेशन .<br>उदा.१.लिपिक-टंकलेखक पदावरुन लिपिक-टंकलेखक पदावर,<br>२. तलाठी पदावरुन तलाठी पदावर,<br>३.लघुटंकलेखक पदावरुन लघुटंकलेखक पदावर<br>४.लेखा लिपीक पदावरुन लेखा लिपीक पदावर इ. | |

| | | |
|---|---|---|
| ५. | **कायमस्वरुपी समावेशनाचे धोरण कोणत्या स्तरावर लागू होईल.** | |
| | (१) | जिल्हास्तरावर ज्येष्ठतायादी ठेवली जात असल्यास, संबंधित जिल्हा वगळून राज्यातील कोणत्याही जिल्हयात सदर धोरणानुसार कायमस्वरुपी समावेशन करता येईल. |
| | (२) | महसूली विभाग स्तरावर ज्येष्ठतायादी ठेवली जात असल्यास, संबंधित महसूली विभाग वगळून राज्यातील उर्वरित सर्व महसूली विभागातील कोणत्याही जिल्हयात सदर धोरणानुसार कायमस्वरुपी समावेशन करता येईल. |
| | (३) | राज्यस्तरावर ज्येष्ठतायादी ठेवली जात असल्यास, सदर धोरणानुसार कायमस्वरुपी समावेशन करता येणार नाही. |
| ६. | **कायमस्वरुपी समावेशनाचे धोरण खालील बाबींसाठी अनुज्ञेय राहणार नाही :-** | |
| | **(१)** | **महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील पदे-** |
| | | (अ) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील गट क च्या पदावर कायमस्वरुपी समावेशन करता येणार नाही. तसेच, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील गट क च्या पदावरुन आयोगाच्या कक्षेबाहेरील अन्य गट क च्या पदांवर कायमस्वरुपी समावेशन करता येणार नाही. |
| | | (ब) बृहन्मुंबईतील मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हयांमध्ये आपापसात कायमस्वरुपी समावेशन करता येणार नाही. |
| | **(२)** | एकाच जिल्हयामधील एका नियुक्ती प्राधिकाऱ्याकडून त्याच जिल्हयातील दुसऱ्या नियुक्ती प्राधिकाऱ्याकडे कायमस्वरुपी समावेशन करता येणार नाही. थोडक्यात जिल्हाअंतर्गत एका कार्यालयातून दुसऱ्या कार्यालयात कायमस्वरुपी समावेशन करता येणार नाही. |
| | **(३)** | तसेच, शासकीय कार्यालयातून निमशासकीय कार्यालये, मंडळे, महामंडळे, सांविधिक मंडळे (Statutory Board), जिल्हा परिषदा, नगरपालिका, महानगर पालिका यांच्या आस्थापनेवरील पदांवर किंवा या आस्थापनांवरील पदांवरुन शासकीय कार्यालयातील पदांवर कायमस्वरुपी समावेशन करता येणार नाही. |
| ७. | **कायमस्वरुपी समावेशन करण्याचे अधिकार-** | |
| | **(१)** | कर्मचारी ज्या नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या अधिपत्याखाली कार्यरत आहे, त्या नियुक्ती प्राधिकाऱ्यांना संबंधित कर्मचाऱ्यास कायमस्वरुपी समावेशनासाठी कार्यमुक्त करण्याचे अधिकार राहतील. |
| | **(२)** | तसेच, ज्या पदावर कायमस्वरुपी समावेशन करावयाचे आहे त्या पदाच्या नियुक्ती प्राधिकाऱ्यांना संबंधित कर्मचाऱ्यास कायमस्वरुपी समावेशनाद्वारे नियुक्ती देण्याचे अधिकार राहतील. |

| | | |
|---|---|---|
| ८. | **कायमस्वरुपी समावेशनासाठी अटी व शर्ती :-** | |
| | (१) | **विनंतीवरुन कायमस्वरुपी समावेशन हा संबंधित कर्मचाऱ्याचा हक्क नाही.** प्रशासनाचे हित, सार्वजनिक सेवेचे हित विचारात घेऊन , संबंधित कर्मचाऱ्याच्या विनंतीवरुन त्याचे अन्य कार्यालयात कायमस्वरुपी समावेशन करण्यास परवानगी /मंजूरी दयावी किंवा कसे याचा आणि कायमस्वरुपी समावेशनाद्वारे संबंधित कर्मचाऱ्यास त्यांच्या कार्यालयात घ्यावे किंवा कसे याचा निर्णय घेण्याचा पूर्ण अधिकार संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्यांना राहील. |
| | (२) | संबंधित कर्मचारी ज्या कार्यालयात कार्यरत असेल, त्या कार्यालयातील त्याच्या नियुक्ती प्राधिकाऱ्यांची, त्याचे अन्य कार्यालयात कायमस्वरुपी समावेशन करण्यास, तत्वत: मान्यता मिळणे आवश्यक राहील. तसेच, ज्या शासकीय कार्यालयात कायमस्वरुपी समावेशन करण्याची विनंती केली आहे, त्या कार्यालयाच्या नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी या संदर्भात ना-हरकत प्रमाणपत्र देणे आवश्यक राहील. |
| | (३) | या धोरणानुसार कर्मचाऱ्याची त्याच्या विनंतीनुसार एका नियुक्ती प्राधिकाऱ्याकडून दुसऱ्या नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या कार्यालयात कायमस्वरुपी समावेशन करताना, **संबंधित कर्मचाऱ्याची सदर संवर्गात ज्या मार्गाने (उदा. पदोन्नती / नामनिर्देशन) नियुक्ती झाली आहे त्या कोटयात पद उपलब्ध असणे आवश्यक आहे.** सरळसेवेने नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्याची पदोन्नतीच्या रिक्त पदावर, तसेच पदोन्नतीने नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्याची सरळसेवेच्या रिक्त पदावर, कायमस्वरुपी समावेशन अनुज्ञेय राहणार नाही. उदाहरणार्थ:-<br>१) एखादा कर्मचारी "लिपिक-टंकलेखक" पदावर पदोन्नतीने कार्यरत असेल आणि त्याने दुसऱ्या जिल्हयातील "लिपिक-टंकलेखक" पदावर कायमस्वरुपी समावेशनाची विनंती केली असेल तर संबंधित जिल्हयातील "लिपीक-टंकलेखक" संवर्गातील पदोन्नती कोटयातील रिक्त पदावरच कायमस्वरुपी समावेशन अनुज्ञेय राहील.<br>२) एखादा कर्मचारी "कर सहायक" या पदावर सरळसेवेने कार्यरत असेल आणि त्याने दुसऱ्या जिल्हयातील "कर सहायक" पदावर कायमस्वरुपी समावेशनाची विनंती केली असेल तर संबंधित जिल्हयातील "कर सहायक" संवर्गातील सरळसेवा कोटयातील रिक्त पदावरच कायमस्वरुपी समावेशन अनुज्ञेय राहील. |
| | (४) | **संबंधित कर्मचाऱ्याची नियुक्ती सामाजिक आरक्षणानुसार ज्या प्रवर्गातील (उदा.खुला, अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती इ.) आहे, त्या प्रवर्गाचे रिक्त पद उपलब्ध असणे आवश्यक आहे**. ज्या प्रवर्गातून नियुक्ती झाली आहे तो प्रवर्ग बदलून अन्य प्रवर्गाच्या पदावर कायम स्वरुपी समावेशन अनुज्ञेय राहणार नाही. |
| | (५) | ज्या पदावर कायमस्वरुपी समावेशन करण्याची विनंती केली आहे, त्या पदाच्या सेवाप्रवेश नियमातील अर्हता धारण करणे आवश्यक राहील. |

| | | |
|---|---|---|
| | (६) | ज्या पदावर समावेशन करण्यात येईल, त्या पदाच्या सेवा प्रवेश नियमानुसार वा विभागीय परिक्षा नियमांनुसार ज्या परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे त्या परिक्षा कायमस्वरुपी समावेशन झाल्यानंतर, उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. |
| | (७) | संबंधित कर्मचाऱ्याचे कायमस्वरुपी समावेशनाचे आदेश निर्गमित झाल्यानंतर त्याने तात्काळ समावेशनाच्या ठिकाणी रुजू होणे आवश्यक राहील. त्यासाठी नियमानुसार पदग्रहण अवधी अनुज्ञेय होईल मात्र, बदली अनुदान, प्रवास भत्ता वा तद्अनुषंगिक लाभ अनुज्ञेय होणार नाहीत. |
| | (८) | **संबंधित कर्मचाऱ्याचे कायमस्वरुपी समावेशनाचे आदेश निर्गमित झाल्यानंतर त्याचा मूळ कार्यालयातील पदावरील धारणाधिकार राहणार नाही.** तसेच, मूळ कार्यालयातून किंवा विभागातून स्वत:च्या विनंतीनुसार दुसऱ्या कार्यालयात किंवा विभागात कायमस्वरुपी समावेशन झाल्यानंतर, पुन्हा मूळ कार्यालयात किंवा विभागात परत येण्याची विनंती मान्य करता येणार नाही. तसेच, समावेशनानंतरच्या कार्यालयात नोकर कपात कार्यान्वित झाली तर वित्त विभागाच्या तत्कालीन मार्गदर्शक सूचनांनुसार कार्यवाही करण्यात येईल. |
| | (९) | संबंधित कर्मचाऱ्याचे कायमस्वरुपी समावेशन झाल्यानंतर, **समावेशनाच्या पदावरील ज्येष्ठता तो त्या पदावर रुजू झाल्याच्या दिनांकास निश्चित होईल**. त्याला **मूळ कार्यालयातील पदाच्या ज्येष्ठतेचे कोणतेही लाभ अनुज्ञेय राहणार नाहीत**. संबंधित कर्मचारी, समावेशनाच्या कार्यालयातील त्याच्या अगोदरच नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांना कनिष्ठ समजण्यात यावा. तसेच, पूर्वीच्या सेवेचा लाभ, वेतननिश्चिती, रजा याकरीता वित्त विभागाच्या संबंधित नियमातील तरतूदी अनुज्ञेय होतील. |
| | (१०) | या शासन निर्णयात विहित केलेल्या सर्व अटी मान्य असल्याचे संबंधित कर्मचाऱ्यांकडून लेखी स्वरुपात बंधपत्र घेणे आवश्यक राहील. |
| ९. | **कायमस्वरुपी समावेशनाची कार्यपध्दती-** | |
| | (१) | **अर्ज करणे-** शासकीय कर्मचाऱ्यास ज्या ठिकाणी समावेशनाने कायमस्वरुपी जाण्याची इच्छा आहे , त्याने त्या ठिकाणी असणाऱ्या शासकीय कार्यालयांकडून सरळसेवा/ पदोन्नतीच्या रिक्त पदांची प्रवर्ग निहाय माहिती प्राप्त करुन, त्यानंतर त्याच्या नियुक्ती प्राधिकाऱ्याकडे कोणत्या अपवादात्मक वैयक्तिक कारणास्तव कायमस्वरुपी समावेशन करणे आवश्यक आहे त्याबाबतच्या पुराव्यासह विनंती अर्ज करणे आवश्यक आहे. |
| | (२) | **विनंती अर्ज प्राप्त झाल्यानंतर खालील बाबींची पडताळणी करावी.**<br>• या शासन निर्णयात नमूद सर्व अटी व शर्तींची पूर्तता होत आहे का ?<br>• परिशिष्ट-एक मध्ये नमूद कारणास्तव विनंती केली आहे का ? तसेच, वैयक्तिक कारण खरेच अपवादात्मक आहे का याची शहानिशा करणे |

| | | |
|---|---|---|
| | | • समावेशनास परवानगी देणे प्रशासकीयदृष्टया हिताचे आहे का ?<br>उपरोक्त बाबी तपासून, विनंती अर्ज विचारात घेणे योग्य आहे किंवा कसे याची लेखी कारणे नमूद करुन प्रस्तावास नियुक्ती प्राधिकाऱ्याची तत्वत: मान्यता घेणे आवश्यक आहे. |
| | (३) | नियुक्ती प्राधिकाऱ्याची समावेशनाने जाण्यास तत्वत: मान्यता मिळाली तरच, ज्या नियुक्ती प्राधिकाऱ्याकडे समावेशन करण्याची विनंती केली आहे, त्या नियुक्ती प्राधिकारी कार्यालयाकडून पत्राद्वारे संबंधित कर्मचाऱ्याच्या समावेशनासाठी त्याची नियुक्ती ज्या सरळसेवा/ पदोन्नती कोटयातून व ज्या प्रवर्गातून झाली आहे, त्या सरळसेवा/ पदोन्नती कोटयात संबंधित प्रवर्गाचे पद निर्बाध रिक्त आहे का याची माहिती तसेच, समावेशनासाठीची सहमती असल्याचे ना हरकत प्रमाणपत्र मागविण्यात यावे. |
| | (४) | वरील (३) नुसार आवश्यक योग्य माहिती प्राप्त झाली तरच, समावेशनाची कार्यवाही करण्याबाबतचे आदेश निर्गमित करण्यापूर्वी कर्मचाऱ्याकडून या शासन निर्णयात विहित केलेल्या सर्व अटी मान्य असल्याचे बंधपत्र दोन प्रतीत घेण्यात यावे. बंधपत्राचा नमूना सोबतच्या **"परिशिष्ट- दोन"** मध्ये नमूद करण्यात आला आहे. |
| | (५) | बंधपत्र प्राप्त झाल्यानंतर मूळ नियुक्ती प्राधिकारी यांनी या शासन निर्णयातील संबंधित अटी व शर्ती नमूद करुन कार्यमुक्तीचे आदेश निर्गमित करावेत. कार्यमुक्तीच्या आदेशाचा नमूना सोबतच्या **"परिशिष्ट-तीन"** मध्ये देण्यात आला आहे. |
| | (६) | कार्यमुक्तीचे आदेश निर्गमित झाल्यानंतर ज्या कार्यालयात समावेश करावयाचे आहे त्या नियुक्ती प्राधिकाऱ्याने संबंधित कर्मचाऱ्यास कायम स्वरुपी समावेशनाने नियुक्ती देण्याबाबतचे आदेश नियुक्तीसंदर्भातील अटी व शर्ती नमूद करुन निर्गमित करावे. कायम स्वरुपी समावेशनाने नियुक्ती देण्याबाबतच्या आदेशाचा नमूना सोबतच्या **"परिशिष्ट- चार"** मध्ये देण्यात आला आहे. |
| १०. | कर्मचाऱ्यांची विनंतीवरुन कायमस्वरुपी समावेशन संपूर्ण सेवेत फक्त एकदाच मान्य करण्यात यावे. | |
| ११. | या शासन निर्णयातील कोणत्याही अटी शिथील केल्या जाणार नाहीत. | |
| १२. | सदरहू शासन निर्णय प्रसिध्द झाल्याच्या दिनांकास, जी प्रकरणे दि.३.६.२०११ च्या शासन निर्णयानुसार विनंतीवरुन/संवर्ग बाह्य बदली देण्यासाठी प्रलंबित असतील, ती प्रकरणे या शासन निर्णयातील तरतूदीनुसार निकाली काढली जातील. | |
| १३. | प्रशासकीय विभाग/विभागप्रमुख/ प्रादेशिक विभागप्रमुख/कार्यालय प्रमुख यांनी यापुढे यासंबंधीचे प्रस्ताव सदर शासन निर्णयातील तरतूदीनुसार तपासून उचित कार्यवाही करावी. | |

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०५१५१२२७२८२४०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Geeta Rahul Kulkarni

Digitally signed by Geeta Rahul Kulkarni
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=87e2e317e0d978442ac6b599d6a0abcf73fe717ee5299444 3a8509075101cc93, serialNumber=92d474843b842720200d1a10946d5fc9348b9450f8 67605a47d177207c9bd384, cn=Geeta Rahul Kulkarni
Date: 2019.05.15 15:36:00 +05'30'

( गीता रा. कुलकर्णी )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,
३. सर्व मा.मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद / विधानसभा, विधानभवन, मुंबई,
५. सर्व मा.संसद सदस्य/विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य,
६. मा.मुख्य सचिव,
७. सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
८. सर्व मंत्रालयीन विभाग,
९. सर्व विभागीय आयुक्त,
१०. सर्व जिल्हाधिकारी,
११. महालेखापाल, महाराष्ट्र-१ ( लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र,मुंबई.
१२.महालेखापाल, महाराष्ट्र-१ ( लेखा व परीक्षा), महाराष्ट्र,मुंबई.
१३.महालेखापाल, महाराष्ट्र-२ ( लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र,नागपूर.
१४.महालेखापाल, महाराष्ट्र-२ ( लेखा व परीक्षा), महाराष्ट्र,नागपूर.
१५. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
१६. सर्व मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
१७. सामान्य प्रशासन विभाग/का. ३९ (महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्दीकरिता),
१८.ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ग्रंथालय, सहावा मजला, विधान भवन, मुंबई ४०० ०३२ (१० प्रती)
१९.सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
२०.निवड नस्ती.

**शासन निर्णय क्रमांकः एसआरव्ही २०१६ /प्र.क्र.५०९ /कार्या १२ दि.१५ मे,२०१९ सोबतचे**

**"परिशिष्ट -एक"**

**शासन निर्णयातील अनु.क्र.३ नुसार पुढील कारणास्तव कायमस्वरुपी समावेशन करण्यासाठी विनंती अर्ज करता येईल.**

| अ.क्र. | कायमस्वरुपी समावेशन करण्यासाठीचे कारण | विनंती अर्जासोबत नियुक्ती प्राधिकाऱ्यांना पुराव्यादाखल सादर करावयाची आवश्यक कागदपत्रे |
|---|---|---|
| १. | **जे शासकीय कर्मचारी** केंद्र शासनाच्या THE RIGHTS OF PERSONS WITH DISABILITIES ACT,२०१६ व त्यात वेळोवेळी केलेल्या सुधारणांनुसार **स्वत: अपंग आहेत.** | कायम अपंगत्वाचे किमान टक्केवारीचे सक्षम प्राधिकाऱ्यांनी दिलेले वैद्यकीय प्रमाणपत्र. |
| २. | जे शासकीय कर्मचारी, केंद्र शासनाच्या THE RIGHTS OF PERSONS WITH DISABILITIES ACT,२०१६ मधील परिशिष्टात विनिर्दिष्टपणे नमूद केलेल्या व त्यात वेळोवेळी केलेल्या सुधारणांनुसार **"असक्षम" ("Specified disability" ) या शब्दात अंतर्भूत आजार असलेल्या मुलांचे किंवा मतिमंद असलेल्या मुलांचे पालक** ( पालक म्हणजे आई- वडील किंवा ते नसल्यास ज्या शासकीय कर्मचाऱ्यांनी मतिमंद असलेल्या स्वत:च्या भावाचे किंवा बहिणीचे पालकत्व स्वीकारलेले आहे. ) असून त्या मुलांचे मुख्य काळजीवाहक आहेत (serves as the main care giver )व शासकीय कर्मचारी जवळ नसल्यामुळे त्यांच्या असक्षम पाल्यांच्या पुनर्वसनामध्ये अडथळा निर्माण होत आहे. | पाल्य "असक्षम" ("Specified disability" ) असल्याबाबत जिल्हा शल्यचिकीत्सक/ वैद्यकीय मंडळ यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र. तसेच, कर्मचाऱ्याच्या रेशनकार्डच्या पहिल्या व शेवटच्या पृष्ठाची (साक्षांकीत) प्रत. |
| ३. | शासकीय कर्मचारी किंवा यथास्थिती पती वा पत्नी वा त्यांची मुले वा त्यांच्यावर अवलंबून असलेले शासकीय कर्मचारी यांचे | संबंधीत गंभीर आजाराबाबतचे जिल्हा शल्यचिकीत्सक/वैद्यकीय मंडळ यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र आणि आंतररुग्ण आणि /किंवा |

| | | |
|---|---|---|
| | आई किंवा वडील किंवा महिला कर्मचाऱ्यांचे सासरे किंवा सासू यांचे पुढील **गंभीर आजार**<br>i) कर्करोग<br>ii) पक्षाघात<br>iii) मूत्रपिंड रोपण शस्त्रक्रिया किंवा डायलेसिस<br>iv) ब्रेन टयुमर किंवा मेंदूवरील शस्त्रक्रिया<br>v) निश्चेतनावस्था (कोमा)<br>vi) मनोविकृतीने ग्रस्त<br>vii) ह्दय शस्त्रक्रियांची प्रकरणे | बाह्यरुग्ण म्हणून औषधोपचाराची कागदपत्रे. तसेच, शासकीय कर्मचारी यांचे आई किंवा वडील किंवा महिला कर्मचाऱ्यांचे सासरे किंवा सासू हे त्यांच्यावर अवलंबून असलेल्या बाबतच्या पुराव्यासाठी कर्मचाऱ्याच्या रेशनकार्डच्या पहिल्या व शेवटच्या पृष्ठाची (साक्षांकीत) प्रत. |
| ४. | **विधवा/विधुर कर्मचारी** | पती/ पत्नीच्या मृत्यू- दाखला प्रमाणपत्राची साक्षांकीत प्रत. |
| ५. | **पती-पत्नी एकत्रिकरणांतर्गत** ज्या शासकीय कर्मचारी यांचे पती किंवा पत्नी केंद्र किंवा राज्य शासकीय किंवा निमशासकीय कार्यालये, महानगरपालिका, नगरपरिषदा, जिल्हापरिषद किंवा पंचायत समिती अथवा शासकीय शैक्षणिक संस्थेमध्ये (शासकीय अनुदानित खाजगी शिक्षणसंस्था वगळून) कार्यरत आहेत, अशा शासकीय कर्मचाऱ्यांना त्यांच्या पती वा पत्नीचे ज्या विभाग /जिल्ह्यात / तालुक्यात वास्तव्य आहे, तिथे या शासन निर्णयात नमूद अटी व शर्तींच्या अधीन राहून कायमस्वरुपी समावेशनाने जाण्याकरिता . | यथास्थिती केंद्र /राज्य शासकीय/ निमशासकीय कार्यालयात/ महानगरपालिका/ नगरपरिषदा/जिल्हापरिषद/ पंचायत समिती अथवा ज्या शैक्षणिक संस्थेमध्ये (शासकीय अनुदानित खाजगी शिक्षणसंस्था वगळून) पती-पत्नी कार्यरत आहेत त्या कार्यालयाचे बोनाफाईड प्रमाणपत्र. |

************

शासन निर्णय क्रमांकः एसआरव्ही २०१६ /प्र.क्र.५०९ /कार्या १२ दि.१५ मे,२०१९ सोबतचे

**परिशिष्ट "दोन"**

**शासन निर्णयातील अनु.क्र.९(४) नुसार_कायमस्वरुपी समावेशनाबाबतच्या बंधपत्राचा नमूना**

मी, श्री./श्रीमती---------------------- असे नमूद करतो/करते की, माझी --------- या कार्यालयात -----------या पदावर पदोन्नती/सरळसेवा या मार्गाने ------या प्रवर्गातून (सामाजिक आरक्षणानुसार ज्या प्रवर्गातून (उदा.खुला, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती इ.) नियुक्ती झाली आहे तो नमूद करावा.) दि. ---------रोजी नियुक्ती झालेली आहे.

मी, दि.------------च्या अर्जान्वये सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दि.१५.५.२०१९ अन्वये निश्चित केलेल्या धोरणानुसार ----------------------@ आस्थापनेच्या --------या पदावरुन ------- या जिल्हयातील/विभागातील --------------------------#आस्थापनेच्या समान-------- या पदावर -----------------$ या कारणास्तव कायमस्वरुपी समावेशन करण्याची विनंती केली आहे. (@मूळ कार्यालयाचे नाव व पूर्ण पत्ता ,#कायमस्वरुपी समावेशनाने जावयाच्या कार्यालयाचे नाव व पूर्ण पत्ता, $ परिशिष्ट एक मध्ये नमूद कारणांपैकी)

माझे, माझ्या विनंती वरुन कायमस्वरुपी समावेशन केल्यास, मला कायमस्वरुपी समावेशनासंदर्भात खालील अटी व शर्ती मान्य आहेत.

| |
|---|
| (१) विनंतीवरुन कायमस्वरुपी समावेशन हा हक्क नाही. |
| (२) मी ज्या पदावर कायमस्वरुपी समावेशन करण्याची विनंती केली आहे त्या पदाच्या सेवाप्रवेश नियमातील अर्हता मी धारण करणे आवश्यक आहे. |
| (३) माझे ज्या कार्यालयातील पदावर कायमस्वरुपी समावेशन करण्यात येईल, त्या कार्यालयातील त्या पदाच्या सेवा प्रवेश नियमानुसार वा विभागीय परिक्षा नियमांनुसार ज्या परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे त्या परिक्षा मला उत्तीर्ण होणे बंधनकारक आहे. |
| (४) कायमस्वरुपी समावेशनाचे आदेश निर्गमित झाल्यानंतर, मला समावेशनाच्या ठिकाणी रुजू होण्यासाठी बदली अनुदान, प्रवास भत्ता वा तद्अनुषंगिक लाभ अनुज्ञेय होणार नाहीत. |
| (५) माझा मूळ कार्यालयातील पदावरील धारणाधिकार राहणार नाही. |
| (६) कायमस्वरुपी समावेशन झाल्यानंतर, मला पुन्हा मूळ कार्यालयात किंवा विभागात परत येण्याची विनंती करता येणार नाही. |
| (७) समावेशनानंतरच्या कार्यालयात नोकर कपात कार्यान्वित झाली तर वित्त विभागाच्या तत्कालीन मार्गदर्शक सूचनांनुसार कार्यवाही करण्यात येईल. |
| (८) कायमस्वरुपी समावेशन झाल्यानंतर, समावेशनानंतरच्या नवीन पदावरील माझी ज्येष्ठता मी नवीन पदावर प्रत्यक्ष रुजू झाल्याच्या दिनांकास निश्चित होईल. मला, माझ्या मूळ कार्यालयातील पदाच्या ज्येष्ठतेचे कोणतेही लाभ अनुज्ञेय राहणार नाहीत. मी, समावेशनानंतरच्या नवीन कार्यालयातील माझ्या अगोदरच नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांना कनिष्ठ राहील ही बाब मला मान्य आहे. |

| |
|---|
| (९) पूर्वीच्या सेवेचा लाभ, वेतननिश्चिती, रजा याकरीता वित्त विभागाच्या संबंधित नियमातील तरतूदी अनुज्ञेय होतील. |
| (१०) माझे कायमस्वरुपी समावेशन संपूर्ण सेवेत फक्त एकदाच मान्य करण्यात येईल |

अर्जदाराचे नाव व पदनाम-
अर्जदाराची सही-
दिनांक-

शासन निर्णय क्रमांकः एसआरव्ही २०१६ /प्र.क्र.५०९ /कार्या १२ दि.१५ मे,२०१९ सोबतचे

**" परिशिष्ट -तीन "**

**शासन निर्णयातील अनु.क्र.९(५) नुसार कार्यमुक्तीच्या आदेशाचा नमूना**

**" श्री./श्रीम. --------पदनाम------ यांची त्यांच्या विनंतीनुसार संवर्गाअंतर्गत ------------ या कार्यालयात --------पदावर कायमस्वरुपी समावेशन करण्यासाठी त्यांना कार्यमुक्त करण्याबाबत......"**

कार्यालयाचे संपूर्ण नाव-
कार्यालयाचा पत्ता-
आदेश क्रमांक :-
दिनांक :-

संदर्भ १) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय,क्र एसआरव्ही २०१६ /प्र.क्र.५०९ /कार्या १२ दि.१५ मे,२०१९

२) अर्जदाराचे नाव व अर्जाचा दिनांक

३)------------------* ( * ज्या कार्यालयात कायमस्वरुपी समायोजन करावयाचे आहे त्या कार्यालयाचे नाव )कार्यालयाचे पत्र क्र.----------- दि.----------

**कार्यालयीन आदेश-**

श्री./श्रीमती------------------------------यांची----------या कार्यालयात(कार्यालयाचे संपूर्ण नाव व पत्ता) -----------या पदावर पदोन्नती/सरळसेवा या मार्गाने -------------@ या प्रवर्गातून ( @ सामाजिक आरक्षणानुसार ज्या प्रवर्गातून नियुक्ती झालेली आहे तो प्रवर्ग नमूद करावा. उदा.खुला, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती इ. ) दि. ---------रोजी नियुक्ती झालेली असून, सदर पदावर त्यांची ५ वर्षाची सेवा पूर्ण झालेली आहे. तसेच, त्यांना स्थायित्व लाभ प्रमाणपत्र मिळालेले असून त्यांनी या संवर्गाच्या सेवा प्रवेश नियमात नमूद केलेल्या सर्व अर्हतांची ( उदा.विविध परीक्षा इ.)पूर्तता केली आहे. त्याचप्रमाणे त्यांचे या संवर्गाच्या सेवाकालावधीत प्रतिवर्षीच्या कार्यमूल्यमापन अहवालातील संख्यात्मक गुणांकन किमान ४ (किमान "ब" दर्जाची )असून त्यांच्या विरुध्द कोणतीही विभागीय चौकशी/ न्यायालयीन प्रकरण चालू अथवा प्रस्तावित नाही.

२. श्री./श्रीम.-------------------------, यांनी संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयातील तरतूदीनुसार त्यांच्या संदर्भ क्र.२ येथील दि.----------च्या अर्जाअन्वये --------------या कारणास्तव त्यांचे अन्य जिल्हयातील/ विभागातील -----------------या कार्यालयातील (कार्यालयाचे संपूर्ण नाव व पत्ता) -------या पदावर कायमस्वरुपी समावेशन करण्याची विनंती केली आहे.

३. श्री./श्रीम.---------------यांनी संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयात विहित केलेल्या सर्व अटी मान्य असल्याचे लेखी स्वरुपात बंधपत्र दिलेले आहे. (प्रत सोबत)

४. संदर्भ क्र.३ येथील पत्रान्वये ------------------ *कार्यालयाने (*कार्यालयाचे नाव व पत्ता) त्यांच्या कार्यालयात ----------संवर्गाचे सरळसेवा / पदोन्नती कोटयातील ------या प्रवर्गाचे पद उपलब्ध असल्याने, त्या पदावर श्री./श्रीम.-----------यांचे कायमस्वरुपी समावेशन करण्यासाठी हरकत नसल्याचे कळविले आहे.

५. श्री./श्रीम. ------------यांना त्यांच्या विनंतीवरुन ------------------ कार्यालयाच्या ----------- या पदावर संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयातील तरतूदीनुसार कायमस्वरुपी समावेशनाने जाण्याकरिता खालील अटीच्या अधीन राहून **कार्यमुक्त करण्यात येत आहे**.

(१) श्री./श्रीम.---------- यांना संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती मान्य आहेत.

(२) श्री./श्रीम.------------- यांचा या कार्यालयातील ------------ या पदावरील (सध्या कार्यरत असलेल्या पदाचे नाव ) धारणाधिकार राहणार नाही. तसेच, त्यांना या कार्यालयाकडे परत येण्यासाठी अर्ज करता येणार नाही.

(३) कायमस्वरुपी समावेशनाचे आदेश निर्गमित झाल्यानंतर,समावेशनाच्या ठिकाणी तातडीने रुजू होणे आवश्यक राहील. त्यासाठी नियमानुसार पदग्रहण अवधी लागू राहील. तथापि, बदली अनुदान,प्रवास भत्ता वा तद्अनुषंगिक लाभ अनुज्ञेय होणार नाहीत.

(४) समावेशनानंतरच्या नवीन कार्यालयात नोकर कपात कार्यान्वित झाली तर वित्त विभागाच्या तत्कालीन मार्गदर्शक सूचनांनुसार कार्यवाही करण्यात येईल.

(५) कायमस्वरुपी समावेशन झाल्यानंतर, समावेशनानंतरच्या नवीन पदावरील ज्येष्ठता त्या नवीन पदावर प्रत्यक्ष रुजू झाल्याच्या दिनांकास निश्चित होईल. **या कार्यालयातील पदाचे ज्येष्ठतेचे कोणतेही लाभ अनुज्ञेय राहणार नाहीत.**

(६) **कायमस्वरुपी समावेशन संपूर्ण सेवेत फक्त एकदाच लागू राहील.**

**सक्षम नियुक्ती अधिकाऱ्याचे नाव,सही**
**पदनाम,**
**कार्यालयाचे नाव**

**प्रति,**

१.अर्जदार श्री.-----------------------व पत्ता

| | | ५.१.३ | <u>निम्न संवर्गातील किमान सेवेची गणना</u>-<br>संदर्भ क्र.११ येथील दि.१८.६.२०१६ व दि.१३.४.२०१८ चा शासन निर्णय अधिक्रमित करुन **<u>निम्न संवर्गातील किमान सेवेची गणना</u>** पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे :-<br>प्रतिवर्षी निवडसूची वर्षाच्या पहिल्या तारखेस म्हणजेच दि.१ सप्टेंबर या तारखेस विचारक्षेत्रातील अधिकारी/ कर्मचाऱ्याची निम्न पदावरील किमान सेवा तसेच, पदोन्नतीसाठीची इतर आवश्यक अर्हता पूर्ण झाली पाहिजे.<br>परंतु, दि.१ सप्टेंबर या तारखेस निम्न पदावरील किमान सेवा पूर्ण करणारे विचारक्षेत्रातील पदसंख्येइतके पुरेसे अधिकारी/कर्मचारी उपलब्ध होत नसल्यास, अशा प्रकरणी पदोन्नतीची पदे रिक्त राहू नयेत म्हणून ज्या दिनांकास समितीची बैठक आयोजित केली जाईल त्या दिनांकास निम्न पदावरील किमान सेवा पूर्ण करणाऱ्या व पदोन्नतीसाठीची इतर आवश्यक अर्हता पूर्ण करणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांचा विचार करण्यात यावा.<br>तसेच, संदर्भ क्र.६ येथील दि.१७.२.१९९७ चा शासन निर्णय अधिक्रमित करुन असे सूचित करण्यात येत आहे की, परिविक्षाधीन कालावधी समाधानकारक पूर्ण केल्याचे आदेश निर्गमित झाल्यानंतर, परिविक्षाधीन कालावधीतील सेवा, पदोन्नतीसाठी आवश्यक असलेल्या अनुभवासाठी ग्राह्य धरण्यात यावी. |
| | ५.२ | <u>सेवाज्येष्ठतासूची</u> :- | |
| | | ५.२.१ | ज्या पदांवर पदोन्नती द्यावयाची आहे त्या पदांच्या निम्नस्तरीय पदांची निवडसूचीच्या वर्षाच्या लगतच्या वर्षाची अंतिम ज्येष्ठतासूची (सन २०१७-२०१८ ची निवडसूची असल्यास दि.०१.०१.२०१७ रोजीची अंतिम ज्येष्ठतासूची) तयार करावी. |
| | | ५.२.२ | तयार केलेल्या अंतिम ज्येष्ठतासूचीमध्ये विचारक्षेत्रातील सर्व अधिकाऱ्यांची/कर्मचाऱ्यांची नावे अंतर्भूत असणे आवश्यक आहे. एखादया अधिकाऱ्यांची/कर्मचाऱ्यांचा मानीव दिनांक दिल्यामुळे त्याचा विचारक्षेत्रात समावेश होत असल्यास, मानीव दिनांकानुसार त्याच्या सुधारीत ज्येष्ठता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | क्रमांकाची नोंद दर्शविणारे ज्येष्ठतासूचीचे शुध्दीपत्रक निर्गमित करावे. |
| | | ५.२.३ | ज्येष्ठतासूचीमधील जे अधिकारी/कर्मचारी समितीच्या बैठकीच्या दिनांकापूर्वीच पदोन्नत, सेवानिवृत्त, राजीनामा, मयत, सेवामुक्त/कार्यमुक्त झाले असतील अशा अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या नावासमोर त्याबाबतची नोंद ज्येष्ठतासूचीत पेनाने स्पष्टपणे करण्यात यावी. त्याचप्रमाणे विचारक्षेत्रातील कनिष्ठ अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या वरिष्ठ स्थानावर नोंद असलेल्या सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांचा विचारक्षेत्रात समावेश केलेला नसल्यास, त्याबाबतचे कारण ज्येष्ठतायादीत संबंधितांच्या नावासमोर दर्शवावे. |
| | | ५.२.४ | ज्येष्ठतासूची ज्या स्तरावर (राज्यस्तर/विभागस्तर/ जिल्हास्तर इ.) तयार करण्यात येते त्या स्तरावरील कार्यालयाच्या आस्थापना अधिकारी/सक्षम अधिकारी यांनी उपरोक्त ५.२.३ प्रमाणे नोंदी घेतलेली अद्ययावत ज्येष्ठतासूची प्रमाणित करुन समितीपुढे सादर करावी. |
| | | ५.२.५ | ज्येष्ठतासूची संदर्भात काही न्यायालयीन प्रकरणे असल्यास व ज्येष्ठतासूची वापरण्याला मा.न्यायाधिकरण अथवा मा. न्यायालय यांचे स्थगिती आदेश असल्यास ज्येष्ठतासूची वापरण्यासंदर्भात कायदेशीर अभिमत प्राप्त करुन पुढील कार्यवाही करावी. |
| | | ५.२.६ | ज्येष्ठतासूचीला मा.न्यायाधिकरण अथवा मा.न्यायालय यांचे स्थगिती आदेश नसल्यास, न्यायालयीन प्रकरणाच्या अंतिम निर्णयाच्या अधीन पदोन्नत्या देण्यासंदर्भात ज्येष्ठतासूचीचा वापर करत असल्याची बाब समितीच्या निदर्शनास आणावी. |
| ६ | **नियमित/तदर्थ निवडसूचीसाठी विचारक्षेत्रातील अधिकारी/कर्मचारी यादी तयार करण्यासाठीच्या सूचना :-** | | |
| | ६.१ | **संदर्भ क्र.३ येथील दि.१.८.१९८९ चा शासन निर्णय अधिक्रमित करुन, निवडसूचीसाठी प्रवर्गनिहाय पात्र अधिकारी/कर्मचाऱ्यांची निवड करण्यासाठी, निवडसूचीच्या एकूण पदसंख्येपैकी प्रवर्गनिहाय पदसंख्येनुसार विचारक्षेत्रातील प्रवर्गनिहाय अधिकारी/कर्मचाऱ्यांची संख्या पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे :-** | |

| अ.क्र. | निवडसूचीतील प्रवर्गनिहाय पदांची संख्या | विचारक्षेत्रातील प्रवर्गनिहाय अधिकारी/ कर्मचाऱ्यांची संख्या |
|---|---|---|
| १ | १ ते ३ | तिप्पट परंतु कमाल ७ |
| २ | ४ ते ९ | दुप्पट परंतु कमाल १४ |
| ३ | १० किंवा त्यापेक्षा अधिक | दिडपट |

६.२ **उपरोक्त प्रमाणे विचारक्षेत्रातील प्रवर्गनिहाय अधिकारी/कर्मचाऱ्यांची संख्या निश्चित केल्यानंतर, त्यांच्या प्रवर्गनिहाय वेगवेगळया याद्या तयार करणे-**

<u>उदा.</u> १५ पदांची निवडसूची तयार करण्यासाठी, एकूण १५ पदांची प्रवर्गनिहाय संख्या व त्यानुसार प्रत्येक प्रवर्ग निहाय विचारक्षेत्रातील अधिकारी/कर्मचारी यांची संख्या खालीलप्रमाणे राहील .

| प्रवर्ग | निवडसूचीतील पदांची प्रवर्ग निहाय संख्या | विचारक्षेत्रातील पदांची प्रवर्ग निहाय यादया |
|---|---|---|
| खुला | १० | १५ ( १० च्या दीडपट नुसार) |
| अ.जा | २ | ६ ( २ च्या तिप्पट नुसार) |
| अ.ज. | १ | ३ (१ च्या तिप्पट नुसार) |
| वि.जा (अ) | १ | ३ (१ च्या तिप्पट नुसार) |
| भ.ज.(क) | १ | ३ (१ च्या तिप्पट नुसार) |
| **एकूण** | **१५** | **३०** |

**टीप** - वरील उदाहरण हे पदोन्नतीतील आरक्षण विचारात घेऊन देण्यात आले आहे. तथापि, पदोन्नतीतील आरक्षणासंदर्भात होणारे न्यायालयीन निवाडे व त्याअनुषंगाने भविष्यात निर्गमित होणाऱ्या शासन निर्णयातील तरतूदी लागू राहतील. त्यानुसार या बाबत अद्ययावत माहिती घेऊन विचारक्षेत्रातील अधिकारी/कर्मचाऱ्यांची परिगणना करण्यात यावी.

६३. पूर्वी पदोन्नती नाकारलेले अधिकारी/कर्मचारी विचारक्षेत्रामध्ये येत असल्यास, त्यांचा संदर्भ क्र. ३० येथील दि.१२.०९.२०१६ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार विचारक्षेत्रात समावेश करावा किंवा कसे याबाबत पडताळणी करावी.

७. उपरोक्त प्रमाणे विचारक्षेत्रातील अधिकारी/कर्मचारी यांच्या प्रवर्गनिहाय यादया तयार केल्यानंतर, सदर यादयांमधील अधिकारी/कर्मचाऱ्यांनी पदोन्नतीसाठी खालील नमूद निकषांची पूर्तता होत असल्याची माहिती/कागदपत्रे समितीस सादर करणे.

७.१ **गोपनीय अहवालाबाबतची परिपूर्ण धारिका -** संदर्भ क्र. २३ येथील शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दि. १.११.२०११ च्या परिशिष्ट-अ मधील सूचना क्र. ५१ नुसार व संदर्भ क्र. २४ येथील शासन निर्णय दि.१३.०२.२०१४ नुसार विचारक्षेत्रातील अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या अलीकडच्या ५ वर्षाच्या परिपूर्ण गोपनीय अहवालांची धारिका समितीसमोर सादर कराव्यात. तसेच, गोपनीय अहवालातील प्रतिकूल/ पदोन्नतीच्या आड येणारे शेरे संबंधितांना कळविल्याच्या प्रती तसेच, त्यावर त्यांच्याकडून प्राप्त झालेल्या अभिवेदनावर घेतलेल्या निर्णयाच्या प्रती गोपनीय अहवाल धारिकेत समाविष्ट कराव्यात. गोपनीय अहवाल धारिका परिपूर्ण ठेवण्याची जबाबदारी संबंधित आस्थापना अधिकारी यांची असेल.

| | | |
|---|---|---|
| | ७.२ | **गोपनीय अहवालाचे निकष -** गोपनीय अहवालासंदर्भातील संदर्भ क्र. ४ येथील दि.२८.३.१९९०, संदर्भ क्र. ५ येथील दि.२१.२.१९९४, संदर्भ क्र. ७ येथील दि.२३.१२.२००२ व संदर्भ क्र. १३ येथील दि.१.४.२०१७ येथील शासन निर्णय अधिक्रमित करुन पदोन्नतीसाठी गोपनीय अहवालाबाबतचे निकष सोबतच्या **परिशिष्ट-४** येथे नमूद करण्यात आले आहेत. सदर निकष विचारात घेण्यात यावेत. |
| | ७.३ | **शैक्षणिक अर्हता व अनिवार्य परीक्षा -** सेवा प्रवेश नियमानुसार खालील अर्हता पूर्ण केल्या असल्याबाबतची कागदपत्रे समितीस सादर करणे<br>i) शैक्षणिक अर्हता,<br>ii) तांत्रिक अर्हता (असल्यास)<br>iii) आवश्यक अनुभव धारण करणे<br>iv) तांत्रिक परीक्षा, |
| | ७.४ | **विभागीय परीक्षा -** विभागीय परीक्षा नियमानुसार सेवाप्रवेशोत्तर विभागीय परीक्षा तसेच, पदोन्नतीसाठीची विभागीय परीक्षा विहीत संधीत उत्तीर्ण झाल्याबाबतची किंवा त्यातून सूट मिळाल्याबाबतची कागदपत्रे समितीस सादर करणे. |
| | ७.५ | **शासनाने नमूद केलेल्या खालील परीक्षा उत्तीर्ण झाल्याबाबतची कागदपत्रे समितीस सादर करणे -**<br>i) संदर्भ क्र. ३५ येथील शासन अधिसूचना दि.२८ मे,२०१८ नुसार संगणक अर्हता परीक्षा<br>ii) मराठी/हिंदी भाषा परीक्षा<br>iii) तसेच, भविष्यात वेळोवेळी निश्चित केल्या जाणाऱ्या परीक्षा |
| | ७.६ | **परिविक्षाधीन कालावधी -** सरळसेवा उमेदवारांच्या बाबतीत त्यांचा परिविक्षाधीन कालावधी पूर्ण झाला असल्याबाबतची कागदपत्रे समितीसमोर सादर करणे. |
| | ७.७ | **स्थायित्व लाभ प्रमाणपत्र -** संदर्भ क्र. २६, २७ व ३३ येथील अनुक्रमे दि.११.९.२०१४, दि.२१.८.२०१५ व दि.१९.९.२०१७ च्या परिपत्रकानुसार स्थायित्व प्रमाणपत्र प्राप्त झाले असल्याबाबतची कागदपत्रे समितीसमोर सादर करणे. |
| | ७.८ | **विभागीय चौकशी/ न्यायालयीन प्रकरणे -** ज्या अधिकारी/कर्मचारी यांच्याविरूध्द विभागीय चौकशी चालू आहे किंवा प्रकरण न्यायप्रविष्ट आहे अथवा शिक्षेच्या अंमलाखाली आहे, अशा अधिकारी/ कर्मचाऱ्यांची माहिती समितीसमोर सादर करणे. |
| | ७.९ | **संशयास्पद सचोटी -** संदर्भ क्र.२१ येथील दिनांक ३० ऑक्टोबर, २००६ नुसार अधिकाऱ्यांचे नाव संशयास्पद सचोटीच्या यादीमध्ये आहे किंवा कसे याबाबतची माहिती समितीसमोर सादर करणे. |
| | ७.१० | **जात वैधता प्रमाणपत्र -** जात पडताळणी अधिनियम २००१ च्या कलम ८ नुसार जात सिध्द करण्याची / जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची जबाबदारी संबंधित मागासवर्गीय अधिकारी/कर्मचारी यांची आहे. त्यामुळे विचारक्षेत्रातील मागासवर्गीय अधिकारी/कर्मचाऱ्यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केले नसल्यास, त्यांना पदोन्नती |

| | | |
|---|---|---|
| | | देण्यात येऊ नये असे आदिवासी विकास विभागाच्या संदर्भ क्र.१९ येथील दि.२८.५.२००१ चे शासन शुध्दीपत्रकान्वये तसेच, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या संदर्भ क्र. २० येथील दि. ५.३.२००५ च्या शासन परिपत्रकान्वये आदेशित केले आहे. त्यानुसार विचारक्षेत्रामधील मागासवर्गीय अधिकारी/कर्मचारी यांनी जातवैधता प्रमाणपत्र सादर केले आहे किंवा कसे याबाबतची माहिती समितीसमोर सादर करणे. |
| | ७.११ | **मत्ता व दायित्वे विवरणपत्रे -** संदर्भ क्र.२५ येथील दि.२ जून,२०१४ च्या शासन निर्णयानुसार अधिकारी/कर्मचारी यांनी अद्ययावत मत्ता व दायित्वे विवरणपत्रे सादर केल्याबाबतची माहिती. |
| | ७.१२ | **वयाच्या ५०/५५ नंतर सेवेत ठेवण्याबाबतचे पुनर्विलोकन केल्याबाबतची माहिती -** संदर्भ क्र.१६ येथील दि.२.९.१९७७ व संदर्भ क्र.१८ येथील दि.१०.६.२०१९ च्या शासन निर्णयानुसार विचारक्षेत्रातील जे अधिकारी/कर्मचारी हे वयाच्या ५०/५५ वर्षानंतर सेवेत ठेवण्याबाबतचे पुनर्विलोकन केले आहे का व केले असल्यास पुनर्विलोकनाअंती, त्यांच्या सेवा पुढे चालू ठेवण्यास पात्र/अपात्र ठरत असल्याबाबतची यादी देणे. |
| | ७.१३ | **दीर्घकाळ विनापरवानगी गैरहजर -** २ वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक कालावधीसाठी विनापरवानगी गैरहजर/बेपत्ता असलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांची यादी. |
| | ७.१४ | **अनिवार्य प्रशिक्षण पूर्ण करणे -** राज्य प्रशिक्षण धोरणांतर्गत पदोन्नतीनंतर प्रशिक्षण अनिवार्य करण्याबाबतच्या संदर्भ क्र. २२ येथील दि.२३.९.२०११ मधील सूचना विचारात घेऊन, विचारक्षेत्रातील अधिकारी/कर्मचारी यांनी अनिवार्य प्रशिक्षण पूर्ण केले आहे किंवा कसे याबाबतची माहिती. |
| ८. | **मागील निवडसूचीतील मोहोरबंद ठेवलेली प्रकरणे :-** मागील निवडसूचीत मोहोरबंद पाकिटात ठेवलेल्या प्रकरणी विभागीय चौकशी/ न्यायप्रविष्ट प्रकरण /शिक्षेचा अंमल पूर्ण झाला आहे किंवा कसे हे तपासून त्याबाबतची सद्यस्थिती समितीस सादर करणे. | |
| ९. | **मागील निवडसूचीतील खुली ठेवलेली प्रकरणे :-** मागील निवडसूचीत खुली ठेवलेल्या प्रकरणी प्रशासकीय कार्यवाही पूर्ण करुन आदेश निर्गमित झाले आहेत का हे तपासणे. अन्यथा सदर आदेश निर्गमित करण्यास जबाबदार असणाऱ्या सक्षम अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करुन, केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस सादर करणे. | |

## उ) <u>समितीने बैठकीच्या वेळी खालील बाबी विचारात घ्याव्यात</u> :-

| | |
|---|---|
| १ | **उपरोक्त "ई"नुसार प्राथमिक कार्यवाही पूर्ण केली आहे का याबाबतची खात्री करावी.** |
| २. | **<u>समितीच्या बैठकीत खालील बाबींची तपासणी करावी</u>:-**<br>i) मागील निवडसूची वर्षातील तदर्थ पदोन्नत्या नियमित करण्याचा प्रस्ताव सादर केला आहे का हे तपासावे व तसे केले नसल्यास सदर कार्यवाही पूर्ण होईपर्यंत नव्याने तदर्थ पदोन्नती वा नियमित पदोन्नती देण्याबाबतचे कोणतेही प्रस्ताव विचारात घेऊ नयेत.<br>ii) विचारक्षेत्रातील सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांची पदोन्नतीसाठीची पात्रता तपासणे |

| | |
|---|---|
| | अनिवार्य असेल.<br>iii) मागील निवडसूचीतील मोहोरबंद पाकीटात ठेवलेल्या प्रकरणांची सद्यस्थिती जाणून घेऊन याबाबत संदर्भ क्र.३४ येथील दि.१५.१२.२०१७ व दि.३०.८.२०१८ च्या शासन निर्णयानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.<br>iv) मागील निवडसूचीतील खुल्या ठेवलेल्या प्रकरणांची सद्यस्थिती जाणून घेऊन पुढील कार्यवाहीचे आदेश देणे. |
| ३. | **विचारक्षेत्रातील सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांची खालील निकषांच्या आधारे पात्रता तपासण्यात यावी :-**<br>i) मागील ५ वर्षाचे गोपनीय अहवाल<br>ii) सेवा प्रवेश नियमानुसार आवश्यक शैक्षणिक अर्हता व अनुभव<br>iii) ज्या पदांच्या सेवा प्रवेश नियमामध्ये तांत्रिक परीक्षा विहित केलेल्या आहेत त्या परीक्षा उत्तीर्ण होणे<br>iv) विभागीय परीक्षा नियमानुसार सेवाप्रवेशोत्तर विभागीय परीक्षा व पदोन्नतीसाठीची विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे<br>v) पदोन्नतीसाठीच्या सर्व अनिवार्य परीक्षा उत्तीर्ण होणे ( संगणक अर्हता परीक्षा, मराठी/हिंदी भाषा परीक्षा )<br>vi) परिविक्षाधीन कालावधी पूर्ण झाल्याबाबतची माहिती<br>vii) स्थायित्व लाभ प्रमाणपत्र<br>viii) जातवैधता प्रमाणपत्र<br>ix) मत्ता व दायित्व विवरणपत्र<br>x) वयाच्या ५०/५५ नंतर सेवेत ठेवण्याबाबतचे पुनर्विलोकन<br>xi) विभागीय चौकशी / न्यायालयीन कार्यवाहीबाबतची माहिती<br>xii) संशयास्पद सचोटी बाबतची माहिती<br>xiii) अनिवार्य प्रशिक्षण |
| ४. | **उपरोक्त मुद्दा क्र.३ मध्ये नमूद केलेल्या निकषांनुसार पात्रता तपासताना खालील नमूद निकषांची पूर्तता संबंधित अधिकारी/कर्मचारी करीत नसल्यास, त्यांना पदोन्नतीसाठी अपात्र ठरविण्यात यावे :-**<br>i) पदोन्नतीसाठी सोबतच्या परिशिष्ट -४ येथे नमूद केल्यानुसार गोपनीय अहवाल किमान पात्रतेचे नसल्यास.<br>ii) सेवा प्रवेश नियमानुसार आवश्यक शैक्षणिक अर्हता व अनुभव धारण करीत नसल्यास.<br>iii) संगणक परीक्षा उत्तीर्ण झाली नसल्यास अथवा त्यातून सूट मिळाली नसल्यास.<br>iv) निम्न पदासाठी आणि पदोन्नतीच्या पदासाठी असलेली विभागीय व तांत्रिक परीक्षा उत्तीर्ण नसल्यास अथवा परीक्षेतून सूट मिळाली नसल्यास.<br>v) मराठी व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण झाले नसल्यास. |

| | |
|---|---|
| | vi) परिविक्षाधीन कालावधी समाधानकारक रित्या पूर्ण करीत नसल्यास.<br>vii) स्थायित्व लाभ प्रमाणपत्र प्राप्त होण्यासाठी नमूद केलेल्या अटींची पूर्तता करीत नसल्यास.<br>viii) जातवैधता प्रमाणपत्र सादर केले नसल्यास.<br>ix) मत्ता व दायित्व विवरणपत्र सादर केले नसल्यास.<br>x) वयाच्या ५०/५५ नंतर सेवेत ठेवण्याबाबतच्या पुनर्विलोकनाअंती अपात्र ठरविले असल्यास.<br>xi) संशयास्पद सचोटीच्या यादीत नाव समाविष्ट असल्यास.<br>xii) पदोन्नतीसाठी विचारक्षेत्रात असलेल्या तथापि, ज्या दिनांकास पात्रता आजमावण्यात येणार आहे त्या कालावधीपूर्वी २ वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक कालावधीत विनापरवानगी अनधिकृत गैरहजर/ परागंदा/बेपत्ता असल्यास.<br>xiii) अनिवार्य प्रशिक्षण पूर्ण केले नसल्यास. |
| ५. | **उपरोक्त मुद्दा क्र.३ मध्ये नमूद केलेल्या निकषांनुसार पात्रता तपासताना खालील नमूद प्रकरणे खुली ठेवण्यात यावीत.**<br>i) संबंधित अधिकारी/कर्मचारी यांनी परिविक्षाधीन कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण करीत असल्याबाबतच्या सर्व अटी शर्तींची पूर्तता केली असेल मात्र केवळ प्रशासकीय विलंबामुळे त्यांचे परिविक्षाधीन कालावधी पूर्ण झाल्याबाबतचे कार्यालयीन आदेश निर्गमित झाले नसल्यास.<br>ii) संबंधित अधिकारी/कर्मचारी यांनी स्थायित्व लाभ प्रमाणप्रत्रासाठी सर्व अटी व शर्तीची पूर्तता केली असेल मात्र केवळ प्रशासकीय विलंबामुळे त्यांचे स्थायित्व लाभ प्रमाणपत्र बाबतचे कार्यालयीन आदेश निर्गमित झाले नसल्यास.<br>iii) विचारक्षेत्रातील अधिकारी/कर्मचारी यांचे वयाच्या ५०/५५ व्या वर्षी सेवेत ठेवण्याबाबतचे पुनर्विलोकन झाले नसल्यास. |
| ६. | **उपरोक्त मुद्दा क्र.३ मध्ये नमूद केलेल्या निकषांनुसार पात्रता तपासून मोहोरबंद करावयाची प्रकरणे –**<br>ज्या अधिकारी/कर्मचारी यांच्याविरूध्द विभागीय चौकशी चालू आहे किंवा प्रकरण न्यायप्रविष्ट आहे अथवा शिक्षेच्या अंमलाखाली आहे, अशा अधिकारी/ कर्मचाऱ्यांचे प्रकरण संदर्भ क्र. ३४ येथील दि.१५.१२.२०१७ व दि. ३०.८.२०१८ च्या शासन निर्णयामधील तरतूदीनुसार खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.<br>**निवडसूचीमधील ज्या अधिकारी/कर्मचारी यांच्याविरूध्द विभागीय चौकशी चालू आहे किंवा प्रकरण न्यायप्रविष्ट आहे अथवा शिक्षेच्या अंमलाखाली आहे, त्यांची पदोन्नतीसाठीची पात्रता तपासून ते पात्र अथवा अपात्र असल्याबाबतचे समितीचे अभिप्राय नोंदवून सदर अभिप्राय मोहरबंद पाकिटात ठेवण्यात यावे.** |

७. **समितीने उपरोक्त मुद्दा क्र.३ ते ६ नुसार विचार क्षेत्रातील अधिकारी/कर्मचाऱ्यांची पात्रता तपासून, पात्र/अपात्र/खुली/मोहोरबंद पाकीटात ठेवलेल्या प्रकरणांच्या स्वतंत्र यादया तयार कराव्यात.**

८. **<u>तदर्थ पदोन्नती प्रथम नियमित करणे-</u>**

मुद्दा क्र.७ नुसार तयार केलेल्या यादयांमधून निवडसूची तयार करताना, यापूर्वी तदर्थ पदोन्नती दिलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांचा (ज्येष्ठतेनुसार व आरक्षणाच्या पदसंख्येनुसार) प्रथम नियमित निवडसूचीत समावेश करण्यात यावा.

मात्र, अशा अधिकारी/कर्मचाऱ्यांचा नियमित निवडसूचीसाठी विचार करतांना त्यांची नव्याने पात्रता न तपासता त्यांच्यावर तदर्थ पदोन्नती नंतरच्या काळात विभागीय चौकशी/न्यायालयीन प्रकरण सुरु आहे का हे पहावे व विभागीय चौकशी/ न्यायालयीन प्रकरण सुरु झाले असल्यास, त्यांची तदर्थ पदोन्नती नियमित करण्यात येऊ नये.

९. **<u>निवडसूची तयार करणे-</u>**

आरक्षणनिहाय तयार केलेल्या विचारक्षेत्रातील यादयांमधून पात्र अधिकारी/कर्मचाऱ्यांची, निवडसूचीच्या संख्येच्या मर्यादेत, त्यामधील प्रवर्गनिहाय आरक्षणानुसार, त्यांच्या आपापसातील ज्येष्ठतेच्या क्रमानुसार निवडसूची तयार करावी.

**<u>उदा.</u>**

| **प्रवर्ग** | **निवडसूचीतील पदांची प्रवर्ग निहाय संख्या** | **विचारक्षेत्रातील पदांची प्रवर्ग निहाय यादी** | **विचार क्षेत्रातील तपासणी अंती पात्र ठरलेल्या उमेदवारांची संख्या** | **स्तंभ ४ मधील पात्र उमेदवारांपैकी निवडसूचीत समाविष्ट होणारे उमेदवार** | **निवडसूचीत तयार करणे** |
|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. |
| खुला | १० | १५ (१० च्या दीडपट नुसार) | १२ | १२ मधील सेवाज्येष्ठतेच्या क्रमानुसार १० | स्तंभ ५ मधील उमेदवारांची आपापसातील ज्येष्ठतेच्या क्रमानुसार निवडसूची तयार करावी |
| अ.जा. | २ | ६ (२ च्या तिप्पट नुसार) | ३ | ३ मधील सेवाज्येष्ठतेच्या क्रमानुसार २ | |
| अ.ज. | १ | ३ (१ च्या तिप्पट नुसार) | १ | १ | |
| वि.जा. (अ) | १ | ३ (१ च्या तिप्पट नुसार) | २ | २ मधील सेवाज्येष्ठतेच्या क्रमानुसार १ | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| भ.ज.(क) | १ | ३ (१ च्या तिप्पट नुसार) | २ | २ मधील सेवाज्येष्ठतेच्या क्रमानुसार १ | |
| **एकूण** | **१५** | **३०** | **२०** | **१५** | **१५** |

**टीप** - १) ज्या प्रकरणी एखादया प्रवर्गासाठी विचारक्षेत्रातील उमेदवारांमधून एकही पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास , त्या प्रवर्गातील पदोन्नतीचे पद रिक्त ठेवून, तयार केलेल्या निवडसूचीप्रमाणे पदोन्नती देण्यासाठी पुढील आवश्यक कार्यवाही तात्काळ करावी व त्यानंतर सदर रिक्त पद भरण्याच्या अनुषंगाने नवीन विचारक्षेत्राची यादी तयार करुन समितीची बैठक पुन्हा आयोजित करुन, समितीच्या मान्यतेने सदर पदोन्नतीचे पद तात्काळ भरण्याची कार्यवाही करावी. तथापि, नवीन विचारक्षेत्राची यादी तयार करण्यासाठी निम्न संवर्गात पदोन्नतीसाठीची अर्हता धारण करणारे उमेदवार उपलब्ध नसल्यास, सदर पद पुढील निवडसूची वर्षापर्यंत रिक्त राहील.

२) वरील उदाहरण हे पदोन्नतीतील आरक्षण विचारात घेऊन देण्यात आले आहे. तथापि, पदोन्नतीतील आरक्षणासंदर्भात होणारे न्यायालयीन निवाडे व त्याअनुषंगाने भविष्यात निर्गमित होणाऱ्या शासन निर्णयातील तरतूदी लागू राहतील.

१०. निवडसूची तयार झाल्यानंतर, आस्थापना मंडळाने पत्राद्वारे व विभागीय पदोन्नती समितीने इतिवृत्ताद्वारे त्यांचा अहवाल संबंधित विभागास सादर करावा.

११. **(१) समितीने बैठकीच्या इतिवृत्तामध्ये समाविष्ट करावयाच्या बाबी :-**

i) समितीच्या सदस्यांची नावे व पदनामे

ii) बैठकीचा दिनांक,वेळ व ठिकाण

iii) पदोन्नतीचे व त्याच्या निम्न संवर्गाच्या पदाची वेतनश्रेणी व गट

iv) निवडसूचीचे वर्ष ( दि.१ सप्टेंबर------ ते दि.३१ ऑगस्ट-------)

v) सेवाप्रवेश नियमानुसार भरतीचे मार्ग (पदोन्नती, नामनिर्देशन इ.) व त्याचे प्रमाण

vi) मंजूर पदसंख्येनुसार पदोन्नती कोटयातील मंजूर, रिक्त व भरावयाची पदांची आरक्षणनिहाय माहिती.

vii) निवडसूची नियमित / तदर्थ आहे याबाबतचा स्पष्ट उल्लेख.

viii) अपात्र ठरविलेल्या कर्मचाऱ्याची सविस्तर कारणे नमूद करावीत.

ix) ज्येष्ठतासूचीला मा. न्यायाधिकरण /मा. न्यायालय यांचे स्थगिती आदेश नसल्यास, न्यायालयीन प्रकरणाच्या अंतिम निर्णयाच्या अधीन पदोन्नत्या देण्यासंदर्भात ज्येष्ठतासूचीचा वापर करत असल्याची बाब स्पष्ट करावी.

x) निवडसूचीच्या पदसंख्ये इतक्या पात्र अधिकारी/कर्मचाऱ्यांची आपापसातील ज्येष्ठतेनुसार यादी (निवडसूची).

| | |
|---|---|
| | **(२) बैठकीच्या इतिवृत्तासोबत खालील याद्या /विवरणपत्रे सादर करण्यात यावीत :-**<br>i) विचारक्षेत्रातील सर्व अधिकारी/कर्मचारी यांची सर्वसमावेशक यादी,<br>ii) विचारक्षेत्रातील सर्व अधिकारी/कर्मचारी यांची, पात्र/अपात्रतेच्या/ प्रकरण खुले ठेवल्याच्या/ मोहोरबंद पाकीटात ठेवल्याच्या शेऱ्यासह यादी<br>iii) ज्येष्ठ असूनही विचारक्षेत्रातील यादीत समावेश न केलेल्या अधिकारी/कर्मचारी यांची कारणासह यादी<br>iv) विभागीय पदोन्नती समितीच्या सर्व सदस्यांची व अध्यक्षाची स्वाक्षरी असलेले गोपनीय अहवालांच्या प्रतवारींची विवरणपत्रे<br>**(३) वरील सर्व यादयांसह सादर करण्यात येणाऱ्या इतिवृत्तावर बैठकीस उपस्थित असणाऱ्या समितीच्या सर्व सदस्यांची व अध्यक्षाची स्वाक्षरी घेण्यात यावी.** |

## ऊ) आस्थापना मंडळाने केलेल्या शिफारशीनंतर करावयाची कार्यवाही :-

१) आस्थापना मंडळाच्या नियमित/तदर्थ निवडसूचीबाबतच्या शिफारशी संबंधित प्रशासकीय विभागास सामान्य प्रशासन विभाग/ कार्यासन १३ मार्फत पत्राद्वारे कळविण्यात याव्यात.

२) संबधित प्रशासकीय विभागाने, विभागीय महसूली वाटप नियमावलीतील तरतूदी व नागरी सेवा मंडळाच्या शिफारशी विचारात घेऊन पदोन्नतीच्या व पदस्थापनेच्या एकत्रित प्रस्तावास नियुक्ती प्राधिकाऱ्यांची मान्यता घेऊन, पदोन्नती व पदस्थापनेचे एकत्रित आदेश निर्गमित करावेत. ( संदर्भ क्र.९ येथील दि.२४.८.२०१५ चा शासन निर्णय तसेच, दि.२९.९.२०१५ चे शुध्दीपत्रक अधिक्रमित करुन )

३) त्याचप्रमाणे , मंत्रालयीन सचिव व सचिव समकक्ष व त्यावरील पदांकरिता (सार्वजनिक बांधकाम, जलसंपदा, विधी व न्याय इ.विभागातील) तयार झालेल्या निवडसूचीचे व त्या निवडसूचीनुसार रिक्त पदांवर नियुक्ती देण्याचे प्रस्ताव अपर मुख्य सचिव (सेवा) व मुख्य सचिव यांच्या मार्फत एकत्रितरित्या शासनास सादर करण्यात यावेत.

**टीप -** उपरोक्त (२) व (३) प्रमाणे नियमित पदोन्नती व पदस्थापनेचे आदेश महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मान्यतेच्या अधीन राहून निर्गमित करावेत. त्यानंतर आदेश निर्गमित केल्यापासून तीन महिन्याच्या आत आदेशासह परिपूर्ण प्रस्ताव आयोगाकडे पाठविणे संबंधित प्रशासकीय विभागास बंधनकारक राहील व अशा प्रस्तावावर लोकसेवा आयोगाचा सल्ला प्राप्त झाल्यापासून पुढील तीन महिन्यात आवश्यक ती पुढील कार्यवाही करुन त्याबाबतचा अहवाल संबंधित प्रशासकीय विभागाने आयोगास पाठविणे आवश्यक राहील. तदर्थ पदोन्नत्या या ११ महिन्याच्या कालावधीसाठी असल्याने, त्यास महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मान्यतेची आवश्यकता राहणार नाही.

## ए) <u>विभागीय पदोन्नती समितीने केलेल्या शिफारशीनंतर करावयाची कार्यवाही :-</u>

१) **संदर्भ क्र.८ येथील दि.२४.२.२०११ चे शासन परिपत्रक अधिक्रमित करण्यात येऊन याबाबत असे नमूद करण्यात येते की,** गट-अ (आस्थापना मंडळाच्या कक्षेबाहेरील पदे) आणि गट-ब (राजपत्रित) पदांच्या नियमित/तदर्थ निवडसूचींच्या संदर्भात विभागीय पदोन्नती समितीने केलेल्या शिफारशी संबंधित प्रशासकीय विभागाने तपासून नियमित /तदर्थ निवडसूचीचा प्रस्ताव **<u>परिशिष्ट-५</u>** मधील तपासणीसूचीतील माहितीसह व मागील निवडसूचीच्या नस्तीसह सामान्य प्रशासन विभाग/ कार्यासन १२ च्या मान्यतेस्तव सादर करावा.

२) प्रस्तावास सामान्य प्रशासन विभाग/ कार्यासन १२ ची अंतिम मान्यता प्राप्त झाल्यानंतर संबधित प्रशासकीय विभागाने, विभागीय महसूली वाटप नियमावलीतील तरतुदी व नागरी सेवा मंडळाच्या शिफारशी विचारात घेऊन, पदोन्नतीच्या व पदस्थापनेच्या एकत्रित प्रस्तावास संदर्भ क्र. ३१ येथील दि.१९.११.२०१६ च्या शासन निर्णयानुसार निश्चित केलेल्या नियुक्ती प्राधिकाऱ्यांची मान्यता घेऊन, पदोन्नती व पदस्थापनेचे आदेश एकत्रित निर्गमित करावेत. ( संदर्भ क्र.९ येथील दि.२४.८.२०१५ चा शासन निर्णय तसेच, दि.२९.९.२०१५ चे शुध्दीपत्रक अधिक्रमित करुन )

**टीप** - नियमित पदोन्नती व पदस्थापनेचे आदेश महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मान्यतेच्या अधीन राहून निर्गमित करावेत. त्यानंतर आदेश निर्गमित केल्यापासून तीन महिन्याच्या आत आदेशासह परिपूर्ण प्रस्ताव आयोगाकडे पाठविणे संबंधित प्रशासकीय विभागास बंधनकारक राहील व अशा प्रस्तावावर लोकसेवा आयोगाचा सल्ला प्राप्त झाल्यापासून पुढील तीन महिन्यात आवश्यक ती पुढील कार्यवाही करुन त्याबाबतचा अहवाल संबंधित प्रशासकीय विभागाने आयोगास पाठविणे आवश्यक राहील. तदर्थ पदोन्नत्या या ११ महिन्याच्या कालावधीसाठी असल्याने, त्यास महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मान्यतेची आवश्यकता राहणार नाही.

३) गट-ब (अराजपत्रित), गट-क आणि गट-ड मधील पदांवर पदोन्नती देण्याकरीता तयार केलेल्या नियमित /तदर्थ निवडसूच्यांच्याबाबतीत संबधित नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी, नागरी सेवा मंडळाच्या शिफारशी विचारात घेऊन आदेश निर्गमित करावेत. गट-ब (अराजपत्रित) पदांवर पदोन्नती देण्याकरीता तयार केलेल्या नियमित निवडसूच्या/ तदर्थ पदोन्नतीसूच्यांच्याबाबतीत विभागीय महसूली वाटप नियमावलीतील तरतुदी विचारात घ्याव्यात.

## ऐ) पदोन्नतीचे आदेश निर्गमित करताना त्यामध्ये अंतर्भूत करावयाच्या बाबी :-

१) नियमित निवडसूचीतील पदोन्नत्यांच्या आदेशामध्ये, सदरहू पदोन्नत्या नियमित पदोन्नत्या (Regular Promotion) असल्याचे सुस्पष्ट करण्यात यावे. जर काही प्रकरणी मा. न्यायाधिकरण / न्यायालय येथे दाखल असलेल्या न्यायप्रविष्ट प्रकरणाच्या अधीन राहून किंवा तात्पुरती ज्येष्ठतासूची इ.अन्य कारणास्तव पदोन्नती देताना संबंधित कारण नमूद करुन तात्पुरती पदोन्नती (Temporary Promotion) देण्यात येत असल्याचे आदेशामध्ये स्पष्टपणे नमूद करावे.

२) तदर्थ निवडसूचीतील पदोन्नती आदेशामध्ये खालील अटी सुस्पष्टपणे नमूद कराव्यात :-

i) सदरहू पदोन्नती ही तदर्थ पदोन्नती (Adhoc promotion) असल्याबाबत.

ii) सदरहू पदोन्नती दिलेल्या अधिकारी/कर्मचारी यांना सेवाज्येष्ठतेचा कोणताही लाभ मिळणार नाही.

iii) अशा पदोन्नत्या, सरळसेवेद्वारे आयोग/मंडळाकडून उमेदवार उपलब्ध होईपर्यंत किंवा प्रतिनियुक्तीवर बाहेर गेलेले अधिकारी/ कर्मचारी रुजू होईपर्यंत किंवा पदोन्नतीच्या आदेशापासून ११ महिन्यांसाठी यापैकी जे आधी घडेल त्या कालावधीसाठी असतील व आवश्यकता असल्यास दर ११ महिन्यानंतर खंडित करुन पुढे चालू ठेवल्या जातील. तसेच, आदेशामध्ये नियुक्तीच्या कालावधीची तारीख स्पष्टपणे नमूद करण्यात यावी आणि प्रस्तुत नियुक्ती, नियुक्तीच्या आदेशात नमूद केलेल्या कालावधीनंतर आपोआपच संपुष्टात येतील असा स्पष्ट उल्लेख आदेशात करावा. (संदर्भ क्र.१७ येथील दि. ८.१०.१९९० चा शासन निर्णयानुसार)

iv) तदर्थ पदोन्नती दिलेल्या पदावर सरळसेवेने उमेदवार उपलब्ध झाल्यास अथवा प्रतिनियुक्तीवर बाहेर गेलेले अधिकारी/ कर्मचारी रुजू झाल्यास तदर्थ पदोन्नती दिलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्याची तदर्थ पदोन्नती संपुष्टात आणण्यात येईल,

v) याव्यतिरिक्त अन्य कारणास्तव तदर्थ पदोन्नती दिली असल्यास, ज्या कारणास्तव तदर्थ पदोन्नती दिली असेल त्या कारणाचा पदोन्नती आदेशात स्पष्ट उल्लेख करावा.

## ओ) शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्याने पदोन्नती नाकारल्यास अवलंबिण्याची कार्यवाही:-

नियमित /तदर्थ निवडसूची तयार करताना वा केल्यानंतर एखादया अधिकारी/कर्मचारी यांनी पदोन्नतीच्या पदाचा कार्यभार स्वीकारण्यापूर्वी पदोन्नती नाकारल्यास त्यांचे संदर्भ क्र.३० येथील दि.१२.०९.२०१६ च्या शासन निर्णयामध्ये नमूद कार्यपध्दतीनुसार नियमित निवडसूची/तदर्थ निवडसूचीमधून नाव वगळण्याबाबत आवश्यक कार्यवाही करावी. पदोन्नतीचा कार्यभार स्वीकारल्यानंतर पदोन्नती नाकारता येणार नाही.

**औ) प्रत्येक निवडसूचीवर्षात नियमित निवडसूची तयार न केल्यास करावयाची कार्यवाही :-**

सदर शासन निर्णयासोबत जोडलेल्या परिशिष्ट ३ मध्ये विहित केलेल्या वेळापत्रकानुसार प्रत्येक निवडसूचीवर्षात नियमित पदोन्नतीबाबतची कार्यवाही पूर्ण करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कार्यवाही न झाल्यास परिस्थितीनुरुप संवर्ग नियंत्रण अधिकारी अथवा समितीच्या सचिव/सदस्य सचिव यांच्यावर जबाबदारी निश्चित करण्यात यावी.

मात्र, अशा प्रकारे प्रशासकीय कारणामुळे जेव्हा समितीची बैठक प्रत्येक निवडसूची वर्षात आयोजित करण्यात आली नाही तर अशा वेळी प्रलंबित सर्व निवडसूचीवर्षांची रिक्त पदे विचारात घेऊन एकच नियमित निवडसूची एकाच वेळी तयार करावी. (उदा. २०१५-१६,२०१६-१७, २०१७-१८ या तीन वर्षाच्या निवडसूच्या केलेल्या नसल्यास, या निवडसूची वर्षातील रिक्त पदे व सन २०१८-१९ या निवडसूचीतील रिक्त व संभाव्य रिक्त पदे यांची एकत्रित बेरीज करुन सन २०१८-१९ या निवडसूची वर्षाची एकच निवडसूची तयार करण्यात यावी.)

२. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३२० (३)(ब) नुसार राज्य लोकसेवा आयोगाशी विचारविनिमय करुन, नागरी सेवेमध्ये बढत्या/पदोन्नती देताना अनुसरावयाच्या तत्वांविषयी शासन आदेश निर्गमित करण्याबाबतची तरतूद केली आहे. त्यानुसार उपरोक्त प्रमाणे नागरी सेवेमध्ये बढत्या/पदोन्नती देताना अनुसरावयाच्या तत्वास महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या पत्र क्र. एस१६/१५३५/२०१८/दोन दि.२६ जून २०१९ अन्वये प्राप्त मान्यतेनुसार हा शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय हा शासन निर्णयाच्या दिनांकापासून खालील नमूद केल्यानुसार लागू राहील :-

१) आस्थापना मंडळ १ व २ च्या कक्षेतील पदांसाठी, सदर शासन निर्णयाच्या दिनांकापूर्वी ज्या नियमित निवडसूच्यांना आस्थापना मंडळाने मान्यता दिली आहे अशा नियमित निवडसूच्या वगळून, या दिनांकानंतर आस्थापना मंडळापुढे सादर होणाऱ्या निवडसूच्यांना लागू राहील.

२) आस्थापना मंडळाच्या कक्षेबाहेरील परंतु सामान्य प्रशासन विभागाच्या मान्यतेने अंतिम होणाऱ्या निवडसूच्यांच्या प्रकरणी, सदर शासन निर्णयाच्या दिनांकापूर्वी ज्या नियमित निवडसूच्यांना सामान्य प्रशासन विभागाने मान्यता दिली आहे अशा नियमित निवडसूच्या वगळून, या दिनांकानंतर सामान्य प्रशासन विभागास सादर होणाऱ्या निवडसूच्यांना लागू राहील.

३) सामान्य प्रशासन विभागाच्या मान्यतेखेरीज ज्या निवडसूच्या विभागीय पदोन्नती समितीच्या मान्यतेने अंतिम होतात, अशा प्रकरणी सदर शासन निर्णयाच्या दिनांकापूर्वी ज्या नियमित निवडसूच्यांना विभागीय पदोन्नती समितीने मान्यता दिली आहे अशा नियमित निवडसूच्या वगळून या दिनांकानंतर विभागीय पदोन्नती समितीस सादर होणाऱ्या निवडसूच्यांना लागू राहील.

४) मात्र, या शासन निर्णयापूर्वी तदर्थ निवडसूच्यांना आस्थापना मंडळ/ सामान्य प्रशासन विभाग/ विभागीय पदोन्नती समितीने मान्यता दिली आहे अशा तदर्थ निवडसूच्या या शासन निर्णयाच्या दिनांकानंतर नियमित करताना, सदर शासन निर्णय लागू राहील.

४. या शासन निर्णयाच्या दिनांकानंतर तयार करावयाच्या नियमित/तदर्थ निवडसूच्या या सदर शासन निर्णयातील सूचना विचारात घेऊन तयार करण्याची दक्षता सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी घ्यावी व सदरहू आदेश त्यांच्या अधिपत्याखालील क्षेत्रीय कार्यालयांच्या निदर्शनास आणून द्यावेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८०११५०४३५९६०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Geeta Rahul Kulkarni
Digitally signed by Geeta Rahul Kulkarni
DN: CN = Geeta Rahul Kulkarni, C = IN, S = Maharashtra, O = Government of Maharashtra, OU = General Administration Department
Date: 2019.08.01 18:45:23 +05'30'

**( गीता रा. कुलकर्णी )**
**उप सचिव ,महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३. सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद / विधानसभा, विधानभवन, मुंबई,
५. सर्व मा. संसद सदस्य/विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य,
६. मा.मुख्य सचिव,
७. सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
८. सर्व मंत्रालयीन विभाग,
९. *प्रबंधक, मूळ शाखा, मा. उच्च न्यायालय, मुंबई, औरंगाबाद व नागपूर,
१०. *प्रबंधक, अपील शाखा, मा. उच्च न्यायालय, मुंबई, औरंगाबाद व नागपूर,
११. *प्रबंधक, लोकायुक्त आणि उप लोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
१२. *सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१३. *प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानसभा), मुंबई,
१४. *प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानपरिषद), मंबई,
१५. *सचिव, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई,
१६. *महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई,
१७. *महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई,
१८. *महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर,
१९. *महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, नागपूर,
२०. *सचिव, राज्य मुख्य माहिती आयुक्त यांचे कार्यालय, नवीन प्रशासन भवन, मुंबई,

२१. *प्रबंधक, राज्य मानवी हक्क आयोग, मुंबई ४०० ००१,
२२. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
२३. निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई,
२४. सर्व विभागीय आयुक्त,
२५. सर्व जिल्हाधिकारी,
२६. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
२७. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
२८. सर्व मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख, (मंत्रालयीन विभागांनी संबंधितांना प्रत पाठवावी)
२९. सामान्य प्रशासन विभाग/का. ३९ (महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्दीकरिता),
३०. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ग्रंथालय, सहावा मजला, विधान भवन, मुंबई ४०० ०३२ (१० प्रती)
३१. सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
३२. निवड नस्ती.

## "परिशिष्ट-१"

आस्थापना मंडळासमोर सादर करावयाच्या प्रस्तावाची तपासणीसूची तथा अनुक्रमणिका

विभागाचे नाव-

विषय - --------------------------------------या पदावर पदोन्नती देण्याचा प्रस्ताव.

निवडसूचीचे वर्ष - -----------------

## तपासणीसूची तथा अनुक्रमणिका

| अ.क्र. | जोडलेल्या कागदपत्राचा तपशील | सोबत जोडले आहे होय/नाही/लागू नाही | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | जोडपत्र-अ | | |
| २. | जोडपत्र-ब | | |
| ३. | जोडपत्र-क | | |
| ४. | जोडपत्र-ड | | |
| ५. | ज्या पदावर पदोन्नती द्यावयाची आहे त्या पदाच्या सेवाप्रवेश नियमाची प्रत | | |
| ६. | ज्येष्ठता यादी (प्रस्ताव ज्या निवडसूची वर्षासाठी सादर केला आहे त्या वर्षाच्या लगतपूर्व १ जानेवारीची अद्ययावत अंतिम ज्येष्ठता सूची) | | |
| ७. | पदोन्नतीच्या पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या दर्शविणारे विवरणपत्र | | |
| ८. | पदांच्या आढाव्याची (आकृतीबंध) प्रत/पदनिर्मितीच्या शासन निर्णयाची प्रत | | |
| ९. | विचारक्षेत्रातील अधिकाऱ्यांच्या विभागीय चौकशीची संक्षिप्त माहिती दर्शविणारी टिप्पणी | | |
| १०. | विचारक्षेत्रातील मागासवर्गीय अधिकाऱ्यांच्या जात वैधता प्रमाणपत्रांच्या प्रती | | |
| ११. | रिक्त पदांवरील आरक्षणाला सामान्य प्रशासन विभाग /मागास वर्ग कक्षाच्या मान्यतेच्या टिप्पणीची प्रत (एकाकी पद असल्यास आवश्यकता नाही.) | | |
| १२. | पदोन्नतीच्या याच पदासाठी आस्थापना मंडळाच्या यापूर्वीच्या शिफारशीसंबंधीच्या पत्राची प्रत | | |
| १३. | विचारक्षेत्रातील ज्या अधिकाऱ्यांना वयाच्या ५०/५५ व्या वर्षी करावयाचे पुनर्विलोकन लागू आहे त्या | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | अधिकाऱ्यांचे ५०/५५ व्या वर्षी पुनर्विलोकनाअंती निर्गमित केलेल्या आदेशांची प्रत/प्रती | | |
| १४. | विचारक्षेत्रातील अधिकाऱ्यांच्या परिपूर्ण गोपनीय अहवाल धारिका (ज्या निवडसूची वर्षासाठी विचार करण्यात येणार आहे त्यापूर्वीचे ५ वर्षाचे गोपनीय अहवाल/प्रमाणपत्रासह) | | |

## "परिशिष्ट-२"

### जोडपत्र : अ

### आस्थापना मंडळ क्रमांक १/२ समोर सादर करावयाचा प्रस्ताव

**विषय – --------------------------- या पदावर पदोन्नती देण्याचा प्रस्ताव**

**निवडसूची वर्ष -----------------**

**१. विभागाचा तपशील :**

| | | नाव | दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | प्रस्ताव पाठविणारा मंत्रालयीन विभाग | | --- |
| २ | विभागाचे सचिव/प्रधान सचिव/अ.मु.स | | |
| ३ | सह सचिव/उप सचिव (आस्थापना) | | |
| ४ | कार्यासन अधिकारी व कार्यासन क्र. | | |

**२. पदोन्नतीच्या पदाचा तपशील :**

| अ.क्र. | मुद्दा | तपशील |
|---|---|---|
| १ | पदोन्नतीच्या पदाचे नाव | |
| २ | पदोन्नतीच्या पदाची वेतनश्रेणी | |
| ३ | निम्न संवर्गातील पदाचे नाव | |
| ४ | निम्न संवर्गातील पदाची वेतनश्रेणी | |
| ५ | सेवा प्रवेश नियमातील पदे भरण्याची तरतूद व गुणोत्तर प्रमाण | |
| ६ | पदोन्नतीसाठी सेवा प्रवेश नियमानुसार आवश्यक अर्हता व अनुभव कालावधी | |
| ७ | पदोन्नतीच्या पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या याचे थोडक्यात विवरण | |
| ८ | नामनिर्देशनाच्या कोटयातील पदे रिक्त असल्यास सदर पदे भरण्याबाबत करण्यात येत असलेल्या कार्यवाहीचा तपशील | |

**३. रिक्त पदांचा तपशील :**

| मंजूर पदे | संवर्गातील एकूण पदे – | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| नियुक्तीचा मार्ग | नियुक्तीचे प्रमाण % | कोटयातील पदे | भरलेली पदे | सध्या रिक्त पदे | संभाव्य रिक्त पदे | एकूण रिक्त पदे |
| सरळ सेवा | | | | | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| पदोन्नती | | | | | | |
| अन्य मार्ग | | | | | | |
| एकूण | १००% | | | | | |

**४. छाननीचे मुद्दे :**

<table>
<tr><th>क्र.</th><th>छाननीचा मुद्दा</th><th></th></tr>
<tr><td>१</td><td>वित्त विभागाच्या सहमतीने पदांचा आढावा (सुधारीत आकृती बंध) मंजूर झाला आहे काय?असल्यास शेवटच्या मंजूरीचा दिनांक</td><td>होय/नाही<br>दि.------</td></tr>
<tr><td rowspan="2">२.</td><td>अ) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.असंक १००१/प्र.क्र.२९/२००१/ वित्तीय सुधारणा, दि. १०.९.२००१व शासन निर्णय, वित्त विभाग क्र.असंक १००१ / प्र.क्र.२९/२००१/वित्तीय सुधारणा, दिनांक १.०९.२००४ मधील सूचना विचारात घेता, या प्रस्तावात पदोन्नतीने भरण्यासाठी अंतर्भूत असलेली पदे व्यपगत झालेली आहेत काय?</td><td>होय/नाही/लागू नसल्यास शेरा नमूद करावा.</td></tr>
<tr><td>ब) पदे व्यपगत झाली असल्यास, ती वित्त विभाग/उच्चस्तरीय सचिव समितीच्या मान्यतेने पुनरुज्जीवित करुन घेण्यात आली असल्यास आदेशाची प्रत सोबत जोडली आहे काय ?</td><td>होय/नाही</td></tr>
<tr><td>३.</td><td>निवडसूचीच्या वर्षाच्या पूर्वीच्या वर्षी सरळसेवेच्या कोट्याच्या पदावर तदर्थ पदोन्नत्या देण्यात आल्या आहेत काय?</td><td>होय/नाही</td></tr>
<tr><td>४.</td><td>सदर तदर्थ पदोन्नत्या, पदोन्नती कोटयात उपलब्ध रिक्त पदांवर नियमित करण्यात आल्या आहेत का ? नसल्यास सदर तदर्थ पदोन्नत्या नियमित होण्यासाठी त्यांचा चालू प्रस्तावातील निवडसूचीत समावेशन करण्याची कार्यवाही प्रथम करावी.</td><td>होय/नाही</td></tr>
<tr><td>५.</td><td>प्रस्तावासोबत उपलब्ध रिक्त पदांवरील आरक्षणाला सा.प्र.वि/मागास वर्ग कक्षाच्या मान्यतेची टिप्पणी सादर केली आहे काय ?</td><td>होय/नाही</td></tr>
<tr><td>६.</td><td colspan="2">सामान्य प्रशासन विभागाच्या मागास वर्ग कक्षाने निश्चित केलेले आरक्षण
<table>
<tr><td rowspan="2">निवडसूचीवर पदोन्नतीची रिक्त पदे</td><td colspan="8">सा.प्र.वि मागास वर्ग कक्षाने निश्चित केलेले आरक्षण</td></tr>
<tr><td>अ.जा.</td><td>अ.ज.</td><td>वि.जा. (अ)</td><td>भ.ज. (ब)</td><td>भ.ज. (क)</td><td>भ.ज. (ड)</td><td>वि.मा. प्र .</td><td>खुला</td></tr>
<tr><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
</table></td></tr>
<tr><td>७.</td><td>पदोन्नतीच्या पदाच्या सेवा प्रवेश नियमांची/सुधारित सेवा प्रवेश नियमांची प्रत सोबत जोडली आहे काय ? सदर सेवा प्रवेश नियम/सुधारित सेवा प्रवेश नियम अधिसूचित केल्याची तारीख</td><td>होय/नाही<br>दि. ...........</td></tr>
<tr><td>८.</td><td>(१) ज्येष्ठतासूचीत विचारक्षेत्रातील सर्व अधिकाऱ्यांचा समावेश आहे किंवा कसे?</td><td>होय/नाही</td></tr>
</table>

(२) निम्न संवर्गाच्या सोबत जोडलेल्या अंतिम जेष्ठतायादीचा तपशिल

| ज्येष्ठता सूची प्रसिध्द दिनांक | ज्येष्ठता सूची कोणत्या दिनांकाच्या स्थितीस अनुसरुन प्रसिध्द केली आहे तो दिनांक |
|---|---|
| | |

| | | |
|---|---|---|
| | (३) या ज्येष्ठतासूचीतील जे अधिकारी/कर्मचारी पूर्वीच सेवानिवृत्त, पदोन्नत, निधन झाले असतील वा राजीनामा दिला आहे, त्यांची नोंद केली आहे काय ? | होय/नाही |
| | (४) ही ज्येष्ठतासूची योग्य असल्याचे संबंधित विभागाच्या/कार्यालयाच्या आस्थापना अधिकारी यांनी प्रमाणित केली आहे काय ? | होय/नाही |
| | (५) वरील ज्येष्ठतासूचीबाबत प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत काय ?<br>असल्यास न्यायालयाचे स्थगिती वा अन्य आदेश आहेत काय ? | होय/नाही<br>होय/नाही |

(६) प्रसिध्द केलेल्या ज्येष्ठता सूच्यांबाबत न्यायालयात प्रलंबित असलेल्या प्रकरणांचा तपशील :-

| मूळ अर्ज/याचिका क्रमांक | याचिकाकर्त्याचे नाव | याचिकेतील मागणीचे थोडक्यात स्वरुप | सद्य:स्थिती |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |

| | | |
|---|---|---|
| ९. | विचार क्षेत्रातील सर्व अधिकाऱ्याचे पदोन्नतीसाठी विचारात घ्यावयाचे सलग ५ वर्षाचे गोपनीय अहवाल परिपूर्ण आहेत काय? | होय/नाही |
| १०. | विचारक्षेत्रातील अधिकाऱ्यांच्या अलिकडच्या ५ वर्षाचे गोपनीय अहवालातील प्रतिकुल/पदोन्नतीच्या आड येणारे शेरे संबंधितांना कळविल्याच्या प्रती तसेच, त्यावर त्यांच्याकडून प्राप्त झालेल्या अभिवेदनावर घेतलेल्या निर्णयाच्या प्रती गोपनीय अहवाल धारिकेत समाविष्ट करुन परिपूर्ण गोपनीय अहवाल धारिका सादर केल्या आहेत काय ? (अलिकडच्या ५ वर्षाच्या गोपनीय अहवालांना वर्षवार पताका लावण्यात याव्यात) | होय/नाही |
| ११. | विचारक्षेत्रातील सर्व मागासवर्गीय अधिकाऱ्यांची जात प्रमाणपत्र पडताळणी झाली आहे काय?<br>मागासवर्गातील सर्व अधिकाऱ्यांच्या जाती वैधता प्रमाणपत्राच्या **साक्षांकित** प्रती सोबत जोडल्या आहेत काय? | होय/नाही<br>होय/नाही |
| १२. | विचारक्षेत्रात असलेल्या सर्व अधिकाऱ्यांचे वयाच्या ५०/५५ व्या वर्षी पुनर्विलोकन झाले आहे काय? | होय/नाही |
| १३. | विचारक्षेत्रात असलेल्या सर्व अधिकाऱ्यांनी संगणक अर्हता प्रमाणपत्र सादर केले आहे काय किंवा त्यातून सूट मिळाली आहे काय? | होय/नाही |

| | | |
|---|---|---|
| १४. | विचारक्षेत्रात असलेल्या सर्व अधिकाऱ्यांनी सेवा प्रवेश नियमानुसार विभागीय परीक्षा (असल्यास) / व्यावसायिक परीक्षा (असल्यास)/ पदोन्नतीच्या पदासाठीची परीक्षा (असल्यास) उत्तीर्ण केली आहे काय? | होय/नाही/लागू नाही |
| १५. | विचारक्षेत्रात असलेल्या सर्व अधिकाऱ्यांनी परिविक्षाधीन कालावधी (असल्यास) समाधानकारकरित्या पूर्ण केला आहे किंवा कसे, त्याबाबतचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत काय? | होय/नाही/लागू नाही |
| १६. | विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु असलेल्या विचारक्षेत्रातील अधिकाऱ्यांची त्याबाबतची सद्य:स्थितीची थोडक्यात माहिती सादर केली आहे काय? | होय/नाही |
| १७. | विचारक्षेत्रात असलेल्या अधिकाऱ्यांपैकी कोणाविरुध्द **शिक्षेची अंमलबजावणी** चालू आहे काय? | होय/नाही |
| १८. | अनुभवाची अट शिथिल करुन पदोन्नती देण्याचा प्रस्ताव असल्यास शिथिलीकरणास अ.मु.स./प्र.स. (सेवा) यांच्या अध्यक्षतेखालील समितीची मान्यता आहे काय?<br>मान्यतेची प्रत सोबत जोडली आहे काय? | होय/नाही<br>होय/नाही |
| १९. | सदर पदावर पदोन्नतीसाठी या पूर्वीच्या निवडसूचीबाबत आस्थापना मंडळाच्या शिफारशीसंबंधीच्या पत्राची प्रत सोबत जोडली आहे काय? | होय/नाही |
| २०. | विचारक्षेत्रात असलेल्या सर्व अधिकाऱ्यांनी सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: वशिअ-१२१४/प्र.क्र.२६/११ दि.२.६.२०१४ च्या शासन निर्णयानुसार चालू वर्षापर्यंतचे मत्ता व दायित्वे विवरणपत्र सादर केली आहेत काय? | होय/नाही |

२१. आस्थापना मंडळाने पदोन्नतीसाठी **यापूर्वी शिफारस** केलेल्या अधिकाऱ्यांपैकी ज्या अधिकाऱ्यांची विभागीय चौकशी/शिक्षा सुरु असलेली प्रकरणे मोहोरबंद पाकिटात ठेवण्यात आली असल्यास त्यांचा तपशील :-

| क्र. | अधिकाऱ्याचे नाव | आस्थापना मंडळाच्या शिफारशीबाबतचे पत्र क्रमांक व दिनांक | निवडसूची वर्ष |
|---|---|---|---|
| | | | |

२२. आस्थापना मंडळाने यापूर्वी माहिती प्राप्त न झाल्याच्या आधारे जी प्रकरणे खुली ठेवली आहेत त्याचा तपशील :-

| क्र. | अधिकाऱ्याचे नाव | आस्थापना मंडळाच्या शिफारशीबाबतचे पत्र क्रमांक व दिनांक | निवडसूची वर्ष |
|---|---|---|---|
| | | | |

२३. (१) आस्थापना मंडळाने पदोन्नतीसाठी **यापूर्वी शिफारस केलेल्या** अधिकाऱ्यांपैकी ज्या अधिकाऱ्यांना पदोन्नती देण्यात आली नाही किंवा नाकारली आहे त्यांचा तपशील :-

| क्र. | अधिकाऱ्याचे नाव | आस्थापना मंडळाच्या शिफारशीबाबतचे पत्र क्रमांक व दिनांक | निवडसूची वर्ष | पदोन्नती न देण्यात आल्याचे/स्वत: नाकारण्याचे कारण |
|---|---|---|---|---|
| | | | | |

| | | |
|---|---|---|
| | (२) सामान्य प्रशासन विभागाच्या दि. १२.०९.२०१६ च्या शासन निर्णयानुसार, पदोन्ती नाकारल्याने पदोन्नतीसाठी विचार न झालेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांचा त्यासंबंधीचा अर्ज सोबत जोडला आहे काय? | होय/नाही |
| | (३) पदोन्नती कायमस्वरुपी नाकारली किंवा किती कालावधीकरिता नाकरली याचा स्पष्ट उल्लेख अर्जात केला आहे का?<br>नसल्यास ते स्पष्ट करुन घ्यावे. | होय/नाही |
| २४. | वरील माहिती व्यतिरिक्त आस्थापना मंडळापुढे सादर करण्यायोग्य असलेली माहिती<br>१) -----------------------------------------(पृ.क्र. )<br>२)------------------------------------------(पृ.क्र. )<br>३)------------------------------------------(पृ.क्र. ) | |
| | | |

**दिनांक –**

**प्रस्ताव पाठविणाऱ्या संबंधित सह / उप सचिव (आस्थापना)**
**यांचे नाव, पदनाम व सही**

**फोन कार्यालय :**
**मोबाईल :**

शासन निर्णय, क्रमांक: एसआरव्ही २०१८/प्र.क्र.१५९/का.१२, दि. १ ऑगस्ट,२०१९ सोबतचे

## “परिशिष्ट-२”

### जोडपत्र-ब

### प्रस्तावित निवडसूचीत समाविष्ट करण्यासाठी खुल्या तसेच मागासवर्गीयांच्या विविध प्रवर्गातील अधिकाऱ्यांची निवड करण्यासाठी प्रवर्गनिहाय विचारक्षेत्रात येणारे अधिकारी व त्यांचा तपशील

**(खुला प्रवर्ग, अनुसूचीत जाती, अनुसूचीत जमाती, विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), विशेष मागास प्रवर्ग या क्रमाने )**

| अ. क्र. | ज्येष्ठतेनुसार विचार क्षेत्रात येणाऱ्या अधिकाऱ्यांचा जाती प्रवर्ग | ज्येष्ठतेनुसार विचारक्षेत्रातील प्रवर्गनिहाय अधिकाऱ्यांची नावे | ज्येष्ठता सूचीतील ज्येष्ठता क्रमांक | जन्म दिनांक व सध्याचे वय | सेवानिवृत्तीचा दिनांक | शैक्षणिक अर्हता | सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार पदोन्नतीसाठी अर्हताप्राप्त आहे/नाही | ज्या पदावरुन पुढील पदावर पदोन्नती देय आहे त्या पदावर एकूण सेवा किती व केव्हापासून | सध्याच्या पदावर जेव्हापासून सलग काम करीत आहे तो दिनांक (त्या पदाचे नाव द्यावे) पदोन्नतीचा मानीव दिनांक दिला असल्यास तो नमूद करावा | वयाच्या ५०/५५ व्या वर्षी झालेल्या पुनर्विलोकनाचा निर्णय | जातीचे प्रमाणपत्राची वैधता प्राप्त झाली आहे किंवा कसे? | शिस्तभंग विषयक कार्यवाही/प्राथमिक चौकशी चालू आहे/नाही (विस्तृत माहिती जोडपत्र क मध्ये नमूद करावी.) | पूर्वी कधीतरी आस्थापना मंडळाने त्यांचा विचार केला होता/नाही असल्यास आ.मं.च्या बैठकीचा दिनांक व सा.प्र.वि चा संबंधित पत्रव्यवहार नमूद करावा. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| | | खुला प्रवर्ग | | | | | | | | | | | |

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | | | |
| | | अनुसूचीत जाती | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | अनुसूचीत जमाती | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | विमुक्त जाती (अ) | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | भटक्या जमाती (ब) | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | भटक्या जमाती (क) | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | भटक्या जमाती (ड) | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | विशेष मागास प्रवर्ग | | | | | | | | | | | |

**दिनांक :**

**प्रस्ताव पाठविणाऱ्या संबंधित सह/ उप सचिव (आस्थापना) यांची सही**

## "परिशिष्ट-२"

### जोडपत्र : क
### विचारक्षेत्रातील अधिकाऱ्यांची वैयक्तिक सेवाविषयक माहिती

| | | |
|---|---|---|
| १ | अधिकाऱ्याचे नाव | |
| २ | शासनाच्या सेवेतील प्रथम नेमणूकीचा दिनांक | |
| ३ | गट अ चे पद जेव्हापासून सलग धारण करीत आहे तो दिनांक व त्या पदाचे नाव | |
| ४ | गेल्या दहा वर्षाच्या कालावधीपासून आतापर्यंत ते धारण करीत असलेल्या सर्व पदांचा तपशील | |
| ५ | अनिवार्य प्रशिक्षण पूर्ण केले आहे का?<br>असल्यास तपशील | |
| ६ | अन्य घेतलेल्या प्रशिक्षणाचा तपशील | |
| ७ | सेवेमध्ये असताना केलेली उल्लेखनीय कामगिरी | |
| ८ | विभागीय व शिस्तभंगविषयक कार्यवाही सुरु आहे का? असल्यास दोषारोपांची थोडक्यात माहिती व चौकशीची सद्य:स्थिती | |
| ९ | i) पूर्वी झालेल्या चौकशीअंती शिक्षा दिली असल्यास शिक्षेची अंमलबजावणी चालू आहे का? | |
| | ii) शिक्षेची स्वरुप काय? शिक्षेचा अंमल कधीपर्यंत आहे? | |
| १० | अधिकाऱ्यांची सचोटी संशयास्पद आहे का? असल्यास त्याबाबतचा तपशील द्यावा व संबंधित चौकशीच्या अहवालाची प्रत सोबत जोडावी. | |
| ११ | सदर अधिकाऱ्याबाबत काही अतिरिक्त गोपनीय किंवा विशेष माहिती (गुणदोषांसह) आस्थापना मंडळाच्या निदर्शनास आणावयाची असल्यास तशी माहिती | |
| १२ | काही न्यायालयीन प्रकरणे असल्यास त्याबाबतची सद्य:स्थिती. | |

**दिनांक :** **प्रस्ताव पाठविणाऱ्या संबंधित सह/ उप सचिव (आस्थापना) यांची सही**

## “परिशिष्ट-२”

### जोडपत्र : ड
### विचारक्षेत्रातील अधिकाऱ्यांच्या गोपनीय अहवालांबाबतची माहिती

| | | |
|---|---|---|
| १ | अधिकाऱ्याचे नाव | |
| २ | अधिकाऱ्याची गोपनीय अहवाल नस्ती अद्ययावत आहेत का? | |
| ३ | नसल्यास, गोपनीय अहवाल कोणत्या कालावधीसाठी उपलब्ध नाहीत? | |
| ४ | उपलब्ध नसलेले गोपनीय अहवाल किती कालावधीत उपलब्ध करुन देण्यात येतील? | |
| ५ | गोपनीय अहवाल उपलब्ध होऊ शकत नाहीत त्याबद्दलची विहित नमुन्यातील सकारण प्रमाणपत्रे नस्तीत योग्य ठिकाणी ठेवलेली आहेत काय? | |
| ६ | गोपनीय अहवालाच्या प्रती संबंधित अधिका-यांना देऊन त्याची पोच मूळ गोपनीय अहवालावर घेण्यात आली आहे काय? (सन २०११-१२ पूर्वीच्या गोपनीय अहवालातील प्रतिकूल/टिकात्मक/सूचनात्मक तसेच पदोन्नतीला बाधा येणारे शेरे असल्यास ते संबंधित अधिकाऱ्यास कळविण्यात आले आहेत काय?) | |
| ७ | गोपनीय अहवालातील शेऱ्यांविरुध्द संबंधित अधिकाऱ्याने अभिवेदन सादर केले आहे का? | |
| ८ | प्रतिकूल/सूचनात्मक/पदोन्नतीच्या आड येणाऱ्या शेऱ्यांविरुध्दचे अभिवेदनावर घेतलेल्या निर्णयाची प्रत गोपनीय अहवाल धारिकेत योग्य ठिकाणी समाविष्ट केली आहे काय? | |

| | | |
|---|---|---|
| ९ | असे अभिवेदन विचाराधीन असेल तर त्याबाबतची सद्यस्थिती व त्यावर अंतिम निर्णय घेण्यासाठी अपेक्षित कालावधी | |

**दिनांक :** **प्रस्ताव पाठविणाऱ्या संबंधित सह/ उप सचिव (आस्थापना) यांची सही**

शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-२०१८/प्र.क्र.१५९/का.१२, दिनांक १ ऑगस्ट, २०१९ सोबतचे

## परिशिष्ट- ३

### पदोन्नतीची प्रक्रिया वेळेवर पूर्ण होण्याच्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाहीबाबतचे वेळापत्रक

| अ. क्र. | दरवर्षी कार्यवाही पूर्ण करण्याची अंतिम तारीख | मुद्दा | करावयाची कार्यवाही |
|---|---|---|---|
| **टप्पा- क्र (I):-पदोन्नतीचे प्रस्ताव आस्थापना मंडळ/विभागीय पदोन्नती समितीसमोर सादर करण्यासाठीची प्राथमिक कार्यवाही** | | | |
